म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ७७९

# साहित्यकौमुदी

विद्याधर वामन भिडे

किंमत १ रुपया

# साहित्यकौमुदी

मम्मटाच्या काव्यप्रकाशाच्या पांच उल्लासांचें
पद्यरूप लक्षणांसह मराठींत
संक्षिप्त निरूपण

क्र. ९६५३२
सं. भाषा. 12
23/11/32

हें पुस्तक

**विद्याधर वामन भिडे**

“ महाराष्ट्र भाषेचा सरस्वतीकोश, ” “ मराठी [illegible] उद्घाटन, ” “ मराठी म्हणींविषयीं चार शब्द, ”
“ मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०, ”
“अर्थालंकारांचें निरूपण,” “ राघवीय-परीवाह, ” इत्यादि पुस्तकांचे कर्ते

ह्यांनीं रचिलें,

तें

चित्रशाळा प्रेस, पुणें, येथें छापून प्रसिद्ध केलें

इसवी सन १९३२

---

किंमत १ रुपाया

मुद्रक व प्रकाशक—
शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

सात आठ वर्षांच्या मागें आम्ही "अर्थालंकारांचें निरूपण" ह्या नांवाचें साहित्यशास्त्रावर एक पुस्तक रचिलें, त्याची दुसरी आवृत्ति छापल्यालाही आठ दहा महिने होऊन गेले पुस्तकाला इतक्या थोड्या अवधींत दुसरी आवृत्ति लागली, त्यावरून ह्या पुस्तकाचा उपयोग शाळांतील आणि कालेजांतील विद्यार्थ्यांना आणि रसिक वाचकांना होत आहे, हें उघड आहे

२ हें पुस्तक लोकांच्या आदराला पात्र झालेलें पाहून आम्हाला साहित्यशास्त्रावर आणखी एक आणि अधिक मोठा ग्रंथ लिहिण्याची हौस वाटून आम्ही "साहित्य-कौमुदी" हा ग्रंथ रचून वाचकांना सादर करीत आहों

३ आमच्या "अर्थालंकारांचें निरूपण" ह्या ग्रंथांत मम्मटाच्या "काव्य-प्रकाश" ह्या नावाच्या जगद्विख्यात ग्रंथाच्या दहाव्या उल्लासानें मुख्यत्वेंकरून निरूपण केलेलें असून पहिल्या आणि दुसऱ्या उल्लासाचें गौणत्वानें निरूपण करून तें उपोद्घाताच्या रूपानें ग्रंथास आरंभीं जोडिलें आहे साहित्यकौमुदी ह्या प्रस्तुत पुस्तकांत काव्यप्रकाशाच्या दहाच्या दहा उल्लासांचें निरूपण करावयाचें आम्ही योजिलें आहे या दहा उल्लासांपैकीं पहिल्या हप्त्याला पहिला, दुसरा, तिसरा, नववा, आणि दहावा, अशा पांच उल्लासांचें ह्या आमच्या साहित्यकौमुदींत निरूपण करून बाकीच्या पांच उल्लासांचें निरूपण धनकालादिकाच्या आनुकूल्यावर आम्ही सोंपवीत आहों

४ साहित्यकौमुदी ह्या पुस्तकांतील विवरणाची शैली कशी आहे हें सांगितलें पाहिजे. साहित्यशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचें लक्षण संस्कृत आलंकारिकांच्या सरणीनें पद्यांत दिलें आहे नंतर ह्या पद्याचा गद्यांत उलगडा केला आहे नंतर उदाहरणें देऊन त्यांचा अनुवाद करून तीं उदाहरणें लक्षणांना जुळवून दाखविलीं आहेत. यानंतर कांहीं टिपणें देणें जरूर वाटल्यास टिपणें दिलीं आहेत पारिभाषिक शब्दांचीं लक्षणें पद्यांत दिलेलीं असल्याकारणानें तीं विद्यार्थ्यांना लक्षांत ठेवण्याची विशेष सोय ह्या साहित्यकौमुदीनें होईल अशी आम्हाला आशा आहे.

५ प्राचीन काळीं विषयाचें विवरण शक्य तितक्या थोडक्या शब्दांत करण्याची ग्रंथकर्त्याला आवश्यकता असल्याकारणानें मम्मटादि साहित्यशास्त्रावर रचना करणारांनीं पारिभाषिक शब्दांचीं लक्षणें पद्यपादांत, पद्यार्धांत, किंवा अन्य प्रकारें अपूर्ण पद्यांत दिलीं आहेत ह्या ठासीव रचनेमुळें पुष्कळ ठिकाणीं वादग्रस्तता, दुर्बोधता, आणि संदिग्धता, ह्यांना अवसर मिळालेला आहे. आम्हाला अशी ठासीव रचना करण्याची आवश्यकता नसल्याकारणानें आम्हीं सबंध पद्यांत एक एक पारिभाषिक शब्द लक्षिला आहे एका पद्यांत एकाहून अधिक पारिभाषिक शब्द आम्ही लक्षिले नाहींत. ह्यामुळें एका पारिभाषिक शब्दाचें लक्षण समाप्त झाल्यावर जर पद्याची कांहीं जागा शिल्लक राहिली असली, तर ती "असें पंडित म्हणतात" इत्यादि सारखे शब्द घालून भरून काढिली आहे. अशी रचना अर्वाचीन काळच्या विद्यार्थ्याला सोयीची वाटेल असें आमचें मत आहे.

६ दुसरें असें कीं लक्षणांच्या स्पष्टीकरणार्थ जीं पद्यें आम्ही दिलीं आहेत, तीं लक्षणांशीं जुळणारीं नाहींत असें कदाचित् घडलेलें असणें संभवनीय आहे अशा जातीचे दोष जर कोणी तज्ज्ञानें दाखवून दिले, तर आम्ही त्यांचे उपकार मानून दुरुस्त्या करावयास सिद्ध आहों.

७ साहित्यकौमुदींत उदाहरणार्थ दिलेलीं बहुतेक पद्यें आमच्या स्वताच्याच काव्यांतून उद्धृत केलेलीं आहेत, किंवा प्रसंगासाठीं नवीन बनवलेलीं आहेत. "अर्थालंकारांचें निरूपण" आणि "साहित्यकौमुदी" ह्या दोन पुस्तकांत विषयाच्या विवरणासाठीं दिलेलीं उदाहरणपद्यें भिन्न भिन्न असल्याकारणानें तीं दोन्हीं पुस्तकें संग्रहीं ठेवणाऱ्याला विषयाचा उलगडा साहजिकपणें चांगला होईल. जें एका पुस्तकांत त्याला दुर्बोध वाटेल तें दुसऱ्या पुस्तकांत सुबोध होईल.

८ आम्ही "मराठी म्हणींविषयीं चार शब्द," "मराठी शब्दांचें उद्घाटन," "अर्थालंकारांचें निरूपण," इत्यादि भाषा, अलंकार, शब्द, इत्यादिकांच्या शास्त्रांवर कांहीं पुस्तकें रचिलीं. तसेंच आम्ही आजपर्यंत पुष्कळ कविता रचिली तीही आज कित्येक वर्षें महाराष्ट्रीयांच्या पुढें आहे. परंतु शास्त्र आणि कविता यांच्या संयोगानें रचिलेलें हें "साहित्यकौमुदी" पुस्तक महाराष्ट्रीयांना सादर करण्यांत आम्हाला बरीच कचर वाटत आहे स्वतंत्रपणें साहित्यशास्त्रावर गद्यांत रचना करणें, आणि स्वतंत्रपणें स्वीकारलेल्या विषयावर कविता करणें, ह्या दोन्ही गोष्टी परस्परांहून भिन्न आहेत, आणि एकीचा संबंध दुसरीशीं बिलकूल येत नाहीं. ह्या कारणामुळें लेखकाला पूर्ण स्वातन्त्र्य असतें, आणि लेखकाच्या सोयीप्रमाणें रचना करावयाला त्याला पूर्ण अवसर असतो. परंतु "साहित्यकौमुदी" ह्या पुस्तकाची गोष्ट तशी नाहीं शास्त्राचीं सर्व प्रमेयें अबाधित रीतीनें सांगण्याची एक नियंत्रणा आम्हांला असतां कवितेच्या नियमाची आणखी नियंत्रणा भरतीला आल्यानें काम फारच कठिण होतें डोळा फुटूं नये आणि काडी मोडूं नये अशा पेंचाच्या स्थितींतून वाट काढण्याचें साहस आम्ही ह्या पुस्तकांत करीत आहों. ह्या पुस्तकाची रचना चाललेली असतां ह्या दोन्ही प्रकारच्या नियंत्रणा आम्हाला पदोंपदीं नडवीत होत्या. ह्या दोन प्रकारच्या अडचणींत आमचा मार्ग कुंठित होई, तेव्हां आम्ही कवितेच्या नियंत्रणाकडे काणाडोळा करून शास्त्राच्या शुद्धतेला बलीयस्त्वाचा मान दिला आहे ह्या कारणामुळें आमचें हें काम कसें काय वठलेलें असेल हें आम्हांला खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. परंतु हें काम बरेंचसें चांगलें वठलें आहे असें महाराष्ट्रीयांचें मत ठरलें, तर काव्यप्रकाशाच्या उरलेल्या पाच उल्लासांवर ह्याच सरणीनें रचना करण्याची आमची उमेद आहे त्यांत काव्यांतील रस, काव्यांतील गुण, काव्यांतील दोष, ध्वनि, इत्यादिकांचें आम्ही विवरण करूं.

९ ह्या आमच्या पुस्तकांत झालेले कोणत्याही प्रकारचे दोष तज्ज्ञांनी आमच्या आमच्या नजरेस आणून दिले, किंवा अन्य कांहीं सुधारणा सुचविल्या, तर आम्ही त्यांचे उपकृत होऊं, आणि तदनुरोधानें आमच्या पुस्तकांत सुधारणा करूं

१० ह्या पुस्तकांत जे पारिभाषिक शब्द आम्ही विषयाच्या अनुरोधानें लक्षिले आहेत, त्यांची एक सूची, आणि उदाहरणार्थ दिलेलीं जीं पद्यें त्यांची एक सूची, अशा दोन सूची ह्या ग्रंथाच्या शेवटीं जोडल्या आहेत तेणेंकरून विद्यार्थ्याला एकादा विशिष्ट पारिभाषिक शब्द किंवा पद्य तावडतोब पाहतां येण्याची सोय झाली आहे.

११ "साहित्यकौमुदी" ह्या पुस्तकासंबंधाची सर्व प्रकारची जबाबदारी चित्रशाळेचे साहसी आणि उत्साही मालक रा० रा० वासुदेव गणेश जोशी, यांनीं आपल्या शिरावर घेतली ह्याबद्दल आम्ही त्यांचे उपकृत आहों हें सांगावयाला आम्हाला आनंद वाटत आहे

पुणें ७३५ सदाशिव पेठ,<br>१५ नोव्हेंबर १९३२

**विद्याधर वामन भिडे,**<br>**कर्ता**

८८८८
१८७३८
सं. गा. ग्रं. ९२४
२३/११/३२

# साहित्यकौमुदी

साहित्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला कांहीं पारिभाषिक शब्द माहीत असणें आवश्यक आहे म्हणून आम्ही मुख्य मुख्य पारिभाषिक शब्दांचीं लक्षणें संक्षेपानें देतों.

लक्षण; वृत्त आर्या.

**काव्यनियमशब्दरसालंकृतिगुणदोषहेतुफल ज्यांत–।**
**असतें निरूपिलेलें त्याला " साहित्यशास्त्र " म्हणतात॥ १ ॥**

काव्य म्हणजे काय, काव्यासंबंधाचें नियम, काव्यांतील शब्द, रस, काव्याचे अलंकार, काव्यातील गुण आणि दोष, काव्य रचण्याचे उद्देश, आणि काव्याचें फल, इत्यादि विषयांचें निरूपण ज्या शास्त्रांत केलेलें असतें, त्याला " साहित्यशास्त्र " असें म्हणतात.

लक्षण; वृत्त आर्या

**म्हणिजे " काव्य " बुधें तो शब्द रसिक जो जनास आनंद–।**
**देई प्रतिक्षणीं नव, भृंगाला विचक जेंवि माकंद ॥ २ ॥**

फुललेला आम्रवृक्ष भ्रमराला जसा आनंद देतो, तसा सहृदय माणसाला क्षणों-क्षणीं नवा नवा आनंद देतो, त्या शब्दाला " काव्य " असें म्हणतात. ह्या लक्षणांतील " शब्द " ह्याचा अर्थ वाक्य किंवा वाक्यसमूह असा घ्यावयाचा.

लक्षण, वृत्त आर्या.

**सार्थ असें एकाक्षर किंवा एकाधिकाक्षरसमूह ।**
**म्हणिजेइ " शब्द ", सैनिकबंध सहेतुक रणीं जसा व्यूह॥ ३ ॥**

ज्याला कांहीं अर्थ आहे असें एक अक्षर, किंवा एकाहून अधिक अक्षरांचा समूह, याला शब्द असें म्हणतात,– लढाईच्या भूमीवर शिपायांची कांहीं विशिष्ट उद्देशानें केलेली जी रचना तिला जसें " व्यूह " म्हणतात तसें

च (=केवल), ही (= सुद्धा), न (=एकही शब्द), ढ (=मूर्ख), ग (=गर्व, गाची बाधा इ० प्रयोगांत), हे एकाक्षरी शब्द होत. घर, समुद्र, भागीरथी, इ० हे अनेकाक्षरी शब्द होत.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**वाच्य, लक्ष्य, व्यंग्य, असे शब्दांचे अर्थ तीन ते ।**
**तीन शक्तींमुळें शब्दीं येती तज्ञांचिया मतें ॥ ४ ॥**

वाच्य, लक्ष्य, आणि व्यंग्य, असे शब्दांचे तीन प्रकारचे अर्थ असतात, आणि ते तीन अर्थ शब्दांना तीन शक्तींमुळें येतात.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**वाच्य अर्थास अभिधा, लक्ष्य अर्थास लक्षणा, ।**
**व्यंजना व्यंग्य अर्थास असे हेतु असें म्हणा ॥ ५ ॥**

शब्दाचा जो वाच्य अर्थ तो त्याला अभिधा शक्तीनें प्राप्त होतो,लक्ष्य अर्थ लक्षणा शक्तीनें प्राप्त होतो, आणि व्यंग्य अर्थ व्यंजनाशक्तीनें प्राप्त होतो.

शब्दाचे ठायीं अभिधा या नांवाची शक्ति असते तिचे सामर्थ्यानें त्या शब्दाला त्याचा वाच्य अर्थ प्राप्त होतो, लक्षणा शक्तीच्या सामर्थ्यानें लक्ष्य अर्थ प्राप्त होतो, आणि व्यंजना शक्तीच्या सामर्थ्यानें व्यंग्य अर्थ प्राप्त होतो.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**शब्दोच्चारणमात्रें जो अर्थ येई मनामधीं ।**
**त्याला म्हणति "वाच्यार्थ" किंवा "मुख्यार्थ"ही मधी ॥ ६ ॥**

शब्द उच्चारल्याबरोबर जो अर्थ आपल्या मनांत येतो, तो त्या शब्दाचा "वाच्यार्थ." त्याच अर्थाला "मुख्यार्थ" असें दुसरें नांव आहे. शब्दाचा हा जो वाच्यार्थ, तो लोकांच्या संकेतावरून त्याला प्राप्त झालेला असतो, म्हणून त्याला "सांकेतिक अर्थ "असेंही म्हणतात.

"गंगा" त्या शब्दाचा वाच्यार्थ "एका विशिष्ट स्थानापासून उत्पन्न होऊन विशिष्ट मार्गानें वाहात जाणारा पाण्याचा प्रवाह" असा आहे. तसेंच "भाला" त्या शब्दाचा वाच्यार्थ "अग्राला तीक्ष्ण धारेचा विशिष्ट आकाराचा पोलादी तुकडा जिला बसविला आहे अशी लढण्याच्या उपयोगाची काठी."

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**मुख्यार्थबाध मुख्यार्थी जुळता अर्थ येतसे—।**
**रूढिप्रयोजनवशें शब्दा "लक्ष्यार्थ" तो असे ॥ ७ ॥**

वाक्यामध्यें एकाद्या शब्दाचा मुख्य म्हणजे वाच्य अर्थ जर त्या वाक्यामध्यें बाधित होत असला, म्हणजे लागू पडण्याजोगा नसला, तर त्या प्रसंगीं आपल्याला त्या शब्दाचा जो अर्थ करावा लागतो, त्याला त्या शब्दाचा "लक्ष्यार्थ" असें म्हणतात. परंतु हा जो अर्थ आपण घेतों, त्या अर्थाचा मुख्य अर्थाशीं कोणच्या तरी प्रकारचा संबंध असला पाहिजे, आणि तसा त्या शब्दाचा अर्थ घ्यावयाची रूढि तरी असली पाहिजे, किंवा तसा अर्थ घेण्यामध्यें आपला कांहीं तरी हेतु असला पाहिजे

"कुशल" त्या शब्दाचा वाच्य किंवा मुख्य अर्थ कुश गवत तोडणारा असा आहे. परंतु "तो चित्रें काढण्यांत कुशल आहे". त्या वाक्यांत कुश गवत तोडण्याच्या

क्रियेचा कांहीं संबंध नाहीं. कुश गवत तोडण्याला जशी हुशारी लागते, तशी त्याच्या अंगांत आहे असें म्हणण्याचा आपला उद्देश असतो. म्हणून "कुशल" ह्या शब्दाचा "हुशार" असा आपण अर्थ घेतों, आणि असा अर्थ घेण्याची रूढि आहे. म्हणजे "कुशल" हा शब्द "हुशार" ह्या अर्थी रूढ आहे.

कुश गवत तोडणें आणि चित्रें काढणें, ह्या दोन क्रियांत जो संबंध आहे त्याच्या जोरावर आपण "कुशल" ह्याचा "हुशार" असा अर्थ करतों हाच "कुशल" ह्या शब्दाचा लक्ष्यार्थ होय.

"निष्णात" या शब्दाचा वाच्यार्थ "पाण्यांत बुडी मारून सर्व गात्रें भिजतील अशा प्रकारें ज्यानें आंघोळ केली आहे तो." "रामाचार्य मीमांसेंत निष्णात आहेत" ह्या वाक्यांत अंघोळ करणें ही क्रिया शक्य नाहीं, पण पूर्णपणें खोल गेलेला किंवा बुडलेला इतकाच अर्थ घेऊन आपण "निष्णात" ह्याचा अर्थ त्या शास्त्रांत खोल गेलेला म्हणजे तें शास्त्र पूर्णपणें पढलेला असा घेतों. "निष्णात" ह्या शब्दाचा वाच्यार्थ टाकून देऊन आपण "पूर्णपणें पढलेला" असा जो अर्थ घेतों, तो "लक्ष्यार्थ," आणि असा अर्थ आपण रूढीच्या जोरावर घेतों येथें रूढीवरून लक्षणा झाली आहे.

"गंगेवर गौळवाडा आहे" ह्या वाक्यात "गंगा" ह्या शब्दाचा मुख्यार्थ म्हणजे वाच्यार्थ घेणें शक्य नाहीं, कारण पाण्याच्या प्रवाहावर गौळवाडा वसलेला असणें शक्य नाहीं. येथें मुख्यार्थ बाधित होत आहे. म्हणून "गंगा" ह्या शब्दाचा अर्थ "गंगेचा कांठ" असा आपण घेतों. "गंगा" ह्या शब्दाचा "कांठ" असा जो अर्थ आपण घेतों, तो "गंगा" ह्या शब्दाचा लक्ष्यार्थ होय. "गंगा" ह्या शब्दाचा "प्रवाह" हा मुख्यार्थ आणि "तट" हा येथें आपण घेतों तो अर्थ लक्ष्यार्थ. ह्या दोन अर्थांत सान्निध्यरूप संबंध आहे, आणि "गंगा" ह्याचा "तट" हा अर्थ करण्यांत तेथील शैत्य, पावनत्व, इत्यादि धर्मांची प्रतीति करून यावी असा आपला उद्देश आहे, म्हणून "गंगेवर गौळवाडा आहे" हें वाक्य आपण योजतों.

"गंगा" ह्या शब्दाचा "प्रवाह" असा अर्थ न घेतां आपण "तट" हा अर्थ घेतों. कारण प्रवाहावर गौळवाडा वसणें शक्य नाहीं, म्हणजे मुख्यार्थाला बाध येत आहे. "प्रवाह" आणि "तट" ह्या दोहोंत सान्निध्यरूप संबंध आहे, आणि तसा अर्थ घेण्यांत शैत्यपावनत्वादि धर्मांचें अस्तित्व कथन करावें असा आपला उद्देश आहे लक्षणा करावयाला मुख्यार्थबाध, मुख्यार्थयोग, आणि उद्देश, ह्या तीन गोष्टी येथें उपस्थित आहेत. "गंगेवर गौळवाडा आहे" ह्या वाक्यांत प्रयोजनावरून लक्षणा झाली आहे

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**अंगीं शब्दाचिया जाणा लक्षणा न क्रिया वसे ।**
**क्रिया आरोपिलेली ती, शब्दीं कल्पित ती असे ॥ ८ ॥**

लक्षणा ही जी क्रिया ती शब्दाच्या अंगची नव्हे. ती क्रिया शब्दावर आरोपित केलेली असते, म्हणजे ती क्रिया त्या प्रसंगापुरती त्या शब्दाचे ठायीं कल्पिलेली असते.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**शुद्धा गौणी असे दोन लक्षणेचे प्रकार ते—।**
**अनेकभेद असती साहित्यज्ञांचिया मतें ॥ ९ ॥**

[ अनेकभेद म्हणजे अनेक आहेत भेद क्रिं० वर्ग ज्यांत असे ( प्रकार ) ]

लक्षणेचे दोन प्रकार आहेत, एक शुद्धा लक्षणा आणि दुसरी गौणी लक्षणा. ह्या दोन्ही प्रकारांत पुष्कळ पोटभेद होतात असें साहित्यशास्त्र जाणणारे म्हणतात. गौणी लक्षणेंत वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ह्या दोहोंमध्यें गुणांच्या बाबतींत साम्य असतें. शुद्धा लक्षणेंत असें साम्य नसतें. शुद्धा लक्षणेंत वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ह्या दोहोंत सान्निध्य, तादर्थ्य, तात्कर्म्य, इत्यादिरूप संबंध असतो. त्याचे प्रकार पुढें १८ आणि १९ ह्या लक्षणपद्यांत दिले आहेत.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**शुद्धेमध्यें " उपादानलक्षणा " पहिली गणा ।**
**लक्षणा दुसरी जी ती असे " लक्षणलक्षणा " ॥ १० ॥**

शुद्धा लक्षणेचे दोन पोटभेद आहेत. एक "उपादानलक्षणा" आणि दुसरी "लक्षणलक्षणा."

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**स्वार्थासह परार्थातें घे उपादानलक्षणा ।**
**अर्थद्वयसमावेश हींत होतो असें गणा ॥ ११ ॥**

ज्या लक्षणेमध्यें शब्दाचा स्वार्थ म्हणजे वाच्यार्थ घेतला जाऊन परार्थ म्हणजे अन्य अर्थही घेतला जातो, तिला "उपादानलक्षणा" म्हणतात. उपादान म्हणजे घेणें. स्वार्थ घेऊन जी आणखी परार्थही घेते, ती उपादानलक्षणा ह्या प्रकारच्या लक्षणेंत दोन्ही अर्थांचा ( स्वार्थ आणि परार्थ ) ह्यांचा समावेश ( म्हणजे ग्रहण ) झालेला असतो.

" भाले येत आहेत " हें उपादानलक्षणेचें उदाहरण. येथें " भाले " ह्याचा अर्थ " भाले धारण करणारे पुरुष " असा आपण घेतों. भाले निर्जीव पदार्थ असल्या कारणानें त्यांच्याकडून " येणें " ही क्रिया होणें शक्य नाहीं. म्हणून " भाले " ह्याचा अर्थ " भालेवाले पुरुष " असा आपण घेतों. हा अर्थ लक्ष्यार्थ होय. पुरुषांच्या समतींत भाले येणें शक्य आहे. ह्या लक्ष्यार्थांत " भाले " हा स्वार्थ किंवा मुख्यार्थ घेतलेला असून शिवाय पुरुष हा अवांतर अर्थ घेतलेला आहे. ह्यांत वाच्यार्थ

आणि लक्ष्यार्थ ह्या दोहोंचाही समावेश झालेला आहे. ही उपादानलक्षणा होय. उपादानलक्षणेला " अजहत्स्वार्था " असेंही दुसरें नांव आहे. अजहत् ह्म० न सोडणारी. जींत स्वार्थ म्हणजे स्वकीय अर्थ म्हणजे वाच्यार्थ सोडिलेला नसून अन्य अर्थही घेतलेला असतो, ती " अजहत्स्वार्था लक्षणा."

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**अर्थनिष्पत्ति व्हायास स्वार्थाच्या करि वारणा ।**
**परार्थाच्याहि आदाना ती हो " लक्षणलक्षणा " ॥ १२ ॥**

[ निष्पत्ति ह्म० निघणें, उत्पन्न होणें. स्वार्थ ह्म० वाच्यार्थ. वारण ह्म० दूर सारणें, टाकून देणें. परार्थ म्ह० अन्य कांहीं तरी अर्थ. आदान म्ह० घेणें, ग्रहण. ]

वाक्यामध्यें योजलेले जे शब्द त्यांतून सम्यक् अर्थ निघावा म्हणून शब्दाचा वाच्यार्थ जींत टाकून दिलेला असतो, आणि अन्य असा कांहीं अर्थ घेतलेला असतो, तिला " लक्षणलक्षणा " म्हणतात.

"गंगेवर गौळवाडा आहे" ह्या वाक्यांत "गंगा" शब्दाचा "प्रवाह" हा त्याचा स्वताचा अर्थ टाकून देऊन आपण "तट" हा अन्य अर्थ घेतों. म्हणून "गंगेवर गौळवाडा आहे " हें " लक्षणलक्षणेचें " उदाहरण होय. ह्या लक्षणेला "जहत्स्वार्थालक्षणा" असें पर्याय नांव आहे. जहत् म्हणजे टाकणारी स्वार्थ म्हणजे स्वकीय अर्थ म्हणजे वाच्यार्थ जिच्यात टाकून दिलेला असतो, ती "जहत्स्वार्था लक्षणा " वरील उदाहरणांत "गंगा" शब्दाचा "प्रवाह" हा अर्थ टाकून देण्यांत आलेला आहे.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ गुणसाम्यें जिचेमधीं ।**
**असती " लक्षणा गौणी " तेथें होइ ह्मणे मधी ॥ १३ ॥**

शब्दाचा वाच्यार्थ आणि वाक्यांत त्याचा घ्यावयाचा लक्ष्यार्थ, हे दोन्ही अथ समान गुणानें जुळलेलें असतात, म्हणजे त्या दोहोंमध्यें गुणाचे बाबतींत साम्य असतें, तेथें जी लक्षणा होते ती " गौणी लक्षणा " असें पंडित म्हणतात.

" राम्या टोणगा अभ्यास न करतां हिंडत असतो, " ह्या वाक्यांत " राम्या " आणि " टोणगा " ह्या वाचक आणि लक्षक शब्दांचे वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ मूर्खपणा किंवा बुद्धिमांद्य ह्या गुणानें जुळते आहेत. म्हणून हें " गौणी लक्षणेचें" उदाहरण होय.

ह्या वरील वाक्यांत " राम्या " आणि " टोणगा " हे दोन्ही शब्द आलेले आहेत असे दोन्ही शब्द वाक्यांत आलेले असता तेथें "सारोपा गौणीलक्षणा" होते. राम्याकडे बोट दाखवून " हा टोणगा अभ्यास न करतां हिंडत असतो " असें वाक्य आपण उच्चारलें असतां अर्थ तोच होतो, पण " राम्या " हा विषय " टोणगा " ह्या

शब्दांत निगीर्ण झालेला म्हणजे लुप्त झालेला असतो. राम्या हा विषय असून त्याच्या अपेक्षेनें "टोणगा" हा विषयी. "हा टोणगा अभ्यास न करतां हिंडत असतो," ह्या वाक्यांत "साध्यवसाना गौणी लक्षणा" झाली आहे.

आतां वरील ऊहापोहांत "विषय" आणि "विषयी" हे पारिभाषिक शब्द आले आहेत त्यांचीं लक्षणें देतों.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

> शब्द वाचक जो त्यातें ह्मणती "विषय" सधी।
> "विषयी" जो स्वसामर्थ्य प्रकटी विषयामधीं ॥ १४ ॥

वाचक जो शब्द त्याला "विषय" असें पण्डित म्हणतात. वरील उदाहरणांत "राम्या" हा विषय होय. विषयी हा आपलें सामर्थ्य विषयावर प्रकट करतो म्हणजे आपल्या गुणाचा जोर विषयावर स्थापित करतो, म्हणजे आपले गुण विषयाचे ठायीं आहेत, असें स्पष्टपणें प्रतीतीस आणून देतो.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

> वाच्य लक्ष्य अशा दोन्ही अर्थांचें शब्द वाचक-।
> असतां होइ "सारोपा लक्षणा" भेदसूचक ॥ १५ ॥

ज्या लक्षणेंत वाच्यार्थाचा वाचक शब्द म्ह० वाच्यार्थ दाखविणारा शब्द, आणि लक्ष्यार्थाचा वाचक शब्द म्ह० लक्ष्यार्थ दाखविणारा शब्द, हे दोन्हीही उपस्थित असतात, तेथें "सारोपा लक्षणा" होते. "राम्या टोणगा अभ्यास न करतां हिंडत असतो," ह्या वाक्यांत "राम्या" हा वाच्यार्थ दाखविणारा शब्द, आणि "टोणगा" हा लक्ष्यार्थ दाखविणारा शब्द, हे दोन्ही शब्द आलेले आहेत. हें वाक्य "सारोपा गौणी लक्षणेचें" उदाहरण होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

> होई "साध्यवसाना" ही लक्षणा जेथ लोपवी।
> विषयालागिं विषयी म्हणतात असें कवी ॥ १६ ॥

जेथें विषयाला विषयी लोपवितो तेथें "साध्यवसाना गौणी लक्षणा" होते असें विद्वान् लोक म्हणतात. "हा टोणगा अभ्यास न करतां हिंडत असतो" ह्या वाक्यांत "टोणगा" ह्या विषयीनें "राम्या" ह्या विषयाला वाक्यांतून बाहेर लोटून दिलेलें आहे, म्हणजे विषयाला वाक्यांत स्थान मिळूं दिलें नाहीं. वरील वाक्य "साध्यवसाना लक्षणेचें" उदाहरण होय.

लक्षण; वृत्त आर्या.

> हे साम्यें सारोपा साध्यवसाना प्रकार गौणींत।
> शुद्धेंतहि संबंधें अन्यें ते असति, असति दोहींत ॥ १७ ॥

सारोपा आणि साध्यवसाना हे जे दोन प्रकार आम्हीं सांगितले, ते साम्याच्या संबंधानें गौणी लक्षणेंत असतात, आणि दुसऱ्या कांहीं संबंधानें शुद्धेंतही असतात. सारांश, सारोपा आणि साध्यवसाना हे प्रकार गौणी लक्षणेंत आणि शुद्धा लक्षणेंत अशा दोहींतही असतात

शुद्धा लक्षणेंत साम्याहून इतर कांहीं संबंधानें सारोपा आणि साध्यवसाना असे दोन प्रकार होतात असें आम्ही वर म्हटलें. आता हे इतर संबंध जे त्यांपैकीं कांहीं सांगतों.

लक्षण; वृत्त आर्या

**वाच्यार्थाशीं जोडी लक्ष्यार्था स्वामिभृत्यभाव कधीं ।**
**तादर्थ्य, कार्यकारणभाव, समीपत्व, जोडि ईजमधीं॥ १८॥**
**अंगांगिभाव हाही, तात्कर्म्य, दुजेहि ईत बहुसाल—।**
**संबंध असति, त्यांतें जाणुनि ह्या शास्त्रिं निपुण तुह्मि व्हाल ॥ १९॥**

राजाच्याबद्दल काम करणारा जो त्याचा सेवक तो राजा, ही लक्षणा स्वस्वामिभाव किंवा स्वामिभृत्यभाव ह्या संबंधावरून झाली आहे इंद्राकारणें किंवा इंद्रा प्रीत्यर्थ ही स्थूणा म्हणून " ही स्थूणा इंद्र " ही तादर्थ्य ह्या संबंधावरून लक्षणा झाली आहे. घृत सेविल्यानें आयुष्य वाढतें म्हणून " हें घृत आयुष्य " ही कार्यकारणसंबंधानें झालेली लक्षणा."गंगेवर गौळवाडा आहे"ही गंगा आणि तट ह्या दोहोंत शेजारपणाचा संबंध असल्यानें लक्षणा झाली आहे. "चालतांना पुढें नीट वाट पाहून पाय टाकावा" ह्या वाक्यांत " पाऊल " ह्या अंगाबद्दल "पाय" हा अंगी योजला आहे. येथें अंगागिभावावरून लक्षणा झाली आहे. " हा गोविंदराव सुतार चांगला कारागीर आहे, " ह्या वाक्यात गोविंदराव हा ब्राह्मण असून सुतारकी करतो म्हणून तो सुतार, अशी तात्कर्म्यावरून लक्षणा झाली आहे. तात्कर्म्य म्हणजे त्याचें काम करणें हा धर्म.

येणेंप्रमाणें शुद्धा लक्षणेंत वर परिगणिलेले आणि इतर प्रकारचेही संबंध अनेक असतात, ते विद्यार्थ्यांनीं जाणावे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**कथिले भेद जे त्यांहीं लक्षणा षड्विधा असे ।**
**विचार सूक्ष्म केल्यास विवेचन मनीं ठसे ॥ २०**

येथवर आम्ही लक्षणेचे जे हरएक प्रकार सांगितले,त्यांचेमुळें लक्षणेचे सहा प्रकार होतात. विद्यार्थ्यानें सूक्ष्म विचार केल्यास हें सर्व विवरण त्याच्या मनात चांगलें ठसेल.

हे सहा प्रकार असे. १. शुद्धा सारोपा उपादान लक्षणा. २. शुद्धा साध्यवसाना

उपादान लक्षणा. ३. शुद्धा सारोपा लक्षणलक्षणा ४. शुद्धा साध्यवसाना लक्षण लक्षणा. ५. सारोपा गौणी लक्षणा. ६. साध्यवसाना गौणी लक्षणा.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

व्यंग्य त्या लक्षणेमध्यें नसे जी रूढिसंभवा ।
प्रयोजनवतीमध्यें असे हें मनिं वागवा ॥ २१ ॥

रूढीवरून जी लक्षणा झालेली असते, तिच्यांत व्यंग्यार्थ नसतो. प्रयोजनावरून जी लक्षणा झालेली असते, तिच्यांत व्यंग्य असतें असें तुमच्या मनांत ठसो.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

वाच्यार्थाहुनि लक्ष्यार्थाहुनि शब्दास येतसे—।
अधिकार्थ प्रसंगानें नांव "व्यंग्यार्थ" त्या असे ॥ २२ ॥

वाच्यार्थाहून आणि लक्ष्यार्थाहून अधिक असा कांहीं अर्थ शब्दापासून प्रसंगविशेषीं निघतो, त्याला त्या शब्दाचा "व्यंग्यार्थ" असें म्हणतात.

"गंगेवर गौळवाडा आहे" ह्या वाक्यांत शैत्य, पावनत्व, इत्यादि धर्मांचा जो बोध होतो तो "व्यंग्यार्थ."

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

वाच्य लक्ष्य व्यंग्य अर्थांतुनी व्यंग्यार्थ ये कधीं ।
व्यंग्यार्थाचे असे तीन भेद होति ह्मणे सुधी ॥ २३ ॥

वाच्य अर्थ, लक्ष्य अर्थ, आणि व्यंग्य अर्थ, यांचेपासून कधीं कधीं व्यंग्य अर्थ उत्पन्न होतो, तेणें करून व्यंग्यार्थ तीन प्रकारचा असूं शकतो, असें पंडितांचें म्हणणें आहे.

म्हणजे असें कीं कधीं कधीं वाच्य अर्थांतून व्यंग्य अर्थ निघतो, लक्ष्य अर्थांतून व्यंग्य अर्थ निघतो, आणि व्यंग्य अर्थांतून व्यंग्य अर्थ निघतो. ह्या योगानें व्यंग्य अर्थाचे तीन प्रकार होतात

उदाहरण, वृत्त आर्या.

पाकाची सामुग्री गृहिं नुरली हें मला म्हणालीस ।
माते! तर काय करूं? कलला हा सूर्य अस्त अद्रीस ॥१॥

हे आई (किंवा सासूबाई), स्वयंपाकाचे तांदूळ, डाळ, पीठ, इत्यादि पदार्थ घरांत नाहींत असें तू मला म्हणालीस, तर आतां मी काय करूं? दिवस बुडत चालला आहे पहा!

वरील पद्याचा वाच्य अर्थ वर अनुवादांत दिला आहे. हाच अर्थ आईला (किंवा सासूला) कळवावा असा त्या मुलीचा उद्देश होता. परंतु तिला आपल्या प्रियकराकडे

जावयाला कांहीं सबब पाहिजे होती असें येथें आपणाला संदर्भावरून कळून येतें हा संदर्भावरून आपणाला कळून आलेला जो अर्थ, तो व्यंग्यार्थ, आणि हा व्यंग्यार्थ येथें वाच्यार्थावरून उत्पन्न झालेला आहे.

उदाहरण, वृत्त आर्या.

मम रमणा मजसाठीं विनवाया जाउनी सखे! श्रमसी।
हे कष्ट सहुनि दुर्वह उपकारनिबद्ध करिसि गे! मजसी॥ २॥

अगे दासी, माझ्या प्रियकराला माझ्या भेटीस यावयाची विनंती करण्यासाठीं जाऊन तूं फार दमतेस! हे कठिण कष्ट मजसाठीं सोसून तूं मला उपकाराच्या ओझ्याखालीं चिरडीत आहेस!

या पद्यांतील वाच्यार्थ वरील अनुवादांत दिला आहे. ह्या पद्याचा लक्ष्यार्थ दासीची निंदा. तूं लबाड आहेस, तूं मजकरिता माझ्या प्रियकराला न बोलावतां तूं स्वताच त्याच्याशीं रममाण होऊन आलीस, असा टोमणा सखीनें दासीला मारला आहे. हा टोमणा हा लक्ष्यार्थ. माझा प्रियकर खोटा आहे हा व्यंग्यार्थ. लक्ष्यार्थांतून व्यंग्यार्थ निघाल्याचें हें पद्य उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त आर्या.

बिसिनीपत्राचे वरि निश्चल विश्रब्ध बघ बलाका ही।
निर्मलमरकतपात्रस्थित ती द्युति शंखशुक्तिची वाही॥ ३॥

कोणी स्त्री आपल्या प्रियकराला म्हणते—कमलाच्या पानावर ही बकस्त्री निर्भयपणें निश्चल बसली आहे पहा! स्वच्छ पाचेच्या पात्रात ठेविलेल्या शंखशुक्तीची शोभा ती बकस्त्री धारण करीत आहे!

ह्या पद्याचा वाच्यार्थ वर अनुवादांत दिला आहे. ही बलाका निर्भयपणें बसली आहे हा वाच्यार्थ.येथें रहदारी नाहीं हा त्यातून निघालेला व्यंग्यार्थ ह्या व्यंग्यार्थांतून "आपल्या विलासाला हें स्थान योग्य आहे" व्यंग्यार्थ निघतो

व्यंग्यार्थापासून व्यग्यार्थ कसा निघतो हे वरील पद्यावरून कळून येण्याजोगें आहे.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

वक्ता, श्रोता, देश, काल, इत्यादींची विशिष्टता।
व्यंग्यार्थ सुचवायाला हेतु होतात तत्त्वता॥ २४॥

बोलणारा, ऐकणारा, स्थल, प्रसंग, इत्यादींचे विशेष हे व्यंग्यार्थ सुचविण्याला खरोखर कारण होतात; म्हणजे असें कीं वक्ता, श्रोता, देश, काल, इत्यादि प्रकारासंबंधानें जशी परिस्थिति असेल, तसा व्यंग्यार्थ निष्पन्न होतो परिस्थिति भिन्न भिन्न असल्यास एकाच वाक्यातून भिन्न भिन्न व्यंगार्थ निघतात.

उदाहरण, वृत्त आर्या.

पाण्यानें भरलेली घागर वाहोनि आणितां वेगें ।
घामानें मी भिजलें, श्वासहि मज लागला बहु सखे ! गे ! ॥ ४ ॥

पाण्याची घागर जलदीनें वाहून आणल्या कारणानें मला घाम आला आहे आणि मी जोरानें श्वासोच्छ्वास करीत आहें !

येथें बोलणारी स्त्री व्यभिचारिणी आहे ह्या तिच्या विशेष गुणावरून ती आपल्या प्रियकराच्या भेटीला जाऊन आलेली आहे असा व्यंग्यार्थ निघतो

उदाहरण, वृत्त आर्या

निस्तेज वदन तव हें, जागरण, अशक्तता बघूनि तव ।
मजसाठीं तूं श्रमसी झुरसी शंका न ह्यांत मजसि लव ॥ ५ ॥

आपल्या प्रियकराकडे दूती म्हणून पाठविलेल्या दासीला तिची स्वामिनी म्हणते:—

तुझें निस्तेज मुख, तुला होत आहेत तीं जागरणें, आणि तुझी ही अशक्तता पाहून मला खात्रीपूर्वक वाटतें कीं तू मजसाठीं फार श्रम करतेस, आणि तूं झुरणीस लागली आहेस !

हें वाक्य दूतीला उद्देशून बोललेलें आहे. दूती लबाड आणि विश्वासघातकी असल्यामुळें "तू स्वताच माझ्या प्रियकराशीं रममाण होण्यास जातेस" असा व्यग्यार्थ निघतो श्रोत्रीच्या स्वभावाच्या विशेषावरून निघालेला हा व्यग्यार्थ होय.

उदाहरण; वृत्त उपजाति

मी येथ गोळा कुसुमें करीन, समर्थ जायास सुदूर मी न ।
पलीकडे जा कुसुमार्थ, मानो विचार हा योग्य तुम्हा सख्यांनो!॥ ६ ॥

मी येथें फुलें गोळा करीन, माझ्यानें दूर जावत नाहीं. तुम्ही सख्यांनो, पलीकडच्या बाजूस जाऊन फुलें वेचा ! हा उत्तम विचार तुम्हाला ग्राह्य वाटो !

हें स्थल एकान्ताचें असल्याकारणानें माझ्या प्रियकराला भेटण्याला सोयीचें आहे, असा व्यंग्यार्थ स्थलाच्या एकान्तरूप वैशिष्ट्यावरून येथें निघत आहे

उदाहरण; वृत्त द्रुतविलंबित

गुरुजनोक्ति तुला दवडी तर गमन तूं मज सोडुनिया कर ।
परिणती कळवीन तुला न मी, त्यजुनि जा मज, मी तुजला नमीं ॥७॥

परगांवाला जाऊं निघालेल्या आपल्या प्रियकरास कोणी स्त्री म्हणते, " वडील माणसांच्या आज्ञेवरून तुला जाणें आवश्यक आहे असें तुला वाटत असल्यास जा. याचा परिणाम काय होईल हें मी तुला सांगत नाहीं, मी तुझ्या पायां पडतें ! "

तूं गेल्यावर मी प्राण सोडीन, असा त्या स्त्रीचा व्यंग्यार्थ. वसंत ऋतु हा सुखो-

रा.सं.ग्रं. २३।११३२

पभोगाचा काळ उपस्थित असल्यामुळें वरील व्यंग्यार्थ निघत आहे. हें पद्य कालाच्या वैशिष्टयावरून निघणाऱ्या व्यंग्यार्थाचें उदाहरण होय.

लक्षण, वृत्त आर्या.

**आनंदप्रेमादिक अपुल्या चित्तांत वृत्ति ज्या असती।**
**त्या कारणें विशिष्टें होतां उद्दीप्त त्यांस "रस" ह्मणती ॥ २५ ॥**

मनुष्याच्या अंत करणांत आनंद, प्रीति, इ० जे विकार असतात, ते विकार कांहीं विशिष्ट कारणानीं चेतले असतां त्यांना "रस" असें म्हणतात. येथें "वृत्ति" ह्या शब्दांचा अर्थ भावना किंवा प्रसंगविशेषींची मनःस्थिति असा व्यावहारिक अर्थ घ्यावयाचा.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**बुधांनीं रति, उत्साह, शोक, विस्मय, हास्य, भी, ।**
**जुगुप्सा, क्रोध, निर्वेद, ह्या नऊ वृत्ति मानिल्या ॥ २६ ॥**

रति, उत्साह, शोक, विस्मय, हास्य, भीति, जुगुप्सा (किळस), कोप, आणि निर्वेद (वीट), अशा नऊ वृत्ति अंत करणांत असतात. असें पंडितांनीं मानिलें आहे. ह्या वृत्ति उद्दीप्त झाल्या असता त्यांना "रस" म्हणतात. हे नऊ वृत्तीपासून उद्दीप्त झालेले नऊ रस आहेत.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**शृंगार वीर करुणाऽद्भुत हास्य भयानक ।**
**बीभत्स रौद्र हे आठ, नववा रस शांत हा २७ ॥**

शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, आणि शांत, असे एकंदर नऊ रस आहेत.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**रस हे व्यक्त होतात रूपें शब्दांचिया यदा–।**
**आल्हादकर रीतीनें काव्य निष्पन्न हो तदा ॥ २८ ॥**

हे शृंगार, वीर, करुणा, इ० नऊ रस जेव्हां शब्दांच्या रूपानें प्रकट केले जातात, आणि जेव्हां हें प्रकटीकरण आनंद देतें, तेव्हां काव्य उत्पन्न होतें. म्हणजे थोडक्या शब्दांत असें कीं कोणत्याही रसाचें आनंददायक असें जें प्रकटीकरण तें काव्य.

लक्षण, वृत्त आर्या.

**अंतःकरणांतिल जी वृत्ति तिचा भर मनोज्ञ शब्दांनीं–।**
**होतां प्रकट तयाला नांव दिजे "काव्य" हें बुधजनांनीं ॥ २९ ॥**

आपल्या अंत करणांत रति, उत्साह, शोक, इत्यादि ज्या वृत्ति असतात त्यांचा मनोहर शब्दांनीं प्रकट केलेला किं० प्रकट झालेला जो उत्कर्ष तेंच "काव्य".

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**भिन्न भिन्न रसांना जी वर्णांची अनुरूपता ।**
**ती "वृत्ति," तीची श्रोत्रास असे गोचर रम्यता ॥ ३० ॥**

शृंगार, वीर, इत्यादि जे नऊ रस, ते प्रकट करतांना जे शब्द आपण योजतों, ते कांहीं विशिष्ट वर्णांनीं घटित असले तर ते रस खुलून दिसतात. त्या त्या रसाला ते ते वर्ण अनुरूप किंवा अनुकूल असतात. रसाला वर्णांची जी अनुरूपता, तिला " वृत्ति " असें म्हणतात. येथें " वृत्ति " हा पारिभाषिक शब्द आहे.

कोणचे वर्ण कोणच्या रसाला अनुकूल असतात हें मम्मटानें आपल्या काव्यप्रकाशाच्या आठव्या उल्लासांत सांगितलें आहेत त्यांचें महत्त्व नसल्यामुळें आम्ही येथें तें सांगत नाहीं.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**मधुरा, पुरुषा, प्रौढा, ह्या वृत्ती तीन मानिल्या ।**
**माधुर्यौज:प्रसादाख्य गुणां त्या हेतु वर्णिल्या ॥ ३१ ॥**

ह्या वृत्ति तीन मानिलेल्या आहेत. मधुरा ( गोड ), परुषा ( कठोर, कर्कश ), आणि प्रौढा ( जोरदार, भारदस्त ), अशा ह्या तीन वृत्ती आहेत. माधुर्य, ओज, आणि प्रसाद, हे जे काव्याचे तीन गुण, त्यांना ह्या तीन वृत्ति कारण म्हणून वर्णिल्या आहेत. म्हणजे असें कीं रचनेमध्यें मधुर वर्ण ( म्हणजे कानाला गोड वाटणारे वर्ण ) पुष्कळसे असले तर ते "माधुर्य" ह्या गुणाला पोषक होतात. कठोर किंवा कर्कश वर्ण पुष्कळसे असल्यास " ओज " ह्या गुणाला ते पोषक होतात, आणि प्रौढ वर्ण पुष्कळसे असल्यास " प्रसाद " ह्या गुणाला ते पोषक होतात,

लक्षण, वृत्त आर्या

**मधुरेस "कैशिकी" हें, "आरभटी" हेंहि नांव परुषेस ।**
**प्रौढेस "सात्वती" हें देती, वैशिष्ट्य ह्यांत रचनेस ॥ ३२ ॥**

मधुरा ह्या वृत्तीला " कैशिकी " हेंहीं नांव, परुषा ह्या वृत्तीला " आरभटी " हेंही नांव, प्रौढा ह्या वृत्तीला " सात्वती " हेंही नांव देण्यांत येतें रचनेला मधुर परुष, किंवा प्रौढ असें जें वैशिष्ट्य प्राप्त होतें तें ह्यांतच असतें.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**भिन्न भिन्न रसांना जी शब्दांची अनुरूपता ।**
**ती " रीति, " चित्तास तिची असे गोचर रम्यता ॥ ३३ ॥**

शृंगार, वीर, इ० जे रस त्याचें वर्णन करतांना कवि जे शब्द वाक्यात योजतो त्या शब्दांपैकीं सामासिक शब्द किती आहेत हें पाहून त्या वर्णनाची रीति ठरविली जाते. वरील लक्षणांत " रीति " हा शब्द पारिभाषिक समजावयाचा.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**वैदर्भी रीति, पांचाली, गौडी, ह्या तीन वर्णिल्या ।**
**समासबद्ध शब्दांच्या संख्येवरुनि भेदिल्या ॥३४॥**

वाक्यामध्यें तोकडीं तोकडीं सामासिक पदें आहेत किंवा लांबलचक सामासिक पदें आहेत, हें पाहून रीतीचे तीन भेद ठरविण्यांत आले आहेत. वैदर्भी रीतीमध्यें सामासिक पद मुळींच नसतें किंवा एकादें असलें तर तें अगदीं तोकडें म्हणजे एक दोन शब्दांचेंच असतें. अशी रचना माधुर्याची व्यंजक असते. ज्या रचनेमध्यें चाराहून कमी शब्दांनीं घटित अशीं सामासिक पदें असतात,त्या रचनेला " पांचाली रीति, " ह्मणतात. अशी रचना प्रसादगुणाची व्यंजक असते. ज्या रचनेमध्यें चाराहून अधिक शब्दांनीं घटित अशीं सामासिक पदें असतात, त्या रचनेला " गौडी रीति " म्हणतात. ही रचना ओज ह्या गुणाची व्यंजक असते.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**वर्णसंहति शब्दांत शब्दनिष्ठचि वृत्ति ती ।**
**शब्दसंहति वाक्यांत वाक्यनिष्ठचि रीति ती ॥ ३५ ॥**

ज्या वर्णांनीं शब्द घटित झालेले आहेत, म्हणजे शब्दांत जे वर्ण आलेले असतात, त्यावरून वृत्ति ठरविण्यांत येतें. वाक्यामध्यें किती किती शब्दांनीं घटित अशीं पदें आहेत हें पाहून रीति ठरविण्यांत येतें. म्हणजे असें कीं वृत्ति हा गुण शब्दघटनेवर अवलंबून असतो. रीति हा गुण वाक्यघटनेवर अवलंबून असतो शब्दांत वृत्ति असते. वाक्यांत रीति असते.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**" गुण " त्या ह्मणती धर्मा जे रसाप्रति पोषिती ।**
**प्रसाद, ओज, माधुर्य, हे मुख्य गुण मानिती ॥ ३६॥**

विशिष्ट रसाचा परिपोष करणारे जे धर्म त्याना " गुण " असें म्हणतात. हे गुण प्रसाद, ओज, आणि माधुर्य,असें मुख्यत्वें करून तीन आहेत

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**त्या गुणा नांव " माधुर्य " आलंकारिक देतसे ।**
**ज्या योगें द्रव पावोनी चित्त साल्हाद होतसे ॥ ३७ ॥**

ज्या गुणांमुळें अंत करण द्रवीभूत होऊन आनंद पावतें, त्या गुणाला" माधुर्य " असें आलंकारिकांनीं नाव दिलें आहे. साध्या भाषेंत असें कीं कानाला गोड वाटेल जी रचना ती मधुर.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**चित्ता करुनि उद्दीप्त त्यातें विस्तार पाववी ।**
**त्या गुणाप्रति देतात नांव " ओज " असें कवी ॥ ३८ ॥**

अंतःकरणाचें उद्दीपन करून त्याला विस्तार पावविणारा जो गुण, त्याला "ओज" असें म्हणतात. साध्या भाषेत असें कीं जोरदार जी रचना तींत ओज असतें.

लक्षण; वृत्त आर्या.

**गुण तो " प्रसाद " जेणें काव्य भरे तत्क्षणींच चित्तांत ।**
**विमलपटांत जसें जल किंवा वन्हीहि शुष्क काष्ठांत ॥ ३९ ॥**

स्वच्छ वस्त्रांत जसें पाणी तत्काळ भिनतें, किंवा कोरड्या लाकडांत जसा अग्नि तत्काळ शिरतो, तसें जें काव्य ऐकल्याबरोबर अंतःकरणांत प्रविष्ट होतें, त्या काव्यांत " प्रसादगुण " असतो. साध्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं श्रमाशिवाय म्हणजे ऐकल्याबरोबर ज्या भाषाशैलीपासून अर्थबोध होतो, त्या भाषाशैलींत " प्रसाद " हा गुण असतो.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**रसाच्या अपकर्षाला जे होती धर्म कारण ।**
**तयां " दोष " म्हणे तज्ज्ञ, दोषांचें हेंच लक्षण ॥ ४० ॥**

काव्यांतील रसाचा अपकर्ष ज्या धर्मांमुळें होतो त्यांना "दोष" असें म्हणतात.

व्याकरण, गणमात्रादि रचनेचे नियम, सदभिरुचि, रूढि, इत्यादि बाबतींत जें उल्लंघन, त्याचेमुळें रसाची हानि होते. ही हानि करणारे जे धर्म, त्यांना "दोष" असें म्हणतात

दोषांचे अनेक वर्ग आणि उपवर्ग साहित्यशास्त्रकारांनीं केलेले आहेत. परंतु दोषांचें यथासाग निरूपण साहित्यकौमुदीच्या दुसऱ्या भागांत करावें असें आम्ही संकल्पिलें आहे दोषांचें स्वरूप कळण्यासाठीं येथें आम्ही कांहीं दोष उदाहरणासह सांगतों

उदाहरण; वृत्त उपजाति.

मौन्यत्व हें साधन बालिशांस स्वाज्ञान आहे लपवावयास ।
तरीहि ते स्वस्थ न बैसतात, बोलोनि निंदा जनीं लाहतात ॥ ८ ॥

आपलें अज्ञान झाकावयाचें साधन न बोलता स्वस्थ बसून राहाणें हें मूर्खांजवळ असतें; तथापि मूर्ख लोक स्वस्थ न बसतां बोलतात ( म्हणजे आपले विचार प्रकट करतात ) आणि लोकांच्या उपहासाला स्वतास पात्र करून घेतात !

ह्या पद्यांत " मौन्यत्व " हा शब्द व्याकरणदृष्ट्या सदोष आहे. " मौन " हें शुद्ध रूप होय " मुनि " पासून " मौन " हें वृद्धिरूप संस्कारानें भाववाचक नाम झाल्यावर त्याला पुन्हां " य " हा एक आणि " त्व " हा दुसरा भाववाचक नामें

घडविणारा प्रत्यय लावणें हें वैयाकरणांस असंमत आहे. " मौन्यत्व " हें " च्युत-संस्कृतित्व " ह्या दोषाचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त उपजाति

हा यत्न माझा न फळास आला, कातर्थ्य वाटे नचि मन्मनाला ।
म्हणोनि मी यत्न करावयास होतों पुन्हा सिद्ध कसोनि कास ॥ ९ ॥

हा माझा प्रयत्न सफळ झाला नाहीं म्हणून माझ्या चित्ताला धन्यता वाटत नाहीं. यासाठीं मी पुन्हा झटून प्रयत्न करावयाला सिद्ध होतों !

येथें " कातर्थ्य " हा कानाला बोचणारा शब्द आहे. हें " श्रुतिकटुत्व " दोषाचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त इद्रवज्रा

दास्यत्व नीचास रुचे म्हणून स्वीकारितो संतत तें झटून ।
मानी महात्मा नरकासमान तें, तें चुरी शुद्धि गुणा समान ॥ १० ॥

[ समान म्ह० स्वाभिमानासह. ]

गुलामगिरींत राहाणें हें हलकट माणसास आवडतें. तो गुलामगिरीची स्थिति प्रयत्न करून मिळवावयास झटतो. थोर आहे आत्मा ज्याचा असा मनुष्य ती गुलामगिरीची स्थिति नरकाप्रमाणें समजतो; कारण ती स्थिति अंत करणाचें पावित्र्य स्वाभिमानासह नष्ट करते !

ह्या पद्यांतही "च्युतसंस्कृतित्व" हा दोष झाला आहे " दास "ह्या शब्दापासून " दास्य " हें भाववाचक नाम सिद्ध झाल्यावर त्याच्यावर आणखी " त्व " हा प्रत्यय लादणें चुकीचें होय.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

किंप्रभू जीं करांच्या रूपानें घेतो प्रजाधनें ।
तीं प्रजेलाच तो गांजाया योजी निर्दयें मनें ॥११ ॥

अधम राजा कर म्हणून जे पैसे रयतेपासून घेतो, ते पैसे तो त्या रयतेलाच छळण्यासाठीं निर्दय अंत करणानें खर्च करतो !

ह्या पद्याच्या प्रथमार्धांत " रूपानें " ह्या शब्दाच्या पहिल्या अक्षरावर यति पडली आहे. हा यतिभंगरूपी दोष. द्वितीयार्धांत " गांजाया " ह्या शब्दाच्या दुसऱ्या अक्षरावर यति पडली आहे हेंही यतिभंगाचेंच उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त मालिनी.

वचन वद असें कीं संशया स्थान त्यांत तिळभरिही नुरावें, तें ठसावें मनांत ।
जर गडबडगुंडा तू करूं पाहशील तर म्हणतिल तूतें लोक कापट्यशील ।१२

तूं असें भाषण करीत जा कीं त्यांत शंकेला मुळींच जागा राहू नये, आणि तें भाषण श्रोत्यांच्या चित्तांत ठसावें. तूं जर भरमसाटपणें बोलू लागलास तर लोक तुला कपटी म्हणतील !

ह्या पद्यात " गडबडगुंडा " हा शब्द काव्यांत योजावयाच्या योग्यतेचा नाहीं. येथें " ग्राम्यत्व " हा दोष होत आहे

उदाहरण, वृत्त आर्या.

मनरंजक गोष्टी तुज भारतरामायणादिकांतून-।
सांगेन, श्रवण तुला कथन मला मोद देइल अनून ॥ १३ ॥

भारत, रामायण, इत्यादि ग्रंथांतील मन रमविणाऱ्या कथा मी तुला सांगेन. त्या कथा ऐकून तुला आनंद होईल आणि सांगून मला आनंद होईल.

येथें "मनरंजक" हा व्याकरणांत अशुद्ध गणलेला शब्द आहे. हें " च्युतसंस्कृतित्व" ह्या दोषाचें उदाहरण. व्याकरणाचे संस्कार ह्या शब्दावर झालेले नाहींत. " मनोरंजक " हें रूप शुद्ध होय.

मी करेन, मी चालीन, इ० हीं ह्याच दोषाचीं उदाहरणें.

लक्षण, वृत्त आर्या

वाक्यास देति शोभा त्या धर्मा म्हणति कवि " अलंकार " ।
असति अलंकार तसे वाक्या देहा जसे कटक हार ॥ ४१ ॥

ज्या धर्मांच्या योगानें वाक्याला शोभा येते, त्या धर्मांना कवि " अलंकार " म्हणतात. शरीराला जशीं सलकडीं, हार, इत्यादि वस्तु शोभवितात, तसे अलंकार वाक्याला शोभवितात.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

अलंकारामधें भेद असती दोन ते असे ।
शब्दनिष्ठ अलंकार अर्थनिष्ठ दुजे तसे ॥ ४२ ॥

[ शब्दनिष्ठ म्ह० शब्दांतच आहे वास्तव्य ज्यांचें असे ( अलंकार ). अर्थनिष्ठ म्ह० अर्थांतच आहे वास्तव्य ज्यांचें असे ( अलंकार ) ]

अलंकारांचे दोन प्रकार आहेत. कांहीं अलंकार शब्दावर अवलंबून असतात; आणि कांहीं अर्थावर अवलंबून असतात.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

"शब्दालंकार" ते त्या त्या जे शब्दांताचि राहती ।
तदर्थक दुजे शब्द योजितां ते विलोपती ॥ ४३ ॥
रूपस्थानादि शब्दांचीं फिरतां हे विलोपती ।
अल्पही परिवृत्ती हे अलंकार न साहती ॥ ४४ ॥

जे अलंकार त्या त्या शब्दांतच असतात, आणि त्या अर्थाचे दुसरे शब्द त्याच्याजागीं योजल्यास नष्ट होतात, त्यांना " शब्दालंकार " म्हणतात. तेच शब्द

ठेवावे लागतात, इतकेंच नव्हे तर तेच शब्द त्याच रूपात आणि त्याच स्थानीं योजावे लागतात नाहींतर त्यांचें अलंकारत्व नष्ट होतें.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**अर्थ मात्र असे ज्यांच्या अवस्थानास कारण ।**
**" अर्थालंकार " ते, हेंच अर्थालंकारलक्षण ॥ ४५ ॥**

[ अवस्थान म्ह० स्थिति, अस्तित्व. ]

जे अलंकार अर्थावरच अवलंबून असतात, शब्दांवर अवलंबून नसतात, त्याना " अर्थालंकार " म्हणतात वाक्यांत योजलेल्या शब्दांबद्दल याच अर्थाचे दुसरे शब्द योजले, तरी ज्या अलंकारांना क्षति होत नाहीं, ते "अर्थालंकार." "त्या तरुणीचें मुख चंद्रासारखें मनोहर आहे, " ह्या वाक्यात उपमा हा अर्थालंकार आहे. ह्या वाक्याबद्दल "त्या युवतीचें वदन सुधांशूप्रमाणें रमणीय आहे" असें वाक्य योजलें तरी त्यांतील उपमेला कांहीं क्षति होत नाहीं. अशा प्रकारचे जे अलंकार ते " अर्थालंकार " .

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**शब्दालंकार असती अनेक, परि त्यांमधीं ।**
**श्लेषानुप्रासयमकचित्र मुख्य म्हणे प्रधी ॥ ४६ ॥**

शब्दालंकारांचे अनेक प्रकार आहेत, त्यापैकीं श्लेष, अनुप्रास, यमक,—आणि चित्र, हे चार मुख्य होत, असें विद्वान लोक म्हणतात.

लक्षण; वृत्त आर्या

**शब्दाचे एकाधिक अर्थ विवक्षित कवीस असतात ।**
**तेव्हां तेथें होतो "श्लेष" असें सर्व तज्ज्ञ म्हणतात ॥४७॥**

जेव्हां एका शब्दाचे एकाहून अधिक अर्थ घ्यावे असा कवीचा अभिप्राय असतो, तेव्हां तेथें " श्लेष " हा शब्दालंकार होतो, असें शास्त्रज्ञ म्हणतात.

वरील लक्षणांत योजलेला " शब्द, " हा शब्द शब्दसमूह ह्या अर्थानेंही घ्याव-याचा. एक किंवा अनेक शब्द, शब्दांची रुपें, शब्दाची मांडणी, शब्दाचे विशिष्ट प्रकारानें पदच्छेद, इत्यादिंवर शब्दश्लेष अवलंबून असतो.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**"श्लिष्ट" तो म्हणिजे शब्द श्लेषा आधार जो असे ।**
**अनेकार्थत्व शब्दाचें श्लेषवृक्षास मूलसें ॥ ४८ ॥**

श्लेषाला आधारभूत जो शब्द त्याला " श्लिष्ट " शब्द म्हणतात एकाद्या विशिष्ट शब्दांतून अनेक अर्थ निघतात ज्या सामर्थ्यामुळें, तें सामर्थ्य श्लेषरूपी वृक्षाला मुळाप्रमाणें होय.

" घागरी एवढ्या मोत्यांची भिकबाळी त्याच्या कानांत लोंबत होती, " ह्या वाक्यात शब्दश्लेष आहे पाणी भरावयाचें संसारांतील जें आकारविशेषाचें पात्र, त्याला " घागर " म्हणतात. दागिन्यांना ज्या सोन्याच्या किंवा चांदीच्या पोकळ गोट्या

शोभेसाठीं लोंबत सोडलेल्या असतात, त्यांना " घागऱ्या " म्हणतात. पहिल्या अर्थाची घागर आणि दुसऱ्या अर्थाची घागरी ह्या दोहोंचें एकवचनी सामान्यरूप " घागरी " असें होतें. तेणेंकरून " घागरी एवढें " हा शब्द श्लिष्ट होतो, आणि त्या वाक्यांत मूर्खपणाचें विधान आहे असें वाटतें. येथें हा शब्द बदलल्यास श्लेषाला क्षति होते.

हें शब्दश्लेषाचें उदाहरण.

" भाकरी कां करपली ? पानें कां सडलीं ? घोडा कां बुडाला ?" ह्या तीन प्रश्नांचें उत्तर " न फिरविल्यामुळें. " हें उत्तर "शब्दश्लेषाचें" उदाहरण होय.

" लाख रुपयांला शेर तर तीन शेरांची किंमत किती ?" हें मुलांचें कोडें सर्वांच्या परिचयाचें आहे. ह्यांत शब्दश्लेषालंकार आहे

" शंभर रुपयांस पंचेचाळीस तर दोनशे रुपयांस किती ? " हेंही मुलांचें कोडें शब्दश्लेषाचेंच उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

सूचीच्या अग्रांपरि कुजनसुजनवर्तनें जगीं दिसतीं ।
एक करी छिद्रातें, आच्छादन करि दुजें तयावरतीं ॥ १४ ॥

सुईच्या दोन टोकांप्रमाणें खलजन आणि साधुजन यांची वर्तणूक जगांत दिसते,— एक भोक पाडतें ( माणसांचे दोष उघड करतें ), आणि दुसरें तें बुजवितें ( दोषांवर पांघरूण घालतें ) !

येथें " छिद्र " आणि " आच्छादन " हे शब्द श्लिष्ट आहेत.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**पुन्हां पुन्हां वर्ण तेच आले वाक्यामधें तर ।**
**" अनुप्रास " अलंकार होई कर्णमनोहर ॥ ४९ ॥**

वाक्यामध्यें तेच तेच वर्ण पुन्हा पुन्हा आले असतां "अनुप्रास" होतो. ह्या लक्षणांत " वर्ण " ह्याचा अर्थ व्यंजनें असा घ्यावयाचा.

हीं व्यंजनें जितकीं शेजारीं शेजारीं येतील, म्हणजे त्यांच्यांत अंतर जितकें कमी असेल, तितकी अधिक गोडी उत्पन्न होते. अनुप्रासांत पुन्हा पुन्हा येणाऱ्या व्यंजनांचे स्वरही सारखेच यावेत असा निर्बंध नाहीं, परंतु स्वरासहित व्यंजनें आलीं असतां त्या अनुप्रासाची चारुता वाढते इतकेंच.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**वर्णांचा क्रम, उच्चारस्थानें, आवृत्ति, अन्वय ।**
**ह्या तत्त्वांवरि होईल अनुप्रासचतुष्टय ॥ ५० ॥**

( १ ) व्यंजनांचा क्रम, ( २ ) मुखाचीं कंठ, दंत, ओष्ठ, तालु, इत्यादि जीं वर्णोच्चाराचीं स्थानें तीं, ( ३ ) किती व्यंजनें किती वेळा आवृत्त झालीं आहेत ती संख्या, आणि ( ४ ) कांहीं व्यंजनांनीं घटित जे शब्द त्यांचा वाक्यांत असलेला अन्वय, ह्या गोष्टी विचारात घेतल्या असतां अनुप्रासाचे चार प्रकार होतात.

आवृत्त झालेलीं कितीं व्यंजनें कोणत्या क्रमानें आलीं आहेत हें पाहून अनुप्रासाचे दोन प्रकार केले जातात वाक्यात आलेलीं व्यंजनें मुखाच्या कोणत्या स्थानांपासून उच्चारलीं जाणारीं आहेत हें पाहून अनुप्रासाचा एक प्रकार केला जातो, आवृत्त झालेल्या व्यंजनानीं घटित शब्द वाक्यात कसे अन्वित झाले आहेत हें पाहून अनुप्रासाचा एक प्रकार होतो. अशा रीतीनें अनुप्रासाचे एकंदर चार प्रकार होतात.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**वृत्ति, श्रुति, च्छेक, लाट, ह्या चार बुध वर्णिती—।**
**अनुप्रासप्रकारां, ते शोभा काव्यास आणिती ॥ ५१ ॥**

वृत्त्यनुप्रास, श्रुत्यनुप्रास, छेकानुप्रास, आणि लाटानुप्रास, असे अनुप्रासाचे चार प्रकार आलंकारिक सांगतात. हे प्रकार काव्याला शोभा देणारे असतात

लक्षण, वृत्त आर्या.

**दोनचि वेळां आले व्यस्तक्रम बहुत वर्ण तर त्यास ।**
**साहित्यशास्त्रपारंगत देती नांव "वृत्त्यनुप्रास" ॥ ५२ ॥**
**बहुवार वर्ण एकचि, सक्रम कीं अधिकवार बहुवर्ण— ।**
**आल्यास तेंचि देती नांव; "अनुप्रास" हा सुखविकर्ण॥५३॥**

अनेक वर्ण वेगळ्या क्रमानें दोनच वेळां आले असता वृत्त्यनुप्रासाचा ( क ) प्रकार होतो. एकच वर्ण अनेक वेळां आला असतां वृत्त्यनुप्रासाचा ( ख ) प्रकार होतो; किंवा दोहोहून अधिक वेळां अनेक वर्ण त्याच क्रमानें आले असतां वृत्त्यनुप्रासाचा ( ग ) हा प्रकार होतो

लक्षण, वृत्त आर्या.

**वाक्यांतिल शब्दांच्या आरंभीं वर्ण तोच जर आला ।**
**तर "वृन्तानुप्रास" असें देती बुध नांव त्या प्रकाराला ॥ ५४ ॥**

वृत्त्यनुप्रासाचे क, ख, आणि ग, हे जे तीन प्रकार आम्हीं सांगितले, त्यांतील ( ख ) ह्या प्रकारांत एक पोटभेद आहे. तेंच व्यंजन वाक्यांतील अनेक शब्दांच्या आरभीं आलें असतां "वृन्तानुप्रास" होतो हा वृत्त्यनुप्रासाचा (घ) प्रकार.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

संकटांत उडी टाकी नर बुद्धिपुरस्सर ।
तो इष्टार्थ लहो वा न, तो जनें निंदिले नर ॥ १५ ॥

जा मनुष्य जाणूनबुजून स्वताला संकटात पाडून घेतो, त्याचा मनोरथ सफळ झाला किंवा न झाला तरी तो लोकाच्या निंदेला पात्र होतो !

येथें प्रथमार्धात क्, ट्, हे दोन वर्ण व्यस्त क्रमानें दोनच वेळां आले आहेत. हें वृत्त्यनुप्रासाच्या ( क ) ह्या प्रकाराचें उदाहरण होय

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

इहलोकीं पिता माता असतां त्यास धिक्करी ।
तिलोदक मृतां त्यां दे पुत्र तो कायसा तरी ? ॥ १६ ॥

उपकार करी साधू परी मौन धरी व्रत ।
उपकार परें केला गर्जितो साधु संतत ॥ १७ ॥

वि० वा० भिडे,-जीवजागृति,-सकीर्ण, पद्यें १९,२४.

वरील दोन श्लोकांपैकीं पहिल्यांत " त् " हें व्यंजन, आणि दुसऱ्यांत " र् " हें व्यंजन अनेक वेळां आलें आहे. हीं दोन्हीं वृत्त्यनुप्रासाच्या ( ख ) ह्या प्रकाराचीं उदाहरणें होत.

उदाहरण, वृत्त आर्या.

प्रस्तरसंस्तरदुस्तर देश असो, हीं नदा न भय पावे ।
ध्येय मनीं वागवुनी ती सिंधुपतीकडे सतत धांवे ॥ १८ ॥

वि० वा० भिडे,-गोमती, पद्य १६.

[ प्रस्तर म्ह० धोंडे. संस्तर म्ह० थर. दुस्तर म्ह० चालावयाला कठिण ]

जागोंजाग धोंडे जरी भूमीवर पसरलेले असले,तरी त्या नदीला भय वाटत नाहीं इ०. येथें स् , त् , आणि र् , हीं तीन व्यंजनें त्याच क्रमानें तीन वेळां आलीं आहेत. हें वृत्त्यनुप्रासाच्या ( ग ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

गजराज तो उभारुनि शुण्डादण्ड प्रचण्ड येतांना ।
दिसला त्रिकूटगिरिचा जंगम कीं खण्ड एक तो साना ॥ १९ ॥

वि० वा० भिडे,-गजेन्द्रमोक्ष, पद्य १६

तो हत्ती दंडासारखी भव्य सोंड उभारून येतांना त्रिकूटपर्वताचा एक लहान तुकडा चालत येत आहे असा दिसत होता '

येथें ण् आणि ड् हीं दोन व्यंजनें ह्याच क्रमानें तीन वेळां आलीं आहेत हें वृत्त्यनुप्रासाच्या ( ग ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त मंदाक्रान्ता.

कां कांधावा, कुटिल करणी, क्रौर्य, कार्पण्य केवा-
वाढे ज्ञानें ? वरुनि जरिही शुष्क होतात खेंवा ।
ज्ञानाची कां परिणति करी भिन्न रूप स्वरूप ?
ज्ञानप्राप्ति प्रचुर हृदया कां करी शौचकूप ?॥ २० ॥

वि० वा० भिडे,-विज्ञानव्यर्थता, पद्य १०

ह्या पद्यांत प्रथम चरणाच्या सात शब्दांच्या आरंभीं " क् " हें व्यंजन आलें आहे हें वृन्तानुप्रासाचें म्हणजे अनुप्रासाच्या ( घ ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

साधु सदा सकलांना सुचवुनि सरणी सुयोग्य सुखवितसे ।
ती सरणी अवलंबिति काम तयाचा फलाढ्य होत असे ॥ २१ ॥

वि० वा० भिडे,-पुण्यपंक्ति, पद्य २९.

वरील आर्येत प्रत्येक शब्दाच्या आरंभीं " स् " हा वर्ण आला आहे. हें " वृन्तानुप्रासाचें, " म्हणजे अनुप्रासाच्या ( घ ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**एकाच स्थानचे वर्ण आले पुष्कळसे तर ।**
**" श्रुत्यनुप्रास " तो होतो, श्रुतिला तो मनोहर ॥ ५५ ॥**

वर्णांच्या उच्चारणात जे मुखाचे भाग उपयोगांत येतात, त्याना त्या वर्णांचीं स्थानें म्हणतात. हीं स्थानें कंठ, तालु, मूर्धा, दंत, आणि ओष्ठ, अशीं पांच आहेत. कांहीं वर्ण दोन स्थानांपासून उच्चारले जातात

जेव्हां एकाद्या वाक्यात एकाच स्थानापासून उच्चारले जाणारे वर्ण पुष्कळसे येतात, तेव्हां तेथें " श्रुत्यनुप्रास " होतो

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

नानाविध विलासांत दवडी धन काल तो ।
पात्र निंदेस लोकात होतो, सुख न लाहतो ! ॥२२॥

ह्या पद्यांत बत्तीस अक्षरें असून तेहेत्तीस व्यंजनें आहेत. ह्या तेहेत्तीस व्यंजनांत बावीस व्यंजनें दन्त्य स्थानचीं आहेत येथें " श्रुत्यनुप्रास " झाला आहे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**अनेक वर्ण एकाच क्रमें येतात दोनदां–।**
**वाक्यामध्यें नातिदूर " छेकानुप्रास " हो तदा ॥ ५६ ॥**

दोन किंवा अधिक व्यंजनें त्याच क्रमानें दोनच वेळा वाक्यामध्यें आलीं असतां " छेकानुप्रास " होतो. ह्या दोन व्यंजनसंघांमध्यें अंतर जितकें कमी असेल तितकी चारुता अधिक.

उदाहरण; वृत्त चामर.

राघवास कोपवून पामरा ! मरावया
इच्छितोस कां ? तदंगनेस देइ दुर्नया ! ।
नातरी तुझीं चिरील तो दहाहि मुंडकीं,
तो रणीं अजेय तूज हें मनात आण कीं ॥ २३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १९, पद्य २०

[ पामर म्ह० क्षुद्र प्राणी. तदंगना म्ह० त्याची ( रामाची ) बायको ( सीता ). दुर्नय म्ह० अनीतिमान्. मुडकें म्ह० डोकें ( तुच्छतेंत ). ही सुग्रीवाची रावणाप्रत उक्ति आहे

येथें प्रथम चरणांत [illegible] ही दोन व्यंजनें त्याच क्रमानें दोनच वेळां आलीं आहेत. हा " छेकानुप्रास " हीं व्यंजनें सस्वर आहेत म्हणून छेकाची चारुता विशेष आहे.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

रावणें भूमिकन्येच्या रक्षणा क्षणदाचरी ।
योजिल्या त्या तिला झाल्या मृगीला द्वीपिनीपरी ॥ २४ ॥

[ भूमिकन्या म्ह० सीता. क्षणदाचरी म्ह० राक्षसी द्वीपिनी म्ह० वाघिणी. ]

रावणानें अशोकवनिकेमध्यें सीतेला नेऊन ठेविलें आणि तिच्या रक्षणासाठीं त्यानें राक्षसी नेमल्या, त्या राक्षसी मृगीला वाघिणी वाटाव्या तशा सीतेला वाटल्या!

येथें "रक्षणा" आणि "क्षणदाचरी" ह्या दोन शब्दांत क्, ष्, ण्, हीं तीन व्यजनें दोनच वेळा त्याच क्रमानें आलीं आहेत हा "छेकानुप्रास" होय.

उदाहरण; वृत्त विबुधप्रिया

राक्षसाधिप ऐकतां विविधा अशा वचनांप्रति
हर्षला अति, कावला अति, कीं रणोत्सुक तन्मती ।
कुंभकर्णवचास पुत्रवचास ऐकुनि हर्षला,
किंतु ऐकुनि तो बिभीषणभाषणा अति कावला ॥ २५ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १८, पद्य १८.

[ राक्षसाधिप म्ह० राक्षसांचा राजा ( रावण ). रणोत्सुक म्ह० लढावयाला उत्सुक असलेली ( त्याची मति ) किंतु म्ह० पण, परतु. ]

येथें चतुर्थ चरणांत भ्, ष्, ण्, हीं तीन व्यजनें त्याच क्रमानें दोन वेळां आलीं आहेत हें "छेकानुप्रासाचें" उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

तुमचें कारुण्य फळो, द्या मज तारुण्य, वार्द्धक गळो हें ।
परिवर्तन घडवा हें, कठिन तुम्हा हें भिषग्वरा नोहे ॥ २६ ॥

वि० वि० भिडे,–सुकन्या, आर्या ७७.

[ कारुण्य म्ह० दयाशीलता परिवर्तन म्ह० बदल, पालट. भिषग्वर म्ह० उत्कृष्ट वैद्य ( अश्विनी कुमार ) ]

ही च्यवन ऋषींची अश्विनीकुमारांप्रत उक्ति आहे

येथें प्रथमार्धांत र्, ण्, य् हीं तीन व्यजनें त्याच क्रमानें दोन वेळां आलीं आहेत. हें "छेकानुप्रासाचें उदाहरण" हीं व्यजनें सस्वर आहेत, तेणें करून ह्या छेकाची चारुता वाढली आहे

लक्षण, वृत्त आर्या.

**वाक्यांत तोच शब्द द्विवार भिन्नान्वयांत ये तर तो ।**
**"लाटानुप्रास" असे, लाटाख्यजनांस तोच आवडतो ॥ ५७ ॥**

वाक्यामध्यें एकच शब्द एकाच अर्थानें पण भिन्न प्रकारें अन्वित झालेला असला, तर त्याला "लाटानुप्रास" म्हणतात. हा लाटानुप्रास लाट देशातील लोकांना आवडतो.

उदाहरण; वृत्त विबुधप्रिया.

क्ष्वेडसें दशकण्ठकण्ठविवान्त वाक्य विभीषणा–
झोंबलें तरि तो स्वतावरि घालि घोर नियंत्रणा।
यापरी अवमानिला उठला बिभीषण सत्वर,
सोडुनी सद मित्र घेउनि जाय अंबरिं तो वर ॥ २७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १८, पद्य ४०.

[क्ष्वेड म्ह० विष. विवान्त म्ह० ओकलेलें किंवा बोललेलें. दशकण्ठ म्ह० रावण. सद म्ह० सभागृह. अबर म्ह० आकाश ]

रावणानें बोललेलें हें वाक्य बिभीषणाच्या अंतःकरणाला फार बोचलें पण त्यानें आपला राग आवरला, इ०

येथें "कठ" हा शब्द प्रथम चरणांत दोन वेळां एकाच अर्थानें आला आहे. परतु तो दोन ठिकाणीं दोन रीतींनीं अन्वित झाला आहे. "दशकठ" हा बहुव्रीहि समास आणि "दशकंठकंठ" हा तत्पुरुष समास. हें "लाटानुप्रासाचें" उदाहरण होय.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्,

**नियत स्थानिं आवृत्ति पूर्वस्वरसमन्वित–।**
**भिन्नार्थी अक्षरांची तें म्हणे "यमक" पण्डित ॥ ५८ ॥**

वाक्यामध्यें कांहीं ठराविक स्थानीं एका किंवा अनेक अक्षरांची भिन्न भिन्न अर्थांनीं मागल्या स्वरासह आवृत्ति झाली असतां त्याला "यमक" असें पंडित म्हणतात "यमक" हा शब्द नपुसकलिंगी आहे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**यमकांत अनुस्वार अनुच्चारित जो असे।**
**तो तुल्यरूप नसतां यमकाला क्षती नसे ॥ ५९ ॥**

अंग, पंचा, कंठ, मंडनगड, कंड, अंतर, खंवीर, तंबाखू, वनांत, (अरण्याचा गर्भ), कणिंग, इत्यादि शब्दांतील अनुस्वार उच्चारांत स्पष्टपणें भासमान होतो. घरांत, कापणें, माझ्या॰ साठीं, दिव्याखालीं, इत्यादि शब्दांतील अनुस्वार तितका स्पष्टपणें श्रुतिगोचर होत नाहीं. ह्या अशा अनुस्वाराला "अनुच्चारित अनुस्वार" म्हणतात. यमकाक्षरांचे जे संघ त्यांतील अनुच्चारित जे अनुस्वार ते वेगळ्या जातीचे असले, किंवा एका संघात असून बाकीच्या संघात नसले, तर तसलें यमक क्षम्य मानलें जातें. राहातात, गांवात, हात; दाही, नाहीं, ही (स्त्री० ए० व०), हीं (न० अ० व०), ही यमकें अग्राह्य गणिलीं जात नाहींत

लक्षण, वृत्त आर्या.

**जेव्हां दुसरा चवथा पद्यचरण एकरूप असतात।**
**तेव्हां होइ यमक तें "संदष्टक यमक" तज्ञ म्हणतात ॥ ६० ॥**

पद्याचा दुसरा "चरण" चवथ्या चरणाशीं एकरूप असतो, तेव्हा "संदष्टक यमक" होतें. "चरण" शब्द पुल्लिंगी किंवा नपुंसकलिंगी आहे.

उदाहरण, वृत्त आर्या.

न शिके त्याच्या बोल न बाला; मंदार सावरिल काय–।
पतनेच्छुचा न, न वरिल बाला मंदा; रसा वरिल काय ?॥ २८ ॥

मोरो०,– आर्याभारत, वनपर्व, अ० १, आर्या ११.

[ बाला म्ह० बापाला. मदार हा एक स्वर्गवृक्ष आहे. काय म्ह०शरीर पतनेच्छु म्ह० पडणारा. बाला म्ह० कुमारी. रसा म्ह० पृथ्वी. ]

ह्या आर्येत " बाला मदा रसा वरिल काय " हीं द्वितीय आणि चतुर्थ चरणांतील अक्षरें अगदीं समसमान आहेत हें " संदष्टक यमकाचें " उदाहरण

लक्षण; वृत्त आर्या

**दुसऱ्या अर्धाशीं समरूप असे प्रथम अर्ध पद्यांत ।**
**तेव्हां होइ " समुद्गक " ऐसें साहित्यविज्ञ म्हणतात ॥ ६१ ॥**

जेव्हां पद्याचें पहिलें अर्ध दुसऱ्या अर्धाशीं अगदीं एकरूप असतें, तेव्हा " समुद्गक यमक " होतें

उदाहरण, आर्या.

अनलसमीहित साधी राया वारा महीवरा कामा ।
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही, वराका मा ॥ २९ ॥

मोरोपंत,–वनपर्व, अ० ९, आर्या ५०.

या आर्येचें प्रथमार्ध द्वितीयार्धाशीं अगदीं सम आहे हें " समुद्गक यमकाचें " उदाहरण होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**वृत्तपादीं यतिस्थानीं असे यमक जेथचां ।**
**म्हणती " पुष्पयमक " तें साहित्यज्ञ तेथवां ॥ ६२ ॥**

वृत्ताच्या चरणांत जीं यतिस्थानें असतात तेथें यमक साधलेलें असेल त्याला " पुष्पयमक " म्हणतात

उदाहरण, वृत्त पृथ्वी

स्वदेश बुडवावया, स्वजन दुःखिं लोटावया
धनें गृह भरावया, विबुधनाशही व्हावया ।
सदैव खल तो झटे गणुनि पुण्य तें गोमटें,
न यत्न करितां हटे, सरणि हीच त्याला पटे ॥ ३० ॥

हें पृथ्वी वृत्त आहे यांत चरणाच्या आठव्या अक्षरावर एक यति आणि चरणाच्या शेवटच्या अक्षरावर एक यति, अशीं दोन यतिस्थानें आहेत. तेथें पहिल्या दोन चरणात ' वया ' ह्या पूर्वस्वरयुक्त अक्षरांचें यमक आहे. तिसऱ्या आणि चवथ्या चरणांत त्याच स्थानीं पूर्वस्वरयुक्त 'टे' ह्या अक्षराचें यमक आहे. हीं "पुष्पयमकाचीं" उदाहरणें होत

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**पादद्वय समीपस्थ यमकें जुळतीं यदा ।**
**होई त्या " दामयमक " असें नांव दिजे तदा ॥ ६३ ॥**

जेव्हां शेजारचे दोन चरण यमकानें जुळलेले असतात, तेव्हां " दामयमक " होतें. ह्या प्रकारच्या यमकांत प्रथम चरणाच्या अंतीं आणि द्वितीय चरणाच्या आरंभीं यमक असतें; किंवा द्वितीय चरणाच्या अंतीं आणि तृतीय चरणाच्या आरंभीं यमक असतें, किंवा तृतीय चरणाच्या अंतीं आणि चतुर्थ चरणाच्या आरंभीं यमक असतें

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

घालायाला नवा घाला न वाघाला मृगावरी ।
संतावरि खलालाही खंती वाटेल अंतरीं ॥ ३१ ॥
परदास्यांत न रते नर तेजस्वितांकित ।
समानसें खल गणी दास्य कैवल्य निश्चित ॥ ३२ ॥

वि० वा० भिडे,–पापपक्ति, पद्यें १४, ९.

[ नवा घाला घालणें म्ह० पुन्हा हल्ला करणें. परदास्य म्ह० दुसऱ्याची गुलामगिरी रते म्ह० आनद पावतो. तेजस्वितांकित म्ह० मानी ( नर ). कैवल्य म्ह० मोक्ष ]

वरील दोन पद्यांपैकीं पहिल्या पद्याच्या पहिल्या चरणाच्या अंतीं आणि दुसऱ्या चरणाच्या आरंभीं ' नवा घाला, ' हीं चार अक्षरें आलीं आहेत. हें " दामयमक. " दुसऱ्या पद्याच्या पहिल्या चरणाच्या शेवटीं आणि दुसऱ्या चरणाच्या आरंभीं " न, र, ते, " हीं तीन अक्षरें आलीं आहेत हेंही "दामयमकाचें" उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

सदा सत्पथ लोकांस साधु बोधी परोपरी ।
परी लोक स्वनाशार्थ असत्पथचि आदरी ॥ ३३ ॥

येथें द्वितीय चरणाच्या अंतीं आणि तृतीय चरणाच्या आरंभीं "परी" ह्या अक्षरांनीं " दामयमक " झालें आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

कलिशक्ति खरी कृत्या कृत्या करवि निंद्य ती ।
कलिमूढ त्यजी कान्ता कान्तारीं नलभूपती ॥ ३४ ॥

वि० वा० भिडे,–जी० जा०, सकीर्ण, पद्य ३१

[ कृत्या ह्म० पीडा करणारी एक देवता. कलि ह्म० कलियुगाची अधिष्ठात्री देवता. कान्तार ह्म० अरण्य. ]

येथें प्रथम चरणाच्या अंतीं आणि द्वितीय चरणाच्या आरंभीं " कृत्या " ह्या दोन अक्षरांचें " दामयमक " आहे. तसेंच तृतीय चरणाच्या अंतीं आणि चतुर्थ

चरणाच्या आरंभीं " कान्ता " ह्या दोन अक्षरांचें " दामयमक " आहे.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

" संयुतावृत्ति यमक " जुळतां यमकाक्षरें ।
" असंयुतावृत्ति " यदा दूर तीं जाति अंतरें ॥ ६४ ॥

पद्याच्या चरणांत यमकाक्षरांचे दोन किंवा अधिक संघ एकमेकांस जुळून म्हणजे चिकटून आल्यास त्याला " संयुतावृत्ति यमक " ह्मणतात. हे संघ अन्य अक्षरें त्याच्यामध्यें आल्यानें विलग होतील, तेव्हा त्याला " असंयुतावृत्ति यमक " म्हणतात. उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

कपिवरा! मम राम मना प्रिय, नयनिं मृत्कण रावण दुष्क्रिय ।
प्रथम मन्नति सांग रघूद्वहा, कळविं तूं मग त्यास निरोप हा ॥ ३५ ॥

वि० वा० भिडे,–रा० प्र०, सर्ग १७, पद्य १.

[ कपिवर म्ह० श्रेष्ठ वानर ( मारुति ). मृत्कण म्ह० मातीचा कण. दुष्क्रिय म्ह० निंद्य आहे आचरण ज्याचें असा मन्नति म्ह० माझा रामाप्रत नमस्कार. रघूद्वह म्ह० राम. ]

ही सीतेची मारुतीप्रत उक्ति आहे.

येथें प्रथम चरणांत ". रा मम " " राम म..." हीं यमकाक्षरें जुळून म्हणजे शेजारीं आलीं आहेत हें " संयुतावृत्ति यमक "

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

सकलही कलहीं कनकास्तव शिरति मार्ग धरोनि सकैतव ।
कनकलोभ मनांत बळावतां नर करी क्षिति रौरव तत्वता ॥ ३६ ॥

वि० वा० भिडे.

[ कनक म्ह० सोनें म्ह० पैसा. सकैतव म्ह० लबाडीचा, खोटा. क्षिति म्ह० पृथ्वी. रौरव हा एक नरक आहे. ]

येथें " . कलहीं " "कलही", हीं यमकाक्षरें चिकटून आलीं आहेत. हें " संयुतावृत्ति यमकाचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

पांग तिचे फेडाया सांग तिचा पुत्र करिल कर्तव्य ।
गांग सलिलसा तो शुचि सांग न हो कैंवि साधुसा नव्य ॥ ३७ ॥

वि० वा० भिडे,–शिवोक्ति, पद्य ८३

शिवाजी दादाजीला म्हणतो —

ह्या आर्यभूमीचे हाल चुकवून तिचे मनोरथ सफल करून देऊन तिला सुखी करावयाला जो तिचा पुत्र पूर्णपणें कर्तव्य करील, तो गंगेच्या उदकाप्रमाणें पवित्र म्हणून साधूप्रमाणें स्तुतीस पात्र कसा नाहीं होणार हें मला सांग.

येथें चारी चरणाच्या आरंभीं पूर्वस्वरयुक्त आणि पूर्वानुनासिकयुक्त " ग " हें

अक्षर आहे. हीं चार यमकें एकमेकांना चिकटून आलेलीं नाहींत. हें " असंयुतावृत्ति " यमकाचें उदाहरण

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

क्षमा वस्तु नसे ठावी यमा दुष्कर्मदण्डनीं ।
समान रावरकां तो, रमा सद्वृत्तपालनीं ॥ ३८ ॥

वि० वा० भिडे,–जी० जा०, संकीर्ण, पद्य १३९.

पातकी लोकांचें पारिपत्य करण्यांत यम बिलकूल क्षमा करीत नाहीं श्रीमंताला आणि गरीबाला यम सारख्याच सरणीनें शिक्षा करतो. सदाचारानें वागणें तुम्हांला आनंददायक वाटो !

येथें क्षमा, यमा, समा..., रमा, हें " असंयुतावृत्तियमक " आहे.

लक्षण, वृत्त आर्या

**यमकाच्या पूर्वींचे नंतरचे वर्ण भिन्न असल्यास–।**
**बहु संघि, "अश्वधाटी यमक" असें तज्ञ जन म्हणे त्यास ॥६५॥**

यमकाच्या पूर्वींचे आणि नंतरचे वर्ण वेगळे वेगळे असून यमकाच्या अक्षराचे अनेक संघ एकापुढें एक असे आल्यास " अश्वधाटी यमक " होतें.

उदाहरण, वृत्त आर्या.

डुलत झुलत खुलत तिथें आला तो ठाकला सरापुढती ।
मग आनंदें शिरला जलिं शुंडादंड उभवुनी वरती ॥ ३९ ॥

वि० वा० भिडे,–गजेंद्रमोक्ष, पद्य १८.

" लत " ह्या यमकाक्षरांच्या मागें डु, झु, आणि खु, अशीं भिन्न अक्षरें आलीं आहेत डुलत, झुलत, खुलत, हें " अश्वधाटी यमक " होय.

लक्षण; वृत्त आर्या.

**नियमविशेषें मांडुनि पद्यांतिल सर्व अक्षरें जेथें ।**
**कवि करि खड्गाद्याकृति, रचना "चित्राख्य" होतसे तेथें ॥६६॥**

स्रग्धरा, अनुष्टुभ्, इत्यादि पद्यांतील घटक अक्षरें कांहीं विशेष प्रकारें एकाद्या पदार्थाच्या चित्राच्या वेगळ्या वेगळ्या भागांत मांडून, आणि कांहीं अक्षरें द्विवार, त्रिवार, अशीं वाचावयाचीं अशी नियंत्रणा संभाळून, जी रचना केलेली असते तिला "चित्रबंध" म्हणतात. ज्या पदार्थाच्या चित्रात हीं अक्षरें मांडलेलीं असतात, त्याच्या नांवावरून त्या बंधाला नाव दिलें जातें

खड्ग, पद्म, मुरज, इत्यादि पदार्थांच्या आकृतींत अक्षरें मांडलेलीं असल्यास त्या रचनेला ' खड्गबंध " , " पद्मबंध " , " मुरजबंध, " इत्यादि नावें दिलीं जातात. संस्कृतमध्यें कांहीं कवींनीं चित्ररचना केली आहे. मराठींत असल्या रचनेचा कोणी फारसा अवलंब केलेला नाहीं. वृत्त, यतिस्थानें, यमक, व्याकरण, इत्यादींचे नियम

पाळणें कवीला कठिण असतेंच असतें; आणि ते पाळून आणि शिवाय अक्षरें कांहीं विशिष्ट नियंत्रणा संभाळून योजावयाचीं, हें फारच कठिण असतें. अशा रचनेचा एक नमुना आम्ही पुढें देतों.


उदाहरण; वृत्त भुजंगप्रयात.

विवेकानुसारें रहावें जगांत, प्रधी नित्य आनंदती या क्रमांत ।
अशा पूज्य मार्गें समस्तास व्हावें, विकार प्रयासप्रकर्षे त्यजावे ॥४०॥

वि० वा० भिडे.

सदसद्विवेकबुद्धीच्या अनुरोधानें ह्या जगांत आपण रहावें. समंजस लोक असें वर्तन करण्यांत आनंद पावतात.अशा सरणीचा अवलंब करून सर्व लोकांच्या आदरास पात्र ( पूज्य ) व्हावें मनोविकार प्रयत्नाची ( प्रयास ) शिकस्त ( प्रकर्ष ) करून दडपून टाकावे ।

छत्रबंध



ह्या पद्यातील अक्षरें छत्रीच्या आकारात वरील चित्रात बसवून दाखविलीं आहेत पद्याचे पहिले तीन चरण आडव्या सहा ओळींत बसविले आहेत. पहिल्या ओळींत " वि " हें एक अक्षर आहे. दुसऱ्या ओळींत " वेकानु " हीं तीन अक्षरें आहेत. तिसऱ्या ओळींत " सारें रहावें " हीं पांच अक्षरें आहेत चवथ्या ओळींत " जगांत प्रथी नित्य " हीं सात अक्षरें आहेत. पांचव्या ओळींत " आनदती ह्या क्रमात अ " हीं नऊ अक्षरें आहेत. आणि सहाव्या ओळींत " शा पूज्य मार्गें समस्तांस व्हावें " हीं अकरा अक्षरें आहेत ह्या सहाव्या ओळीच्या शेवटीं पहिले तीन चरण संपतात. चवथ्या चरणाचीं बारा अक्षरें छत्रीच्या उभ्या दांड्यांत एकाखालीं एक अशीं बसविलीं आहेत. हा छत्रबंध करतांना पुढील नियंत्रणा पाळाव्या लागल्या आहेत.

१ हें पद्य भुजंगप्रयात वृत्तांत असल्याकारणानें प्रत्येक चरणांत चार यगण आले पाहिजेत

२ जगांत-क्रमांत, व्हावें–त्यजावें, अशीं पूर्वस्वरयुक्त दोन यमकें आलीं पाहिजेत.

३ पहिल्या चरणाचें पहिलें, तिसरें, आणि सातवें, हीं तीन अक्षरें चवथ्या चरणाच्या पहिल्या, दुसऱ्या, आणि तिसऱ्या अक्षरांशीं समान असलीं पाहिजेत दुसऱ्या चरणाचें पहिलें अक्षर आणि नववें अक्षर हीं दोन अक्षरें चवथ्या चरणाच्या चवथ्या आणि पाचव्या अक्षरांशीं समान असलीं पाहिजेत तिसऱ्या चरणाचें सातवें अक्षर चवथ्या चरणाच्या सहाव्या अक्षराशीं समान असलें पाहिजे

४ चवथ्या चरणांतील चवथें अक्षर ( येथें प्र ) लघु असून जोडाक्षर असलें पाहिजे.

५ चवथ्या चरणांतील सहावें अक्षर ( येथें स ) लघु असून त्याच्या पुढचें म्हणचे सातवें अक्षर ( येथें प्र ) जोडाक्षर असलें पाहिजे.

ह्या इतक्या नियंत्रणा पाळून पद्य सफाईदार उतरणें हें यदृच्छेवर बहुतेक अवलंबून असतें ! अशा पद्यात चिवारीच्या पानांतील रसाइतकाच बहुधा रस असतो !

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**अनेक वस्तु कविंनीं दृष्टान्तादि करावया ।**
**कल्पिल्या असती, नांव " कविसंकेत " हें तयां ॥ ६७ ॥**

आपलें वर्णन विशद व्हावें म्हणून, किंवा आपल्या वर्णनाला मनोहरपणा यावा म्हणून, कवींनीं पुष्कळ वस्तु कल्पिल्या आहेत, ह्या वस्तु वास्तव सृष्टींत अविद्यमान आहेत कवींनीं कल्पिलेल्या अशा वस्तूना " कविसंकेत " किंवा " कविसमय " म्हणतात त्यांपैकीं कांहीं पुढें देतों.

लक्षण, वृत्त आर्या.

**स्त्रीचरणाचें ताडन होतां येतीं सुमें अशोकाला ।**
**स्त्रीमदिरागंडूषें पुष्पें येतात बकुल वृक्षाला ॥ ६८ ॥**

येतात सुमें स्त्रीच्या सुस्वर गीतें नमेरु वृक्षास ।
तिलकास दृष्टिपातें, गाढ समालिंगनें कुरवकास ॥ ६९ ॥
फूत्कारें आम्राला, नृत्यें येतात कर्णिकाराला ।
हसितेंही चंपकाला, स्त्रीच्या सुवचें सुमेंहि अर्काला ॥ ७० ॥
रात्रीं नलिनें तैशीं पद्में दिवसास विकच होतात ।
मुक्ताफळें गजांच्या गंडस्थलिं वंशगर्भिं असतात ॥ ७१ ॥
सर्पशिरीं रत्न असे, नवधुनरविं मोर नृत्य करितात ।
मानससरोवराला ग्रीष्मारंभास हंस जातात ॥ ७२ ॥
जलदुग्धमिश्रणांतुनि उरवुनि जल दुग्ध मात्र हंस पितो ।
विधुकिरणस्पर्शानें अमृताचा स्राव विधुमणी करितो ॥ ७३ ॥
पतिपत्नी कोकांच्या होऊन वियुक्त रात्रिच्या समयीं ।
जुळती प्रातःकाळीं दुसऱ्या दिवशीं खरांशुच्या उदयीं ॥७४॥
चातक नव मेघोदक पीउनि तृष्णा करितसे शांत ।
सिंहास पराभवितो शरभ रणीं शूर त्याहुनि नितांत ॥ ७५ ॥
आकाश, पाप, काळें, कीर्ति धवल, हास्यही असे धवल ।
रक्त क्रोध, प्रीती; चंद्रकरांचा चकोर करि कवल ॥ ७६ ॥
हे आणि असे दुसरे असती कविसमय, मुख्य हे त्यांत ।
कवि ह्या कविसमयांचा प्रेमें अवलंब नित्य करितात ॥ ७७ ॥

स्त्रीच्या चरणाचें ताडन् झाल्यानें अशोकाला फुलें येतात. स्त्रीनें मद्याची चूळ बकुल वृक्षावर टाकिली असतां त्याला फुलें येतात. नमेरु वृक्षापुढें स्त्रीनें गायन केलें असतां, तिलक वृक्षाकडे स्त्रीनें दृष्टि टाकिली असतां, कुरबकाला स्त्रीनें कवटाळलें असतां, आंब्याच्या झाडावर स्त्रीनें फुंकर घातला असतां, कण्हेरीच्या झाडापुढें स्त्री नाचली असतां, चंपकाकडे पाहून स्त्री हसली असतां, स्त्रीनें गोड भाषण अर्क वृक्षापुढें केलें असतां त्यांना फुलें येतात रात्रीं नलिनें फुलतात, पद्में दिवसाला फुलतात. हत्तींच्या गंडस्थळांत आणि बांबूच्या गर्भांत मोतीं असतात सापाच्या डोक्यांत रत्न असतें. पावसाळ्याच्या आरंभीं मेघांचा ध्वनि ऐकून मोर नाचूं लागतात. ग्रीष्म ऋतूच्या आरंभीं हंस मानससरोवराकडे जातात. पाणी आणि दूध यांच्या मिश्रणांतून हंस दूध तेवढें पिऊन पाणी तेवढें उरवितात. चंद्राचीं किरणें चंद्रकांत मण्यावर पडलीं असतां त्या मण्यांतून अमृताचा पाझर होऊं लागतो. चक्रवाक [illegible] [illegible] दुसऱ्या दिवशी सकाळीं सूर्याच्या उदयीं त्यांच्या पुन्हां गांठी पडतात नवीन मेघाचें जल पिऊन चातक आपली तहान भागवितो. शरभ या नांवाचा एक आठ पायांचा वन्य पशु आहे तो सिंहाहून फार अधिक बळकट असून

सिंहाचा पराभव करूं शकतो. आकाश आणि पाप ह्यांचा रंग काळा आहे. कीर्ति आणि हास्य ह्यांचा रंग पांढरा आहे. क्रोध आणि प्रेम ह्यांचा रंग तांबडा आहे. चकोर पक्षी चंद्राच्या किरणांवर उपजीविका करतो.

वर सांगितलेल्या गोष्टी कवींनीं गृहीत घेतल्या आहेत दुसऱ्या अशाच कांहीं गोष्टी आहेत. आम्ही वर सांगितलेल्या गोष्टी त्यांपैकीं मुख्य होत

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**दोन वस्तूंत सादृश्य आल्हादकर वर्णिजे ।**
**तेव्हां त्या रम्य उक्तीला " उपमा " नांव देइजे ॥ ७८ ॥**

जेव्हां दोन भिन्न भिन्न पदार्थांत कांहीं मनोहर असें सादृश्य किंवा साम्य वर्णिलेलें असतें, तेव्हां त्या रमणीय वचनाला " उपमा " असें नाव दिलें जातें

" खडूसारखें दूध पाढरें असतें " ह्या वाक्यांत कांहीं चमत्कृति नाहीं म्हणून हें वाक्य उपमा अलकाराचें उदाहरण होऊं शकत नाहीं.

लक्षण, वृत्त आर्या.

**उपमेस चार अंगें उपमेय, समान धर्म, उपमान ।**
**उपमावाचक पद; हीं असल्याविण चार पूर्ण उपमा न॥ ७९ ॥**
**उपमेंत धर्मवाची, उपमावाचक न शब्द जर असला ।**
**तर साहित्यविशारद म्हणती "लुप्तोपमा" असें तिजला ॥ ८० ॥**

उपमा व्हावयाला चार गोष्टींची आवश्यकता असते. ह्या चारांना आपण उपमेचीं अंगें असें नांव देऊं. ज्या वस्तूचें कवि वर्णन करतो, तिला "उपमेय" म्हणतात. उपमेयाचें सादृश्य ज्या वस्तूशीं सांगितलेलें असतें तिला "उपमान" म्हणतात. उपमेय आणि उपमान ह्या दोन वस्तूंचें ज्या धर्मांत म्हणजे गुणांत सादृश्य सांगितलेलें असतें,त्या गुणाला " समान धर्म, " " साधारण धर्म " किंवा " सामान्य धर्म " म्हणतात. आणि हें सादृश्य वाक्यांत ज्या शब्दानें दर्शविलेलें असतें त्याला " उपमावाचक " शब्द म्हणतात उपमेय, उपमान, सामान्यधर्म, आणि उपमावाचक शब्द, हीं उपमेचीं चार अंगें. हीं चारी अंगें सांगितलेलीं असलीं(म्हणजे वाक्यांमध्यें उक्त असलीं), तर ती"पूर्णोपमा"होते. ह्या चार अंगांपैकीं कांहीं अंगें लुप्त असलीं (म्हणजे सांगितलेलीं नसलीं) तर ती " लुप्तोपमा " होते. मराठीमध्यें समानधर्म गाळतां येतो किंवा उपमावाचक शब्द गाळतां येतो. उपमेय आणि उपमान हीं गाळतां येत नाहींत. उपमेंत समान धर्म गाळला असल्यास किंवा उपमावाचक शब्द गाळला असल्यास तिला " लुप्तोपमा " म्हणतात.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**जसा, तसा, परी, वाणी, सारखा, जेविं, तेविं हीं ।**
**पदें दाविति साधर्म्य एतदर्थक अन्यही ॥ ८१ ॥**

जसा,तसा,परी,इत्यादि शब्द किंवा त्या अर्थाचे इतर शब्द(प्रमाणें इ०)उपमेंतील

समान धर्म दाखवितात ह्यांपैकीं जसा, तसा, सारखा, हे शब्द लिंगवचनांप्रमाणें फिरणारे आहेत जेंवि, तेंवि, परी, वाणी, हे शब्द तसे फिरत नाहींत. " वाणी " हा शब्द सुशिक्षितांच्या गद्यलेखनांतून आणि भाषणांतून गळाला आहे

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**एका कीं दोन वाक्यांत करितो उपमा कवी ।**
**दोन वाक्येंहि असतां अंगें नाढळतीं नवीं ।। ८२ ।।**

कवि उपमा करतो ती कधीं एका शुद्ध म्हणजे साध्या वाक्यांत केलेली असते. कधीं कधीं एक गौण आणि एक मुख्य अशा दोन वाक्यांच्या संयोगानें बनलेल्या एका विषमयोगी वाक्यामध्यें कवि उपमा करतो. साध्या वाक्यांत एकच क्रियापद असतें विषमयोगी वाक्यांत दोन क्रियापदें असतात. परतु वाक्य एक असलें, किंवा वाक्यें दोन असलीं, तरी उपमा ह्या अलंकाराचीं उपमेय, उपमान, साधारण धर्म, आणि उपमाबोधक शब्द, हीं जीं चार अंगें, त्यांत नव्या अंगाची भर होऊं शकत नाहीं. उपमेचीं अंगें चार असतात आणि चारच असूं शकतात.

" कर्णाप्रमाणें विक्रम राजा उदार होता, " हें एक वाक्य आहे, आणि त्यांत " होता " हें एक क्रियापद आहे " दिलीपाला जसा रघु आनंदप्रद झाला तसा अजाला दशरथ झाला, " येथें दोन वाक्यें आणि दोन क्रियापदें असून एक विषमयोगी वाक्य झालें आहे. वरील दोन्हीं उदाहरणांत प्रत्येक उपमेंत चार अंगें आहेत. पहिल्या उदाहरणांत "विक्रम" हें उपमेय आहे, "कर्ण" हें उपमान आहे, "उदार" शब्द साधारणधर्म दाखवितो, आणि "प्रमाणें" हा शब्द उपमावाचक आहे. दुसऱ्या उदाहरणांत " अज " हें उपमेय, " दिलीप " हें उपमान, " जसा तसा " हा उपमावाचक शब्द, आणि " आनंदप्रदत्व " हा साधारण धर्म दोन्ही उदाहरणांत उपमेचीं चार अंगें आहेत "जसा तसा" हे जोडीनें येणारे दोन शब्द असले तरी वाक्यांत त्यांचें एकच कार्य आहे, आणि त्यांना एकत्वाचीच किंमत आहे. मराठींमध्यें जसा इ० शब्द वाक्यांत गाळलें तरी चालतात. तसा इ० शब्द गाळतां येत नाहींत.

**टीप**,--उपमा एकवाक्यात्मक असावी असा संस्कृत साहित्यशास्त्रकारांचा निर्बंध आहे. परंतु मराठी भाषा ही वाक्यरचनेच्या बाबतींत संस्कृताहून भिन्न असल्या-कारणानें उपमा दोन वाक्यांतही मराठींत होऊं शकते, असें विद्यार्थ्यानें समजावें. तसेंच उपमेच्या दोन वाक्यात अर्थ आणि काळ हीं भिन्न असलीं तरी हरकत नाहीं, असें आम्हांस वाटतें. ह्याचा खुलासा पुढें उदाहरणें देऊं त्यांवरून होईल.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित

दशमुखें मग मंत्रिसुतां जवें दवडिलें बल देउनि त्यां नवें ।
तुटुनि ते पडले प्लवगावरी शलभ दीपशिखेवरि ज्यापरी ।। ४१ ।।

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १७, पद्य ३६

मारुतीचें पारिपत्य करावयाला रावणानें त्याच्यावर मंत्रिसुत पाठविले त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे

रावणानें आपल्या अमात्यांच्या पुत्रांबरोबर नवें सैन्य देऊन त्यांना त्वरेनें मारुतीवर पाठविलें. दिव्याच्या ज्योतीवर शलभ तुटून पडतात, तसे हे अमात्यांचे पुत्र त्या वानरावर म्हणजे मारुतीवर तुटून पडले !

येथें " ते ( मंत्रिसुत )" हें उपमेय आहे, "शलभ" हें उपमान आहे, " तुटून पडणें " हा सामान्य धर्म आहे, आणि " ज्यापरी " हा उपमावाचक शब्द आहे. ह्या उदाहरणांत उपमेचीं चारी अंगें विद्यमान आहेत. हें " पूर्णोपमेचें " उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या

कष्टे देशहितास्तव, न स्वार्थास्तव, तयाकडे भावें—।
जनता अयःशलाका जैशी चुंबकमण्याकडे धावे ॥ ४२ ॥

वि० वा० भिडे,–पुढारी, पद्य ७.

जो कोणी मनुष्य देशाच्या कल्याणासाठीं झटतो, स्वार्थासाठीं झटत नाहीं, त्याच्याकडे लोक ओढले जातात,–लोहचुंबकाकडे लोखंडाची काडी ओढली जाते त्याप्रमाणें !

येथें " जनता " हें उपमेय, " शलाका " हें उपमान, " जैशी " हें उपमावाचक पद, आणि " धावणें " हा सामान्य धर्म. येथें उपमेचीं चारीं अंगें उपस्थित आहेत हे " पूर्णोपमेचें " उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या

विद्युत्पातें ताडित वप्र तसा तो सवेग धडधडला ।
दे माय ठाय धरणी म्हणुनि जणों तो धरातलीं पडला ॥४३॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ११२.

पर्वताचा कडा विजेच्या तडाख्यानें कोसळून पडतो, तसा तो यवन वेगानें जमी-जमीनीवर आदळला इ०

येथें " तो " हें उपमेय, " वप्र " हें उपमान, "तसा" हा उपमाबोधक शब्द, आणि " धडधडला " हा समान धर्म येथें उपमेचीं चारीं अंगें विद्यमान आहेत. ही पूर्णोपमा

उदाहरण, वृत्त आर्या

आबाजिस शिवरायें यवनांवरि धाडिलें लढायास ।
असुरांवरि इंद्रानें जैसें सेनानि कार्तिकेयास ॥ ४४ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य २२.

शिवाजीनें आबाजी सोनदेव ह्याला लढण्यासाठीं यवनांवर पाठविलें, इंद्रानें असुरांवर देवाचा सेनापति जो कार्तिकेय ह्याला पाठविलें त्याप्रमाणें

येथें " आबाजी, " " शिवराय, " " यवन " हीं उपमेयें, " कार्तिकेय, " " इंद्र, " " असुर, " हीं उपमानें, " जैसें " हें उपमावाचक पद, " पाठविणें " हा समानधर्मवाचक शब्द हें पूर्णोपमेचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त वसततिलका.

कर्णाट गुर्जर कलिंग नृपाल सर्व आले पुरा इतरही नृप बाढगर्व ।
भूभाग तो हलतसे नृपसैन्यशाली कैलास जेंवि शिवतांडवलास्यकालीं ॥४५

विं० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य २३.

ह्या पद्यांत सीतास्वयंवराच्या प्रसगाचें वर्णन आहे.

ताडव नृत्य शकर करीत असता कैलास पर्वत जसा हादरतो, तसा आलेल्या राजेलोकांच्या सैन्यांनीं शोभणारा तो भूप्रदेश हादरत होता !

येथें " भूभाग " हें उपमेय, " कैलास " हें उपमान, " जेंवि " हा उपमावाचक शब्द, आणि " हलणें " हा समान धर्म. हें पूर्णोपमेचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

श्रीराम लक्ष्मण कुमारहि तेथ होते तेजस्विताजितखरांशुरुची अहो ! ते ।
ते शोभले खलु विदेहसभाजनांत श्रीकार्तिकेय गणराज जसे गणांत॥४६॥

वि० वा० भिडे,—रा० प०, सर्ग ३, पद्य ३२.

सीतास्वयंवराच्या प्रसगाचें हें वर्णन आहे. आपल्या कांतीनें ज्यानीं सूर्याची कांति फिकी पाडिली आहे असे राम आणि लक्ष्मण हे मुलगेही तेथें होते जनकराजाच्या सभेंत ते शिवाच्या गणात कार्तिकस्वामी आणि गणपति हे शोभतात तसे शोभत होते !

येथें " श्रीराम " आणि " लक्ष्मण " हीं उपमेयें, " श्रीकार्तिकेय " आणि " गणराज " हीं उपमानें, " जसे " हा उपमावाचक शब्द, आणि " शोभणें " हा समानधर्म हें " पूर्णोपमेचें उदाहरण "

उदाहरण; वृत्त स्वागता

भूरिविक्रम कुमार नवीन पावला द्युति अधीं मळहीन ।
मंत्रसंस्कृत दिसे रघुवीर जेंवि शाणपरिघृष्ट सुहीर ॥ ४७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २, पद्य ५२.

अगोदरच मळहीन आणि पराक्रमी असा राम ह्या विश्वामित्रानें शिकविलेल्या विद्यांच्या योगानें अत्यंत तेजस्वी दिसू लागला,— सहाणेवर घासून ज्याला पैलू पाडले आहेत अशा उत्कृष्ट हिऱ्याप्रमाणें '

येथें " रघुवीर " हें उपमेय, " सुहीर " हें उपमान, " दिसे " हा समान धर्म, आणि " जेंवि " हा उपमावाचक शब्द. ही पूर्णोपमा

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

असें वदुनि रावणीं रिपुचिया समीकीं तसा
अभीत शिरला महा गज सहर्ष डोहीं जसा ।
कडाडवुनि शिंजिनी शर तयें बहु वर्षिले,
विपक्षभट मृत्युच्या बहु गृहाकडे लोटिले ॥ ४८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य ५६.

असें बोलून इंद्रजित् शत्रूच्या सैन्यांत भीति न बाळगता शिरला,—जसा मोठा हत्ती आनंदानें पाण्याच्या डोहांत शिरतो. धनुष्याची दोरी कडाडवून त्यानें अनेक बाण सोडले आणि शत्रूच्या पक्षाचे अनेक योद्धे यमाच्या घराकडे पाठवून दिले।

येथें प्रथमार्धांत पूर्णोपमा आहे.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

प्लवंगबलिं इंद्रजित् मृगगणांत शार्दूलसा।
करीत सुटला क्षया कचरवून तन्मानसां।
निशाट सरसावले बहु तथासवें संगरीं,
तुटोनि पडले गदापरिघपाणि शत्रूवरी ॥ ४९ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य ५७.

हरिणाच्या कळपांत वाघ नाश करीत सुटतो, त्याप्रमाणें इंद्रजित् वानरांच्या सैन्यांत दहशत उत्पन्न करून नाश करीत सुटला. हें पूर्णोपमेचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

दशानन नरांतकादि सुत चार दिग्विश्रुत
रणाप्रति सहोदरद्वयसहाय धाडी द्रुत।
प्रचण्डबलयुक्त हे भट सहा रणा पातले,
रघूत्तमभटास ते वृक अजाससे जाहले ॥ ५० ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग२०, पद्य ८.

आपल्या दोन भावासह नरातक इ० आपले प्रख्यात चार पुत्र रावणानें जलदीनें युद्धभूमीवर पाठविले. मोठ्या सैन्यासहवर्तमान हे सहा योद्धे युद्धभूमीवर येऊन पोचले. रामाच्या योध्याना ते सहा वीर बकऱ्यांना लांडगे ( नाशकारक ) होतात तसे झाले

येथें " नाशकारक " हा सामान्य धर्म उक्त नाहीं. हें " लुप्तोपमेचें " उदाहरण.

लक्षण, वृत्त आर्या.

**उपमालंकाराचे कविची प्रतिभा प्रकार विविध करी।**
**सोदाहरण विवेचन मी दोहोंचेंच येथ करिन तरी ॥ ८३ ॥**

कवि आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानें उपमेचे अनेक वेगळे वेगळे प्रकार करतो. आम्ही या पुस्तकांत त्यां पैकीं दोनच प्रकारांचीं उदाहरणें देऊन विवरण करणार आहों.

लक्षण, वृत्त आर्या.

**उपमेय असुनि एकचि उपमानें भिन्न, भिन्न धर्मांत–।**
**असतां त्या उपमेला कविजन "मालोपमा"चि म्हणतात ॥८४॥**
**मालोपमा दुजी जर एकचि उपमेय, धर्महि, असून।**
**उपमानें असतां बहु, हीही आनंद देइल अनून ॥ ८५ ॥**

जर उपमेय एकच असलें आणि भिन्न भिन्न धर्मांत भिन्न भिन्न उपमानें असलीं, तर त्या उपमेला कविलोक " मालोपमा " म्हणतात. जर उपमेय एकच असून साधारणधर्मही एकच असला, आणि उपमानें अनेक असलीं, तर तो मालोपमेचा दुसरा प्रकार होतो आणि हा प्रकारही पुष्कळ आनंद देणारा असतो.

ह्या प्रकारच्या रचनेंत अनेक उपमांची माला असते म्हणून हिला " मालोपमा " हें नाव अन्वर्थकच आहे. मालोपमेच्या वर सांगितलेल्या दोन प्रकारांत फरक हा कीं पहिल्या प्रकारांत भिन्न धर्मांत भिन्न उपमानें असतात. दुसऱ्या प्रकारांत उपमानें अनेक असलीं तरी साधारणधर्म एकच असतो.

उदाहरण, वृत्त आर्या

तूं जंबुकसा धूर्त, प्रतिभय हरिसा, समीरसा चपळ ।
कल्याण सुभा यवनांपासुनि घ्यायास शीघ्र जाच, पळ ॥ ५१ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य ११.

आबाजी सोनदेवाला शिवाजी ह्मणतोः—

हे आबाजी, तूं कोल्ह्यासारखा धूर्त आहेस, सिंहासारखा भयंकर आहेस, आणि वाऱ्यासारखा चपळ आहेस. कल्याणसुभा यवनांच्यापासून सोडवून घेण्यास ह्या क्षणीं जा, पळ !

येथें " धूर्तपणा " ह्या गुणात आबाजीला जंबुकाची, " प्रतिभयपणा " ह्या गुणांत सिंहाची, आणि " चपळपणा " ह्या गुणांत वाऱ्याची उपमा दिली आहे. हें मालोपमेचें उदाहरण होय. ह्या मालोपमेंत उपमेयाला भिन्न धर्मांत भिन्न उपमानें योजिलीं आहेत

उदाहरण, वृत्त आर्या.

यमकिंकरसे भीषण होते, स्थूल द्विपेंद्रसे यवन ।
रोधाया शिवबाची गति आले तेथ आक्रमोनि वन ॥ ५२ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ३४

हे यवन यमाच्या दूतांप्रमाणें भयंकर होते, मोठ्या हत्तीप्रमाणें ते लठ्ठ होते. अरण्य ओलांडून ते शिवाजीची वाट अडविण्यासाठीं तेथें आले होते

येथें भयंकरपणांत यमकिंकरांसारखे, आणि स्थूलपणात द्विपेंद्रांसारखे, ते यवन होते असें म्हटलें आहे. हें मालोपमेच्या पहिल्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

प्रावृट्कालीनघनापरि काळा, शैलसानुपरि थोर ।
किंप्रभुसा उन्मत्त, द्विप करि चीत्कार तो श्रुतिकठोर ॥ ५३ ॥

वि० वा० भिडे,–गजेन्द्रमोक्ष, श्लोक १७.

पावसाळ्यांतील मेघासारखा काळा, पर्वताच्या शिखरासारखा मोठा, आणि दुष्ट राजाप्रमाणें उन्मत्त असा तो हत्ती कर्कश चीत्कार करीत होता !

येथें " द्विप " हें एकच उपमेय असून " घन, " " शैलसानु, आणि

" किंप्रभु, " हीं तीन उपमानें आहेत. काळेपणा, थोरपणा, आणि उन्मत्तपणा, हे अनुक्रमें तीन साधारणधर्म आहेत हें मालोपमेच्या पहिल्या प्रकारचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

आक्रीड जेंवि दिसतो रुचिरां सुमांनीं
आकाश जेंवि दिसतो सुमनोविमानीं ।
वाराशि जेंवि दिसतो विविधा प्लवांनीं
आस्थानमंडप तसा दिसला नृपांनीं ॥ ५४ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग ३, पद्य ३०

सीतास्वयंवराच्या प्रसंगाचें हें जनकसभेचें वर्णन आहे.

बाग जसा मनोहर पुष्पांनीं दिसतो, किंवा आकाश जसें देवांच्या विमानांनीं दिसतें, किंवा समुद्र जसा नानाप्रकारच्या होड्यांनीं दिसतो, तसा तो सभामंडप राजे लोकांनीं दिसला. येथें " आस्थानमंडप " हें एक उपमेय असून " आक्रीड, " " आकाश, " आणि " वाराशि, " हीं तीन उपमानें आहेत. " दिसणें " हा समान धर्म असून " जेंवि तसा " हे उपमाद्योतक शब्द आहेत. हें " मालोपमेच्या दुसऱ्या प्रकाराचें " उदाहरण. " आकाश " हा शब्द अशी आहे.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

उभयपार्श्वनिषण्णहि तें सद सचिव शास्त्रकलापविशारद ।
सजविती उडु जेंवि नभस्तल, विकच वा तरु जेंवि वनस्थल ॥ ५५ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १७, पद्य ६३.

हें रावणाच्या सभेचें वर्णन आहे.

तारे जसे आकाशाला, किंवा उमललेल्या फुलांचे वृक्ष जसे अरण्यभूमीला शोभवितात, तसे अनेक शास्त्रांत पारंगत असे रावणाच्या दोन्ही बाजूस बसलेले त्याचे अमात्य त्या सभागृहास शोभवीत होते !

हेंही "मालोपमेच्या दुसऱ्या प्रकाराचेंच" उदाहरण होय. येथें " सजविणें " हा एक साधारण धर्म दोन्ही उपमांत आहे.

उदाहरण, वृत्त मन्दाक्रान्ता.

हर्षे दस्यू विपिनिं बघता एकला अध्वनीन,
हर्षे सर्प क्षुधित असतां भेक देखोनि पीन ।
किंवा हर्षे जळिं बघुनिया नक्रही वारणातें,*
तैसा हर्षे खलजन सदा देखता सज्जनातें ॥ ५६ ॥

वि॰ वा० भिडे,-पापी माणूस, श्लोक ५.

येथें दस्यू, सर्प, आणि नक्र, ह्यांना अध्वनीन, भेक, आणि वारण पाहून हर्ष होतो, तसा सज्जनाला पाहून खलजनाला हर्ष होतो असें विधान आहे. " खल जन " ह्या उपमेयाला " दस्यु, " " सर्प, " आणि " वारण, " हीं तीन उपमानें असल्या

कारणानें हे पद्य "मालोपमेचें" उदाहरण होय. "हर्षणें" हा तिन्ही उपमांत साधारण धर्म एकच आहे. हा मालोपमेचा प्रकार दुसरा

लक्षण; वृत्त आर्या.

**उपमेय जें प्रथम तें उपमान पुढें अशीं बहु विधानें ।**
**जुळवुनि कवि करि रचना म्हणिजे "रसनोपमा" तिज बुधानें ॥८६॥**

जेव्हा पहिल्या वाक्यांतील उपमेय पुढच्या वाक्यांत उपमान केलेलें असतें, ह्या दुसऱ्या वाक्यातील उपमेय त्याच्या पुढच्या वाक्यात उपमान केलेलें असतें, अशा सरणींचीं अनेक विधानें केलीं असतात तेव्हां त्या रचनेला "रसनोपमा" असें साहित्यशास्त्रकारांनीं नाव दिलें आहे

लक्षण, वृत्त आर्या

**रसनोपमेंत साधारण धर्म असेल एक उपमांत ।**
**किंवा अनेक असतिल तेणें दोन प्रकार होतात ॥ ८७ ॥**

रसनोपमेंत ज्या अनेक उपमा असतात, त्यांत साधारण धर्म एक असेल अथवा प्रत्येक उपमेंत एक एक वेगळा वेगळा साधारण धर्म असेल. अशामुळें रसनोपमेचे दोन प्रकार होतात

उदाहरण; वृत्त आर्या

उच्चार विचारापरि,उच्चारापरि पवित्र आचार, ।
आचारापरि लौकिक ज्याचा तो आदरा जन अपार ॥ ५७ ॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें, पद्य ४.

विचाराशीं जुळणारें ज्याचें भाषण असतें, भाषणाशीं जुळणारें ज्याचें वर्तन असतें, आणि वर्तनाशीं जुळणारी ज्याची थोरवी असते, तो मनुष्य आदराला पात्र होतो !

येथें पहिल्या उपमेंत "उच्चार" हें उपमेय आहे तें दुसऱ्या उपमेंत उपमान झालें आहे दुसऱ्या उपमेंत "आचार" हें उपमेय आहे तें तिसऱ्या उपमेंत उपमान झालें आहे.

विचारासारखा उच्चार, उच्चारासारखा आचार, आचारासारखा लौकिक, अशी येथें सांखळी बनविली आहे हें "रसनोपमेचें उदाहरण" होय "पवित्रपणा" हा तीन्हीं उपमांत एकच साधारण धर्म आहे

उदाहरण, वृत्त आर्या.

भाषणसें मधुर वदन, वपु कोमल वदनसें, सुसंघटित- ।
वपुसें चरित, तियेचें विमल, चरितसें जनांत यश महित ॥ ५८ ॥

वि० वा० भिडे,-कमळीची सुटका, पद्य ३

कमळी ह्या मुलीचें मुख तिच्या भाषणासारखें गोड आहे, तिचें शरीर तिच्या मुखासारखें नाजुक आहे, तिचें आचरण तिच्या शरीरासारखें सुसंघटित आहे, आणि

तिचें निर्मल यश तिच्या आचरणाप्रमाणें लोकांच्या आदरास पात्र आहे '

येथें भाषणासारखें मुख, मुखासारखें शरीर, शरीरासारखें आचरण, आणि आचरणासारखें यश, अशी सांखळी आहे. प्रत्येक मागल्या विधानांतील उपमेय पुढच्या प्रत्येक विधानांत उपमान केलेलें आहे हें "रसनोपमेचें उदाहरण." येथें मधुर, कोमल, सुसघटित, विमल, आणि महित, असे चार उपमांत चार भिन्न भिन्न साधारण धर्म आहेत.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

> भेकास सर्प, सर्पास केकी, केकीस वीश्वर ।
> तसा दुर्जन साधूस भयदायी निरंतर ॥ ५९ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति, संकीर्ण, पद्य ८६.

बेडकाला जसा साप भीतिदायक असतो, किंवा सापाला जसा मोर भीतिदायक असतो, किंवा मोराला जसा गरुड भीतिदायक असतो, तसा साधूला खल भीतिदायक असतो !

येथें भेक, सर्प, केकी, वीश्वर, आणि दुर्जन, ह्या पांच पदार्थांची एक सांखळी आहे सर्प, केकी, आणि वीश्वर, हे तीन दुवे मागल्या आणि पुढल्या दुव्यांच्यामध्यें असून ते त्याना जोडणारे आहेत. पहिला दुवा आणि शेवटचा दुवा ह्यांना एकाच बाजूनें दुव्यांचा सबध आहे.

हें पद्य " मालोपमचें उदाहरण " असून त्यांत " रसना " साधली आहे.

उपमा ह्या अलकाराचे पूर्णोपमा, मालोपमा, लुप्तोपमा, आणि रसनोपमा, असे चारच भेद येथवर आम्ही सागितले. परंतु कविप्रतिभेनें आणखी शेकडों प्रकार संभवतात त्याचें आम्ही दिग्दर्शन केलें नाहीं.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

> **वर्ण्यापरी वर्ण्य एक हें विधान "अनन्वय" ।**
> **नान्यत्र वर्ण्य वस्तूचा धर्म हा वर्णनाशय ॥ ८८ ॥**
> **ह्याचा एक असे भेद धर्माची ज्यांत उक्ति तो ।**
> **नसतां ती दुजा भेद आलंकारिक मानितो ॥ ८९ ॥**

जेव्हां एकाद्या वस्तूचें वर्णन करावयाचें असलें, आणि त्या वस्तूच्या ठायीं जो धर्म आहे तो दुसऱ्या कोणत्याही वस्तूच्या ठायीं नाहीं असा अभिप्राय व्यक्त करावयाचा असतो, तेव्हा त्या वस्तूसारखी तीच वस्तू, असें एक वाक्यात्मक विधान केलेलें असतें, तेव्हां " अनन्वय "हा अलंकार होतो जेव्हां ह्या वर्ण्य वस्तूचा धर्म ह्या विधानात सांगितलेला असतो, तेव्हां अनन्वय अलकाराचा एक प्रकार ( क ) होतो, आणि तो धर्म सांगितलेला नसतो, तेव्हां दुसरा प्रकार ( ख ) होतो.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

> राघव प्रकृतिक्षेमचिंतनीं राघवापरि ।
> भीमसेनापरी भीमसेन निर्भय संगरीं ॥ ६० ॥

प्रजाजनाचें कल्याण मनात जागें ठेवण्याच्या बाबतींत रामासारखा एक रामच होऊन गेला. ह्या उदाहरणांत "प्रकृतिक्षेमचिंतन" हा रामाचा धर्म उक्त आहे.

भीमाप्रमाणें रणांगणांत भीमच धीट होता ह्या उदाहरणात "निर्भयत्व" हा गुण उक्त आहे हीं दोन्ही उदाहरणें "अनन्वयाच्या (क)" ह्या प्रकाराचीं आहेत, आणि हीं दोन्ही उदाहरणें एक वाक्यात्मक आहेत

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

त्यजूनि निज बांधवां हतनया ! विपक्षासवें
करोनि सखिता सुखें तुज कसें तरि राहवे !।
तुझेपरि बिभीषणा ! अधम तूंच भूमंडळीं,
तुझी मलिनता त्रपा उपजवील हालाहलीं ॥ ६१ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०; पद्य ५०.

इंद्रजित् बिभीषणाला धिक्कारून म्हणतो.—अरे नीतिमार्ग सोडून देणाऱ्या बिभीषणा, आपल्या बंधुजनांना सोडून शत्रूशीं सख्य करून तुला सुखांत कसें राहवतें ? तुझ्यासारखा ह्या सर्व पृथ्वीच्या तळावर तूंच नीच आहेस ! तुझा नीचपणा पाहून हालाहलाला लाज वाटेल ! येथें "अनन्वय अलंकाराचा ( क )" प्रकार आहे.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

रामापरीच भुजविक्रमशालि राम
रामापरी खचित रामचि नीतिधाम ।
सीतेपरी मधुरकांति दुजी न सीता
सौजन्यसार कमनीयगुणा विनीता ॥ ६२ ॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग ३, पद्य ७२.

बाहूंच्या पराक्रमानें शोभणारा रामासारखा रामच होय रामासारखा नीतिमान् रामच होय सीतेसारखी सुंदर आणि सौजन्ययुक्त आणि विनयशील अशी सीताच होय!

येथें अनन्वय अलंकाराचीं तीन उदाहरणें आहेत तिन्ही उदाहरणांत साधारण धर्म उक्त आहे. हीं अनन्वयाच्या ( क ) ह्या प्रकाराचीं उदाहरणें.

उदाहरण; वृत्त रथोद्धता

तू तूझेचि परि अंब ! पावना, तूं तुझेचि परि शांतिदा मना ।
जेंवि हीं त्रिपथगे ! तुझीं जलें तेंवि हींच, इतरें न निर्मल ॥ ६३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ७, पद्य ८१.

ही सीतेची गंगेप्रत उक्ति आहे.

हे माते गंगे, तुझ्या सारखीच तूं पवित्र आहेस, आणि मनाला शांति देणारी तुझ्यासारखी तूच आहेस ! हे गंगे, हीं तुझीं जलें तुझ्याच जलांसारखी निर्मल आहेत, तशीं दुसरीं कोणतींही जलें निर्मल नाहींत !

येथें प्रथमार्धांत दोन अनन्वय आहेत, "पावनत्व" आणि "शांतिदत्व" हे धर्म सांगितलें आहेत. द्वितीयार्धांत "निर्मलत्व" हा धर्म सांगितलेला आहे. हीं

तिन्ही "अनन्वयाच्या ( क )" ह्या प्रकाराचीं उदाहरणें होत.

उदाहरण, वृत्त आर्या

होउन गेले राजे आजवरि अनेक मेदिनीवरती ।
परि शर्यातीचे परि शर्याति असेंच सर्व बुध म्हणती ॥ ६४ ॥

वि० वा० भिडे,–सुकन्या, आर्या २.

आजपर्यंत पृथ्वीवर अनेक राजे होऊन गेले, पण शर्यातिसारखा शर्यातीच होता, असेंच सर्व जाणते लोक म्हणतात !

येथें कोणच्या गुणांत शर्याति श्रेष्ठ होता तें सांगितलेलें नाहीं. हा "अनन्वयाचा ( ख )" हा प्रकार होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**दोन वस्तूंत तिजशी ही, तीही इजशी असे ।**
**ह्या उक्तीतें दिजे नांव " उपमेयोपमा " असें ॥ ९० ॥**
**सारखेपण ज्या धर्मामध्यें वस्तुद्वयीं वसे ।**
**एक भेद तदुक्तीनें, अनुक्तीनें दुजा असे ॥ ९१ ॥**

दोन वस्तूंपैकीं ही तिच्यासारखी आहे, आणि ती हिच्यासारखी आहे, अशा विधानाला " उपमेयोपमा " असें नांव देण्यांत आलेलें आहे. ह्या दोन वस्तूंत ज्या धर्मांत सारखेपणा आहे, तो धर्म उक्त असल्यास उपमेयोपमेचा एक प्रकार ( क ) होतो, आणि तो धर्म उक्त नसल्यास दुसरा प्रकार ( ख ) हा होतो.

उदाहरण; वृत्त आर्या

शर्याति रामसा नृप, रामही शर्यातिसा प्रजानिष्ठ ।
स्त्रीकन्या प्रिय हा तो दूर करी कीं प्रजासुख गरिष्ठ ॥ ६५ ॥

वि० वा० भिडे,–सुकन्या, पद्य ५२.

प्रजेचें कल्याण चिंतिण्याच्या धर्मामध्यें रामासारखा शर्याति होता आणि शर्यातीसारखा राम होता त्या दोघांच्या अंतःकरणांत प्रजेचें कल्याण हें महत्त्वाचें असल्याकारणानें, ह्या कल्याणाला बाध येऊं नये म्हणून रामानें आपली स्त्री सीता परित्यागिली, आणि शर्यातीनें आपली कन्या सुकन्या परित्यागिली !

येथें प्रथमार्धांत " उपमेयोपमा " असून " प्रजानिष्ठत्व " हा सामान्य धर्म सांगितलेला आहे हें " उपमेयोपमेच्या ( क ) " प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

निशाट बल घेऊनी समरिं इंद्रजित् पावला,
तृणा अनल जाहला सुभट तो अरीच्या बला ।
तयें अमित मारिले प्लवग ऋक्ष युद्धीं अहा !
कृतान्तसम तो, तयासम कृतान्त जीवापहा ॥ ६६ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य १६.

राक्षसांचें सैन्य घेऊन रणांगणावर इंद्रजित् आला तो उत्कृष्ट योद्धा इंद्रजित् शत्रुसैन्यरूपी गवताला अग्नि झाला, त्यानें अगणित वानर आणि ऋक्ष युद्धांत ठार मारिले प्राण हरण करण्याच्या धर्मांत तो यमासारखा होता आणि यम त्याच्यासारखा होता!

येथें चतुर्थ चरणांत " उपमेयोपमा " आहे. " जीवापहा " हा साधारण धर्म उक्त असल्याकारणानें हा " उपमेयोपमा " ह्या अलंकाराचा (क) प्रकार होय.

उदाहरण, वृत्त कलहंस.

नभ तोयसेंहि नभसें अजि तोय, विमलत्व हा गुण मनोरम होय।
कमलांपरी अजि उडु गगनांत, उडुंचें परीहि कमलें सलिलांत ॥६७॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १४, पद्य १०

हें शरदृतूचें वर्णन राम करीत आहे.

आज जलासारखें आकाश आहे, आणि आकाशासारखें जल आहे स्वच्छपणा हा त्या दोहोंचा धर्म आल्हाद वाटविणारा आहे. आज आकाशांत कमळासारखे तारे शोभत आहेत, आणि त्यांच्यासारखीं कमळें पाण्यामध्यें शोभत आहेत!

ह्या पद्याच्या प्रथमार्धांत " विमलत्व " हा नभ आणि तोय ह्यांचा साधारण धर्म उक्त आहे हा उपमेयोपमेचा (क) प्रकार होय. द्वितीयार्धांत उडु आणि कमलें ह्यांचा साधारण धर्म "शोभमानत्व" हा उक्त नाहीं. हें (ख) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त कलहंस.

विधु हंससा धवलरूप नभांत, विधुसाहि हंस शरदेंत जलांत।
नभ तोय हीं समगुणाढ्य दिसाया सजलीं परस्परविरोध कराया॥६८॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १४, पद्य ११.

राम शरदृतूचें वर्णन करीत आहे शरदृतूंत हंसासारखा चंद्र आकाशांत पांढरा स्वच्छ दिसतो, आणि चंद्रासारखा पाण्यांत हंस पांढरा स्वच्छ दिसतो आकाश आणि पाणी हीं सारख्या गुणानें युक्त असून तीं जणों काय परस्परांशीं स्पर्धा करावयास उठलीं आहेत!

येथें प्रथमार्धांत " विधु " आणि " हंस " यांचा " धवलत्व " हा सामान्य धर्म उक्त असल्यामुळें हा उपमेयोपमेचा (क) हा प्रकार होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**करी संभावना वर्ण्य वस्तूवरि कवी जिथें–।**
**तीं दुजीच अशा अर्थें " उत्प्रेक्षा " होतसे तिथें ॥ ९२ ॥**

संभावना ह्म० अमुक वस्तु तमुक आहे असा बळकट ग्रह म्हणजे कल्पना. असा ग्रह सांगणें ह्या क्रियेलाही " संभावना " ह्मणतात जेथें एकादी वस्तु दुसरीच कांहीं

वस्तु आहे, असा आपला दृढ ग्रह कवि सांगतो, तेथें ' उत्प्रेक्षा हा अलंकार होतो. वर्ण्य वस्तूवर म्ह० उपमेयावर अवर्ण्य वस्तूची म्ह० उपमानाची संभावना ह्या अलंकारांत प्रकट केलेली असते उपमेय आणि उपमान ह्याच्यात सादृश्य असल्याकारणानें उपमेय हें उपमान आहे, असा कवीचा ग्रह होतो.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**वाटे, भासे, जणों, काय, जाणों, कीं काय, कीं, गमे ।**
**शब्द, दावीति उत्प्रेक्षा एतदर्थक अन्यही ॥ ९३ ॥**

' उत्प्रेक्षा " ह्या अलकारांत उपमेय हें उपमान आहे, असा कवीचा झालेला ग्रह दाखविणारे शब्द वाटे, भासे, जणों, काय, जाणों, कीं काय, कीं, गमे, हे किंवा ह्या अर्थाचे दुसरे शब्द असतात.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

स्फुलिंग उठले तदा भडकल्या घरांपासुनी,
अदग्धहि घरांस ते पसरले जवें तेथुनी ।
घरें त्वरित पेटलीं लघु विशालही यापरी,
निशाट पुरिं वाटला ज्वलन कीं विलासा करी ॥ ६९ ॥

बि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य २८.

लंकापुरी जळत होती त्या प्रसगाचें हें वर्णन आहे. जळूं लागलेल्या घरांपासून ठिणग्या उत्पन्न झाल्या त्या अद्यापि जळत नसलेल्या घरांवर पडूं लागल्या, तेणेंकरून लहान मोठीं अशीं सर्वच घरें जळूं लागलीं ! अग्नि ह्या राक्षसांच्या नगरींत जणों काय क्रीडा करीत आहे असें दिसलें !

येथें चतुर्थ चरणांत उत्प्रेक्षा आहे " वाटला " हा उत्प्रेक्षा दाखविणारा शब्द आहे.

उदाहरण, वृत्त क्षमा.

चरमगिरितटा जाउं लागे रवी त्यजुनि धवलता लोहितीं वैभवीं ।
कनकमयरसें ती जणों माखिली निशिगपतिपुरी वानरें देखिली ॥ ७० ॥

बि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १५, पद्य २७.

लंकानगरीचा मारुतीनें पाहिलेला सायंकाळचा देखावा ह्या पद्यात वर्णिला आहे. अस्ताचलाच्या शिखराकडे सूर्य आपली पांढरी कांति सोडून तांबड्या शोभेनें युक्त होतसाता जाऊं लागला. ही राक्षसाची नगरी सोन्याच्या रसानें जणों काय माखून काढल्यासारखी दिसत होती, ती मारुतीनें पाहिली !

येथें तिसऱ्या चरणांत "उत्प्रेक्षा" आहे " जणों " हा उत्प्रेक्षावाचक शब्द.

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

अनेक जळतीं घरें धडधडां पडों लागलीं,
विदीर्ण मणिकुट्टिमें विखरलीं धरित्रीतलीं ।

स्फुलिंगनिकर ज्वलद्गृहसमुत्थ गेला वरी,
कृशानुतरुचीं सुमें पसरलीं जणों अंबरीं ॥ ७१ ॥

वि० वा० भिडे,–रा०प०, सर्ग २०, पद्य ३०.

जळत असलेल्या लंकानगरीचें हें वर्णन आहे. जळत असलेलीं पुष्कळ घरें धडाधडां कोसळून पडूं लागलीं; फुटलेल्या रत्नखचित फरसबंदीच्या जमीनी भूतलावर अस्ताव्यस्त होऊन पडल्या; जळत असलेल्या घरांपासून ठिणग्यांचें लोट वर आकाशांत जाऊं लागले, अग्निरूपी वृक्षाचीं हीं फुलेंच जणों काय आकाशांत पसरलीं होतीं !

येथें चवथ्या चरणांत "उत्प्रेक्षा" असून "जणों" हा उत्प्रेक्षावाचक

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

निशाटरुदितध्वनी करुण अंबरातें भरी,
निशाटपुरदुर्दशा अमित जाहली यापरी ।
अनर्थकर देखतां प्लवग ऋक्ष लंकेमधीं
दशास्य खवळे जणों प्रलयकालिंचा तोयधी ॥ ७२ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य ३१

राक्षसांच्या रडण्याचा केविलवाणा आवाज आकाशांत भरत होता. या रीतीनें लंकेची फार दुर्दशा झाली. नाश करणारे हे वानर आणि ऋक्ष त्यांना पाहून रावण खवळला,– जणों काय तो प्रळयकाळचा समुद्रच होता !

येथें चतुर्थ चरणांत "दशास्यावर" "तोयधीची" उत्प्रेक्षा आहे. "जणों" हा उत्प्रेक्षावाचक शब्द.

उदाहरण; वृत्त पृथ्वी.

बहिर्गत करावया प्लवग ऋक्ष लंकेंतुनी
अनेक भट योजिले दशमुखें त्वरा दावुनी
रणार्थ चतुरंगिणी समयिं त्या महावाहिनी
पुढें पसरली जणों गगनगर्भि कादंबिनी ॥ ७३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०; पद्य ३२.

वानर आणि ऋक्ष त्यांना लंकेंतून हाकून देण्यासाठीं रावणानें जलदीनें अनेक योध्यांस त्यांच्यावर पाठविलें. चतुरंगिणी सेना या वेळीं रणावर पसरली,–ती सेना जणों काय आकाशाच्या पोकळींत पसरलेली मेघमालाच होती ! येथेंही उत्प्रेक्षा आहे. "जणों" हा उत्प्रेक्षावाचक शब्द.

उदाहरण; वृत्त सौदामिनी.

सदा श्रीस लाधे अरुद्धा गती, नदी काय वर्षर्तुकालीन ती ।
परी शारदेला मिळेना स्थल, तिचा सर्व ठायीं सदा हो छळ ॥७४॥

वि० वा० भिडे,–श्री शारदा, पद्य २०

संपत्तीची गति सदा अकुंठित असते; जणों काय ती पावसाळ्यांतील नदीच! परंतु शारदेला कोठेंच स्थळ मिळत नाहीं; तिचा सर्व ठिकाणीं छळच होतो. श्रीमत मनुष्याला कांहीं अडथळा होत नाहीं; विद्वानाला कोठेंच स्थान मिळत नाहीं. श्रीमंताला सर्व कांहीं प्राप्त होतें; विद्वानाची कोठेंच चहा होत नाहीं!

येथें प्रथमार्धांत श्रीवर वर्षर्तुकालीन नदीत्वाची संभावना केली आहे. हें उत्प्रेक्षेचें उदाहरण. "काय" हा उत्प्रेक्षावाचक शब्द

उदाहरण, वृत्त आर्या

गिरिवरि ठायीं ठायीं पादप अति उंच उंच बहु होते।
स्थापी गगनतलाला आधारस्तंभ कीं विधि अहो! ते ॥ ७५ ॥

वि० वा० भिडे,–गजेंद्रमोक्ष, पद्य ४.

ह्या त्रिकूटपर्वतावर उंच उंच वृक्ष होते. आकाशाला टेका देण्यासाठीं ब्रह्मदेवानें ते खांबच जणों काय उभारलेले होते!

येथें "पादप" ह्या वस्तूवर "आधारस्तंभत्वाची" कल्पना कवीनें केलेली आहे. हें उत्प्रेक्षेचें उदाहरण होय. "कीं" हा उत्प्रेक्षावाचक शब्द.

उदाहरण; वृत्त मालिनी.

नलविरचित सेतू दीर्घ विस्तीर्ण झाला,
उपजवि सकलांच्या चित्तिं तो विस्मयाला।
अभयवितरणाला आपुल्या कन्यकेला
सकरुण अवनीनें हात कीं लांब केला ॥ ७६ ॥
जलधिस शयनाला सेतुभित्ती उशाला
रघुवर उपधा ही मांडि किंवा विशाला।
रघुवरकृत किंवा सेतु हा मानदण्ड
जलधिवितततेचें माप घाया प्रचण्ड ॥ ७७ ॥
करगत जणुं लंकारूप मत्स्यी कराया
बडिश चतुर निर्मी सेतु हा रामराया।
दशमुखपिट लंकादेहिंचा भग्न व्हाया
भिषज खुपसि सेतू शस्त्र कीं रामराया ॥ ७८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १९, श्लोक८१ ते ७३.

लंकेस जावयासाठीं रामानें जो सेतु बांधला त्याचें ह्या तीन पद्यांत वर्णन आहे.

नलानें बांधलेला हा सेतु लांब आणि रुंद होता तो पाहून सर्वांना विस्मय वाटला. आपली कन्या जी सीता तिला अभय देण्यासाठीं भूमीनें आपला हात पुढें सारला आहे कीं काय? किंवा समुद्राला निजतांना डोक्याखालीं घ्यावयाला सेतु ही

उशी रामानें मांडिली आहे कीं काय ? किंवा समुद्राच्या विस्ताराचें माप घ्यावयासाठीं रामानें सेतु हा मोजणीचा गज उत्पन्न केला आहे कीं काय ? किंवा लंकारूपी मत्स्यीला ओढून काढण्यासाठीं रामानें सेतु हा गळ उत्पन्न केला आहे कीं काय ? किंवा लंकेच्या शरीराला झालेलें रावणरूपी गळू फोडण्यासाठीं सेतुरूपी शस्त्र राम ह्या वैद्यानें त्या गळवांत खुपसलें आहे कीं काय ?

ह्या तीन पद्यांत सेतूवर भूमीचा हात, उशी, मोजणीचा गज, मासे पकडण्याचा गळ, आणि वैद्याचें शस्त्र, अशा पांच उत्प्रेक्षा आहेत.

उत्प्रेक्षा ह्या अलंकाराचे भेद मम्मटानें सांगितले नाहींत, परंतु ते इतर आलंकारिकांनीं दिले आहेत ते विद्यार्थ्यांना माहीत असावे म्हणून ते येथें देतों. उत्प्रेक्षा करावयासाठीं कवीनें एकादा पदार्थ कल्पिला असला तर ती " स्वरूपोत्प्रेक्षा " किंवा "वस्तूत्प्रेक्षा" होते. क्रियेवर जी उत्प्रेक्षा ती ह्याच प्रकारांत येते कवीनें क्रियेचें कारण कल्पिलेलें असलें तर ती "हेतूत्प्रेक्षा" होते. कवीनें क्रियेचें फळ कल्पिलेलें असलें तर ती " फलोत्प्रेक्षा " होते.

उदाहरण, वृत्त सौदामिनी

तदंगद्युतीनें जणों माखिलों, जणों नाग मंत्रें असें मोहिलों ।
तिचें तेज मद्देहिं वाटे भिने, तिच्या स्नापिलों मी जणों दीप्तिनें ॥७९॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १६, पद्य २५.

हा सीतेला पाहून रावणानें काढलेला स्वगत उद्गार आहे

तिच्या म्हणजे सीतेच्या अंगाच्या कांतीनें मी जणों काय चोपडलों गेलों आहे ! मंत्रानें मोह ज्यावर घातला आहे असा मी जणों काय सर्प आहें ! तिचें तेज माझ्या सर्व शरीरांत जणों काय भिनत आहे, तिच्या कांतीनें मला जणों काय स्नान होत आहे !

येथें चार चरणांत चार उत्प्रेक्षा आहेत ह्या चारी " वस्तूत्प्रेक्षा " होत

उदाहरण; वृत्त मंजुभाषिणी

रघुनाथकार्मुकनिरस्त मार्गणां रुचल्या न यातुतनु पापलक्षणा ।
म्हणुनी प्रवेश करितांच त्या तयीं त्यजिल्या असें मज गमे मरुद्रयीं ॥८०॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ९, पद्य ७३

धनुष्यावरून रामानें सोडलेल्या बाणांना राक्षसांचे पापी देह रुचले नाहींत म्हणून त्या देहांत शिरताच ते बाण वायुवेगानें त्या देहांतून बाहेर पडून निघून गेले असें मला वाटतें ।

येथें त्या मार्गणांना राक्षसांच्या तनु आवडल्या नाहींत हें त्यांच्या बाहेर पडण्याचें कविकल्पित कारण होय हें " हेतूत्प्रेक्षेचें " उदाहरण. रामानें बाण अत्यंत जोरानें सोडलेले होते म्हणून ते राक्षसांच्या देहांतून आरपार निघून गेले असा कवीचा भाव आहे

उदाहरण; वृत्त स्वागता.

तो सुबाहु रघुवंशवरानें ताडिला अनलदीप्तशरानें ।
तो पडे व्यसु समायत काय भूमिदैर्घ्यगणनास्तव काय ! ॥ ८१ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २, पद्य ८५

रघूच्या वंशांतील उत्कृष्ट वीर जो राम त्यानें अग्नीसारखा तेजस्वी बाण सुबाहु राक्षसावर सोडला. तेव्हां तो सुबाहु मरण पावून तो आपल्या विशाल शरीरानें भूमीचें माप घेण्यासाठीं जणों काय जमीनीवर पडला'

येथें भूमीचें माप घेणें हें कविकल्पित फळ आहे, ही " फलोत्प्रेक्षा " होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

ह्या चारीही होत्या मूर्ती अतिकृष्णवर्ण यवनाच्या ।
जाणों मसीजलाची शंभर देहां दिलीं पुटें त्यांच्या ॥ ८२ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ३२.

हे चार यवन अत्यन्त काळे होते, जणों काय त्यांच्या शरीरांना शाईचीं शंभर शंभर पुटें दिलीं होतीं । हें " वस्तूत्प्रेक्षेचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त प्रहर्षिणी.

श्रीराम प्रणयविमोहभग्न चेतीं अश्रूंनीं चिर भिजवी विभूषणें तीं ।
संस्काराविण मळलीं म्हणूनि काय ह्या प्रक्षालनविधि योजि रामराय ॥८३॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग १२, पद्य ५०.

सुग्रीवानें रामाला सीतेचीं विभूषणें दाखविलीं त्या प्रसगाचें हें वर्णन आहे.

प्रेमानें उत्पन्न झालेल्या मोहानें व्यथित झालें आहे अंतःकरण ज्याचें अशा रामानें तीं विभूषणें अश्रूंनीं भिजविलीं; दीर्घकाळपर्यंत त्या विभूषणांना उजळा दिलेला नव्हता म्हणून तीं मळलीं होतीं, म्हणून तीं स्वच्छ करण्यासाठीं रामानें तीं जणों काय धुऊन काढलीं !

संस्कार न केला गेल्यामुळें विभूषणें मळलीं होतीं; तीं धुऊन काढण्यासाठीं जणों काय रामानें त्यांच्यावर अश्रु पाडविले " धुऊन काढणें "-हें फळ उत्प्रेक्षित आहे. ही " फलोत्प्रेक्षा. "

लक्षण; वृत्त आर्या.

**साम्यावरोनि शंका उपमेयाविषयिं येतसे कीं तें–।**
**उपमान असावें, ह्या देति " ससंदेह " नांव उक्तीतें॥९४॥**
**शुद्धच संदेह असो, कीं निश्चयगर्भ, निश्चयान्त असो ।**
**त्रिविध प्रकार तेणें ह्याचे हें तुमचिया मनांत ठसो॥ ९५ ॥**

जेव्हां कांहीं सारखेपणावरून प्रकृत वस्तु ( म्ह० उपमेय ) कांहीं वेगळीच वस्तु ( म्ह० उपमान ) आहे कीं काय अशी शंका उत्पन्न झाल्याचें विधान असतें, तेव्हां ह्या विधानाला " ससंदेह " अलंकार असें म्हणतात.

( क ) उपमेयावर उपमानत्वाची शंका घेतलेली असली, आणि नतर पुढें कांहींच विधान नसलें, तर तो " शुद्ध ससंदेह " अलकार होतो.

( ख ) उपमेयावर उपमानत्वाची शंका घेऊन त्या दोहोंतील भेद दाखवून त्या शंकेचें निरसन झाल्याचें वर्णन असलें, तर तो " निश्चयान्त ससदेह "

( ग ) उपमेयावर उपमानत्वाची शंका, मग भेदकथन, मग पहिल्या शंकेचें निरसन, मग पुन्हां दुसरी शंका, असा क्रम असल्यास तो " निश्चयगर्भ प्रकार."

येणेंप्रमाणें ससदेह अलकाराचे तीन प्रकार होतात. त्यांचीं पुढें क्रमानें उदाहरणें देतों

उदाहरण, वृत्त आर्या

इतुक्यांत वनान्तावरि दिसलें काळें तयांपुढें कांहीं ।
कज्जलराशि असे कीं हा केला तर्क ह्या मराठ्यांहीं ॥ ८४ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य २९.

इतक्यात त्या अरण्याच्या कांठावर त्यांना अत्यन्त काळेकुट्ट असें कांहीं दिसलें, तो काजळाचा ढीग असेल काय ? अशी शंका ह्या मराठ्यांना आली हें " शुद्ध ससंदेहाचें " म्हणजे ( क ) ह्या प्रकाराचें उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या.

तें काळें बघुनि घनध्वान्ताचि संदेह ये मग तयांस ।
तो स्थिर, हा सरके, हो संदेहाचा असा मग निरास ॥ ८५ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ३०.

ह्या चार मराठ्याना काळें असें जें कांहीं पुढें दिसलें तें दाट काळोख असावा असा संदेह त्याना आला पण तो अचेतन म्हणून स्थिर असणार, आणि हा सरकत आहे, यावरून ह्या त्यांच्या सदेहाचा निरास झाला !

येथें त्या काळ्यावर घनध्वान्ताचा संदेह आला; मग भेदाचें कथन असून त्या संदेहाचा निरास झाला, असें शेवटीं वर्णन आहे. हा " ससंदेहाचा ( ख ) " हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त मालिनी.

बघुनि रघुपतीला चंडकांती सुवेलीं
मति निशिचरचित्तीं चित्ररूपा उदेली ।
रविपरि दिसतो हा किंतु बैसे रथीं न,
अनलसम दिसे हा किंतु चांगल्यहीन ॥ ८६ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०; सर्ग १७, पद्य ९०.

रावणाशीं युद्ध करण्यासाठीं राम लंकेंत येऊन सुवेल पर्वतावर तळ देऊन राहिला, त्या वेळीं त्याला पाहून राक्षसाच्या मनात जे तर्कवितर्क आले, त्याचें हें वर्णन आहे.

देदीप्यमान आहे तेज ज्याचें अशा त्या रामाला पाहून राक्षसांच्या मनांत विचित्र कल्पना उत्पन्न झाली, ती अशी कीं हा दिसतो सूर्यासारखा, पण तो रथात बसलेला नाहीं. हा दिसतो अग्निसारखा पण तो चंचल नाहीं !

येथें रामावर रवित्वाची शंका प्रथम असून मग त्या शंकेचें निरसन झालें आहे, मग पुन्हा अनलत्वाची शंका असून तिचेंही निरसन झालें आहे. हा "ससंदेहाचा" "निश्चयगर्भ" म्हणजे (ग) प्रकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या

> राक्षस यवनास म्हणों नर गगनामाजीं ते न संचरती ।
> किंवा रात्रिसमयिं ते गाढान्धातमसिं नच कधीं फिरती ॥ ८७ ॥
> दैत्य म्हणों यवनां तर, म्हादाजी, कामरूप ते नसती ।
> किंवा नरमांसाशन मिळवाया ते श्मशानिं न भ्रमती ॥ ८८ ॥
> ह्या यवनांस पशू ही संज्ञा देतांहि चांचरे वाचा ।
> पशु केवळ लीलेस्तव करिति न संहार जीवमात्राचा ॥ ८९ ॥

वि० वा० भिडे,-शिवाजीची उक्ति, पद्यें ५८,५९,६०

म्हादाजीला शिवाजी म्हणतोः—

ह्या यवनांना राक्षस म्हणावें तर ते आकाशांत फिरत नाहींत किंवा रात्रीच्या वेळीं गाढ अंधारांतही ते भटकत नाहींत ह्या यवनांना दैत्य म्हणावें तर,अरे म्हादाजी, ते वाटेल तें रूप धारण करणारे नाहींत, किंवा मनुष्याचें मास खाण्यासाठीं ते श्मशानांत हिंडत नाहींत ह्या यवनांना पशूही म्हणतां येत नाहीं, कारण, पशु केवळ गमतीखातर प्राण्यांचा वध करीत नाहींत !

येथें यवनांसंबंधें राक्षसत्वाची शंका आली. पुढें ह्या शंकेचें निरसन झालें. नंतर यवन हे दैत्य असावे अशी शंका आली. पुढें ह्याही शंकेचें निरसन झालें. नंतर यवन हे पशु असावे अशी शंका आली. पुढें ह्याही शंकेचें निरसन झालें, असें वर्णन आहे.

येथें आरंभीं आणि अंतीं ‒ ‒ संशय आणि मध्यें शंकानिरसन किंवा निश्चय असल्यामुळें हा "ससंदेहाचा निश्चयगर्भ" म्हणजे (ग) हा प्रकार होय.

लक्षण; वृत्त आर्या.

> **प्रस्तुत अप्रस्तुत ह्या दोहोंत अभेद ह्या ग्रहें वचन— ।**
> **असतें तेथें होतें "रूपक" ऐसें म्हणे समस्त जन ॥ ९६ ॥**

प्रकृत आणि अप्रकृत, म्हणजे उपमेय आणि उपमान, ह्याच्यांत अभेद आहे असें गृहीत घेऊन जेथें कांहीं विधान केलेलें असतें, तेथें "रूपक" हा अलंकार होतो असें सर्व लोक म्हणतात.

उपमेय हें उपमानच आहे, उपमेय आणि उपमान हीं एकरूपच आहेत, त्याच्यांत कांहीं भेद नाहीं, अशा बुद्धीनें जें विधान करणें, त्याला "आरोप करणें" असें म्हणतात. उपमेयावर उपमानत्वाचा आरोप केला असतां "रूपक" होतें.

उदाहरण, वृत्त उपजाति.

क्रोधाग्निनें त्वन्मुख रक्त झालें हें पाहुनी ते शठ फार भ्याले ।
निरुद्ध तूं तन्मधुरोक्तजालीं होशील ही तन्मतिही विराली ॥ ९० ॥

वि० वा० भिडे.

तुझें तोंड कोपरूपी अग्नीनें तांबडें झालेलें पाहातांच ते लबाड लोक फार भ्याले. त्यांच्या गोड भाषणरूपी जाळ्यात तू अडकविली जाशील ही जी त्याची कल्पना होती ती पूर्णपणें निरस्त झाली !

येथें प्रथमार्धांत क्रोधावर अग्नित्वाचा आरोप केला आहे. द्वितीयार्धांत तन्मधुरोक्तावर जालत्वाचा आरोप केला आहे. ह्या पद्यात दोन रूपकें आहेत.

उदाहरण; वृत्त आर्या.

मौलाना अहमद मी हरि, तू गजशाव, उगीच बडबडसी ।
ये काफिरा ! शरण मज, नातरि वासूनि तोंड तूं पडसी ॥ ९१ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य २७

मी मौलाना अहमद सिंह आहें, तूं हत्तीचा बच्चा आहेस, व्यर्थ बडबड कशाला करतोस ! अरे नास्तिका, मला शरण ये, नाहींतर तूं तोंड वासून पडशील !

येथें मौलाना अहमदावर हरित्वाचा आरोप केला आहे, आणि तूं ( आबाजी सोनदेव ) याचेवर गजशावत्वाचा आरोप केला आहे येथें दोन रूपकें आहेत

येथवर रूपकाची आह्मी सामान्य कल्पना विद्यार्थ्यांला आणून दिली. आतां रूपकाच्या विविध प्रकारांचें वर्गीकरण करतों.

कवीनें रूपक ज्या पदार्थावर केलेलें असतें, त्या पदार्थांचीं अंगें किंवा भाग किंवा अवयव विचारात न घेतां त्या पदार्थावर रूपक केलेलें असलें, तर तें " निरंग रूपक " होतें ह्या रूपकांत अंगें नसल्याकारणानें त्याला " निरंग रूपक " हें नांव अन्वर्थक आहे ह्या जातीचें रूपक अगदीं साधें किंवा शुद्ध असतें. त्यांत कोणत्याही प्रकारची गुतागुत नसते कोपावर अग्नित्वाचा आरोप केला असतां तें " निरंग रूपक " होतें.

ह्या निरंगरूपकांत एका पदार्थावर एकाच वेळीं कांहीं आरोप केलेला असला तर त्याला " शुद्ध निरंगरूपक म्हणतात " ( क ) निरंगरूपकांत एकाच पदार्थावर अनेक वेळां अनेक आरोप केलेले असल्यास रूपकाची एक माला उत्पन्न होते म्हणून त्या रूपकाला " मालानिरंगरूपक " असें नाव देण्यांत येतें. हा ( ख ) प्रकार.

जेव्हां कवि एकाद्या पदार्थावर एक मुख्य रूपक करतो, आणि त्या पदार्थाच्या अंगांवरही दुसरीं गौण रूपकें करतो, तेव्हां ह्या रूपकाच्या प्रकाराला "सांग रूपक" असें म्हणतात ह्या सांगरूपकांतील सारींच रूपकें शब्दांनीं उक्त असल्यास त्याला' समस्तवस्तुविषय सांग रूपक ' म्हणतात ( ग ) पण ह्या रूपकांपैकीं कांहीं रूपकें शब्दांनीं उक्त असलीं आणि कांहीं संदर्भावरून जाणावयाचीं असलीं, तर त्या रूपकाला " एकदेशविवर्ति सांग रूपक " म्हणतात ( घ ).

४०३९

आतां ह्या चारी प्रकारांच्या रूपकांचीं उदाहरणें देतों
उदाहरण, वृत्त आर्या.

मी अपराधी, मी अनुतप्त असें, हो कृपाळु मजवरतीं।
वाक्छल्यें मम हृदया वेधुं नको, मान्य मम करीं प्रणती ॥ ९२ ॥
वि० वा० भिडे

मी तुझा अपराध केला आहे, मला पश्चात्ताप होत आहे; मजवर दया कर; भाषणरूपी शल्यानें माझ्या हृदयाला बोचू नको, माझी विनंती मान्य कर !

येथें " वाक्छल्य " हें रूपक असून येथें " वाच् " ह्या एका उपमेयावर " शल्य " ह्या उपमानाचा आरोप केला आहे आरोप एकच असल्याकारणानें हें " शुद्ध निरंग-रूपक " होय हें रूपकाच्या ( क ) ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त आर्या.

विधिचातुरी सदेहा,जननेत्रां कौमुदीच ही बाला।
मदनविलासा वसती, धन्य खचित ती करील शिवबाला ॥ ९३ ॥
वि०वा० भिडे,-शिवाजीचें चारित्र्य, पद्य ४०.

ही मुलगी ब्रह्मदेवाच्या निर्माणकुशलतेची मूर्ति आहे, लोकांच्या डोळ्यांना चंद्रप्रकाश आहे, आणि मन्मथाच्या क्रीडेला स्थान आहे, ती शिवाजीला खचित धन्य करील !

येथें त्या बालेवर " विधिचातुरीत्व, " " कौमुदीत्व, " आणि " मदन-विलासवसतित्व " असे तीन आरोप केले आहेत. हें " मालानिरंगरूपकाचें " म्हणजे (ख) ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त सौदामिनी.

खनी सौष्ठवाची, धुनी कांतिची,शिखा तूंचि सीते ! विलासाग्निची।
मृदुत्वा तुझ्या देखतां मालती, शिरीष, प्रियंगु, त्रपा पावती ॥ ९४ ॥
वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १६, पद्य ४८.

रावण सीतेला विलोभवीत असतां तिला म्हणतो—

हे सीते, तूं नेटकेपणाची खाण, आणि सौंदर्याची नदी, आणि विलासरूपी अग्नीची ज्वाळा आहेस ! तुझा नाजुकपणा पाहून मालती, शिरीष, आणि प्रियंगु, ह्या लज्जित होतात !

येथें पद्याच्या प्रथमार्द्धांत सीतेवर तीन रूपकें केलीं आहेत. " हें मालानिरंग रूपकाचें " म्हणजे ( ख ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या

ताराफेनविराजित तरुनि नभोंबुधि सुधांशु नाविक हा।
पश्चिमदिग्भार्येला प्रेमें भेटावयास जाइ पहा ॥ ९५ ॥

तारकारूपी फेसानें शोभणाऱ्या आकाशरूपी समुद्रावरून चंद्ररूपी नावाडी पश्चिम-दिशारूपी आपल्या पत्नीला प्रेमानें भेटावयास चालला आहे पहा !

येथें सुधांशूवर नाविकाचा, तारकांवर फेनाचा, नभावर अंबुधीचा, आणि पश्चिमदिशेवर भार्येचा आरोप केला आहे ह्या जलपर्यटनाचीं सर्व अंगें शब्दांनीं उक्त आहेत. "रूपकाचा हा ( ग ) " म्हणजे " समस्त वस्तु विषयसांग रूपक " हा प्रकार.

उदाहरण; वृत्त आर्या.

भवदुःखरोगजर्जर जे त्या लोकांस बोध हें अगद— ।
देउनि साधु तयांची जीवनयात्रा सदा करिति सुखद ॥ ९६ ॥

बि० वा० भिडे.

संसारांतील नानाविध दुःखें हेच कोणी रोग, त्यांनीं पीडित झालेल्या लोकांना उपदेश हें औषध देऊन साधु ( हे वैद्य ) त्यांची जीवितयात्रा सुखावह करतात।

येथें भवदुःखावर रोगाचें, आणि बोधावर अगदाचें रूपक केलें आहे, पण त्यांना अनुसरून " साधु " यावर "वैद्याचें" रूपक शब्दांनीं केलें नाहीं. तें अर्थावरूनच जाणावयाचें आहे. हें पद्य " एकदेशविवर्तिसाग रूपकाचें " म्हणजे (घ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**एक रूपक आधार दुसऱ्या रूपका असे ।**
**तेव्हां अन्योन्यसंयोगें " परंपरित " होतसे ॥ ९७ ॥**

एक रूपक करावयाचें असतां दुसऱ्या रूपकाचा आधार घ्यावा लागतो, तेव्हां त्या दोन रूपकांनीं " परंपरित रूपक " होतें हीं दोन्ही रूपकें परस्परावलंबी असतात. ह्या दोन रूपकांत कार्यकारणभाव असतो असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं. हा रूपकाचा ( ङ ) प्रकार

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**बहु हीं रूपकें एका वस्तूवरि कवी यदा ।**
**वर्णनीं करितो " मालापरंपरित " हो तदा ॥ ९८ ॥**

कांहीं एका वस्तूचें वर्णन करावयाचें असता कवि त्या वस्तूवर एकामागुन एक अशीं हीं ह्म० अशा प्रकारचीं ह्म० परंपरित रूपकें अनेक करतो, तेव्हां "मालापरंपरित" होतें. हा रूपकाचा ( च ) प्रकार.

उदाहरण; वृत्त पृथ्वी

निशाटबल घेउनी समरिं इंद्रजित् पावला,
तृणा अनल जाहला सुभट तो अरीच्या बला ।
तयें अमित मारिले प्लवग ऋक्ष युद्धीं अहा !
कृतांतसम तो तयासम कृतान्त जीवापहा ॥ ९७ ॥

वि०मा० भिडे,—रा० प०, सर्ग २०, पद्य १६.

राक्षसांचें सैन्य घेऊन इंद्रजित् समरांगणावर आला. शत्रूचें सैन्य हेंच कोणी गवत, त्याला तो उत्तम योद्धा अग्नि झाला ( म्हणजे शत्रूच्या सैन्याचा तो नाश करू लागला ) त्यानें अगणित वानर आणि ऋक्ष युद्धांत ठार मारिले, यमासारखा तो आणि त्याच्यासारखा यम प्राणनाशक होता !

येथें अरीच्या बलावर तृणत्वाचा आरोप केला आहे म्हणून इंद्रजितावर अनलत्वाचा आरोप करणें शक्य झालें आहे. पहिल्या रूपकावर दुसरें रूपक आधारलेलें आहे. हें " परंपरित रूपकाचें " उदाहरण होय. हा ( ङ ) प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या.

आधारस्तंभ तुम्ही चवघे जण आर्यसंस्कृतिगृहास ।
ही आर्यसंस्कृतिच शुचि साऱ्याही कुशल दाविल जगास ॥ ९८ ॥
वि० बा० भिडे,-कमळीची सुटका, पद्य १९८

हे शिवाजी, तानाजी, एसाजी, आणि बाजी ह्या तिघांसह तूं असे चवघे जण आर्यांची संस्कृति हेंच कोणी घर, त्याला आधाराचे खांब आहां ! हीच आर्यांची संस्कृति सर्व जगाला कल्याण देणारी होईल !

येथें "आर्यसंस्कृति"वर "गृहत्वाचा" आरोप, हें तुम्हा चौघावर "आधारस्तंभत्वाच्या" आरोपास कारण आहे हें "परंपरित रूपकाच्या ( छ ) ह्या प्रकाराचें" उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या

आर्योत्कर्षसरोजा तूं रवि, यवना गजा मृगेंद्र खरा ।
चातुर्वर्ण्यगृहा तूं आधारस्तंभ, नाचि असा दुसरा ॥ ९९ ॥

हे शिवाजी, आर्यांच्या वैभवरूपी पद्माला तू सूर्य आहेस, यवनरूपी हत्तीला तूं खरोखरी सिंह आहेस, आणि हिंदूच्या चातुर्वर्ण्यरूपी घराला तूं आधारस्तंभ आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोणी मनुष्य नाहीं !

येथें तीन परंपरित रूपकांची एक माला आहे. हें रूपकाच्या ( च ) ह्या प्रकारचें उदाहरण होय

लक्षण, वृत्त आर्या

**उपमेयाचा करुनी अपलाप स्थापिजेल उपमान ।**
**तेथें अलंकृती जी होइ " अपन्हुति " तियेस अभिधान ॥९९॥**
**वस्तूच्या रूपाचें गोपन किंवा नव्हेच ती म्हणणें ।**
**तत्स्थानीं अन्याचें स्थापन "अपलाप" होइ विबुध म्हणे ॥१००॥**
**अपलाप " आर्थ " एका वाक्यानें छलमिषादि शब्दांनीं-।**
**कीजे; "शाब्द" नव्हे तें तें, तें हें कथुनि दोन वाक्यांनीं ॥१०१॥**
**छल, ढोंग, रूप, आकृति, मिष, किंवा एतदर्थ येतात-।**
**शब्द विधानीं तेव्हां "आर्थ अपन्हुति" तियेस म्हणतात ॥१०२॥**

अपलाप करणें म्हणजे एकाद्या वस्तूचें स्वरूप बुझवून टाकणें किंवा झांकून टाकणें, अमुक वस्तु जी ती खरोखरी आहे, ती ती नाहीं अशा अर्थाचें जें विधान त्याला " अपलाप " म्हणतात.

उपमेयाचा अपलाप करून त्याचे जागीं उपमानाची स्थापना केली असतां " अपन्हुति " अलंकार होतो हें मुख नव्हे, हा चंद्र आहे, ह्या दोन वाक्यांत " मुख " ह्या वस्तूचा अपलाप केला आहे, आणि त्या वस्तूच्या जागीं चंद्र ह्या वस्तूची स्थापना केली आहे. हें " अपन्हुति " अलंकाराचें उदाहरण.

अपन्हुति अलंकाराचे दोन प्रकार असतात. जेव्हां स्पष्ट शब्दांनीं एकाद्या वस्तूचा अपलाप केलेला असतो, तेव्हां एक प्रकार होतो. त्याला "शाब्द अपन्हुति" म्हणतात. " हें मुख नव्हे, हा चंद्र आहे " हें "शाब्द" अपन्हुतीचें उदाहरण. शाब्द

अपन्हुतींत दोन वाक्यें असावीं लागतात " मुखाच्या रूपानें हा चंद्र शोभत आहे " असें एकवाक्यात्मक विधान केलेलें असल्यास तो अपन्हुतीचा दुसरा प्रकार, त्याला " आर्थ अपन्हुति " म्हणतात. ढोंग, बहाणा, मिष, आकृति, रूप, हे किंवा ह्या अर्थांचे शब्द ह्या प्रकारच्या अपन्हुतींत यावे लागतात.

उदाहरण, वृत्त आर्या.

न वरंग तो, असे तो क्रौर्य, कपट, धर्मवेड, कुविचार,
विश्वासघात यांच्या साराचा बनविला नराकार ॥ १००॥
अवरंगाच्या व्याजें कलि घाली उग्र येथ थयमान ।
बुडवी चातुर्वर्ण्य, प्रेम, दया, धर्म, देश करि रान ॥ १०१ ॥

वि० वा० भिडे,—कमळींची सुटका, पद्यें ७३ आणि ७४.

शिवाजी एका यवनापुढें अवरंगजेबाचें वर्णन करीत आहे.—

तो अवरंगजेब नव्हे; क्रूरपणा, लबाडी, धर्मवेड, हलके विचार, विश्वासघात, यांचा अर्क काढून त्या अर्कांची मानवी आकृति तो अवरंगजेब आहे !

अवरंगाच्या मिषानें ह्या आर्यभूमीवर कलि भयंकर थयमान घालीत आहे, तो चातुर्वर्ण्य, प्रेम, दया, आणि धर्म, हीं बुडवून ह्या देशाला रानाचें रूप देत आहे !

वरील दोन आर्यांपैकीं पहिलींत अवरंगजेब ह्या वस्तूचा "न वरंग तो" ह्या शब्दांनीं स्पष्ट अपलाप केला आहे, आणि त्याच्या जागीं क्रौर्य इ० दुर्गुणांचा नराकार ही वस्तु स्थापिली आहे. हें " शाब्द अपन्हुतीचें " उदाहरण.

दुसऱ्या आर्येंत " हा अवरंगजेब नव्हे, हा कलि आहे " असें न म्हणतां " अवरंगजेबाच्या मिषाचा हा कलि आहे " असें म्हटलें आहे. ही " आर्थ अपन्हुती "

उदाहरण, वृत्त उपजाति.

तटावरोनी जल पाहिल्यानें पोहावया येइल या भ्रमानें ।
घेई उडी जो जलिं तो जलीं न घेई यमाच्या मुखिं बुद्धिहीन ॥१०२॥

वि० वा० भिडे,–वेलावेदन पद्य १३

पाण्याच्या काठावरून पाणी पाहिल्यानें पोहावयाला येइल अशा मूर्ख कल्पनेनें जो पाण्यात उडी टाकतो, तो पाण्यांत उडी टाकीत नाहीं, तर यमाच्या तोंडांत उडी टाकतो !

येथें " जलीं उडी न घे " ह्या शब्दांनीं " जल " ह्याचा अपलाप करून तेथें " यमाचें मुख " स्थापित केलें आहे. हें " शाब्द अपन्हुतीचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त उपजाति.

हा हन्त ! हाहा ! चिरिली तयानें कपोतिका क्रूरतमें मनानें ।
न पक्षिणी ती चिरिली तयानें स्वसुस्थिती मूढतमें मनानें ॥ १०३ ॥

वि० वा० भिडे,–जळजवाल, श्लोक ३१.

( त्या कपोतीच्या पोटांतील सोन्याचीं सर्व अंडीं एकदम मिळविण्याच्या इच्छेनें)

जंबालानें ती कपोतिका निर्दय अंत:करणानें चिरिली त्यानें चिरिली ती कपोतिका नव्हती, आपली सुखाची स्थितीच त्यानें चिरिली !

येथें कपोती पक्षिणीचा अपलाप करून तिच्या जागीं स्वसुस्थिति स्थापिली आहे. हें " शाब्द अपन्हुतीचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या

शिवबाचा खड्ग न तो जो कापी दोन भुज तया अरिचे ।
इंद्राचा वज्रचि तो जो पक्ष च्छेदि त्या यवनगिरिचे ॥ १०४ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ११९

त्या शत्रूचे दोन बाहु ज्यानें छाटून टाकिले तो शिवाजीचा खड्ग (तरवार) नव्हता, तर त्या यवनरूपी पर्वताचे पक्ष तोडणारा तो इंद्राचा वज्रच होता !

येथें "खड्ग" चा अपलाप करून त्याचेवर वज्रत्व स्थापित केलें आहे. हें " शाब्द अपन्हुतीचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त वंशस्थ.

पुरस्थ सारे जन बोलले असें " न हा दशस्यंदन, इंद्र हा असे ।
खरीच हे द्यौ, नचि हे असे मही, नव्हे अयोध्या, अमरावतीच ही " ॥ १०५ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ४६

अयोध्या नगरींतील सर्व लोक म्हणाले, " हा दशरथ नव्हे, हा इंद्र आहे, ही पृथ्वी नव्हे, हा स्वर्ग आहे; ही अयोध्या नव्हे, ही अमरावतीच आहे ! "

येथें दशस्यदन, मही, आणि अयोध्या, ह्या तीन वस्तूंचा अपलाप केलेला असून त्यांचे स्थानीं इंद्र, द्यौ, आणि अमरावती, यांची अनुक्रमें स्थापना केली आहे. हीं तीन्ही " शाब्द अपन्हुतीचीं " उदाहरणें होत.

लक्षण वृत्त आर्या

**संदर्भादिक नसतां निर्णायक हेतु दोन अर्थ जर ।**
**शक्य असति वाक्याचे तर म्हणती " श्लेष " तो कविप्रवर ॥ १०३ ॥**

जेव्हां एकाद्या वाक्याचा नक्की अर्थ ठरवायाला संदर्भ इत्यादि निर्णायक अशी कांहीं गोष्ट नसते, आणि म्हणून जेथें दोन अर्थ शक्य असतात, तेथें " श्लेष " हा अलंकार होतो असें पंडित म्हणतात.

श्लेष दोन जातीचा असतो,–अर्थश्लेष आणि शब्दश्लेष. आम्ही येथें पहिल्या जातीच्या " श्लेष " घेतला आहे. जेव्हां तोच शब्द त्याच रूपांत असला तर दोन अर्थ होतात, नाहींतर होत नाहींत, तेव्हां तेथें " शब्दश्लेष " असतो " सैंधव " ह्या शब्दाचे घोडा आणि मीठ असे दोन अर्थ आहेत " सैंधव आण " असें कोणी मनुष्य म्हणाला आणि आपणास प्रसंग इत्यादि कांहीं ठाऊक नाहीं, तर त्या वाक्याचे दोन अर्थ संभवतात. परंतु कोणी मनुष्य प्रवासास निघाला असतां " सैंधव आण " असें तो म्हणाला, तर घोडा आण असा अर्थ होईल. तो जेवीत असता " सैंधव

आण " असें म्हणाला, तर मीठ आण असा अर्थ होईल. संदर्भादिकांवरून " सैंधव " शब्दाचा कोणचा अर्थ अभिप्रेत आहे हें समजावयाचें असतें. हें शब्दश्लेषाचें उदाहरण झालें (मागें लक्षणपद्यें ४७ आणि ४८ आणि त्याचें विवेचन पहा) परतु अर्थश्लेषाची तशी गोष्ट नसते जेव्हा एकाद्या वाक्यांत योजलेले शब्द काढून टाकून त्याचेबद्दल दुसरे त्याच अर्थाचे शब्द योजले, तरी श्लेषाला क्षति होत नाहीं, तेव्हां तेथें " अर्थश्लेष " असतो तेच शब्द त्याच रूपांत असतां जेथें दोन अर्थ होतात, तेथें " शब्दश्लेष " असतो. जेव्हां योजलेल्या शब्दाबद्दल त्याच अर्थाचे इतर शब्द योजले तरी दोन अर्थ होतात, तेथें " अर्थश्लेष " असतो.

उदाहरण; वृत्त आर्या

होओनि उदित दिनकर सार्वत्रिक तम हरी, जना त्यजवी—।
आलस्य, उचित कर्मीं देइ कराया जनास शक्ति नवी ॥ १०६ ॥

हा दिनकर ( सूर्य, पक्षीं "दिनकर" ह्या नावाचा राजा ) उदयाचलावर आल्याबरोबर ( उगवताच, पक्षीं सिंहासनारूढ होताच ) पृथ्वीवर सर्वत्र पसरलेला अंधेर घालवितो ( काळोख, पक्षीं अज्ञान निरस्त करतो ), लोकाना आळस टाकून द्यावयास लावतो, आणि योग्य कर्मे करावयाला नवी शक्ति देतो !

येथें "सूर्य" आणि " दिनकर " ह्या नांवाचा राजा, ह्या दोहोंसही हें वर्णन लागूं पडतें.

श्लिष्ट शब्दांचे दोन अर्थ वर कसांत दाखविले आहेत. ह्या श्लिष्ट शब्दांबद्दल त्याच अर्थाचे इतर शब्द घातले तरी श्लेष कायम राहातो. हें "अर्थश्लेषाचें" उदाहरण

उदाहरण; वृत्त आर्या.

तूं मलिन, कुटिल, नीरस, जडहि पुनर्भवपणेंहि कच साच।
धरिला शिरींही न स्वप्रकृतिगुण त्यजिसि, नांव कच साच ॥ १०७ ॥

मोरोपंत,–कचोपाख्यान

तूं काळा ( पक्षीं पातकी ), कुरळा ( पक्षीं, वाकड्या मार्गानें जाणारा ), शुष्क ( पक्षीं, प्रीतिरहित ), निर्जीव ( पक्षीं, मूर्ख ), असा असून वारंवार उत्पन्न होतोस ( पक्षीं, अनेक वेळां मरून जिवंत होतोस ) ह्या गुणांमुळें तू केशासारखा आहेस तुला मस्तकावर धारण केलें तरी ( पक्षीं, तुला प्रेमानें वागविलें तरी ) तूं आपला स्वभावसिद्ध गुण सोडीत नाहींस ! तुझें नांव "कच" आहे तें योग्यच आहे !

येथें मलिन, कुटिल, नीरस, जड, पुनर्भव, धरिला शिरीं, हे सहा शब्द श्लिष्ट आहेत. ह्या सहा शब्दांबद्दल तदर्थक दुसरे कोणतेही शब्द योजिले, तरी श्लेषाला क्षति होऊं शकत नाहीं. कारण, ह्या आर्येत योजलेले सहा शब्द बाह्य स्वरूपाला लागूं पडणारे असून स्वभाव, वृत्ति, इत्यादि अंतर्गुणांनाही लागूं पडणारे आहेत. तसेंच त्यांचे पर्यायशब्दही दोहोंकडे लागूं पडतील, म्हणून ही आर्या " अर्थगतश्लेषालंकाराचें " उदाहरण होय

लक्षण; वृत्त आर्या.

**श्लिष्ट विशेषणयोगें प्रकृताहुनि अन्य अर्थही निघतो- ।**
**ज्या वाक्याचा त्याचें नांव "समासोक्ति" हें कवी म्हणतो ॥१०४॥**

विशेषणें श्लिष्ट म्हणजे द्व्यर्थी असल्याकारणानें तीं प्रकृताला जशीं लागू पडतात, तशीं तीं अप्रकृतालाही लागूं पडूं शकतात, तेणेंकरून प्रकृत अर्थ निघून शिवाय अप्रकृत अशा अर्थाचा त्या वाक्यांतून बोध होऊं शकतो अशा प्रकारची रचना असल्यास तेथें "समासोक्ति" हा अलंकार होतो.

उदाहरण, वृत्त आर्या

दिवसाचीं कर्तव्यें केल्याविण पुरुष घे न विश्राती ।
आक्रामि जग आधीं मग संध्येची रक्त रवि बघे काती ॥ १०८ ॥

दिवसाचीं सर्व कामें केल्याशिवाय पुरुष विश्राति घेत नाहीं जगाचा फेरा अगोदर संपवून नंतर तांबडा ( पक्षीं, प्रेमयुक्त ) सूर्य संध्येची ( सायंकाळची ) शोभा पाहातो !

येथें द्वितीयार्धांत सूर्य संध्येची शोभा पाहातो यांत पुरुष आणि स्त्री यांचा विलास ध्वनित केला आहे हें "समासोक्तीचें" उदाहरण.

समग्र आर्येंत अर्थान्तरन्यासही आहे.

उदाहरण; वृत्त आर्या

त्यास न उत्तर देतां शिवबा उपसी क्षणांत तरवारी ।
स्पर्शे भवानीस शिवें करितां ती प्रकटि कान्तिभर भारी ॥ १०९ ॥

वि० वा० भिडे,-कमळाची सुटका, पद्य ९२.

हें त्या मुसलमानाचें भाषण ऐकतांच शिवाजीनें आपली तरवार उपसली. शिवाजीचा ( शिवाजीचा, शंकराचा ) भवानीस ( भवानी नांवाच्या तरवारीस, पक्षीं पार्वतीस ) स्पर्श होतांच ती भवानी विशेष कांति प्रगट करिती झाली !

येथें शिव, भवानी, हे शब्द श्लिष्ट असून अप्रकृत अर्थ पतिपत्नींचें आलिंगन सूचित होत आहे हें "समासोक्तीचें" उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त आर्या

तव हस्तस्पर्शानें कांतिमती ही स्फुरे तव भवानी ।
हृष्ट भयार्त सुहृद्रिपु बघतिल हें स्फुरित चकित नयनांनीं ॥ ११० ॥

वि० वा० भिडे,-कमळाची सुटका; पद्य २०२.

तिप्पण्णाभट वैष्णव शिवाजीस म्हणतो—

तुझ्या हाताचा स्पर्श त्या भवानी तरवारीस होतांच ती स्फुरण पावते हें स्फुरण तुझे मित्र आणि शत्रु आनंदित आणि भीतिग्रस्त डोळ्यांनीं पाहातील म्हणजे तू तरवार हातांत घेतांच तुझ्या मित्रांना आनंद होईल आणि शत्रूंना भीति वाटेल !

येथें आर्येच्या प्रथमार्धांत पतिपत्नींच्या विलासाचें दिग्दर्शन होत आहे. हें "समासोक्तीचें" उदाहरण द्वितीयार्धांत "यथासंख्य" अलंकारही आहे.

लक्षण, वृत्त आर्या

**संबध अशक्य जरिहि दोन पदार्थांत वा विधानांत ।**
**तरि तो जुळवुनि उपमा कवि दावि, "निदर्शना" असें त्यांत ॥१०५॥**

दोन पदार्थ किंवा दोन वाक्यें यांच्यांत जो संबध असणें शक्य किंवा संभवनीय नाहीं, तो सबध जोडणें आणि तेणेंकरून त्या दोहोंत सादृश्यसबध आहे असें दाखवून देणें, ह्याला "निदर्शना" म्हणतात

जे दोन पदार्थ किंवा वाक्यार्थ एकरूप नाहींत, ते एकरूप आहेत असें म्हटलें असतां त्या दोहोंत अर्थात् सादृश्य आहे असा वक्त्याचा अभिप्राय प्रकट होतो तेणें-करून ह्या विधानाचें पर्यवसान उपमेमध्यें होतें अशा प्रकारची मांडणी असतां "निद-र्शना" हा अलंकार होतो.

जेव्हां दोन वाक्यार्थ एकरूप आहेत असें विधान असतें, आणि परिणामीं त्या दोहोंत सादृश्य सूचित होतें, तेव्हां निदर्शनेचा (क) हा प्रकार होतो जेव्हां दोन पदार्थांत एकरूपता आहे असें विधान केलेलें असतें, आणि फलित अर्थानें त्या दोन पदार्थांत साम्य आहे असें सुचविलेलें असतें, तेव्हां निदर्शनेचा ( ख ) हा प्रकार होतो.

( क ) ह्या प्रकारांत दोन वाक्यार्थांत एकरूपता सांगितलेली असते ही एक-रूपता पुढील प्रकारच्या वाक्यांनीं सांगितली जाते. जो कोणी अमुक करतो तो तमुक करतो, हें अमुक करणें म्हणजे तें तमुक करणेंच होय; हें अमुक करूं पाहाणें म्हणजे तें तमुक करून पाहाणेंच होय.

( ख ) ह्या प्रकारांत दोन पदार्थांत पुढील प्रकारच्या वाक्यांनीं एकरूपता सांगितली जाते. हा पदार्थ तो पदार्थ आहे. ह्या पदार्थाचें रूप, शोभा, गुण, तत्त्व, इत्यादि तो पदार्थ दाखवितो किंवा धारण करतो

( क ) आणि ( ख ) ह्या दोन्ही प्रकारांत बाह्यत: अशक्य अर्थ सांगितलेला असतो हें करणें म्हणजे तें करणें होय, किंवा हा पदार्थ तो पदार्थ होय, हें वास्तविक अशक्याचें कथन होय परंतु त्या दोन क्रियांत किंवा पदार्थांत अशक्यत्वाच्या कथनानें साम्य दर्शविणें हा वक्त्याचा उद्देश असतो.

एकादी क्रिया आणि त्या क्रियेचें फळ ह्यांच्यातील कार्यकारणसंबंधावरून जेव्हां त्याच वाक्यांत कांहीं सिद्धान्त किंवा विधान किंवा अनुभव ह्यांचें कथन केलेलें असतें, तेव्हां निदर्शनेचा तिसरा प्रकार ( ग ) होतो. ह्या प्रकारांत एका विधा-नांत कार्यकारणभावानें बद्ध अशा दोन वस्तूंची एक जोडी आणि दुसऱ्या विधानांतील कार्यकारणभावानें बद्ध अशा दोन वस्तूंची दुसरी जोडी, ह्या दोन जोड्यांचा संबध दाखवून दिल्यानें त्या दोन जोड्यांत सादृश्यसंबंध उत्पन्न होऊन उपमा फलित होते.

अभ्यास करणें हें कारण, परीक्षा पास होणें हें कार्य, ह्या दोहोंची एक जोडी कर्तव्य झटून करणें, यश मिळणें ही दुसरी जोडी, ह्या दोन जोड्यांची सांगड घालून दिल्यानें त्या दोन जोड्यांत साम्य आहे असें प्रत्ययास येतें आणि उपमा फलित होते.

आतां ह्या तीन्ही प्रकारांच्या निदर्शनेचीं उदाहरणें देतों.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

खलाला करणें बोध सैकतीं बांधणें घर ।
न होई कारलें स्वादू घालितां खत साखर ॥ १११ ॥

वि० वा० भिडे,-जीवजागृति, संकीर्ण, पद्य ३८.

हलकट माणसाला उपदेश करणें हें वाळवटांत घर बांधणेंच होय ! साखरेचें खत घातल्यानें कारलें कांहीं गोड होत नाहीं !

येथें हें करणें हें तें करणें होय अशा अशक्य अर्थाचें कथन वाळवंटांत घर बांधणें जसें निष्फळ, तसें खलाला बोध करणें निष्फळ अशा उपमेंत म्हणजे साम्यांत फलित होत आहे. हें निदर्शनेच्या ( क ) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

किंप्रभूस दयान्यायासाठीं याचील मानव ।
रेड्याला उत्कटाशेनें तो दोहील दुधास्तव ॥ ११२ ॥

वि० वा० भिडे -जीवजागृति संकीर्ण, पद्य ३५.

दुष्ट राजापासून दया आणि न्याय मिळण्यासाठीं जो मनुष्य त्याची प्रार्थना करील, तो दुधासाठीं रेड्याला दोहीत बसेल !

येथें दुष्ट राजापासून दया आणि न्याय यांच्या प्राप्तीची आशा करणें, आणि रेड्यापासून दूध मिळविण्याची आशा करणें, ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच अशक्य आणि मूर्खपणाच्या आहेत, असें फलितार्थानें आपणास कळतें. येथें " वाक्यार्थ निदर्शना " झाली आहे. हा " निदर्शनेचा ( क ) प्रकार " होय.

उदाहरण, वृत्त स्वागता.

वज्रभंग तर तो सुमनानें पाहतो करूं विमूढ मनानें ।
अर्भकें कुटिल राक्षसघात जो करूं बघतसे समरांत ॥ ११३ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग २, पद्य २०.

दशरथाजवळ रामलक्ष्मणांना मागावयासाठीं विश्वामित्र आला तेव्हां दशरथ त्याला म्हणतोः—

लबाड राक्षसांना युद्धांत ठार मारणें हें कार्य लहान वयाच्या मुलाकडून जो करवूं पाहातो, तो मूर्खपणानें फुलाच्या साधनानें वज्राचा भंग करण्याचा प्रयत्न करतो ! हें " निदर्शनेच्या ( क ) " प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

अबलेचा छल करणें हें बिरुद नव्हेच ह्या शिवाजीचें ।
तें करणें हारविणें सौभाग्य मदीय विभवलक्ष्मीचें ॥ ११४ ॥

वि० वा० भिडे,-शिवाजीचें चारित्र्य, पद्य ७१.

आबाजी सोनदेवाला शिवाजी म्हणतोः—

अनाथ स्त्रीस गांजणें हें ह्या शिवाजीचें ( म्ह० माझें ) ब्रीद नव्हे अनाथ स्त्रीस गांजणें हें माझ्या उत्कर्षरूपी लक्ष्मीचें सौभाग्य नष्ट करणेंच होय !

हा " निदर्शनेचा ( क ) " प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

ज्वरिताला पय देसी, मणिकांचनभूषणें विरक्ताला ।
अंधाला दर्पण कीं आबा ! ही मजसि देउनी बाला ॥ ११५ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य ६६.

अरे आबा, ही मुलगी मला देऊन म्हणजे दिल्यानें तूं तापकऱ्याला दूध, किंवा विरक्ताला रत्नाचीं आणि सोन्याचीं भूषणें, किंवा अधळ्याला आरसा देत आहेस !

तापकऱ्याला दुधाचा उपयोग नाहीं, विरक्ताला भूषणाचा उपयोग नाहीं, अंधळ्याला आरशाचा उपयोग नाहीं, तसा मला ह्या मुलीचा उपयोग नाहीं, अशी येथें उपमा फलित होत आहे.

ज्याला ज्या वस्तूचा उपयोग नाहीं त्याला ती वस्तु देणें हा मूर्खपणा होय अशा अर्थांत ह्या निदर्शनेचें पर्यवसान होतें.

हें " निदर्शनेच्या (क) " प्रकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त आर्या

सौंदर्यबाडिश टाकुनि मज मीना नयसरामधुनि खेची ।
तो वारणा बिसानें बांधुनि खिळवावया स्वबल वेची ॥ ११६ ॥

वि० वा० भिडे,– शिवाजीचें चारित्र्य; पद्य ६८.

शिवाजी हा आबाजी सोनदेवाला म्हणतो:—

सौंदर्यरूपी गळ नीतिरूपी सरोवरांत टाकून मी जो मीन त्या मला बाहेर खेचूं पाहातो, तो मनुष्य कमळाच्या तंतूनें हत्तीला बांधून खिळवूं पाहातो !

मला सौंदर्याची भुरळ पाडूं इच्छिणें आणि हत्तीला बिसतंतूनें खिळवूं पाहाणें, ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच मूर्खपणाच्या होत. हें "निदर्शनेच्या (क)" प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त स्वागता

गाधिजें धरियली द्युति साची पुष्पवद्रुचिर मेरु नगाची ।
पार्श्ववर्तिरघुवंशकुमारें उज्ज्वलें मथितषड्रिपुवारें ॥ ११७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २, पद्य ४५.

[ गाधिज म्ह० विश्वामित्र द्युति म्ह० शोभा. पुष्पवत् म्ह० चंद्र आणि सूर्य. रुचिर म्ह० सुंदर. ]

ज्याच्या एका बाजूस राम आणि दुसऱ्या बाजूस लक्ष्मण आहे, अशा जितेन्द्रिय आणि तेजस्वी विश्वामित्रानें ज्याच्या दोन बाजूंस चंद्र आणि सूर्य आहेत, अशा मेरू पर्वताची शोभा धारण केली !

येथें विश्वामित्रानें मेरुपर्वताची शोभा धारण केली असे वर्णन आहे. हें " निदर्शनेच्या ( ख ) " प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त कलहंस.

सलिलावगाहविधिनें मलहीन अनुजा! पहा भ्रमति हे गज पीन।
मदवारिपूररमणीय वनांत स्रवदुत्सशैलरुचि ते धरितात ॥ ११८ ॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग १४, पद्य २२.

[ स्रवत् म्ह० वाहाणारे उत्स म्ह० डोंगरावरून वाहाणारा पाण्याचा ओहोळ. स्रव...रुचि म्ह० ज्यांचेवरून पाण्याचे प्रवाह वाहात आहेत अशा पर्वतांची शोभा ( रुचि ) ].

शरदृतूंतील देखाव्याचें वर्णन राम लक्ष्मणास बोलून दाखवीत आहे.

पाण्यांत बुड्या मारून स्वच्छ झालेले हे लठ्ठ हत्ती, हे लक्ष्मणा, इकडे तिकडे हिंडत आहेत ते पहा. त्यांच्या गंडस्थलातून पाझरणाऱ्या दानोदकाच्या पूरांनीं रमणीय दिसणारे हे हत्ती धबधब्यांनीं युक्त अशा पर्वतांची शोभा धारण करीत आहेत !

हें " निदर्शनेच्या ( ख ) " ह्या प्रकारचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

राजपदस्थित होतां स्थापुनि उचिता जनास अधिकारीं ।
हा विभवप्राप्तीचें गुणगौरवकार्य सुचवि, अवधारीं ॥ ११९ ॥

सिंहासनावर बसतांच हा राजा लायक माणसास अधिकाराच्या जागांवर नेमून गुणाचें गौरव करणें हें वैभवप्राप्तीचें कार्य होय असें लोकांना दाखवून देत आहे ! हें नीट लक्ष्यांत धरा !

राजपदारोहण हें कारण, उचित जनास अधिकारावर स्थापणें हें कार्य, ही एक जोडी. विभवप्राप्ति हें कारण, गुणगौरव हें कार्य, ही दुसरी जोडी. ह्या दोन जोड्यांत साम्य दर्शविलें आहे हें " निदर्शनेच्या ( ग ) " प्रकाराचें उदाहरण.

येथपर्यंत जीं निदर्शनचीं उदाहरणें आम्हीं दिलीं तीं सर्व शुद्ध निदर्शनेचीं होतीं. मालारूपाची निदर्शना पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

उदाहरण; वृत्त मंदाक्रान्ता.

जो राज्याला प्रभु असिवलें स्थैर्य आणूं बघेल,
तो वाळूचा घडवुनि जिना स्वर्ग पाहूं उठेल ।
कीं होडीनें तरुनि उदधी पैल गाठूं बघेल,
कीं तंतूनें द्विरद खिळवूं कोळियाच्या निघेल ॥ १२० ॥

वि० वा० भिडे,–जिताजित, श्लोक ९.

जो राजा आपल्या राज्याला तरवारीच्या जोरावर बळकटी आणूं पाहातो, तो वाळूच्या जिन्यानें स्वर्गास जाऊं इच्छितो, किंवा होडक्यांत बसून समुद्राच्या पैल तीराला जाऊं इच्छितो, किंवा कोळ्याच्या क्षुद्र धाग्यानें हत्तीला खिळवूं इच्छितो !

हें " मालानिदर्शनेचें " उदाहरण.

उदाहरण वृत्त मंदाक्रान्ता.

स्त्रीजातीला त्यजुनि झटती देश जे उद्धराया,
ते रंगातें नुघडुनि दृशा कष्टती ओळखाया।
किंवा दंष्ट्रा नसुनि चणकां पाहती खावयाला,
किंवा जाती श्रुति मिटुनि ते वाद्य लावावयाला॥ १२१॥

वि० वा० भिडे,—स्त्रीसखी, पद्य १३.

स्त्रियाना बाजूस सारून जे कोणी देश उद्धरू पाहातात, ते डोळे मिटून रंग ओळखण्याचा प्रयत्न करतात, किंवा दाढा नसतां हरभरे खाण्याचा प्रयत्न करतात, किंवा कान झांकून ( सतार इत्यादि ) वाद्य लावण्याचा प्रयत्न करतात।

हेंही "मालानिदर्शनेचें" उदाहरण होय

लक्षण, वृत्त आर्या

**प्रकृतार्थाचि कळवाया वर्णी कवि अर्थ अप्रकृत जेथें।**
**"अप्रस्तुतप्रशंसा" नाम अलंकार होतसे तेथें॥ १०६॥**

प्रकृत अर्थाचें कथन करावयाचें तें न करतां कवि प्रकृत अर्थ कळविण्यासाठींच जेथें अप्रकृतार्थाचें वर्णन करतो, आणि अशा अप्रत्यक्ष रीतीनें प्रकृतार्थ श्रोत्याला कळवितो, तेथें " अप्रस्तुतप्रशंसा " हा अलंकार होतो.

कवीला प्रकृत अर्थच कळवावयाचा असतो, पण तो अप्रकृत अशा अर्थाचें कथन करून प्रकृत अर्थ श्रोत्याला कळवितो.

अप्रस्तुत म्हणजे प्रकृत नव्हे अशी कांहीं गोष्ट, तिची प्रसंशा म्हणजे कथन ह्या अलंकारात कवि करतो, म्हणून याला " अप्रस्तुतप्रशंसा " असें नांव देण्यांत आलें आहे.

ह्या अलंकाराचे पांच प्रकार आहेत ते येणेंप्रमाणेः—

लक्षण; वृत्त आर्या.

**वर्ण्य असेल कवीला सामान्य, विशेष, कार्य, कारण, वा।**
**तेव्हां तदन्य वर्णी कवि तेणें भेद चार होतात॥ १०७॥**
**वर्ण्य न वर्णुन वस्तू तत्सम वर्णील वस्तु कवि दुसरी।**
**भेद तदा होतो तो पंचम अप्रस्तुतप्रशंसेचा॥१०८॥**

जेव्हां कांहीं सामान्य सांगावयाचें असता तें न सांगता त्याहून भिन्न म्हणजे विशेष सांगितलें असतें; विशेष सांगावयाचें असता त्याहून वेगळें म्हणजे सामान्य सांगितलें असतें, कार्य सांगावयाचें असतां त्याहून भिन्न म्हणजे कारण सांगितलें असतें, कारण सांगावयाचें असतां त्याहून भिन्न म्हणजे वेगळें कार्य सांगितलें असतें, आणि कांहीं गोष्ट सांगावयाची असतां तिच्यासारखी दुसरीच कांहीं गोष्ट सांगितलेली असते, तेव्हा अप्रस्तुतप्रशंसा होते हे पांच प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

( क ) कार्याबद्दल कारण सांगणें
( ख ) कारणाबद्दल कार्य सांगणें.

( ग ) सामान्याबद्दल विशेष सांगणें

( घ ) विशेषाबद्दल सामान्य सांगणें

( ङ ) एकाद्या गोष्टीबद्दल तत्सम गोष्ट सांगणें

**टीपः**—एकाद्या पद्यांत अप्रस्तुतप्रशंसा हा अलंकार आहे किंवा नाहीं, आणि असल्यास तिचा कोणता प्रकार आहे, हें ठरवावयाचें असतां मागच्या संदर्भाची आवश्यकता असते. वर्णनाच्या ओघानें तें पद्य कोठें आलें आहे हें कळल्याशिवाय त्या पद्यात कोणच्या प्रस्तुताबद्दल कोणचें अप्रस्तुत वर्णिलें आहे, हें जाणणें अशक्य असतें.

उदाहरण, वृत्त आर्या

" मी जातों गावा " हें म्हणतां स्त्रीनें मदंघ्रिवरि डोकें—।
ठेवुनि म्हटलें " मी तुम्हि गेल्यास मरेन त्या क्षणीं शोकें " ॥१२२॥

" मी गावाला जाणार आहें " असें मी आपल्या बायकोला म्हणतांच तिणें माझ्या पायांवर डोकें ठेवून म्हटलें, " तुम्हीं गेल्यास मी तत्क्षणीं प्राण सोडीन ! "

" तूं गांवाला जाण्याचा विचार रहित केलास काय ? " असा प्रश्न कोणी एकानें आपल्या मित्रास केला तेव्हां तो मित्र " होय, रहित केला " असें उत्तर न देता बेत रहित करण्याचें कारण माझी बायको प्राण सोडील हें सांगितलें आहे. येथें कार्याबद्दल कारण सांगितलें आहे. हें " अप्रस्तुतप्रशंसेच्या ( क ) " प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त उपजाति.

त्वद्वैरिसद्मांत गुरें उपाशी, खाती घुशी संतत धान्यराशी ।
उलूकसेना न धरोनि कांहीं भीती स्थळीं त्या सकुटुंब राही ॥१२३॥

तुझ्या शत्रूंच्या घरांत गुरें उपाशीं आहेत, त्या घरांतील धान्यें घुशी खात आहेत, त्या घरांत घुबडें भीती सोडून आपल्या कुटुंबीयासकट रहात आहेत !

तू आपल्या शत्रूवर स्वारी करावयाला निघणार आहेस ही बातमी तुझ्या शत्रूंना कळतांच ते आपलीं घरेंदारें सोडून पळून गेले, असें सांगावयाचें असतां घरें दारें ओसाड पडल्यानें जो परिणाम झाला तो सांगितला आहे.

येथें कारण न सांगतां तज्जन्य कार्य सांगितलें आहे. हा " अप्रस्तुतप्रशंसेचा ( ख ) " हा प्रकार होय

उदाहरण; वृत्त आर्या.

" तूं धेड, नको शिवुं मज, मी द्विज " ऐसें न वामनाचार्य ।
वदला विठूस सजतां देशाचें जन करावया कार्य ॥ १२४ ॥

देशाचें कार्य करावयाला सर्व लोक सिद्ध झाले होते तेव्हां वामनाचार्य हा ब्राह्मण विठू धेडाला "तू धेड, मी ब्राह्मण, मला शिवू नको ! " असें म्हणाला नाहीं !

देशकार्य करावयाचें असतां जातिभेद, स्पर्शास्पर्श, इत्यादि गोष्टींकडे कोणी लक्ष्य देत नाहीं, असें सामान्याचें कथन करावयाचें त्याच्या जागीं विठू आणि वामनाचार्य, ह्यांचा विशेष प्रसंग सांगितला आहे हें "अप्रस्तुतप्रशंसेच्या (ग)" ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त आर्या.

सेवावृत्ति स्वीकरि त्या लागे स्वाभिमान सोडावा।
स्वमत, स्वजनप्रेमा, स्वसुखें, तद्‌व्यक्तिता उरे नांवा ॥ १२५ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ८३

जो कोणी दुसऱ्याची नोकरी पथकरतो, त्याला आपला स्वाभिमान, आपली मतें, आपल्या लोकाविषयीं प्रेम, आपलीं सुखें, ह्या सर्व गोष्टी सोडून द्याव्या लागतात, समाजांतील त्याचें व्यक्तित्व केवळ नांवाचेंच शिल्लक राहातें !

अवरंगजेबाच्या पदरीं तूं नोकरी पथकर असें एका यवनानें शिवाजीस सांगितलें मी ती नोकरी पथकरल्यास माझें व्यक्तित्व नष्ट होईल असें उत्तर न देता शिवाजी सामान्याचें कथन करीत आहे जे जे कोणी नोकरी पथकरतात, त्या त्या सर्वांचें व्यक्तित्व नष्ट होतें, हें सामान्य विशेषाबद्दल कथिलें आहे हा "अप्रस्तुतप्रशंसेचा (घ)" प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या.

कृच्छ्रगतास यथाबल साहाय्य करील तो स्तवा पात्र।
तो निंद्य जो 'अरेरे ! म्हणुनि वधूपरि कुटील उर मात्र ॥१२६॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ८५.

शिवाजी एका यवनास म्हणतो:—

संकटांत जो सांपडला आहे त्याला मदत करील तो स्तुतीस पात्र होतो. जो केवल 'अरेरे ! ' असा उद्गार काढून स्त्रीप्रमाणें छाती बडवीत बसतो, तो निंद्य गणला जातो !

यवनाच्या ताब्यांत सापडलेल्या कमळीला आम्ही सोडविल्यास आम्ही स्तुतीला पात्र होऊं, ह्या विशेषाचें कथन न करता शिवाजीनें सामान्याचें कथन केलें आहे. हा "अप्रस्तुतप्रशंसेचा ( घ )" हा प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

धर्माची स्वजनांची परिसुनि निंदाहि जो न नर चेते।
त्याहुनि थोर असे रज पादाहत जें उडोनि शिरीं येतें ॥ १२७ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ५२.

आपला धर्म, आपले इष्टमित्र, इ० ची दुसऱ्या कोणी केलेली निर्भर्त्सना ऐकून ज्याला संताप येत नाहीं, त्या माणसापेक्षां धुळीचा कण थोर म्हटला पाहिजे,— ज्याला पायाचा तडाखा लागतांच जो कण चालणाऱ्याच्या डोक्यावर चढून बसतो !

येथें यवनानें हिंदूधर्म इ० ची निंदा केली ती शिवाजी इ० मराठे वीरांना संतापजनक झाली, हा विशेष सांगणें प्रस्तुत आहे. त्या विशेषाबद्दल सामान्य नियमाचें येथें कथन आहे. ज्या ज्या कोणाला संताप येत नाहीं त्या त्या साऱ्याहून धुळीचा कण वरच्या दर्जाचा असें सामान्याचें कथन केलेलें आहे. हा "अप्रस्तुतप्रशंसेचा ( घ )" हा प्रकार होय.

ही अप्रस्तुतप्रशंसा व्यतिरेकाच्या रूपानें सांगितली आहे म्हणून येथें " व्यतिरेक " अलकारही आहे.

उदाहरण; वृत्त वसंततिलका

तूं कातळावरि घना जल वर्षितोस,
तो भूमिभाग जनहीन सदैव ओस ।
शेतावरी जल तुझें पडल्यास धान्य–
लोकां मिळेल, बहु होशील तूहि मान्य ॥ १२८ ॥

वि० वा० भिडे,– अन्योक्ति मजरीं, पद्य १६.

हे मेघा, तूं खडकाळ जमीनीवर आपल्या पाण्याचा वर्षाव करतोस, पण त्या जमीनविर मनुष्याची वसति नाहीं, आणि ती सदैव उजाड पडलेली असते तेथें पाण्याची वृष्टि करून काय उपयोग ? शेतांवर तूं वृष्टि केलीस तर लोकांना धान्यें मिळून लोक तुला दुवा देतील !

नादान आणि निरुद्योगी माणसाला पोसण्याकडे श्रीमंतानीं आपला पैसा खर्चिणें आणि विद्वान् आणि समाजाला उपयोगी पडणाऱ्या माणसाला मदत न करणें हें निंद्य आहे, असें कवीला सांगावयाचें आहे. तें प्रत्यक्ष शब्दांनीं न सांगतां मेघाचें वर्णन करून तत्सम अशा दुसऱ्या एका गोष्टीचा येथें बोध करून दिला आहे. हें " अप्रस्तुतप्रशंसेच्या ( ङ ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त सौदामिनी.

सुवर्णाचिया पंजरीं कायसा ! तुला वास लाभेल रे वायसा ! ।
नमे रम्य काया शुकाचे परी, न वा शब्द, त्याची न तूला सरी॥१२९॥

वि० वा० भिडे,–अन्योक्त मजरी, पद्य २८.

हे कावळ्या, सोन्याच्या पिंजऱ्यांत तुला रहावयाला कसें सापडेल ! पोपटाच्या शरीरासारखें तुझें शरीर सुंदर नाहीं किंवा त्याच्यासारखी तुला मनुष्यवाणीही नाहीं ! पोपटाची सर तुला कशी येईल ?

गुणी माणसाला जो मान समाजांत मिळतो, तो आपणाला मिळावा अशी कोणी नादान माणसानें इच्छा बाळगिणें हें मूर्खपणाचें होय असें कवीला सांगावयाचें आहे. तें न सागतां मूर्ख कावळा ह्या तत्सम अर्थाचें वर्णन कवि करीत आहे. हा " अप्रस्तुत प्रशंसेचा ( ङ ) " हा प्रकार

लक्षण, वृत्त आर्या

उपमेयाचें निगरण उपमानानें असेल केलेलें ।
उपमेय तें न, कांहीं अन्याचे तें हें असेल म्हटलेलें ॥ १०९ ॥
जर ही अशक्य घडली तर गोष्ट अशक्य ती तरि घडेल ।
ऐसें विधान कविनें केलेलें जर मनोहर असेल ॥ ११० ॥

दोन पदार्थांत नसुनि संबंध स्थापिला जर असेल ।
किंवा संबंध असुनि नाहीं तो हें कवी जर म्हणेल ।। १११ ।।
पौर्वापर्यविपर्यय कारणकार्यांत जर असे केला ।
तर "अतिशयोक्ति" ऐसे कवि त्या देतात नांव रचनेला ।। ११२ ।।

" निगरण " म्हणजे गिळून टाकणें म्हणजे अर्थात् झाकून टाकून दिसूं न देणें. " पौर्वापर्यविपर्यय " म्हणजे एकादी गोष्ट जी घडली असेल तिचें कारण अगोदर म्हणजे पूर्वी घडावयाचें आणि नंतर त्या कारणापासून कार्य घडून यावयाचें. कारणाचा काळ पूर्वीचा असावयाचा आणि कार्याचा काळ अपर म्हणजे नंतरचा असावयाचा असा सृष्टीचा नियम आहे. ह्या दोन काळाचा जो संबंध तो " पौर्वापर्य-संबंध, " आणि ह्या दोन काळांची जी उलथापालथ तिला " पौर्वापर्यविपर्यय " असें म्हणतात

जेव्हां वाक्यामध्यें उपमेयपद मुळींच कथित नसतें, आणि उपमानपदावरूनच तें जाणावयाचें असतें तेव्हा अतिशयोक्तीचा एक प्रकार ( क ) हा होतो.

उपमेय हा पदार्थ तो नव्हे दुसराच काहीं आहे किंवा तो अपूर्व आहे, अशा अर्थाचें विधान असतें तेव्हां अतिशयोक्तीचा दुसरा प्रकार ( ख ) हा होतो.

अमुक एक गोष्ट ( अर्थात् अशक्य ) घडली तर दुसरी तमुक गोष्ट अशक्य असून सुद्धा घडेल, अशा अर्थाचें विधान असल्यास अतिशयोक्तीचा तिसरा प्रकार ( ग ) हा होतो.

दोन पदार्थांत काहीं संबंध नसता तो आहे असें कवीनें विधान केलेलें असलें तर तो अतिशयोक्तीचा चवथा प्रकार ( घ ) हा होतो.

दोन पदार्थांत काहीं संबंध असतां तो नाहीं असें कवीनें विधान केलेलें असल्यास अतिशयोक्तीचा पांचवा प्रकार ( ङ ) हा होतो

कार्याचें पूर्वी कारण घडलेलें असावयाचें असा सृष्टीचा नियम आहे पण कार्याची शीघ्रता दर्शविण्यासाठीं कारण घडलें तेव्हांच कार्य घडलें असें कवीनें विधान केलेलें असल्यास, किंवा अगोदर कार्य घडलें आणि मागून कारण घडलें, असें विधान कवीनें केलेलें असल्यास तो अतिशयोक्तीचा सहावा म्हणजे (च ) हा प्रकार होतो.

मम्मटानें दुसऱ्या प्रकारांतच पांचवा, आणि तिसऱ्या प्रकारातच चवथा प्रकार सामील केले आहेत म्हणून त्याचे चारच प्रकार झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयी-साठीं आम्ही ते प्रकार वेगळे दाखविले आहेत.

उदाहरण, वृत्त आर्या.

धेनूच्या चालाव्या कैशा रे ! खाटिकापुढें गमजा ?।
त्वद्देहाचे तुकडे करणें ही तव पुरे मदास सजा ।। १३० ।।

वि० वा० भिडे,–शिवचारित्र्य, पद्य २८.

कल्याणचा सुभेदार अहमद हा आबाजी सोनदेवाला म्हणतो —खाटिकाच्या

पुढें गायीच्या बढाया कशा चालतील ? तुझ्या शरीराचे तुकडे करणें ही तुझ्या उन्मत्तपणाला शिक्षा बस्स आहे !

येथे "धेनु" शब्दानें तू म्हणजे आबाजी सोनदेव, "खाटिक" शब्दानें मी मौलाना अहमद, असे अर्थ जाणावयाचे आहेत धेनु आणि खाटिक ह्या उपमानांनीं आबाजी सोनदेव आणि मौलाना अहमद यांचें निगरण केलें आहे हा "अतिशयोक्तीचा ( क ) हा पहिला प्रकार " होय

उदाहरण; वृत्त चामर

शोक ओसरावयास तीस तेथ सोडुनि क्रूर पावला गृहा दशास्य हृष्ट तेथुनी ।
तीस मायिकच्छलास तत्सखी निवेदुनी जाहली दवार्दिता मृगीस शीतला धुनी ॥१२१॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १९, पद्य ६.

तुझा पति राम मेला असें सीतेला खोटें सांगून रावण अशोकवनिकेंतून निघून गेला तो प्रसंग.

सीतेचें दु:ख सौम्य व्हावयाला तिला अवसर देण्यासाठीं तो क्रूर रावण आनंदित होत्साता परत आपल्या वाड्यात आला तेव्हा सीतेच्या सखीनें हा सर्व मायेचा देखावा आहे असें तिला सांगितलें आणि ( सीता ह्या ) वणव्यानें होरपळलेल्या हरिणीला ती ( सखी ) थंड नदीसारखी ( सुखदायक ) झाली म्हणजे असें कीं राम खरोखरी मेला नाहीं असें सखीनें सीतेला सांगून तिचें दु:ख नाहींसें केलें.

येथें सीता आणि सखी ह्या दोन उपमेयपदांचें हरिणी आणि धुनी ह्या उपमान पदांनीं निगरण केलें आहे हा " अतिशयोक्तीचा पहिला " म्हणजे ( क ) हा प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या

हर्यक्षासह झगडूं बघतां उपहास्य होति रे ! शशक ।
गरुडावरि युद्ध कसें पामर शकतील वद करीं मशक ॥ १२२ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ८७.

शिवाजी चार यवनाना म्हणतो —

सिंहाशीं झगडावयाला सिद्ध होणारे ससे उपहासास पात्र होतात. हे क्षुद्र मशकां, तूं गरुडाविरुद्ध युद्ध कसें करू शकतील !

येथें हर्यक्ष आणि गरुड शब्दानीं आम्ही मराठे ह्या उपमेयपदांचें निगरण केलें आहे.

मशक आणि शशक ह्या शब्दांनीं तुम्ही यवन ह्या उपमानपदांचें निगरण केलें आहे हा " अतिशयोक्तीचा पहिला " म्हणजे ( क ) हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या

द्वीपी क्रूर परि तुझ्या क्रौर्य अपूर्वाचि असे वरंगाचें ।
क्रोष्टा कपटी परि हें कपट गमें वेगळेंच मज त्याचें ॥ १२३ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ७२.

वाघ क्रूर म्हणून त्याची ख्याति आहे. परंतु तुझ्या अवरंगजेबाचें क्रौर्य कांहीं वेगळेंच आहे ! कोल्हा कपटी म्हणून त्याची प्रसिद्धि आहे, पण त्या औरंगजेबाचें कपट कांहीं वेगळेंच आहे !

येथें वरंगाचें क्रौर्य आणि कपट हीं नेहमींच्या क्रौर्याहून आणि कपटाहून निराळीं आहेत असें म्हटलें आहे. हा "अतियोक्तीचा दुसरा" म्हणजे (ख) हा प्रकार.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

जर तूं शशशृंगाच्या धेनूनें सोडिशी शर–।<br>
गात्रीं त्या दाशरथिच्या तो मरेल रणीं तर ॥ १३४ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १०, पद्य ५०.

शूर्पणखा रावणास म्हणतेः—

हे रावणा, जर तूं सशाच्या शिंगाच्या धनुष्यानें रामाच्या शरीरावर रणांत बाण सोडलेस तर तो राम मरेल !

येथें सशाच्या शिंगाचें धनुष्य करणें आणि त्यावेवरून बाण सोडणें ही गोष्ट अशक्य आहे आणि राम रणामध्यें तुझ्या हातून मरणें हीही गोष्ट अशक्य आहे असें म्हटलेलें आहे. हें "अतिशयोक्तीच्या तिसऱ्या" म्हणजे (ग) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या

रविनें ताप त्यजिला तर मी स्पर्शीन ह्या कुमारीला ।<br>
मज जननीपरि वद्या, ह्या भगिनी सुतेपरी लीला ॥ १३५ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजींचें चारित्र्य, पद्य ७०.

आबाजी सोनदेवाला शिवाजी म्हणतो—

सूर्यानें जर आपली उष्णता सोडिली ( म्हणजे सूर्य जर थंड झाला ) तर मी ह्या मुलीला स्पर्श करीन मला ही लीला मातेप्रमाणें वंद्य आहे आणि बहिणीप्रमाणें आणि मुलीप्रमाणें प्रिय आहे !

येथें रवीनें ताप त्यजिणें ही अशक्य गोष्ट घडली तर मी ह्या कुमारीला स्पर्शिणें ही अशक्य गोष्ट घडेल असें विधान केलें आहे हा "अतिशयोक्तीचा तिसरा" म्हणजे (ग) हा प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

सौंदर्य मला भुलविल जर विझविल चुलुकामित जल दवासी ।<br>
करतल लपवील रविस, कीं टिटवी आटविल समुद्रासीं ॥ १३६ ॥

वि० वा० भिडे,–शिवचारित्र्य, पद्य ६९.

कल्याणच्या सुभेदाराची सुंदर सून आबाजी सोनदेवानें शिवाजीस नजर केली, तेव्हां शिवाजी त्याची निर्भर्त्सना करीत आहे.

जर मुळकाभर पाण्यानें वणवा शमवितां आला, किंवा तळहातानें सूर्याला जर झाकतां आलें, किंवा टिटवीला जर समुद्र कोरडा करता आला, तर ही सुंदर स्त्री मला मोह पाडूं शकेल !

येथें अतिशयोक्तीचा तिसरा म्हणजे ( ग ) हा प्रकार आहे.

उदाहरण; वृत्त पृथ्वी.

अरण्यरुदितापरी मम न हो तुला बोध हा,
मला शरण ये नरा ! चल मदाश्रयाला रहा ।
मशीं रण करावया सजुं नको, जयोपार्जन–
घडेल तुज घेउनी शशविषाणबाणासन ॥ १३७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य ९०.

रावण रामास म्हणतो —

हा तुला मी केलेला उपदेश व्यर्थ न होवो ! अरे मनुष्या, मला शरण ये ! माझ्या आश्रयाला येऊन रहा. माझ्याशीं युद्ध करावयाला सरसावूं नको. शशाच्या शिंगाचें धनुष्य घेऊन तूं आलास तरच तुला मजवर जय मिळेल !

हा " अतिशयोक्तीचा तिसरा " म्हणजे ( ग ) हा प्रकार होय

उदाहरण, वृत्त आर्या

ह्या विपिनांतिल पादप होते भेदुनि नभास वरि गेले ।
उच्छ्रयसा विस्तरही त्यांचा; ते तेथ दैत्य जणुं ठेले ॥ १३८ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य २३

ह्या अरण्यांतील वृक्ष आकाशाला भोकें पाडून पलीकडे गेलेले होते ! जशी त्यांची उंची होती तसा त्यांचा विस्तार होता !

येथें नभ आणि पादप ह्यांचा संबंध नसून तो कल्पिला आहे. हा " अतिशयोक्तीचा चवथा " म्हणजे ( घ ) हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

असंख्य शत्रुचे वीर कापिले ह्या रणावर ।
शोणितांचें तिथें झालें लांब रुंद सरोवर ॥ १३९ ॥

वि० वा० भिडे.

रणांगणावर रक्ताचें मोठें तळें झालें असें येथें वर्णन आहे. रक्त आणि तळें यांचा नसता संबंध वर्णिला असल्यामुळें येथें " अतिशयोक्तीचा ( घ ) प्रकार " आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

पतीच्या मृत्युची वार्ता तिज दुःसह जाहली ।
रडली ती, तिचीं बाष्पें नदी होऊन वाहलीं ॥ १४० ॥

पति मृत झाल्याची वार्ता ऐकून ती स्त्री इतकी रडली कीं तिचीं बाष्पें नदी-रूपानें वाहलीं !

येथें बाष्प आणि नदी ह्यांच्यांत जो संबंध असणें शक्य नाहीं तो वर्णिला आहे हें " अतिशयोक्तीच्या ( घ ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

जें सौकुमार्य ईचें तें गमलें वेगळेंच बघणारा ।
निःसंशय अन्याचि तो हिज होता ब्रह्मदेव करणारा ॥ १४१ ॥

वि० वि० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ४०

ह्या कमळीचा जो नाजुकपणा तो काहीं वेगळाच होता ! हिला निर्माण करणारा ब्रह्मदेव तो एऱ्हवींची मानव सृष्टि करणाराहून दुसराच होता !

जो ब्रह्मदेव सर्व मानवजाति उत्पन्न करितो त्यानेंच हिला उत्पन्न केलें अशी स्थिति असतां हिला उत्पन्न करणारा ब्रह्मदेव दुसराच होता असें येथें म्हटलें आहे. दोन ब्रह्मदेव एकच असतां ते भिन्न असें येथें म्हटलें आहे. संबंध असता तो नाहीं असें येथें म्हटलें आहे, हा " अतिशयोक्तीचा (ङ)" हा प्रकार. (ङ) हा प्रकार वस्तुत (ख) हा प्रकारच होय असें विद्यार्थ्यांच्या लक्ष्यांत येईलच.

उदाहरण; वृत्त पृथ्वी.

दशाननतनूस हा शर समर्थ भेदोनियां
फिरोनि शिरला जवें शरधिमाजि रामाचिया ।
दशाननतनू सुरव्रज.विसृष्ट पुष्पावली
धरातलिं रघूत्तमीं पतन त्या क्षणीं पावली ॥ १४२ ॥

वि० वा० भिडे,–रा० प० सर्ग २०, पद्य १२९.

रावणाच्या मृत्यूचें हें वर्णन आहे.

हा रामाचा जोरदार बाण रावणाच्या शरीराला फाडून पुन्हा रामाच्या भात्यांत त्वरेनें शिरला ! रावणाचें शरीर जमीनीवर. आणि देवांनीं वर्षिलेलीं फुलें रामावर हीं एकदम, पडलीं !

येथें रावणाचें शरीर अगोदर जमिनिवर पडलें आणि मागून देवांनीं रामावर पुष्पवृष्टि केली अशी वस्तुस्थिति असतां शरीराचें पतन आणि पुष्पांचें पतन एकाच समयीं घडलें असें वर्णन आहे म्हणून हा " अतिशयोक्तीचा सहावा " म्हणजे ( च ) हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

कोदण्डलस्तक अखण्ड दुखण्ड झालें,
वीरप्रकाण्डकरकर्षित काय भ्यालें ।
तें जाहलें त्रिपुरभंजन चाप भग्न
आधींच भूमिपति विस्मयसिंधुमग्न ॥ १४३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ५३

[कोदण्ड म्ह० धनुष्य. लस्तक म्ह० धनुष्याचा मुठींत धरावयाचा भाग अखण्ड म्ह० सबध दुखण्ड म्ह० दोन झाले आहेत तुकडे ज्याचे असें ( लस्तक ) वीरप्रकाण्ड म्ह० श्रेष्ठ वीर. ]

जनकाच्या सभेंत रामानें शिवधनुष्य मोडलें त्या प्रसगाचें हें वर्णन आहे

धनुष्याची मूठ सबध असन त्या धनुष्याचे त्याच जागीं दोन तुकडे झाले,— जणों काय उत्तम वीराच्या हातानें तें खेचल गेल्यामुळें तें भ्यालें ! तें शकराचें धनुष्य मोडलें, सभेतील राजे लोक अगोदरच आश्चर्यचकित झाले !

येथें धनुष्य मोडल्यावर राजे आश्चर्यचकित झाले अशी वस्तुस्थिति असता तावडतोबीचा अर्थ दाखविण्यासाठीं मोडणें आणि आश्चर्यचकित होणें याचे काळ फिरविले आहेत. हें "अतिशयोक्तीच्या सहाव्या" म्हणजे (च) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या

कंठावरि हा वार, क्षितिवरि मूर्धा सवेंच यवनाचा—।
पडला, झंझावातें ताडित वटसा कबंध मग त्याचा ॥ १४४ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य १२०

तानाजीचा हुसेनाच्या कठावर वार आणि हुसेनाचें डोकें जमीनीवर हीं दोन्ही एकदमच पडलीं ! इ०

येथें आधीं वार कठावर पडला, आणि मग डोकें जमिनीवर पडलें अशी वस्तुस्थिति असता ती कवीने येथें उलटी दाखविली आहे हा "अतिशयोक्तीचा (च)" प्रकार

लक्षणा, वृत्त अनुष्टुभ्

**भिन्नशब्दोक्त धर्मैक्य दोन वाक्यांमधें असें ।**
**तेव्हां त्या उक्तिला नांव " प्रतिवस्तूपमा " असें ॥११३॥**
**उपमानोक्तिचीं वाक्यें अनेक असतीं जिथें ।**
**अलंकार असे " मालाप्रतिवस्तुपमा " तिथें ॥ ११४ ॥**

उपमेय वाक्य आणि उपमान वाक्य ह्या दोन वाक्यामध्यें जेव्हा एकच साधारण धर्म सांगितलेला असतो, पण तो भिन्न भिन्न शब्दांनीं सांगितलेला असतो, तेव्हां तेथें "प्रतिवस्तूपमा" हा अलकार होतो. उपमेय वाक्य हें प्रकृतविषयाचें वर्णन करणारें असतें आणि उपमान वाक्य हें त्या विषयाला दाखला देऊन विशद करणारें वाक्य असतें अशीं उपमानवाक्यें अनेक असलीं तर "मालाप्रतिवस्तूपमा" होते.

" प्रतिवस्तूपमा " ह्या सामासिक शब्दांतील " उपमा " हें पद " साधारण धर्म " ह्या अर्थानें योजलें आहे, आणि " वस्तु " हे पद " वाक्यार्थ " ह्या अर्थानें योजलें आहे. " प्रतिवस्तु " म्हणजे प्रत्येक वाक्यांत. जेव्हां प्रत्येक वाक्यात तोच साधारण धर्म सांगितलेला असतो, पण तो भिन्न शब्दांनीं सांगितलेला असतो, तेव्हां " प्रतिवस्तुपमा " हा अलकार होतो.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

प्रतिवस्तूपमा होते द्विप्रकारक ती अशी ।
जशी साधर्म्ये कथुनि वैधर्म्ये कथुनी तशी ॥ ११५ ॥
समान धर्म उत्पादी समान फल हें जिथें-।
कवि सांगेल " साधर्म्यें प्रतिवस्तूपमा " तिथें॥ ११६ ॥
विरुद्ध धर्म उत्पादी विरुद्ध फल हें जिथें ।
कवि सांगेल " वैधर्म्यें प्रतिवस्तूपमा " तिथें ॥ ११७ ॥
परिस्थितीच्या भिन्नत्वें परिणामहि भिन्न हो ।
ऐसें विधान वैधर्म्यें साधर्म्यांत फळेल हो ! ॥ ११८ ॥

प्रतिवस्तूपमा दोन प्रकारची असते ती अशी साधर्म्य सांगून जशी प्रतिवस्तूपमा होते तशी वैधर्म्य सांगूनही होते. म्हणजे असें कीं समान धर्म समान परिणाम उत्पन्न करतो असें कवीनें सांगितलेलें असतें तेथें " साधर्म्यावरून प्रतिवस्तूपमा " होते, आणि विरुद्ध धर्म विरुद्ध परिणाम उत्पन्न करतो असें कवीनें सांगितलेलें असतें तेथें " वैधर्म्यावरून प्रतिवस्तूपमा " होते. हेंच वेगळ्या रीतीनें सांगावयाचें तर असें आपणांस म्हणतां येईल कीं भिन्न परिस्थितींत भिन्न परिणाम होतो असें कवीनें दाखवून दिलें म्हणजे समान परिस्थितींत समान परिणाम होणार असें फलितार्थानें सिद्ध होणार. ही जी प्रतिवस्तूपमा ती वैधर्म्यावरून झालेली प्रतिवस्तूपमा

स्वच्छ, मलरहित, इत्यादि शब्द कवींच्या प्रान्तांत एकच धर्म दाखवितात. हालविणें, ढवळणें, अस्ताव्यस्त करणें, उधळणें, इत्यादि शब्द एकच धर्म दाखवितात. चतुर, निपुण, कुशल, प्रवीण, इत्यादि शब्द एकच धर्म दाखवितात शब्दाच्या अशा सर्वांत साधर्म्य आहे प्रतिवस्तूपमेंतील एका म्ह० उपमेय वाक्यात स्वच्छ, हालविणें, चतुर, इत्यादि शब्द आले असतां आणि दुसऱ्या म्ह० उपमान वाक्यांत मलरहित, ढवळणें, निपुण, इत्यादि शब्द आले असतां " साधर्म्यानें प्रतिवस्तूपमा " होते.

स्वच्छ, मलरहित, इत्यादींच्या उलट धर्म, मलिन, मलयुक्त, घाणेरडा, ओंगळ, इत्यादि, हालविणें, ढवळणें, इत्यादींच्या उलट धर्म स्थिर ठेवणें, व्यवस्थितपणें मांडणें इत्यादि, चतुर, निपुण, इत्यादींच्या उलट धर्म, अडाणी, मूर्ख, बावळा, इत्यादि. प्रतिवस्तूपमेच्या एका वाक्यांत जो स्वच्छ, हालविणें, चतुर, इत्यादि शब्दांनीं धर्म सांगितलेला असेल, त्याच्या उलट धर्माचा उलट परिणाम होतो, असे प्रतिवस्तूपमेच्या दुसऱ्या वाक्यांत दाखविलें असलें तर प्रतिवस्तूपमा वैधर्म्यानें झाली असें म्हणतात. वैधर्म्यानें झालेली प्रतिवस्तूपमा अर्थात् साधर्म्यांत फलित होते. विद्वान माणूस मान पावतो, अडाणी किंवा अशिक्षित माणूस आदरास पात्र होत नाहीं, किंवा तुच्छ गणला जातो, किंवा तिरस्कारास पात्र होतो, इत्यादि वाक्यांत तीच वस्तुस्थिति वैधर्म्यानें सांगितलेली आहे.

साधर्म्यानें प्रतिवस्तूपमेचा एक प्रकार ( क ) होतो; वैधर्म्यानें प्रतिवस्तूपमेचा दुसरा प्रकार ( ख ) होतो उपमेय वाक्याच्या जोडीला जेव्हां अनेक उपमानवाक्यें असतात तेव्हा "माला प्रतिवस्तूपमा" होते.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

दुष्कर्मसिद्धि दुष्टाला उत्तेजित करीतसे ।
आज्यधारा कृशानूतें प्रवार्ती बल देतसे ॥ १४५ ॥

वि० वा० भिडे,–मेषपेषण, श्लोक ३२.

दुष्कृत्य सफल झालें म्हणजे हलकट मानसाला उत्तेजन मिळतें आणि तो आणखीं दुष्कृत्यें करण्याला प्रवृत्त होतो । जोराचा वारा वाहातो त्या वेळीं अग्नीमध्यें तुपाची धार पाडली असता तो अग्नि अधिक जोरानें पेटतो !

येथें "उत्तेजित करणें" आणि "बल देणें" ह्या भिन्न शब्दांनीं एकच धर्म कथित आहे. हें "प्रतिवस्तूपमेच्या ( क )" प्रकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

मुलाचें गालबोटानें होई मोहक रूप तें ।
कलंकितहि चंद्राचें बिंब सुंदर वाटतें ॥ १४६ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति, सकीर्ण, पद्य, ९४.

लहान मुलाच्या गालावर काजळाचा ठिपका लावल्यानें त्याचें मुख सुंदर होतें. कलंक ज्यावर आहे असें चंद्रबिंब सुंदर दिसतें !

येथें प्रथम अर्धांत प्रस्तुत आहे. द्वितिय अर्धांत अप्रस्तुत आहे "मोहक होणें" आणि "सुंदर वाटणें" हीं क्रियापदें एकच धर्म भिन्न शब्दांनीं सागत आहेत. हें "प्रतिवस्तूपमेच्या ( क )" ह्या प्रकाराचें उदाहरण होय

उदाहरण; वृत्त वसंततिलका

हा काकपक्षधर कोमलरूप बाळ
झाला तरी सकळ यातुबळासि काळ ।
कंठीरवार्भक करीन्द्रघटा विशाला
लीलाप्रचोदितबलें वधितो नृपाला ! ॥ १४७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ९.

[ काकपक्ष म्ह० लहान मुलाच्या डोक्यावर जीं झुलपें राखलेलीं असतात तीं. यातु म्ह० राक्षस. कंठीरवार्भक म्ह० हत्तींचा बच्चा. करीन्द्रघटा म्ह० हत्तींचा कळप. लीलाप्रचोदितबलें म्ह० गमतीखातर किंवा सहजासहजीं योजलेली शक्ति ]

विश्वामित्र जनकराजाला म्हणतो—

हा नाजूक शरीराचा आणि झुलपें धारण करण्याच्या वयाचा असलेला मुलगा ( राम ) सर्व राक्षसाच्या सैन्याचा विध्वंस करणारा झाला ! सिंहाचा बाल हत्तींच्या मोठ्या कळपाला सहजासहजीं मारून टाकीत नाहीं काय !

येथें ' काळ होणें ' आणि ' बाधिणे ' ह्या दोन भिन्न शब्दांनीं एकच क्रिया दर्शविली जाते. हें " प्रतिवस्तूपमेच्या ( क ) " ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त स्वागता.

अन्य बाहुज धनू उचलाया फार फार झटले परि वाया— ।
तद्भुजश्रम समस्त महीशा, हस्तितोलन न होइल कीशा ॥ १४८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ७९.

इतर क्षत्रिय वीर तें धनुष्य उचलावयाला फार फार झटले पण, हे राजा दशरथा, त्यांच्या बाहूचे सर्व श्रम फुकट गेले. क्षुद्र माकडाला हत्ती कसा उचलतां येईल ?

उचलावयाला झटणें, वाया ( होणे ), ही एक मिश्र क्रिया आणि तोलन न होणें ही दुसरी मिश्र क्रिया, ह्या दोन क्रियांमध्यें साधर्म्य आहे हा " प्रतिवस्तूपमेचा ( क ) " प्रकार होय

उदाहरण, वृत्त वसततिलका.

आरोपणा धनुचिया क्षम नैव बाल—
हा राम हें भय नसो तुज भो नृपाल ! ।
होतो मतंगज रसालकतोलनाला—
पर्याप्त, कीं न, पुस हें अपुल्या मनाला ॥ १४९ ॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग ३, पद्य ११.

धनुष्याला दोरा लावावयाला राम समर्थ होणार नाही अशी, हे राजा जनका, तुला शंका वाटण्याचे कारण नाहीं हत्ती ऊस उचलायाला समर्थ होतो किंवा नाहीं हें आपल्या मनाशींच विचार करून पहा

येथें " साधर्म्यानें प्रतिवस्तूपमा झाली " आहे हा प्रकार ( क ).

उदाहरण, वृत्त वसततिलका.

रामें सभेंत चुरितां भवकार्मुकाला
राजन्य सर्व हतकांति पळांत झाला ।
जों उष्णरश्मि गगनात नसे उदेला
तों दावितात उडु मागुनि न प्रभेला ॥ १५० ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ५५.

रामानें शिवाच्या धनुष्याचा जनकाच्या सभेमध्यें भंग केला त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे

रामानें शिवाच्या धनुष्याचा सभेमध्यें भंग केला तेव्हां सर्व क्षत्रिय तत्काळ निस्तेज झाले आकाशांत सूर्य उगवलेला नसतो तोंपर्यंतच तारे चकचकतात, मागून चकचकत नाहीत !

येथें ' हतकान्ति होणें ' आणि ' प्रभेला न दाखविणें ' ह्या शब्दांनीं एकच धर्म वेगळ्या सरणीनें कथित आहे. हें " प्रतिवस्तूपमेच्या ( क ) " ह्या प्रकाराचें उदाहरण

लक्षण; वृत्त आर्या.

आत्मीय म्हणुनि जपला तो जरि झाला कृतघ्न तरि रक्षा
वाढविला निंबतरू, तो निपजो कटु, न साधु करि रक्षा ॥ १५१ ॥

वि० वा० भिडे,–पुण्यपाकि, पद्य १७.

आपलेपणाच्या बुद्धीनें ज्याचें तुम्ही रक्षण केलें तो जरी पुढें तुमच्याशीं कृतघ्न झाला, तरी त्याचें तुम्ही रक्षण केलें पाहिजे. लिंबाचें झाड वाढविलें आणि तें पुढें कडू निघालें, तरी साधुपुरुष तें जाळून टाकीत नाहींत !

येथें "रक्षिणें ( राखणें )" आणि "रक्षा ( राख न करणें )" ह्या भिन्न शब्दांनीं एकच धर्म कथिला आहे. हें "प्रतिवस्तूपमेच्या ( क )" प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

कशास भय दाविशी मजसि ? मी नसे बायको,
कळे मज हिताहित, त्वदुपदेश्ञ मातें नको ।
अशक्ति भरिशी न तूं मज भयें महाशक्तिला,
वराक भिववी कधींहि न चि दीप झंझाविला ॥ १५२ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य १००

समरांगणावर रावण रामाला म्हणतो.—

मला कशाला तू भीति दाखवितोस ? मी काहीं बायको नाहीं. मला माझें कल्याण कशांत आहे किंवा नाहीं हें समजतें मला तुझा उपदेश नको. मी जो समर्थ ( महाशक्ति ) त्या मला अशक्त ( अशक्ति ) असा तूं भीति वाटवूं शकणार नाहींस. भिकार दिवा वावटळीला भिववूं शकत नाहीं !

येथें "भयें भरणें" आणि "भिवविणें" ह्या भिन्न शब्दांनीं एकच धर्म सांगितला आहे. हें "प्रतिवस्तूपमेच्या ( क )" प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

शिरीं कर्तृत्ववंताच्या कार्यभार सदा पडे ।
न कष्टवी बावळ्याला कामाचें घोर सांकडें ॥ १५३ ॥

कर्तृत्ववान् असा जो माणूस त्याच्याच डोक्यावर काम लादलें जातें ! बावळा जो माणूस त्याला कोणत्याही कामाचे कष्ट करावे लागत नाहींत !

येथें वैधर्म्यानें प्रतिवस्तूपमा झाली आहे हा "प्रतिवस्तूपमेचा ( ख )" प्रकार.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

सज्जनांचीं संकटें जीं तीं जाणे एक सज्जन ।
वेणेची तीव्रता वंध्या आकळी न कदाचन ॥ १५४ ॥

वि० वा० भिडे,–दृ० मा० १ सर पद्य ६०

सज्जनाच्या अडचणी सज्जनानाच कळू शकतात, प्रसूतिसमयींच्या वेदना कशा

असह्य असतात त्यांची वांझ स्त्रीला काय कल्पना होणार ?

येथें " एका परिस्थितींत जाणणें " आणि " भिन्न परिस्थितींत न आकळणें " ह्या दोन शब्दांनीं एकच क्रिया दर्शविली जाते. येथें " वैधर्म्यानें प्रतिवस्तूपमा " झाली आहे. हा प्रकार ( ख ) होय.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

शैवालें पंकज खुले, शोभे अकें निशाकर ।
दिसे आश्रमकन्या ही वल्कलानें मनोहर ॥ १५५ ॥

शेवाळीनें लडबडलेलें कमळ खुलतें, कलंकामुळें चंद्र शोभतो हीं आश्रमांत राहाणारी कुमारी वल्कल नेसून मनोहर दिसते ।

येथें ही आश्रमकन्या वल्कलानें मनोहर दिसते हें उपमेयवाक्य असून शैवालें पंकज खुले आणि अकें निशाकर शोभें हीं दोन उपमानवाक्यें आहेत. खुले, शोभे, मनोहर दिसे, हीं तीन क्रियापदें तीच क्रिया भिन्न शब्दांनीं दर्शवीत आहेत.

हें ' मालाप्रतिवस्तूपमेचें " उदाहरण होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**दोन वाक्यांचिया अर्थामध्यें सदृशता असे ।**
**नसे तदात्मता तेव्हां जाणा " दृष्टान्त " होतसे ॥ ११९ ॥**
**बिंबाची प्रतिबिंबाशीं असते जी समानता ।**
**तीच वाक्यद्वयार्थांत असे, नचि तदात्मता ॥ १२० ॥**
**प्रतिवस्तूपमा जैशी द्विप्रकारक होतसे ।**
**तैसा दृष्टान्त, आल्हादबीज तेंच द्वयीं वसे ॥ १२१ ॥**
**साधर्म्यानें जसा एक वैधर्म्यानें दुजा तसा—।**
**प्रकार होइ दृष्टान्तीं प्रतिवस्तूपमेंतसा ॥ १२२ ॥**

जेथें दोन वाक्यांचा अर्थांत एखाद्या विशिष्टधर्माचे संबंधानें [illegible]सता सारखेपणा असतो, एकरूपता नसते, तेथें " दृष्टान्त ' नांवाचा अलंकार होतो. [illegible]रशांत दिसणारें मुखाचें प्रतिबिंब आणि मूळ मुख, ह्या दोन वस्तु अगदीं भिन्न [illegible]न्न असतात, तथापि त्या दोन वस्तूंत सारखेपणा असतो, ह्या सारखेपणाला " बिंबप्रतिबिंबभाव " म्हणतात दृष्टान्तांत जीं दोन वाक्यें असतात, त्या दोन [illegible]वयांत दोन धर्म सांगितलेले असतात, त्या दोन धर्मांत असा प्रकारचा बिंबप्रतिबिंब भाव असतो; एकरूपता नसते.

घोडा आणि गाढव हे प्राणी भिन्न भिन्न जातींचे आहेत परंतु त्यांच्यात सारखेपणा आहे म्हणजे त्यांच्यांत एकजातित्व नसून सादृश्य आहे. आनंदानें चेहेरा खुलन दिसणें आणि चंद्रोदयानें कुमुद सुंदर दिसणें ह्या दोन गोष्टी अगदीं

वेगळ्या वेगळ्या आहेत परंतु त्याच्यांत कांहीं सारखेपणा आहे बिंबप्रतिबिंबभाव हा केवळ सादृश्यरूप असतो, एकत्वरूप नसतो

आतां दृष्टान्तांतील दोन वाक्यात असलेलें सादृश्य दोन रीतींनीं दाखवितां येईल. सारख्याच परिस्थितींत सारखाच प्रकार दिसतो असें दाखविलें असलें तर "साधर्म्यावरून दृष्टान्त" होतो, आणि भिन्न परिस्थितींत उलट प्रकार दिसतो. त्यावरून सारख्या परिस्थितींत सारखा प्रकार दिसणार असें अप्रत्यक्षपणें दाखविलें असलें तर "वैधर्म्यावरून दृष्टान्त" होतो. साधर्म्यावरून जसा प्रतिवस्तूपमेंत एक भेद होतो आणि वैधर्म्यावरून दुसरा भेद होतो, तसा दृष्टान्तांतही साधर्म्यावरून एक भेद होतो आणि वैधर्म्यावरून दुसरा भेद होतो. साधर्म्य आणि वैधर्म्य हे भेद मागें प्रतिवस्तूपमेच्या विवरणांत सांगितल्याप्रमाणेंच दृष्टान्तांत असतात

उदाहरण, वृत्त भुजंगप्रयात

स्वताच्या सुखाची न चिंता करून प्रजार्थ प्रभू योग्य कष्टे अनून ।
शिरीं तीव्र घेऊनि सूर्यातपास तरू देतसे सावली आश्रितास ॥ १५६ ॥

स्वताच्या सुखाची परवा न करतां उत्तम राजा प्रजाजनासाठीं फार श्रम करतो. डोक्यावर सूर्याचें ऊन्ह सोसून आश्रितांना वृक्ष छाया देतो !

येथें योग्य राजाची कृति आणि वृक्षाची कृति यांच्यात बिंबप्रतिबिंबभाव आहे. येथें साधर्म्यानें दृष्टान्त झाला आहे.

उदाहरण; वृत्त द्रुतविलंबित.

तुज नृपा ! रिपुसैनिक पाहुनी पळत ते सुटले समरांतुनी ।
क्षितिवरी ठरती स्थिर मृत्कण प्रबल जों उठला न समीरण ॥ १५७ ॥

हे राजा, तुला पाहातांच शत्रूचे शिपायी रणांगणातून भयानें पळत सुटले ! वादळी वारा वाहू लागला नाहीं तोंपर्यंतच धुळीचे कण जमीनीवर स्थिर राहातात '

येथें पळत सुटणें आणि स्थिर राहणें यांच्यांत वैधर्म्य आहे हें वैधर्म्यानें झालेल्या दृष्टान्ताचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त इंद्रवंशा

होतांच तूं क्रुद्ध नृपा ! तुझे अरी गेले घरें सोडुनिया वनान्तरीं ।
स्थैर्यें तमें राहति तोंच भूवर आला नसे जों उदयास भास्कर ॥१५८॥

तूं रागावताच, हे राजा, तुझे शत्रु, आपलीं घरेंदारें सोडून अरण्यांत पळून गेले; जोंवर सूर्य उदयाचलावर आला नाहीं तोंवरच अंधकार भूमीवर स्थिरपणें ठरतो !

"पळून जाणें" आणि "स्थिरपणें राहाणें" ह्या दोन क्रियांत वैधर्म्य आहे. हें "दृष्टान्ताच्या (ख)" प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

वर्ण्यावर्ण्य अशीं एका धर्मानें जुळतीं जिथें ।
"दीपकाख्य" अलंकार म्हणे कवि असे तिथें ॥ १२३ ॥

**क्रिया कीं गुण हा धर्म एका वाक्यांत एकदा।**
**कथितो कवि, ही शैली चारुतेंत फळे सदा ॥ १२४ ॥**

प्रकृत आणि अप्रकृत अशा दोन्ही प्रकारच्या वस्तु एकाच धर्मानें जुळलेल्या असतात, म्हणजे त्या दोन्ही प्रकारच्या वस्तूचे ठायीं एक समानधर्म आहे असें सांगितलेलें असतें, तेथें "दीपक" नावाचा अलकार होतो. हा धर्म गुणरूप असतो किंवा क्रियारूप असतो, आणि तो धर्म एकाच वाक्यात एकवारच सांगितलेला असतो अशा रचनेंत चारुता उत्पन्न होते

हे दीपकाचे दोन प्रकार पुढीलप्रमाणें होत —

( क ) यांत प्रकृत आणि अप्रकृत ह्यांचा क्रियारूप साधारण धर्म सांगितलेला असतो.

( ख ) यांत प्रकृत आणि अप्रकृत ह्यांचा गुणरूप साधारण धर्म सांगितलेला असतो

**टीप,**—दीपकाच्या ( क ) आणि ( ख ) ह्या प्रकारात प्रकृतें आणि अप्रकृतें ह्यांचा एक धर्म असल्या कारणानें त्यांच्यांत सादृश्य फलित होतें, म्हणून ह्या दोन प्रकारांत प्रकृत हें उपमेय आणि अप्रकृत हें उपमान असतें.

लक्षण, वृत्त आर्या.

**कारक एक अनेक क्रियापदांशीं निबद्ध असल्यास।**
**साहित्यशास्त्रकोविद "दीपक" ऐसेंच नांव दे त्यास ॥ १२५ ॥**

कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, आणि अधिकरण, हीं सहा कारकें वैयाकरणांनी सांगितलेलीं आहेत. हीं सहा कारकें प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, आणि सप्तमी, ह्या सहा विभक्तींचीं आहेत ह्या गणतींत षष्ठी नाहीं हें विद्यार्थ्यांनीं लक्षांत बाळगावें. विभक्त्यन्त नामाचा क्रियापदांशीं किंवा इतर नामांशीं जो संबंध त्याला "कारक" म्हणतात.

एका कारकाचा किंवा विभक्त्यन्त नामाचा अनेक क्रियापदांशीं अन्वय दाखविलेला असला तर त्यालाही "दीपक" हेंच नांव अलकारशास्त्रवेत्ते देतात. हा दीपकाचा तिसरा भेद तो पुढील प्रमाणें

( ग ) यांत एक विभक्त्यंत नाम अनेक क्रियापदांशीं कोणच्या तरी कारक संबंधानें जुळलेलें असतें

आता दीपकाच्या ह्या तीन्ही प्रकारांचीं उदाहरणें देतों

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

भुजगयुक्त सदन, दैत्योपद्रुत आश्रम।
हसतीपार्श्वशयन चित्ताचा हरिती शम ॥ १५९ ॥

—वि० बा० भिडे,–मेषपेषण, पद्य १७.

ज्या घरात साप आहे असें आपणास ठाऊक आहे असें घर, दैत्यानीं ज्यांत

उपद्रव मांडला आहे असा आश्रम, आणि शेगडीच्या सान्निध्याला निजणें, ह्या गोष्टी अंत करणाचें स्वास्थ्य लोपवितात '

येथें " आश्रम " हा प्रस्तुत वस्तु आहे. " सदन " आणि " शयन " ह्या अप्रस्तुत वस्तु आहेत. ह्या तीन्ही वस्तु " चित्ताचा शम हरणें " ह्या एका क्रियारूप धर्मानें येथें जुळल्या आहेत हें " दीपकाच्या ( क ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त रथोद्धता.

वृष्टिनें जलद, घर्षणें मणी, शूर वीर विजयी क्षतें रणीं ।
भूरिदानसलिलस्रवें करी जाहला कृशहि लोचना हरी ॥ १६० ॥

पाण्याची वृष्टि करून हलका झालेला मेघ, सहाणेवर घासल्यानें हलका झालेला हिरा, रणांत जय ज्याणें मिळविला आहे असा जखमांतून रक्त वाहात असलेला योद्धा, गडस्थळांतून मद स्रवल्यामुळें म्लान झालेला हत्ती, हे कृशपणाच्या स्थितींतही सुंदर दिसतात !

येथें संदर्भ काय आहे हें आपणास ठाऊक नाहीं विजयी आणि जखमी वीराचें हें वर्णन आहे असें आपण गृहीत घेतल्यास जलद, मणि, आणि करी, हीं अप्रकृतें होतील. एक प्रकृत आणि बाकीचीं सर्व अप्रकृतें हीं " लोचना हरी " ह्या क्रियेशीं संबद्ध आहेत. हें " दीपकाच्या ( क ) " ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त आर्या

आकाश घनापगमें, अध्ययनें मन महाविभाशाली-।
होई प्रायश्चित्तें क्षतपाप मनुष्य पर्व शुभकाळीं ॥ १६१ ॥

मेघ नाहींसे झाल्यानें आकाश, अध्ययनानें मनुष्याचें मन, आणि पर्वणीच्या शुभसमयीं प्रायश्चित्त घेतल्यानें पापाचें निरसन ज्याचें झालें आहे असा मनुष्य, अति तेजस्वी ( महाविभाशाली ) होतात.

येथें " मनुष्य " प्रकृत असून " आकाश " आणि " मन " हीं अप्रकृतें आहेत. ह्या तीन्हींचा " महाविभाशाली " ह्या विशेषणानें एक गुण एकवारच कथित आहे हें दीपकाच्या ( ख ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

**टीपः**—वरील पद्यांत " होई " हें क्रियापद आकाश, मन, आणि मनुष्य, ह्या उद्देश्यांना " महाविभाशाली " ह्या विधेयाशीं जोडणारा केवळ साधा आहे हें विद्यार्थ्यानें लक्ष्यांत बाळगावें

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

राजत्व अधिकारानें, विनोदानेंहि भाषण ।
विश्रंभानें मित्र होतो दानानें रम्य वारण ॥ १६२ ॥

हातीं खरी सत्ता असल्यानें राजा, विनोदानें संभाषण, हितगुज मोकळ्या मनानें सांगण्याच्या प्रवृत्तीनें मित्र, आणि दानोदकानें हत्ती रमणीय होतो !

येथें " राजत्व " प्रकृत असून " भाषण, " " मित्र, " आणि " वारण, " हीं तीन अप्रकृतें आहेत. ह्या चार वस्तु " रम्यता " ह्या एकवार उक्त गुणानें निग-

डित आहेत. हें " दीपकाच्या ( ख ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

**टीप,**—मागील पद्याच्या विवरणांतील टीप विद्यार्थ्यांनें पहावी.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

शिखा अमित वन्हिच्या उगवल्या, पुढें वाढल्या,
पुढें मिसळल्या, पुढें फुगुनि अंबरीं कोंदल्या ।
असंख्य पिवळ्या, निळ्या, धवल, सांवळ्या, तांबड्या
शिखा झळकल्या तदा, किति उजू किती वाकड्या ॥ १६३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २०, पद्य २९.

सुग्रीवानें आज्ञा केल्यावरून ऋक्ष आणि वानर, यांनीं लंकेला आग लावून दिली त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे

अग्नीच्या असंख्य ज्वाला उत्पन्न झाल्या, पुढें त्या वाढल्या, पुढें त्या एकमेकांत मिश्र झाल्या, आणि नंतर त्या फुगून आकाशांत भरल्या ह्या, पिवळ्या, पांढऱ्या, काळ्या, तांबड्या ज्वाला प्रकाशत होत्या, आणि त्या ज्वालांपैकीं कांहीं उभ्या सरळ होत्या, आणि कांहीं वाकड्या होत्या !

येथें " वन्हिच्या शिखा " हें एक प्रथमान्त पद " उगवल्या " " वाढल्या " " मिसळल्या " आणि कोंदल्या " ह्या चार क्रियापदांशीं निबद्ध झालें आहे. हें दीपकाच्या ( ग ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

धावे तन्वी पळे, लोळे, ओरडे, आरडे, रडे ।
परी निर्लज्ज दुष्टात्मा जाई तोही तिच्याकडे ॥ १६४ ॥

वि० वा० भिडे,–काककाणता, पद्य १६

राम वनवासात असता एक कावळा सीतेला उपद्रव करीत होता त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे

कावळा सीतेला त्रास देऊं लागला, तेव्हां नाजूक गात्राची सीता धावली, पळाली, जमीनीवर लोळली, ओरडली, आरडली, आणि रडली, पण तो दुष्ट आणि निर्लज्ज कावळा तिच्या पाठोपाठ जात होता !

येथें " तन्वी " हें प्रथमाविभक्त्यन्त पद " धावे " " पळे " लोळे, " " ओरडे, " " आरडे, " आणि " रडे, " ह्या सहा क्रियापदांशीं अन्वित झालें आहे. हा " दीपकाचा ( ग ) " हा प्रकार

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

शरानुसृत तो काक स्वेदसंसिक्त जाहला, ।
श्रमला, भागला, भ्याला, तापला, अनुतापला ॥ १६५ ॥

वि० वा० भिडे,–काक काणता, पद्य २४

राम वनवासात असतां कोणी एक कावळा सीतेला गांजीत होता, त्याच्यावर रामानें ईषिकास्त्र सोडलें त्या वेळचें हें कावळ्याचें वर्णन आहे.

रामाचा बाण ज्याच्या पाठीमागें लागला आहे असा तो कावळा घामानें भिजला, श्रम पावला, दमला, भ्याला, त्याचें अंग तप्त झालें, आणि तो पश्चात्तापानें विद्ध झाला '

येथें " काक " हें प्रथमान्त पद अनेक क्रियापदांशीं अन्वित झालें आहे. हें " दीपकाच्या ( ग ) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

लक्षण; वृत्त आर्या.

**श्रेणीमध्यें पहिला क्रमिक दुजावरि, दुजा तिजावरती ।**
**तीच क्रिया क्रमें करि तर "मालादीपक" प्रधी म्हणती ॥ १२६ ॥**
**कीं दुसरा पहिल्यावरि, तिसरा दुसऱ्यावरि क्रिया करिती ।**
**चवथा तिसऱ्यावरि, हें "मालादीपक" असें विबुध कथिती ॥ १२७ ॥**

कांहीं पदार्थांची एक मालिका असून तींतील पहिला पदार्थ दुसऱ्यावर, दुसरा तिसऱ्यावर, तिसरा चवथ्यावर कांहीं एक क्रिया त्याच क्रमानें करतो, असें वर्णन असल्यास, किंवा पहिल्या पदार्थावर दुसरा, दुसऱ्यावर तिसरा, तिसऱ्यावर चवथा, तीच क्रिया करतो, असें वर्णन असल्यास त्या रचनेला " मालादीपक " म्हणतात.

उदाहरण; वृत्त आर्या

ग्राम द्विजें, श्रुतें द्विजें, सम्यग् ज्ञानें श्रुत स्तवार्ह लसे, ।
सम्यग् ज्ञानहि अध्यापनकर्में, तें स्वशिष्यशांतिरसें ॥ १६६ ॥

ब्राह्मणाची वसति असल्यानें कोणतेंही स्थळ स्तुत्य होतें, वेदाध्ययनानें ब्राह्मण स्तुत्य होतो, वेदाचें उत्तम ज्ञान झाल्यानें वेद स्तुत्य होतात, वेदाचें उत्तम ज्ञान झालेलें असतें तें वेद लोकांस शिकविल्यानें स्तुत्य होतें, आणि हें वेद शिकविणें आपल्या शिष्याच्या चित्तांत शांतिरस उत्पन्न झाल्यानें स्तुत्य होतें !

येथें ग्रामावर द्विजाचें जें उपकारकत्व, तेंच द्विजावर श्रुताचें, श्रुतावर सम्यग् ज्ञानाचें, सम्यग् ज्ञानावर अध्यापनाचें, आणि अध्यापनावर शांतिरसाचें आहे. हें " मालादीपकाचें " उदाहरण होय

**टीप,**—एकजातीय अनेक पदार्थ एका पंक्तींत स्थित असता "माला" होते. ह्या अर्थी मालोपमा, मालाप्रतिवस्तूपमा, इत्यादि शब्दांत " माला " हा शब्द आलंकारिक योजतात परंतु कांहीं पदार्थांची एक श्रेणी असून त्या श्रेणींतील पहिला आणि दुसरा क्रमिक,दुसरा आणि तिसरा क्रमिक,तिसरा आणि चवथा क्रमिक,यांचा संबंध तोच आहे असें सांगितलेलें असतें, त्या रचनेला साहित्यशास्त्रकार " शृंखला " म्हणतात. ह्या दृष्टीनें मालादीपकाला " शृंखलादीपक " म्हणणें अधिक अन्वर्थक होईल परंतु " मालादीपक " ह्या शब्दाची रूढि असल्याकारणानें आम्ही तोच स्वीकारला आहे.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**वर्ण्यें किंवा अवर्ण्यें हीं धर्म्यैक्याच्या निबंधनें ।**
**जुळलीं असतां " तुल्ययोगिता" म्हणिजे जनें ॥ १२८ ॥**

गुणरूप क्रियारूप धर्म्यैक्य द्विप्रकारक ।
तें असें एकदा उक्त तेणें ही चतुरात्मक ॥ १२९ ॥

अनेक वर्ण्य म्हणजे प्रकृत वस्तु, किंवा अनेक अवर्ण्य म्हणजे अप्रकृत वस्तु, एकदाच उक्त अशा एका धर्माच्या बंधनानें जुळविलेल्या असतात, तेव्हा "तुल्ययोगिता" हा अलकार होतो वर्ण्यें एकदाच उक्त अशा धर्म्यैक्यानें जुळलीं असता एक प्रकार, आणि अवर्ण्यें एकदाच उक्त अशा धर्म्यैक्यानें जुळलीं असता दुसरा प्रकार. हे तुल्ययोगितेचे दोन प्रकार. ह्या प्रत्येक प्रकारांत आणखी दोन प्रकार आहेत. हा एकदा उक्त जो धर्म तो गुणरूप असतो किंवा क्रियारूप असतो तेणेंकरून तुल्ययोगितेचे पुढील चार प्रकार होतात

( क ) सर्व वस्तु प्रकृत असून त्यांचा क्रियारूप साधारण धर्म ज्यांत सांगितलेला असतो तो एक प्रकार.

( ख ) सर्व वस्तु प्रकृत असून त्यांचा गुणरूप साधारण धर्म ज्यांत सांगितलेला असतो तो दुसरा प्रकार.

( ग ) सर्व वस्तु अप्रकृत असून त्यांचा क्रियारूप साधारण धर्म ज्यांत सांगितलेला असतो तो तिसरा प्रकार.

( घ ) सर्व वस्तु अप्रकृत असून त्यांचा गुणरूप साधारण धर्म ज्यांत सांगितलेला असतो तो चवथा प्रकार

लक्षण; वृत्त आर्या

वर्ण्यें आणि अवर्ण्यें दीपकिं एका विधानिं जुळतात ।
परि तुल्ययोगितेमधिं हींच जुळतिं, तींच कीं, धरिं मनात ॥ १३० ॥

दीपकामध्यें वर्ण्यें आणि अवर्ण्यें अशा दोन्ही जातींच्या वस्तु एका विधानांत गोंविलेल्या असतात तुल्ययोगितेमध्यें एकाच जातीच्या वस्तु ( मग त्या वर्ण्य असोत किंवा अवर्ण्य असोत ) ह्या एका विधानांत गोंविलेल्या असतात. हा त्या दोन अलंकारांतील फरक विद्यार्थ्यानें लक्ष्यांत बाळगावा.

आतां तुल्ययोगितेच्या चारी प्रकारांचीं उदाहरणें देतों.

उदाहरण, वृत्त आर्या.

मोहक मुख, गोंडस वपु, तरल विलोकित, विलासयुत गमन, ।
भाषण गोड इचें शिवरायाचें तोषवील नित्य मन ॥ १६७ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य ४१

कल्याणचा सुभेदार मौलाना अहमद ह्याच्या सुनेचें आबाजी सोनदेव ह्यानें केलेलें हें वर्णन आहे

हिचें सुंदर मुख, गुटगुटीत शरीर, चंचल अवलोकन, विलासयुक्त चालणें, गोड आवाजानें बोलणें, हे तिचे गुण शिवाजीच्या मनाला सदैव सुखवितील !

येथें मोहक मुख, गोंडस वपु, तरल विलोकित, विलासयुत गमन, आणि गोड भाषण, ह्या पाच गोष्टी त्या सुनेच्या वर्णनांत प्रस्तुत आहेत ह्या पाच गोष्टी "तोष-

वील " ह्या एकवार उक्त अशा क्रियारूप सामान्य धर्मानें अन्वित आहेत म्हणून हा तुल्ययोगितेचा ( क ) प्रकार होय.

उदाहरण; वृत्त यूथिका.

सूचिभेद्य तम आश्रयकंदरा, मेघडंबर महागगनोदरा ।
स्त्रीवियोगभव दुःख मदन्तरा प्रावृषेण्य ऋतु हा भरितो खरा ॥ १६८ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १३, पद्य ६५.

राम पावसाळ्याचें वर्णन करीत आहे:—

अत्यन्त गहन अंधकार प्राण्यांच्या वसतीच्या गुहांत, आणि मेघसमुदाय विस्तीर्ण आकाशाच्या पोकळींत, आणि माझ्या पत्नीच्या विरहाचें दुःख माझ्या अंतःकरणांत हा पावसाळा भरीत आहे !

येथें पावसाळ्याचें वर्णन प्रस्तुत असून पावसाळ्यानें उत्पन्न केलेले सर्व परिणाम सारखेच प्रस्तुत आहेत. " भरितो " ह्या एकवार उक्त क्रियेशीं " तम, " "मेघडंबर," आणि " दुःख, " हीं तीन्ही प्रकृतें अन्वित आहेत हा " तुल्ययोगितेचा ( क ) " प्रकार होय.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

वर्षर्तुच्या आगमनें सारी सृष्टि सुखावहा ।
उद्यानें, पादप, क्षेत्रें, हिरवीं दिसतीं पहा ! ॥ १६९ ॥

पावसाळा आला असतां सगळी सृष्टि सुखावह होते, बागा, वृक्ष, शेतें, हीं सारीं हिरवीं दिसतात !

येथें पावसाळ्याच्या वर्णनांत " उद्यानें, " " पादप, " आणि " क्षेत्रें, " हीं सर्व प्रकृत आहेत त्यांचा " हिरवेपणा " हा धर्म कथित आहे हें " तुल्ययोगितेच्या ( ख ) " प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त सौदामिनी.

खनी सौष्ठवाची, धुनी कांतिची, शिखा तूंचि सीते ! विलासाग्निची ।
मृदुत्वा तुझ्या देखतां मालती, शिरीष, प्रियंगु त्रपा पावती ॥ १७० ॥

वि० वा० भिडे,—रा० प०, सर्ग १६, पद्य ४८

रावण सीतेला बिलोभविण्यासाठीं म्हणतो:—

हे सीते, तू नेटकेपणाची खाण आहेस, सौंदर्याची नदी आहेस, बिलासरूपी अग्नीची ज्वाला आहेस, तुझा नाजूकपणा पाहून मालती, शिरीष, आणि प्रियंगु, ह्या लज्जित होतात !

येथें प्रथमार्धांत " मालानिरंगरूपक " आहे.

द्वितीयार्धांत " सीतेचें मृदुत्व " प्रकृत असून " मालती, " "शिरीष," आणि " प्रियंगु, " हीं तीन अप्रकृतें " त्रपा पावणें " ह्या एकवार उक्त क्रियारूप साधारण धर्मानें जोडलीं गेलीं आहेत हें तुल्ययोगितेच्या ( ग ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

नृपते! औदार्यगुणें त्वां जिणिलें कर्णकल्पसुरभींस ।
शौर्यगुणें रामार्जुनभार्गव असती उणे तुजपरीस ॥ १७१ ॥

हे राजा, उदारपणा ह्या गुणांत तूं कर्ण, कल्पवृक्ष, आणि कामधेनु, यांना जिंकिलें आहेस ( म्हणजे त्याच्याहून तूं अधिक उदार आहेस ! ), शौर्य ह्या गुणांत राम, अर्जुन, आणि परशुराम, हे तुजपेक्षा उणे आहेत '

येथें प्रथमार्धांत " नृपति " प्रकृत असून " कर्ण, " " कल्प, " आणि सुरभी, " हीं तीन अप्रकृतें आहेत, तीं " जिणिलें जाणें ' ह्या क्रियारूपधर्मानें जुळविलीं आहेत ह्या तुल्ययोगितेचा ( ग ) " प्रकार. द्वितीयार्धांत " राम, " "अर्जुन," आणि " भार्गव " हीं तीन अप्रकृतें "उणेपणा" ह्या गुणरूपधर्मानें जुळलीं आहेत. हें " तुल्ययोगितेच्या ( घ ) " प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त कलहंस.

बघ धूम्र ऋक्षसमुदायललाम क्रमितो क्षणीं गगनिं तो शत याम ।
बघता तदीय जव वायुमनांचें अलसत्व कोण ठरवील न साचें ? ॥ १७२ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १४, पद्य ८१.

अनेक दिशांकडून ऋष्यमूक पर्वताकडे येत असलेले ऋक्ष आणि वानर सुग्रीव रामाला दाखवीत आहे, त्या प्रसगाचें हें वर्णन आहे.

तो पहा ऋक्षमंडळीला भूषण असलेला धूम्र! तो एका क्षणांत शंभर याम आकाशात हिंडतो ' त्याचा वेग पाहून वायु आणि मन आळशीच होत, असें कोण म्हणणार नाहीं ?

येथें " धूम्र " प्रस्तुत आहे. ' वायु " आणि " मन " हीं अप्रस्तुतें असून " अलसत्व " ह्या गुणानें तीं जोडिलेलीं आहेत. हें " तुल्ययोगितेच्या ( घ ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त कलहंस.

तव मित्रता भुवि मिळेल जयास नर तो म्हणे सुरभि कल्प कशास ?
कळतां असें तुज कसा विसरेन ! करितां तसें करिन मी गुरु एन ॥ १७३ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १४, पद्य ६१.

सुग्रीव रामाला म्हणतो:—

तुझी मैत्री ज्याला प्राप्त होईल तो कामधेनु आणि कल्पवृक्ष निरर्थक होत असें म्हणेल, हें मला कळत असून मी तुला कसा विसरेन ? मी तसें केल्यास माझ्या हातून मोठें पातक होईल !

येथें " सुरभि " आणि " कल्प " ह्या अप्रस्तुतांचा " त्याज्यत्व " हा धर्म "कशास" ह्या शब्दानें सांगितला आहे हें तुल्ययोगितेच्या (घ) " प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

उपमानगुणाहूनी उपमेयगुणामधीं ।
आधिक्य वर्णितां होतो " व्यतिरेक" ह्मणे मधी ॥ १३१ ॥

उपमेयगुणापेक्षां उपमानगुणामध्यीं ।
न्यूनाची उक्ति जी तीही "व्यतिरेक" ह्मणे प्रथी ॥ १३२ ॥
उपमा दाखवी दोन भिन्न वस्तूंत तुल्यता ।
दाखवी तुल्य वस्तूंत "व्यतिरेक" विभिन्नता ॥ १३३ ॥

उपमानाच्या कांहीं एका विशिष्ट गुणापेक्षा उपमेयाचे ठायीं तो विशिष्ट गुण अधिक प्रमाणांत आहे, अशा वर्णनांत " व्यतिरेक " अलंकार होतो असें पंडित म्हणतात. तसेंच उपमेयाच्या कांहीं एका विशिष्ट गुणापेक्षा उपमानाचें ठायीं तो विशिष्ट गुण कमी प्रमाणांत आहे असें वर्णन असल्यास तेथेंही " व्यतिरेक " हा अलकार होतो असें पंडित म्हणतात

दोन भिन्न अशा वस्तूंत साम्य दाखविलें असतां " उपमा " होते व्यवहारात सारख्या म्हणून समजल्या जात असलेल्या दोन वस्तूंत फरक आहे असें सांगितलें असतां " व्यतिरेक " होतो. " उपमा " आणि " व्यतिरेक " ह्या दोन अलंकारांत हा फरक आहे.

व्यतिरेकाचे मुख्य प्रकार पुढीलप्रमाणें होतात·—

( क ) उपमेयाचा अधिकपणा आणि उपमानाचा कमीपणा हे दोन्ही हेतु ज्यांत उक्त आहेत तो

( ख ) उपमेयाचा अधिकपणा उक्त असून उपमानाचा कमीपणा ज्यांत उक्त नाहीं तो.

( ग ) उपमेयाचा अधिकपणा ज्यांत उक्त नसून उपमानाचा कमीपणा ज्यांत उक्त आहे तो

जेथें उपमेयाचा अधिकपणाही कथित नाहीं आणि उपमामाचा कमीपणाही कथित नाहीं, असा व्यतिरेकाचा प्रकार चारुताविहीन म्हणून आम्ही येथें स्वीकारिला नाहीं.

उदाहरण, वृत्त आर्या.

साधुसमागम सुखकर सोमातपसा सदैव सकलांस ।
परि ह्रास असे वृद्धि क्षय, वृद्धिच केवला असे त्यास ॥ १७४ ॥

वि० वा० भिडे,–पुण्यपंक्ति, पद्य २१.

[ सोमातप ह्म० चंद्राचा प्रकाश ह्यास ह्म० सोमातपाला त्यास ह्म० साधुसमागमाला ].

चंद्राच्या प्रकाशाप्रमाणें साधूंचा सहवास सुखदायक असतो. परंतु चंद्राच्या प्रकाशाला वृद्धि आणि क्षय ह्या दोन अवस्था असतात. साधूच्या सहवासाला फक्त वृद्धि हीच अवस्था असते '

येथें " साधुसमागम " ह्या उपमेयाचा ' केवला वृद्धि असणें "हा अधिकपणाचा हेतु उक्त आहे, आणि " सोमातप " ह्या उपमानाचा " क्षयसहित वृद्धि असणें " हा कमीपणाचा हेतु उक्त आहे. हा व्यतिरेकाचा ( क ) प्रकार

उदाहरण, वृत्त आर्या

महात्मा हा नृप रणीं लीलेनें शत्रुला जिणी।
परी न अन्य नृपशी क्रूरता करि पापिणी ॥ १७५ ॥

हा उदार मनाचा राजा समरांगणावर सहज रीतीनें शत्रूला जिंकतो, परतु इतर राजांप्रमाणें हा राजा पापमय क्रूरपणा करीत नाहीं !

येथें "महात्मा" ह्या शब्दानें उपमेयाचा अधिकपणा कथिला आहे उपमानाचा कमीपणा दाखविणारा शब्द नाहीं हा व्यतिरेकाचा ( ख ) प्रकार

उदाहरण, वृत्त आर्या

अपराधी जे त्यांना क्षेमास्तव मात्र दंडि हा नृपती।
कुनृपति जे त्याचेपरि न रमे सूडांत कधिं तदीय मती ॥ १७६ ॥

हा राजा गुन्हेगाराना त्यांच्या आणि समाजाच्या कल्याणासाठींच शिक्षा करतो, हलकट राजांच्याप्रमाणें सूडाची भावना त्याच्या अतःकरणास आनद देत नाहीं!

येथें "कु" शब्दानें उपमानाचा कमीपणा दाखविला आहे उपमेयाचें आधिक्य दाखविणारा येथें शब्द नाहीं. हें व्यतिरेकाच्या ( ग ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

प्रतिपक्षास सभेंमधिं विद्वत्तेनें करी निरुत्तर तो।
परि दम्र पंडितांपरि सभ्य सरणिपासुनी न तो चळतो ॥ १७७ ॥

सभेंमध्यें हा पडित आपल्या विद्वत्तेनें प्रतिपक्षाचें पूर्णपणें खण्डन करतो, पण हलकट पडिताप्रमाणें तो वादविवादांत सभ्यपणाची शैली सोडीत नाहीं !

येथें उपमेयाचा अधिकपणा उक्त नाहीं, उपमानाचा कमीपणा "दम्र" शब्दानें उक्त आहे. हा व्यतिरेकाचा ( ग ) प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या.

परक्याचे देश कुनृप जिंणिती स्वार्थार्थ, परि शिवाजी हा।
रिपुनीं स्वदेश जिणिला जिणि जनहित परम हो अशि तदीहा ॥ १७८ ॥

वि० वा० भिडे,–पिलाजी आणि शिवाजी, पद्य ८६.

वाईट राजे स्वाऱ्या करून द्रव्य, वैभव, इत्यादि स्वार्थ साधण्यासाठीं परदेश जिंकून पादाक्रान्त करतात, परतु शिवाजी हा शत्रूंनीं हिंदुस्तान जिंकिला तो हिंदुस्तान परत जिंकून घेण्यास झटत आहे; लोकांचें फार मोठें कल्याण व्हावें अशी त्याची इच्छा ( तदीहा ) आहे !

येथें "कु" ह्या शब्दानें अन्य जेत्यांचा म्हणजे उपमानाचा कमीपणा सांगितला आहे शिवाजीचा म्हणजे उपमेयाचा वरचढपणा सांगणारा शब्द ह्या पद्यांत नाहीं हा व्यतिरेकाचा ( ग ) प्रकार होय.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

वेदोपनिषदां ग्रंथ जगद्वंद्य निरंतर।
न अन्य ग्रंथसे देशकालसीमान्तिं नश्वर ॥ १७९ ॥

वेद आणि उपनिषदा हे आर्यांचे ग्रंथ सर्व जगाला पूज्य असून ते सर्व कालीं टिकणारे आहेत इतर ग्रंथाप्रमाणें ते देश आणि काल यांच्या मर्यादा संपतांच लोपणारे नाहींत !

येथें " वेद " आणि " उपनिषदा " ह्या उपमेयांचा थोरपणा " जगद्वंद्य " आणि " निरंतर " ह्या शब्दांनीं कथित आहे. " अन्य ग्रंथांचा " हलकेपणा " देशकालसीमान्वित नश्वर " ह्या शब्दांनीं कथित आहे. हा व्यतिरेकाचा ( क ) प्रकार.

उदाहरण, वृत्त वंशस्थ

न पाळि जो रीति निसर्गनिर्मित कराल तो भोगिल दुःख निश्चित ।
क्षमील राजा निजशास्तिभंजन, क्षमा निसर्गात मिळे कधींच न ॥ १८० ॥
निसर्ग कोणासहि न क्षमा करी, समान तो क्षुद्र नरीं महेश्वरीं ।
वघों नृपाला फसवूं शके नर, निसर्ग कोणा न फसे खरोखर ॥ १८१ ॥

वि० वा० भिडे,-प्रसूपय, श्लोक ९,१०.

निसर्गानें ठरविलेली शिस्त जो अनुसरत नाहीं, तो तीव्र ( कराल ) दुःख खचित भोगील. राजा आपल्या आज्ञेचें उल्लंघन कोणी केलें असलें तर त्याला क्षमा करील,परंतु निसर्गांत क्षमा ही वस्तु नाहीं !

निसर्ग कोणालाच क्षमा करीत नाहीं. क्षुल्लक मनुष्य आणि सार्वभौम राजा ह्या दोघांसही निसर्ग सारख्याच रीतीनें वागवितो; आपणाला असें दिसतें कीं राजाला मनुष्य फसवूं शकेल, परंतु निसर्ग कोणाकडूनही फसविला जात नाहीं !

राजा आणि निसर्ग ह्या दोन वस्तु सामर्थ्यवान् आहेत, पण त्यात राजाहून निसर्ग हा अधिक सामर्थ्यवान् असें म्हणून निसर्गाचा वरचढपणा स्थापित केला आहे. हें " व्यतिरेकाचें " उदाहरण होय.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**पूर्णोक्त वा अपूर्णोक्त वाक्य वक्ता निषेधितो – ।**
**विशेष हेतुनें तेथें "आक्षेप" कवि वर्णितो ॥ १२४ ॥**

वक्त्याच्या मनांत जो कांहीं विचार प्रकट करावयाचा आहे, तो विचार अर्धवट किंवा पूर्णपणें प्रकट केल्यावर त्या विचाराचा निषेध वक्ता करतो, आणि अशा रीतीनें कांहीं विशेष अभिप्रायाची जाणीव श्रोत्याच्या मनांत करून देतो, तेथें "आक्षेप" हा अलंकार होतो

बोललेल्या किंवा बोलावयाच्या मजकुराचा निषेध करणें किंवा तो पुरता न बोलून दाखविणें, ह्याच्यायोगानें वक्ता आपला वैताग दाखवितो किंवा आपल्या बोलण्याचा श्रोत्याच्या मनावर कांहीं परिणाम व्हावयाचा नाहीं असें आपलें मत प्रकट करतो.

पूर्णपणें बोललेल्या मजकुराचा निषेध करणें हा आक्षेपाचा एक प्रकार, आणि मजकूर अर्धवट बोलणें, हा आक्षेपाचा दुसरा प्रकार.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

अहो अधमता ! अहो कुटिलता ! तुझें धिग् जिणें !
कशास अथवा असें वच ? उगाच जिव्हा शिणे ! ।

गदा धरिं करावया समर, ऊठ, माझ्या सवें,
विदीर्ण करितों तुझें मुख, मला न तें पाहवें ॥ १८२ ॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग २०, पद्य ११३.

रावण बिभीषणाला म्हणतोः—

काय तुझा हा नीचपणा! काय तुझी ही लबाडी! धिक्कार असो तुझ्या जीवि-ताला! किंवा हें बोलून तरी काय उपयोग? माझी जीभ मात्र व्यर्थ शिणेल! माझ्याशीं लढावयाला गदा घेऊन ऊठ! तुझें तोंड ठेचून काढतों! मला तें पाहवत नाहीं!

तुझ्या नीचपणाचें वर्णन करण्यापासून कांहीं लाभ नाहीं, असें म्हणून रावण आपलें बोलणें आवरीत आहे येथें जें रावणाच्या मनांत बोलावयाचें होतें तें बोलणें संपल्यावर रावण स्वतांला आवरीत आहे म्हणून हा आक्षेपाचा पहिला प्रकार

उदाहरण, वृत्त आर्या

तत्त्वें तव वंद्य असो, व्यवहारीं धर्म तव तसा नाहीं।
असुचा आहे; अथवा तुज सांगुनि हें न फळ असे कांहीं॥ १८३ ॥

वि० वा० भिडे,–कमळांची सुटका,पद्य ५९

शिवाजी यवनाला म्हणतोः—

तुझा इसलामी धर्म तत्त्वतः उत्तम आहे हें मला कबूल आहे, पण प्रत्यक्ष व्यवहारांत तो उत्तम नाहीं, आमचा हिंदूधर्म प्रत्यक्ष व्यवहारांतही उत्तम आहे कसा तें सांगतों ऐक; किंवा हें तुला सिद्ध करून दाखविण्याचा कांहीं उपयोग नाहीं!

येथें इसलामी धर्म तत्त्वानें उत्तम असला तरी व्यवहारांत तसा नाहीं,हें शिवाजी सिद्ध करून देणार होता, पण तो तें करणें निष्फळ आहे, असें म्हणून तो विषयच सोडून देत आहे आक्षेपाचा हा दुसरा प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या.

हिंदूधर्माचीं तुज तत्त्वें ठावीं न म्हणुनि निंदिसि तो।
कथितों, अथवा मूर्खा तुज काय कळेल? जीभ आवरितों ॥१८४॥

वि० वा० भिडे,–कमळांची सुटका, पद्य ६०.

शिवाजी यवनाला म्हणतोः—

तुला हिंदूधर्माचीं तत्त्वें ठाऊक नाहींत म्हणून तू हिंदूधर्माची निंदा करीत आहेस. हीं तत्त्वें काय आहेत तीं मी सांगतों ऐक, किंवा मूर्खाला तुला हें काय सम-जणार? मी तें सांगत बसत नाहीं!

येथें सांगावयाच्या मजकुराचा निषेध आहे हें आक्षेपाच्या दुसऱ्या म्हणजे (ख) प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**कारणें नसतां कार्य घडे तेथें "विभावना–।"**
**हा नांवाचा अलंकार होतो, तो तोषवी मना ॥ १३५ ॥**

सामान्य व्यवहारीं जीं कार्याचीं बाह्य कारणें- ।
तदभावीं घडे कार्य असें कवि इथें म्हणे ।। १३६ ।।
अलौकिक असें कांही कार्योत्पत्तीस कारण ।
असे हाच अभिप्राय विरोधाचें निवारण ।। १३७ ।।
अनुक्त उक्त वा वाक्यीं हें अलौकिक कारण- ।
असतां भेद हे दोन हें हीचें स्पष्ट लक्षण ।। १३८ ।।

काहीं कार्य घडावयाला जें कारण तें नसून किंवा जीं कारणें तीं नसून कार्य घडलें असें विधान असतें, तेथें " विभावना " हा अलकार होतो सामान्य व्यवहारांत जें एकाद्या कार्याचें कारण तें नसतां काहीं अलौकिक कारणानें हें कार्य घडून आलें आहे, असें सांगण्याचा कवीचा उद्देश असतो, आणि अशा प्रकारें ह्या भासमान विरोधाचा परिहार होतो. हें अलौकिक कारण वाक्यांत उक्त असल्यास विभावनेचा एक प्रकार होतो, नसल्यास दुसरा प्रकार होतो. विभावनेचें असें स्पष्ट लक्षण आहे.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

भूषणांविणही ही स्त्री प्रेक्षकांच्या हरी मना ।
स्पर्शे लोहा तसें ईचें गात्र आकर्षितें जना ।। १८५ ।।

ही स्त्री अंगावर भूषणें नसून सुद्धां पाहाणाऱ्याचें मन ओढून घेते. लोहचुंबक लोखंडाला ओढतो, तशी हिची देहयष्टि लोकांना आकर्षिते !

येथें प्रथमार्धांत " विभावना " अलकार आहे. भूषणें हें मन हरण करण्याचें कारण आहे तें कारण उपस्थित नसतां ही स्त्री मन हरण करते, असें येथें विधान आहे. मन हरण करण्याचें कारण तिचें अप्रतिम सौंदर्य हें येथें अनुक्त आहे हा " विभावनेचा ( ख ) प्रकार होय.

वरील पद्याचें प्रथमार्ध आपण पुढीलप्रमाणें बदलूं.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

भूषणांविण ही ओढी युवती लोकलोचनां ।
स्पर्शे लोहा तसें ईचें गात्र आकर्षितें जना ।। १८६ ।।

येथें " युवती " ह्या शब्दानें " ही स्त्री ऐन तारुण्याच्या भरांत आहे म्हणून ती लोकांची दृष्टि आकर्षिते " असें कारण उक्त आहे

हें " विभावनेच्या पहिल्या प्रकाराचें " उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या

ती सानंद वसे वनिं नसतां मंदिर, न वा विविध खाद्यें, ।
नसतां दास सखीजन, मृदु तल्पीं शयन, वा विविध वाद्यें ।।१८७।।

वि० वा० भिडे,-सुकन्या, पद्य ७०.

उंच वाडा रहावयाला नसतां, किंवा नाना प्रकारचीं पक्वान्नें खावयाला नसतां, किंवा दासदासी आणि मैत्रिणी तिची सेवा आणि करमणूक करावयाला नसतां, किंवा

निजावयाला मऊ बिछाना नसता, किंवा रजवावयाला मृदंगादि वाद्यें नसतां, ती सुकन्या वनामध्यें आनंदानें राहात होती !

येथें मंदिर, खाद्यें, दासदासी, मैत्रिणी, मृदुतल्पीं शयन, आणि वाद्यें, हीं आनंदाचीं कारणें नसतां आनंद हें कार्य घडल्याचें वर्णन आहे. हें विभावनेच्या दुसऱ्या प्रकाराचें उदाहरण "पतिनिष्ठा" हें अनुक्त कारण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**व्हाया निष्पत्ति कार्याची अखंड जरि कारणें ।**
**तरी तीं हो न ही उक्ती " विशेषोक्ति " कवी ह्मणे ॥१३९॥**

एकादें विशिष्ट कार्य उत्पन्न व्हावयाला ज्या कारणांची आवश्यकता आहे, तीं कारणें विद्यमान असूनसुद्धां तें कार्य घडून येत नाहीं, असें वक्त्यानें दाखविलेलें असतें, तेथें " विशेषोक्ति " हा अलंकार होतो

उदाहरण: वृत्त विबुधप्रिया

श्रीविराजित तो तरी अभिमान त्यासि न ठाउका,
नेणुनी विपदंश अल्पहि तो झटे जनभावुका ।
सार्वभौम असे तरी नचि उद्धतत्व मुळीं तया,
कोण या प्रभुचा महामहिमा शके नर गावया ? ॥ १८८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग३, पद्य ८९.

राम, लक्ष्मण, भरत, आणि शत्रुघ्न, ह्या चार मुलांचीं लग्नें मिथिलानगरींत झाल्यावर दशरथ अयोध्येस परत यावयास निघाला असतां मिथिलेच्या नागरीकांनीं दशरथाची ह्या श्लोकात प्रशंसा केली आहे

हा दशरथ राजा धनसपन्न आहे तरी त्याला अभिमानाचें वारेंही नाहीं ! त्याणें जातीनें यत्किंचित् दुःख अनुभविलेलें नसून सुद्धां तो लोकाच्या कल्याणार्थ झटतो ! तो सार्वभौम राजा आहे तरी त्याच्या अंगीं उद्धटपणा मुळींच नाहीं ! ह्या राजाचें थोर वैभव कोण गाऊं शकेल ? कोणी नाहीं !

दशरथाचे ठायीं " श्रीविराजितत्व " हें अभिमानाचें कारण विद्यमान असून त्याचें ठायीं अभिमान हें कार्य घडलेलें नाहीं

" सार्वभौमत्व " हें उद्धतत्वाचें कारण दशरथाचे ठायीं विद्यमान असता त्याचे ठायीं उद्धतत्व हें कार्य दिसत नाहीं !

ह्या दोन प्रकारें येथें " विशेषोक्ति " अलंकार झाला आहे

दुसऱ्या चरणांत विपदंशाची जाणीव हें कारण अविद्यमान असून जनभावुकार्थ-झटणें हें कार्य घडत आहे, असें म्हटलें आहे; म्हणून ह्या द्वितीय चरणांत " विभावना " हा अलंकार आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

असो दुःखमहानीक हानी कष्टद वा पुढें ।
साधूचा न सुटे मार्ग, मन होय न वा कुढें ॥ १८९ ॥

वि० वा० भिडे,–पापपंक्ति, पद्य १५.

पुढें मोठीं दु:खें जरी दिसत असलीं, आणि त्रासदायक नुकसानी जरी दिसत असलीं, तरी साधु सन्मार्ग सोडीत नाहीं किंवा त्याचें मनही खिन्न होत नाहीं।

दु:खाचा आणि नुकसानीचा देखावा हें कारण उपस्थित असून सन्मार्ग सुटणें आणि मन खिन्न होणें हीं कार्यें घडत नाहींत असें येथें वर्णन आहे. हे "विशेषोक्तीचें" उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या.

तो न्यायी तरि न अदय, रणनिपुण तरी न रण रणार्थ करी
निजधर्मपालनीं रत तरि परधर्मासहिष्णुता न वरी ॥ १९० ॥
तो सुखविलासरत तरि कर्तव्यें करि यथासमयिं सारीं।
पंडित तरी अपंडित जे त्यास कधींहि तो न झिडकारी ॥ १९१ ॥
तो गर्भश्रीमंतहि साहाय्य विपन्न दीन जे त्यांस —।
सिद्ध सदा धन आश्रय इत्यादींहीं असे करायास ॥ १९२ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्यें १५५,१५६,१५७.

चंदनगडाचा गडकरी कमरखां ह्याचें हें वर्णन आहे.

जो मनुष्य न्यायी असतो तो अंत:करणाचा कठोर असतो, परंतु कमरखां कठोर नव्हता, त्याच्या ठायीं दया होती न्यायित्व हें कारण उपस्थित असतां अदयता हें कार्य घडत नव्हतें. हें " विशेषोक्तीचें " उदाहरण. ह्याच सरणीनें इतर ठिकाणीं " विशेषोक्ति " विद्यार्थ्यानें जाणावी.

उदाहरण, वृत्त आर्या.

पति अंध जरठ असतां, तत्सेवा तिजसि कष्टवित असतां।
नैराश्य पुढें असता, पतिनिष्ठा धरि तिची परमदृढता ॥ १९३ ॥

वि० वा० भिडे,–सुकन्या, पद्य ६९.

सुकन्येचा पति च्यवन ऋषि अधळा आणि म्हातारा असतां, आणि त्याची शुश्रूषा करण्यानें तिचें शरीर कष्ट पावत असतां, आणि पुढें आशेला कांहीं जागा नसतां, तिची पतीचे ठायीं आसक्ति अधिक अधिक दृढ होत चालली होती।

येथें कारणें उपस्थित असून कार्यें घडलीं नाहींत. म्हणजे तिच्या अंत:करणात पतीविषयीं अनादर हें कार्य उत्पन्न झालें नाहीं, असें म्हटलें आहे हें "विशेषोक्तीचें" उदाहरण.

**टीप**—विभावना, विशेषोक्ति, आणि विरोध, ह्या तीन्ही अलंकारात दोन वस्तूंत विसंवाद दाखविलेला असतो. हा विसंवाद अर्थात् कविकल्पित असतो; खरा विसंवाद हा दोष होय.

विभावना आणि विशेषोक्ति ह्या दोन अलंकारांत जो विसंवाद दर्शविलेला असतो, तो कार्य आणि कारण ह्यांच्या संबंधाचा असतो. विभावनेमध्यें कारणाचा अभाव बाधक असतो, आणि कार्य बाध्य असतें. विशेषोक्तीमध्यें कार्याचा अभाव हा

बाधक असतो, आणि कारण बाध्य असतें विरोध ह्या अलंकारांत दोन्ही वस्तु परस्परांस बाध्य आणि बाधक अशा संबधानें जुळलेल्या असतात.

लक्षण, वृत्त आर्या.

**श्रेणी अनेक असुनी क्रमिक असोनी अनेक त्यांतील ।**
**क्रमिक क्रमें जुळवि कवि तेथ "यथासंख्य" जाण होईल ॥ १४० ॥**

एका जातीच्या अनेक वस्तूची जी पंक्ति तिला "श्रेणी" असें नाव दिलेलें आहे, आणि त्या एका पंक्तींतील ज्या वस्तु, त्याना "क्रमिक" असें नांव दिलेलें आहे

एका एका श्रेणींत अनेक वस्तु असून अशा अनेक श्रेणी "यथासख्य" ह्या अलकारांत असाव्या लागतात अर्थात् प्रत्येक श्रेणींतील ती क्रमिकांची सख्या सारखीच असली पाहिजे

एका श्रेणींतील क्रमिक एकामागून एक असे घेऊन त्यांचा सबध त्याच क्रमानें बाकींच्या श्रेणींतील क्रमिकांशीं जोडून दाखविलेला असता "यथासंख्य" हा अलकार होतो.

ह्या अलंकारात जितक्या श्रेणी अधिक, आणि एका एका श्रेणींत जितके क्रमिक अधिक, तितकी चारुता अधिक, अर्थात् प्रत्येक श्रेणींत तितकेच क्रमिक असावयास पाहिजेत.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

तो भ्रष्ट तापस न आदरि कंद तोय,
खाऊं पिऊं पलल शोणित लोल होय ।
व्यापादिल्या पशुवरी जठराग्नि शान्त—
तो लागला करूं, असात्विक तो नितान्त ॥ १९४ ॥

वि० वा० भिडे,–करालकरवाल, पद्य ३२

तो पापी तपस्वी सत्यवान् कंद आणि पाणी वर्ज्य करून मास (पलल) खाऊं लागला आणि रक्त (शोणित) पिऊं लागला. ठार मारलेल्या (व्यापादिल्या) पशूवर तो जठराग्नि शांत करूं लागला; तो अत्यन्त तामसी वृत्तीचा झाला ।

येथें कंद आणि तोय, हीं एक श्रेणी; पलल आणि शोणित, ही एक श्रेणी. खाऊं आणि पिऊं, ही एक श्रेणी, अशा एकंदर तीन श्रेणी आहेत प्रत्येक श्रेणींत दोन दोन क्रमिक आहेत प्रत्येक श्रेणींतील पहिल्या पदांचा अन्वय एकत्र करावयाचा, आणि दुसऱ्या पदाचा अन्वय एकत्र करावयाचा. तो कंद वर्ज्य करून पलल खाऊं लागला, आणि तोय वर्ज्य करून शोणित पिऊं लागला. हें "यथासख्य" अलंकाराचें उदाहरण.

[illegible]

चित्तें, वचनें, देहें चिंती, बोले, करी स्वदेशहित—।
तो साधु, इह परत्राहि मनुजांत, सुरात होइ तो महित ॥ १९५ ॥

वि० वा० भिडे,–पुण्यपंक्ति, श्लो० ६

जो आपल्या देशाचें हित अंत करणानें चिंतितो, तोंडानें बोलतो, आणि देह झिजवून करतो, तो साधु होय तो ह्या लोकीं मनुष्यांत, आणि परलोकीं देवात, पूज्य होतो।

येथें चित्तें, वचनें, देहें, ही एक श्रेणी, चिंती, बोले, करी, ही दुसरी श्रेणी ह्या दोन श्रेणींतील पहिले क्रमिक एकत्र अन्वित करावयाचे, तसेच दुसरे, आणि तसेच तिसरे अन्वित करावयाचे

इह, परत्र, हीं एक श्रेणी, मनुजात, सुरांत, ही दुसरी श्रेणी. येथें दोन्ही श्रेणीं तील पहिले क्रमिक एकत्र आणि दुसरे क्रमिक एकत्र अन्वित करावयाचे हें " यथा-संख्याचें "उदाहरण

उदाहरण, वृत्त आर्या

तृषिता, क्षुधिता, अधना द्यावें जल, अन्न, धन यथाशक्ति ।
हें उचित म्हणुनि तें करि साधु जरि नसे तया फलासक्ति ॥ १९६॥

वि० वा० भिडे,-पुण्यपंक्ति, पद्य १२.

तान्हेल्याला पाणी द्यावें, भुकेलेल्याला अन्न द्यावें, निर्द्रव्याला द्रव्य द्यावें, हें योग्य आहे म्हणून साधु तें करतो,-जरी त्याला पुण्य मिळावें अशी इच्छा नसली तरी!

येथें तृषिता, क्षुधिता, अधना, ही एक श्रेणी; जल, अन्न, धन, ही दुसरी श्रेणी; वरच्या उदाहरणाप्रमाणें पहिलीं क्रमिकें एकत्र, दुसरी एकत्र, आणि तिसरीं एकत्र, करावयाचीं हें " यथासंख्याचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या

तो अंध, अवीर्य, जरठ, झाला डोळस, सवीर्य, तरुण मुनी ।
आनंद पावली तद्भार्या रूपांतरास ह्या बघुनी ॥ १९७ ॥

वि० वा० भिडे,-सुकन्या, पद्य ८२.

तो च्यवन ऋषि अंधळा, अशक्त, आणि म्हातारा होता. तो अश्विनीकुमारांच्या प्रसादानें डोळस, शक्तिमान्, आणि तरुण झाला, हें पतीचें रूपांतर पाहून त्याची पत्नी सुकन्या आनंद पावली।

येथें अंध, अवीर्य, आणि जरठ ही एक श्रेणी, डोळस, सवीर्य आणि तरुण, ही दुसरी श्रेणी, ह्या दोन श्रेणींतील पहिले क्रमिक, दुसरे क्रमिक, आणि तिसरे क्रमिक अन्वित करावयाचे. येथेंही " यथासंख्य " आहे.

टीप,—आमच्या मताप्रमाणें " यथासंख्य " हा अलंकार अर्थालंकार नसून शब्दालंकार आहे, कारण, त्याच्या चारुतेचें बीज मुख्यत्वें करून शब्दाच्या विशिष्ट स्थानांवर अवलंबून असतें, अर्थावर अवलंबून नसतें.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

होतो "अर्थान्तरन्यास" समर्थी कवि जेधवां ।
सामान्य वा विशेषानें सामान्यानें विशेष वा ॥ १४१ ॥

अर्थान्तरन्यास ह्या अलंकारात दोन वाक्यें असावीं लागतात एका वाक्यात

काहीं सामान्याचें विधान केलेलें असतें, आणि दुसऱ्या वाक्यांत त्या विधानाच्या समर्थनार्थ एका विशेषाचें कथन केलेलें असतें; किंवा एका वाक्यांत काहीं विशेषाचें विधान केलेलें असण्यास दुसऱ्या वाक्यांत सामान्याचें विधान करून त्याला बळकटी आणलेली असते

" रामानें अभ्यास केला नाहीं, तो नापास झाला. अभ्यास न करणारीं मुलें नापास व्हावयाचींच ! " येथें पहिलें वाक्य विशेष असून दुसऱ्या सामान्य वाक्यानें त्याचें समर्थन केलें आहे

" अभ्यास न करणारीं मुलें नापास होतात ! रामानें अभ्यास केला नव्हता तो नाहीं कां नापास झाला ? " येथें पहिल्या वाक्यांतील सामान्य विधानाला दुसऱ्या वाक्यातील विशेष विधानानें ( उदाहरणानें ) बळकटी आणली आहे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

प्रकटीं साम्य दृष्टान्त प्रतिवस्तूपमेपरी ।
दृढ अर्थान्तरन्यास विधान पहिलें करी ॥ १४२ ॥

प्रतिवस्तूपमा ह्या अलंकारांत दोन विधानें असतात तशीं दृष्टान्तांत आणि अर्थान्तरन्यासांतही दोन विधानें असतात. परतु अर्थान्तरन्यासांत पहिल्या विधानाचें दुसऱ्या विधानानें समर्थन केलेलें असतें. दृष्टान्त आणि प्रतिवस्तूपमा ह्या अलंकारांत सादृश्य म्हणजे साम्य फलित होतें. समर्थन करणें हा त्यांचा उद्देश नसतो. समर्थन करणें म्हणजे बळकटी आणणें किंवा दृढ करणें.

पहिल्या वाक्याचें दुसऱ्या वाक्यानें समर्थन करणें किंवा पहिल्या वाक्याला दुसऱ्या वाक्यानें बळकटी आणणें, हें साधर्म्यानें किंवा वैधर्म्यानें करतां येतें. साधर्म्य म्हणजे सजातीय धर्माचें कथन. वैधर्म्य म्हणजे विजातीय किंवा उलट धर्मांचें कथन. विजातीय धर्मांचा उलट परिणाम दाखविल्यानेंसुद्धा पहिल्या वाक्याचें समर्थन होऊं शकतें. ह्यावरून अर्थान्तरन्यासाचे पुढीलप्रमाणें चार प्रकार होतात.

( क ) साधर्म्यावरून सामान्याचें समर्थन विशेषानें.
( ख ) वैधर्म्यावरून " " "
( ग ) साधर्म्यावरून विशेषाचें समर्थन सामान्यानें.
( घ ) वैधर्म्यावरून " " "

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

प्राणी क्षुद्रहि एकीनें थोरलें कार्य साधिती ।
प्रवालकीट विस्तीर्ण द्वीपें सागरिं बांधिती ॥ १९८ ॥

वि० वा० भिडे,–दृष्टान्तमाला–सर दुसरा, पद्य ३१.

अगदीं लहान प्राणीदेखील संघटित प्रयत्न करून मोठें कार्य करतात पोवळ्याचे किडे समुद्रांत मोठमोठालीं बेटें निर्माण करतात !

येथें प्रथमार्धांतील सामान्य द्वितीयार्धांतील विशेषानें साधर्म्यानें समर्थित केलें आहे हें अर्थान्तरन्यासाच्या ( क ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

होओ उच्च कुलीं जन्म जड नीच पथा धरी ।
गिरिप्रभवही वाहे जल खोल महीवरी ॥ १९९ ॥

वि० वा० भिडे,–दृष्टान्तमाला, सर दुसरा, पद्य २१.

उच्च कुळात कोणी मनुष्य जन्मलेला असला, पण त्याचा स्वभाव हलकट असला, तर तो हलकट मार्गानेंच वागतो. पर्वतांत झरा उत्पन्न झालेला असला तरी तो जमीनीवरून सखल मार्गानेंच वाहतो !

येथें प्रथमार्धांतील सामान्याचें द्वितीयार्धांतील विशेषानें साधर्म्यानें समर्थन केलें आहे हें " अर्थान्तरन्यासाच्या ( क ) " प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

योजकाची असे प्रौढी, न योज्याची खरोखर ।
लक्ष्य वेधी शर तरी स्तवा पात्र धनुर्धर ॥ २०० ॥

वि० वा० भिडे,–दृष्टान्तमाला–सर दुसरा, पद्य १३.

वस्तूचा उपयोग करणाऱ्या माणसालाच श्रेय असतें, उपयोगांत आणलेल्या वस्तूला नसतें. बाणानें लक्ष्याचा वेध केला तरी धनुर्धरच स्तुतीला पात्र होतो, बाण होत नाहीं !

ह्या पद्यांत सामान्याला विशेषानें साधर्म्यानें बळकटी आणिली आहे. हें अर्थान्तरन्यासाच्या ( क ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

भक्षावें नित्य जें अन्न त्यापरी होइ तत्फळ ।
दीप भक्षुनि काळोख करी उत्पन्न काजळ ॥ २०१ ॥

जसें अन्न खाल्लें जातें, तसेंच त्याचें फळ असतें; दिवा अंधेर खातो ( ह्म० काळोख नाहींसा करतो ) आणि काजळ उत्पन्न करतो !

येथें सामान्याचें विशेषानें साधर्म्यानें समर्थन केलें आहे हें अर्थान्तरन्यासाच्या ( क )प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

कलिशक्ति खरी कृत्या कृत्या करवि निंद्य ती ।
कलिमूढ त्यजी कांता कांतारीं नलभूपति ॥ २०२ ॥

वि० वा० भिडे,–जी० जा०, सकीर्ण, पद्य ३१.

कलीची शक्ति खरोखरी फार मोठी, ही कलीची शक्ति मनुष्याला निंद्य कृत्यें करावयाला प्रवृत्त करिते. नळराजा कलीनें मूढ होत्साता अरण्यांत आपली पत्नी दमयंती हिला परित्यागिता झाला !

येथें प्रथमार्धांतील सामान्य विधानाला द्वितीयार्धांतील विशेषविधानानें बळकटी साधर्म्यानें आणिली आहे

हें अर्थान्तरन्यासाच्या( क )ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

नर पेचांत पडतां नीचाचीं आर्जवें करी ।
अडला गरुडाचींही नारायण पदें धरी ॥ २०३ ॥

वि० वा० भिडे,-जीवजागृति, संकीर्ण, पद्य ६९.

मनुष्य अडचणींत सापडला असतां हलक्या माणसालाही विनवितो अडला नारायण गरुडाचे पाय धरतो !

येथें प्रथमार्धांत सामान्याचें कथन केलें आहे द्वितीयार्धांतील विशेषानें ह्या कथनाचें समर्थन साधर्म्यानें केलें आहे. हें अर्थान्तरन्यासाच्या ( क ) प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त आर्या.

साधूंशीं नम्रपणें वागे तो भोगि शर्म परिणामीं ।
समरीं लंकापति मृत झाला दौरात्म्य करुनिया रामीं ॥ २०४ ॥

सज्जनाशीं नम्रपणानें वागतो तो शेवटीं सुख भोगितो; रामाबरोबर वैर करून रावण रणांत मृत्यु पावला !

येथें आर्येच्या प्रथमार्धांत सामान्याचें विधान आहे. उत्तरार्धांत विशेषाचें कथन आहे तें वैधर्म्यानें कथन आहे. नम्रपणाचा शर्मभोग हा परिणाम, दौरात्म्याचा मरण रूप उलट परिणाम.

हें अर्थांतरन्यासाच्या ( ख ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त इंद्रवज्रा.

ऐकोनि ह्या स्थूलशिरोवचाला गंधर्व दुःखाकुलचित्त झाला ।
मौर्ख्यें अथश्री हसवी जयाची तापें इतिश्री रडवी तयाची ॥२०५॥

वि० वा० भिडे,-कबधबंधना, पद्य २०

स्थूलशिरा ऋषीचें हें शापवाक्य ऐकून तो गंधर्व दुःखानें व्याकुळ झाला. जें कृत्य मूर्खपणामुळें आरंभीं हसवितें, तें परिणामीं दुःख देऊन रडवितें येथें एका विशेष विधानाला सामान्य विधानानें बळकटी आणली आहे, आणि ती साधर्म्यानें आणिली आहे. हा अर्थान्तरन्यासाचा ( ग ) प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या.

तद्गंधहि नर घेती परि सुकतां स्थान अवकरीं देती ।
जों वस्तु सुखद तोंवर आदर, मग तुच्छ लेखितात नर ॥ २०६ ॥

वि० वा० भिडे,-गुलाब, आर्या ११

त्या फुलाचा वास मनुष्यें घेतात पण तें फूल सुकल्याबरोबर तें उकिरड्यात टाकून देतात. मनुष्यें कोणतीही वस्तु सुख देत आहे तोंवर तिचें कौतुक करतात; ती सुख देईनाशीं झाली कीं तिचा तिरस्कार करतात !

येथें प्रथमार्धांत फुलासंबंधाचें विशेष विधान आहे द्वितीयार्ध सामान्य विधानाच्या रूपाचा असून त्यानें विशेष विधानाला साधर्म्यानें बळकटी आणली आहे.

म्हणून अर्थांतर न्यासाच्या ( ग ) ह्या प्रकाराचें हें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

स्पर्शितो नच वन्हीला चाले राखेवरी नर ।
पावे आदर तेजस्वी, अतेजस्वी अनादर ॥ २०७ ॥

वि० वा० भिडे,–दृष्टान्तमाला–सर दुसरा, पद्य ७.

मनुष्य अग्नीला स्पर्श करीत नाहीं, पण विस्तवाच्या राखेवरून चालतो. तेजस्वी जो मनुष्य आहे, त्याला मान दिला जातो; अतेजस्वी मनुष्याला मान दिला जात नाहीं !

येथें प्रथमार्धांत एक विशेष असून द्वितीयार्धांत सामान्य आहे. हें "अर्थांतर-न्यासाच्या ( ग )" ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

पुढें घे अग्निचा शेक, मागें घे रविचा नर ।
मान सन्निधिच्या तेजा दूरच्यास अनादर ॥ २०८ ॥

वि० वा० भिडे,–दृष्टान्तमाला–सर दुसरा; पद्य ४

अग्नीकडे तोंड करून मनुष्य शेक घेतो. सूर्याचा शेक मनुष्य पाठीवर घेतो. जवळच्या तेजस्वी पदार्थाला मान दिला जातो, आणि दूरच्यास तुच्छता दर्शविली जाते !

येथें प्रथमार्धांतील विशेषाला द्वितीयार्धांतील सामान्यानें बळकटी आणिली आहे. हें "अर्थान्तरन्यासाच्या ( ग )" ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त रथोद्धता.

तेथ मातृभगिनींस पाहुनी, तातमातृपरिरंभ लाहुनी ।
हृष्ट होइल मदीय हें मन, हर्ष दे सतत आप्तदर्शन ॥ २०९ ॥

वि० वा० भिडे,–दक्षदुर्गति, पद्य ४८

सती आपला पति शंकर ह्याला म्हणते:—

तेथें म्हणजे माझ्या माहेरीं ( म्ह० दक्षाच्या घरीं ) माझ्या मावशांना भेटून आणि आईबापांना आलिंगन देऊन माझें अंतःकरण आनंदित होईल; नातलगांच्या भेटीनें आनंद होतो !

येथें पहिल्या तीन चरणांतील विशेषांचें चतुर्थ चरणातील सामान्यानें समर्थन केलेलें आहे. हा " अर्थान्तरन्यासाचा ( ग ) " हा प्रकार.

उदाहरण; वृत्त मालती.

बघुनि असें बल रामदर्शित अतितर भार्गव होय हर्षित ।
कलुषित जें मन मत्सरें नसे प्रमुदित वीर्य बघोनि होतसे ॥ २१० ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ४, पद्य ५८.

रामानें प्रकट केलेलें हें सामर्थ्य पाहून परशुराम अत्यन्त आनंदित झाला. ज्याच्या मनात मत्सर नसतो त्याला दुसऱ्याचें सामर्थ्य पाहून आनंद होतो !

हें " अर्थान्तरन्यासाच्या ( ग ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त वंशस्थ

अशापरींचा करुनी महोत्सव, विलोकुनी तें अतिभव्य वैभव ।
जनासि वाटे दिन अल्प तो असें, सुखेंच काळास तनुत्व येतसें ॥ २११ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ४८.

रामजन्माच्या दिवसाची अयोध्येची शोभा:—अशा प्रकारचा मोठा उत्सव करून आणि तें थोर वैभव पाहून अयोध्येच्या लोकांना तो दिवस अगदीं लहान असा वाटला. सुखाच्या प्रसंगीं वेळ आखूड असा वाटतो !

येथें तृतीय चरणांतील विशेष विधानाला चतुर्थ चरणांतील सामान्य विधानानें बळकटी आणिली आहे. हें "अर्थान्तरन्यासाच्या ( ग ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

तृषा शमवितीं जलें सुरभि सर्वदा ज्यांतलीं,
असे बहु जलाशय स्थित असूनि भूमंडलीं ।
जलार्थ विनवी घना, न इतरां, अहो ! चातक,
न हारवि असोनिही व्यसनिं मान मानी स्वक ॥ २१२ ॥

वि० वा० भिडे,–अन्योक्तिमंजरी, पद्य १८

ज्यांतील गोड उदकें सर्व काळीं तान्हेल्यांची तहान भागवितात, अशीं पुष्कळ तळीं ह्या पृथ्वीवर असता चातक मेघाचीच पाण्यासाठीं प्रार्थना करतो, इतरांची करीत नाहीं. मानी पुरुष सकटसमयीं सुद्धां आपला मान गमावून घेण्यास सिद्ध नसतो!

येथें विशेषाचें समर्थन सामान्यानें केलें आहे तें वैधर्म्यानें केलें आहे. हा "अर्थान्तरन्यासाचा (घ)" हा प्रकार.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

क्षपणा क्रुपणा दूर टाळी रजक याचक ।
जगीं सारे वधों स्नेह असती स्वार्थमूलक ॥ २१३ ॥

वि० वा० भिडे,–जी० जा०, संकीर्ण, पद्य १४.

सदा नम्र वृत्तीनें राहाणाऱ्या भिक्षूला आणि चिक्कू माणसाला परीट आणि भिक्षेकरी टाळतात जगात आपण असें पाहातों कीं कोणी कोणाशीं मित्रत्वाचा संबंध राखतो तो केवळ स्वार्थबुद्धीनें !

येथें प्रथमार्धांतील विशेष विधान वैधर्म्यानें सामान्य विधानानें समर्थित केलें आहे हें "अर्थान्तरन्यासाच्या ( घ )" ह्या प्रकाराचें उदाहरण.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**रूपानें मात्र जो भासे, नसे अर्थें विरोध तो ।**
**अलंकार " विरोधाख्य " असेंच कवि सांगतो ॥ १४३ ॥**
**वाक्यास चारुता येना विरोधें वास्तवें कधीं ।**
**भासमान विरोधास अलंकार म्हणे प्रधी ॥ १४४ ॥**

जो विरोध केवळ दिसण्यापुरताच असतो, खरोखरी नसतो, त्या विरोधाला " विरोध " अलंकार असें म्हणतात वास्तविक विरोध हा दोष होय; परंतु जो केवळ भासमान विरोध असतो, तो अर्थामध्यें चारुता उत्पन्न करतो, म्हणून त्याची अलंकारांत गणना केली जाते

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**विरोध हा जातिगुणक्रियाद्रव्यद्वयामधीं—।**
**असतां होति तद्वर्ग दहा ऐसें म्हणे प्रधी ॥ १४५ ॥**

जाति, गुण, क्रिया, आणि द्रव्य, असे वैयाकरणांनीं आणि साहित्यशास्त्र्यांनीं शब्दांचे चार वर्ग केले आहेत. जाति म्हणजे माणूस, घोडा, पर्वत, नदी, इ० चा वर्ग, म्हणजे सामान्य नामांचा वर्ग. गुण म्हणजे पांढरा, शूर, कोमल, इ० विशेषणांचा वर्ग क्रिया म्हणजे क्रियापदें असें ज्यांना म्हणतात त्यांचा वर्ग द्रव्य म्हणजे रामा, हिंदुस्तान, चंद्र, सूर्य, इ० एक एकच पदार्थ दर्शविणारे जे शब्द त्याचा वर्ग.

जाति, गुण, क्रिया, आणि द्रव्य, ह्या चार वर्गांपैकीं प्रत्येक दोहोंची एक एक जोडी केल्यास दहा जोड्या होतात. प्रत्येक जोडींत एक एक विरोध असे विरोधाचे एकंदर दहा प्रकार होतात, ते असे. ( क ) जातीचा जातीशीं विरोध; (ख) जातीचा गुणाशीं, ( ग ) जातीचा क्रियेशीं, ( घ ) जातीचा द्रव्याशीं; ( ङ ) गुणाचा गुणाशीं; ( च ) गुणाचा क्रियेशीं, ( छ ) गुणाचा द्रव्याशीं, ( ज ) क्रियेचा क्रियेशीं, ( झ ) क्रियेचा द्रव्याशीं; आणि ( ञ ) द्रव्याचा द्रव्याशीं आतां ह्या दहा प्रकारच्या विरोधांची उदाहरणें आम्ही देतों

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

मज दशाननभूति असे महा दवशिखा मृगिला तशि दुःसहा ।
मम इथें विधु विग्रह जाळितो, पवन शीत सुगंधहि पोळितो॥२१४॥
वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य ३.

सीता मारुतीला म्हणते —

मला रावणाची समृद्धि हरिणीला वणव्याच्या ज्वालेप्रमाणें असह्य होत आहे ! येथें चंद्र माझें शरीर जाळतो, आणि थंड आणि सुवासिक वाराही मला भाजतो !

येथें " विधु " ह्या द्रव्याचा " जाळणें " ह्या क्रियेशीं विरोध वर्णिला आहे. हा " विरोधाचा ( झ ) " हा प्रकार

चवथ्या चरणांत " पवन " ह्या जातीचा " पोळतो " ह्या क्रियेशीं विरोध वर्णिला आहे हा "विरोधाचा ( ग )" प्रकार होय

येथें विरहिणीला सुखद वस्तूही दु:खद होतात असा विरोधाचा परिहार करावयाचा.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

मग दशानन तेथुनि गेलियावरि कसा नमलों पदिं तीचिया ।
तिज दिली मग आपण मुद्रिका सुखकरी तरि चित्तविदारिका ॥२१५॥
वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १९, पद्य ९९

मारुति सीतेची आणि आपली भेट झाली त्या प्रसंगाचें आपल्या मित्रमंडळीपुढें वर्णन करीत आहे.

मग रावण तेथून निघून गेल्यावर आपण सीतेच्या पायांवर डोकें ठेविलें, आणि मग तिला रामाची अंगठी दाखविली. ही अंगठी तिला सुखकारक असून अंतःकरण विदीर्ण करणारी होती।

येथें " सुखकरी " आणि " चित्तविदारिका " ह्या दोन गुणांत विरोध आहे. "विरोधाच्या ( ङ )" प्रकाराचें हें उदाहरण होय.

विरहिणींला पतीचें स्मरण करून देणाऱ्या वस्तु सुखही देतात आणि दुःखही देतात असा ह्या विरोधाचा परिहार करावयाचा.

उदाहरण; वृत्त आर्या.

दासाची स्थिति दुःसह, दासा उद्यान माळरान गमे।
विधु तापद, गीत परुष, मन न कशांतहि तदीय खिन्न रमे ॥२१६॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें, पद्य २४.

जो कोणी दुसऱ्याच्या गुलामगिरींत असतो, त्याची स्थिति फार कठिण असते; त्याला बाग ही माळरानासारखी रूक्ष वाटते, चंद्रही ताप देतो; गायनही कठोर लागतें; त्याचें मन कशांत सुद्धां रमत नाहीं।

येथें " उद्यान " आणि " माळरान " ह्या दोन जातिजातींत विरोध आहे, हें "( क ) ह्या प्रकारच्या विरोधाचें उदाहरण " " विधु " ह्या द्रव्याचा " तापद " ह्या गुणाशीं विरोध आहे. हें "( छ ) ह्या प्रकाराचें उदाहरण." " गीत " ह्या जातीचा " परुष " ह्या गुणाशीं विरोध आहे. हें "( ख )" ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त पृथ्वी.

जनां सुख मिळे मुळीं न परतंत्र देशांतिल,
विषादकर तन्मनां मधुर काव्यही होइल।
प्रभुस्तुति रुगावहा, द्रविणराशि हालाहल,
प्रतिष्ठित किताबही करिल तन्मना विव्हल ॥ २१७ ॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें; पद्य १७.

ज्या देशांवर परक्याचें राज्य असतें, त्या देशांतील लोकांना तिळमात्र सुख प्राप्त होत नाहीं। मधुर काव्यही त्यांना खेद उत्पन्न करणारें होईल; नाइलाजानें राजाची स्तुति स्वतः करणें, किंवा त्याच्या बगलबच्चांनीं केलेली स्तुति ऐकणें, हें त्यांच्या मनांत किळस उत्पन्न करील, द्रव्यराशि त्यांना हालाहल विष वाटेल, आणि मोठा किताब ही त्यांच्या मनाला व्याकुळ करील !

येथें " विषादकर " आणि " मधुर " ह्या दोन गुणांत विरोध आहे. हें विरोधाच्या ( ङ ) ह्या प्रकाराचें उदाहरण. "प्रभुस्तुति" आणि " रुगावह " ह्या जोडींत जाति आणि गुण ह्यांचा विरोध आहे हें ( ख ) ह्या प्रकाराचें उदाहरण. " द्रव्यराशि " आणि " हालाहल " ह्या जोडींतील विरोध जाति आणि द्रव्य ह्यांच्यामध्यें

असून तें ( घ ) प्रकाराचें उदाहरण. " प्रतिष्ठित " आणि " विठ्ठल " ह्यांच्यांतील विरोध गुणाचा गुणाशीं असून हें ( ङ ) ह्या प्रकाराचें उदाहरण.

परतंत्र देशातील लोकाना आनंददायक वस्तूपासूनही आनंद होत नाहीं, असा ह्या सर्व विरोधांचा परिहार करावयाचा.

उदाहरण, वृत्त आर्या

खलभाषण मधुर तरी श्रोत्यांच्या त्रासवी मनास सदा ।
परुषहि साधूक्त मना श्रोत्यांच्या होतसे प्रशमसुखद ॥ २१८ ॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें, पद्य ९.

दुष्ट माणसाचें भाषण गोड असलें तरी तें श्रोत्याच्या मनाला त्रास देतें ! साधूचें कठोर भाषण श्रोत्याच्या मनाला शांति आणि सुख देतें !

येथें " मधुर " ह्या गुणाचा " त्रासवी " ह्या क्रियेशीं विरोध आहे हा प्रकार ( च ). " परुष " आणि "प्रशमसुखदा " हा गुण आणि गुण ह्यांच्यांतील विरोध. हा विरोधाचा ( ङ ) हा प्रकार.

उदाहरण,वृत्त स्वागता.

होतसे विरहिणीस निशाप सूर्य, गीतरव दे बहु ताप ।
त्रास दे जरि मनोहर सृष्टि, रम्य वस्तु सुखवी नचि दृष्टि ॥२१९॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें, पद्य ८६

विरहिणीला चंद्र (निशाप) हा सूर्य होतो येथें द्रव्याचा द्रव्याशीं विरोध असल्यामुळें हें (ज) ह्या प्रकाराचें उदाहरण गायनाचा ध्वनि विरहिणीला फार ताप देतो. हें जाति आणि क्रिया ह्यांच्या विरोधाचें म्हणजे ( ग ) ह्या प्रकाराचें उदाहरण. सृष्टि रमणीय असून विरहिणीला त्रास देतें; हें ( च ) ह्या प्रकाराचें उदाहरण; आणि रमणीय वस्तु सुद्धां सुख देतें नाहीं हेंही ह्या ( च ) प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

मुनि तोषला बघुनि ही पतिनिष्ठा कष्टलाहि तो च्यवन ।
मी सफल करुं कसें तज्जीवित याचें करी मुनी मनन ॥ २२० ॥

वि० वा० भिडे,-सुकन्या, पद्य ७२.

सुकन्येची ही पतिनिष्ठा पाहून तो मुनि च्यवन तिचा पति हा संतुष्ट झाला,आणि त्याला दुःखही झालें. तिच्या जन्माचें मी सार्थक्य कसें करावें हा त्यानें विचार चालविला !

येथें " तोषला " आणि " कष्टला " ह्या दोन क्रियांमध्यें विरोध वर्णिला आहे. हें " विरोधाच्या (ज) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

सुकन्येच्या सेवेनें मुनि तोषला आणि तिच्या जन्माचें सार्थक्य होत नाहीं असें पाहून तो कष्टला. भिन्न कारणांनीं भिन्न कार्यें घडवून आणलीं, असा विरोधाचा परिहार करावयाचा.

"विरोध" ह्या अलंकाराचें वर्गीकरण मम्मटानें जाति, गुण, क्रिया, आणि द्रव्य,

ह्या शब्दांचा चार वर्गांतील कोणत्याही दोन वस्तूंच्या विरोधावर आधारलेलें आहे तें वर दिलें आहे. परंतु श्लेषावर आधारलेले विरोध फार मनोहर असतात, ते मम्मटानें सांगितलें नाहींत. त्याचें एक उदाहरण खालीं देतों.

उदाहरण, वृत्त आर्या.

शबरांचा सेनापति मातंगक तो तयाक्षणीं मजला ।
कृष्ण तरी असुदर्शन, तरुण तरी क्षपितबहुवया दिसला ॥ २२१ ॥

[ कृष्ण ह्म० विष्णु; पक्षीं, काळा असुदर्शन ह्म० सुदर्शन चक्र जवळ नसलेला; पक्षीं, उग्र चेहेऱ्याचा. क्षपितबहुवया ह्म० घालविलें आहे पुष्कळ वय ज्यानें असा ह्म० म्हातारा; पक्षीं, मारले आहेत पुष्कळ पक्षी ज्याणें असा.

कृष्ण (पक्षीं, काळा)असूनही जवळ सुदर्शन चक्र नसलेला (पक्षीं, उग्र चेहेऱ्याचा), तरुण असून म्हातारा (पक्षीं; मारले आहेत पुष्कळ पक्षी ज्यानें असा)मातंगक नांवाचा शबरांचा सेनापति मला दिसला.

येथें सुदर्शन चक्र जवळ नसलेला कृष्ण, आणि तरुण असून म्हातारा, ह्या दोन बाह्यात्कारीं विरोधांचा पक्षांतरींचे अर्थ घेऊन परिहार करावयाचा.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**चेष्टा संस्थान डिंभादि वस्तूंचें वर्णिजे जिथें ।**
**याथातथ्यें " स्वभावोक्ति " अलंकार असे तिथें ॥१४६॥**

चेष्टा म्हणजे हालचाली; संस्थान म्हणजे शरीराच्या अवयवांची विशेष प्रसंगीं जी ठेवण असते किंवा होते किंवा केली जाते ती डिंभ ह्म० मूल.

मूल इ० वस्तूंच्या हालचाली, प्रसंगविशेषींची त्यांची गात्रांची ठेवण, इ० चें जें हुबेहुब वर्णन, त्याला " स्वभावोक्ति " म्हणतात.

मूल, माणूस, पशु, पक्षी, इत्यादि प्राण्याचें प्रसंगविशेषीं दिसणारें रूप, प्रसंगविशेषीं त्याच्या गात्राचें दिसणारें संस्थान, प्रसंगविशेषीं त्याच्या गात्राचें होणारें चलनवलन, त्याचा शब्द, ह्यांचें जें हुबेहूब वर्णन त्याला "स्वभावोक्ति" म्हणतात.

माणूस, हत्ती, इत्यादींच्या शरीराचें कितीही तपशीलवार वर्णन केलेलें असलें तरी त्या वर्णनाला " स्वभावोक्ति " म्हणता येणार नाहीं. परंतु कुस्तीचा एकादा पवित्रा मल्लानें केला असतां, किंवा हत्तीनें डोंगरावर धडाके मारीत असतां केलेली गात्राची ठेवण, किंवा चिमणीवर झडप घालूं पाहाणाऱ्या मांजराच्या शरीराचें संस्थान, ह्याचें वर्णन, ही " स्वभावोक्ति " होय.

तसेंच ज्वालामुखीचा उद्रेक, खवळलेला समुद्र, झंझावात, पावसाळ्यांत फुगलेल्या नदीचा प्रवाह, जोरांत पाण्यावर टणटण उड्या मारणारें गलबत, लढाईची धुमश्चक्री, वणवा, इत्यादींचें जें वर्णन तीही स्वभावोक्ति.

शांत स्थितींतील जें निसर्गाचें वर्णन त्याला आलीकडे " स्वभावोक्ति " म्हणण्याचा प्रघात पडत चालला आहे त्याला दुसरा कांहीं शब्द योजणें बरें, असें आमचें मत आहे. त्याला " जाति " हा शब्द योजतां आल्यास योजावा.

उदाहरण; वृत्त विभावरी.

अजिन पांघरुनि वल्कल नेसुनी भसितलिप्ततनु दिव्य जणों मुनी ।
उपलखण्ड बसला समधिष्ठुनी रघुपती, रुचिर मूर्ति याहुनी ॥ २२२ ॥

जवळिं तेथ बसली वसुधासुता पतिमुखार्पितदृशा शमसंयुता ।
चरणसंवहन ती पतिचें करी कमलकोमलतळीं अपुल्या करीं ॥२२३॥

अनुज लक्ष्मण सचाप तया स्थळीं क्षितितलावरि बसे विहितांजली ।
रुचिर मूर्ति न अशा भुवनामधीं मनुज एकवटल्या बघतो कधीं॥२२४॥

[ अजिन ह्म० हरिणाचें कातडें. भसितलिप्ततनु ह्म० राखेनें माखलें आहे अंग ज्याचें असा ( रघुपति ). उपलखण्ड ह्म० दगडाची शिळा. वसुधासुता ह्म० सीता. पति ...... ह्म० नवऱ्याच्या तोंडावर वळविली आहे नजर जिनें अशी ( वसुधासुता ). शमसंयुता ह्म० शांत. चरणसंवहन ह्म० पाय चेपणें. कमलकोमलतल ह्म० कमळासारखे मऊ आहेत तळवे ज्यांचें असे ( आपले हात ). विहितांजली ह्म० जोडले आहेत हात ज्यानें असा. ]

ह्या तीन श्लोकांपैकीं पहिल्यांत रामाचें संस्थान वर्णिलें आहे. दुसऱ्या श्लोकांत सीतेचें, आणि तिसऱ्यांत लक्ष्मणाचें संस्थान वर्णिलें आहे. हीं " स्वभावोक्तीचीं " उदाहरणें.

उदाहरण, वृत्त पृथ्वी

समस्त पुरिं हिंडले प्लवग, ऋक्ष,उल्काकर,
दिलीं बहुत वन्हिच्या मुखिं गृहें तयीं सत्वर ।
अनेक सदनें, गृहें, अवसथें जळों लागलीं,
प्रचण्ड चढल्या नभोन्तरिं असंख्य धूमावली ॥ २२५ ॥

स्फुलिंग उठले तदा भडकल्या घरांपासुनी,
अदग्धहि घरांस ते पसरले जवें तेथुनी ।
घरें त्वरित पेटलीं लघु विशालही यापरी,
निशाटपुरिं वाटला ज्वलन कीं विलासा करी ॥ २२६ ॥

शिखा अमित वन्हिच्या उगवल्या, पुढें वाढल्या,
पुढें मिसळल्या, पुढें फुगुनि अंबरीं कोंदल्या ।
असंख्य पिवळ्या, निळ्या, धवल, सांवळ्या, तांबड्या,
शिखा झळकल्या तदा, किती उजू, किती वाकड्या ॥ २२७ ॥

अनेक जळतीं घरें धडधडां पडों लागलीं,
विदीर्ण मणिकुट्टिमें विखरलीं धरित्रीतलीं ।
स्फुलिंगनिकर ज्वलद्गृहसमुत्थ गेला वरी,
कृशानुतरुचीं सुमें पसरलीं जणों अंबरीं ॥ २२८ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०; सर्ग २०, पद्यें २७ ते ३०.

[ अवसथें ह्म० राहावयाच्या जागा. धूमावली ह्म० धुराचे लोट. स्फुलिंग ह्म० ठिणग्या. लघु विशाल ह्म० लहान मोठीं ( घरें ). निशाटपुर ह्म० राक्षसांचे शहर ह्म० लंका. विदीर्ण ह्म० फुटलेलीं, फाटलेलीं ( मणिकुट्टिमें ). मणिकुट्टिमें ह्म० हिरे, माणकें, इत्यादींनी बनविलेल्या फरसबंदी जमीनी. कृशानुतरु ह्म० अग्निरूपी वृक्ष. अंबर ह्म० आकाश ].

लंकापुरी जळत होती त्या प्रसंगाचें ह्या चार पद्यांत वर्णन आहे. तीं " स्वभावोक्ति " ह्या अलंकाराचीं उदाहरणें होत.

उदाहरण; वृत्त सौदामिनी.

शरीरें सती टेकली शिंशपा मृदुत्वें शिरीषास जें दे त्रपा ।
इथें एकली ती उभी राहिली, मनीं राममूर्ती तिनें ध्यायिली ॥ २२९ ॥
समीरें तिचे हालले मूर्धज, जयीं एकही नोव्हतें पंकज ।
अवेणीक ते सर्वदा मोकळे, वियोगें तिचा अंतरात्मा जळे ॥ २३० ॥
जळें नेत्र होते तिचे पूरित, तिचा ओष्ठ निश्वासवातें सित ।
तिचा अंतरात्मा अती पोळला, जणों आतपीं मीन तो लोळला ॥२३१॥
वियोगज्वरें अंगकांती फिकी, तिची देहयष्टी अती बारिकी ।
प्रभा लोचनांची निमाली अहो ! वियोगें तिची हे दशा कां न हो ! ॥२३२॥

वि० वा० भिडे,–रा० प०; सर्ग १६, पद्यें १६ ते १९.

[ शिंशप हें शिशूचें झाड. शिरीष हें एक नाजूक फूल आहे. त्रपा ह्म० लाज. मूर्धज ह्म० डोईवरील केश. अवेणीक म्ह० ज्यांची वेणी घातली नाहीं असे ( डोईचे केश ) वियोगें ह्म० ( रामापासून ) ती दूर असल्याकारणानें. सित ह्म० निस्तेज, पांढरा ( ओष्ठ ). आतप म्ह० सूर्याचें उन्ह ].

वरील चार श्लोकांत अशोकवनिकेंत सीता होती त्या वेळच्या एका विशिष्ट प्रसंगीं तिच्या शरीराच्या संस्थानाचें वर्णन आहे. हें स्वभावोक्तीचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या

मागिल पद लांबवुनी, करुनि कणा सखल, लांबवुनि अंग ।
मृन्मलिन सटा हलवुनि निद्रोत्थित खिंकाळे बघ तुरंग ॥ २३३ ॥

मागल्या दोन तंगड्या लांबवून, पाठीचें हाड सखल करून आणि धुळीनें भरलेले आयाळाचे केश झटकारून हा झोंपेतून उठलला घोडा कसा खिंकाळत आहे पहा !

ह्या घोड्याच्या वर्णनात " स्वभावोक्ति " आहे.

शाकुंतल नाटकाच्या पहिल्या अंकांत दुष्यन्त हरिणाच्या मृगयेमध्यें रथांत बसून चालला असतां रथाच्या घोड्याचें वर्णन, तसेंच पुढें पळत असलेल्या हरिणाचें वर्णन, हीं " स्वभावोक्तीचीं " उदाहरणें होत.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

दिसे निंदा स्तुति असे, असे निंदा दिसे स्तुति ।
तेथें " व्याजस्तुती " होते मनोहर अलंकृती ॥१४७॥

दिसण्यांत निंदा दिसते परतु वर्ण्य वस्तूची ती खरोखरीं स्तुति असते, किंवा दिसण्यांत स्तुति असली तरी खरोखरीं वर्ण्यवस्तूची ती निंदाच असते, तेव्हां "व्याजस्तुति" हा मनोहर अलंकार होतो

निंदेच्या रूपानें स्तुति किंवा स्तुतीच्या रूपानें निंदा केली असतां "व्याजस्तुति" हा अलंकार होतो.

उदाहरण; वृत्त आर्या.

धनधान्यें कररूपें प्रकृतिजनांचीं अशेष घेऊन ।
लोपविलें चोरभया, मेळविलें त्वां नृपा! यश अनून ॥ २३४ ॥

हे राजा, करांच्या रूपानें प्रजाजनांचीं सगळीं धनें आणि धान्यें घेऊन तूं त्यांच्यावर उपकारच केले आहेस, कारण त्यांना आता चोरांचें भय राहिलें नाहीं! तुला मोठें यश मिळालें आहे!

येथें बाहेरून राजाची स्तुति असून खरोखरीं त्याची निंदा कवीनें केली आहे. हें "व्याजस्तुतीचें" उदाहरण.

उदाहरण; वृत्त शिखरिणी

कुऱ्हाडीच्या दांड्या! तव चिमुकली मूर्ति असतां
करोनि तूं मोठी कृति दिपविसी सर्व जगता ।
कुठें दो हातांची तव तनु? कुठें ती कृति जिनें—
लया नेलीं जातीं निबिडतर विस्तीर्ण विपिनें ॥ २३५ ॥

वि० वा० भिडे,—जीवजागृति २०.

अरे कुऱ्हाडीच्या दांड्या! तुझा देह अगदीं लहान असून तूं जगाचे डोळे दिपविणारे पराक्रम करूं शकतोस! तुझा देह दोनच हात लांबीच्या प्रमाणाचा असून तूं प्रचंड अरण्यांचाही नाश करूं शकतोस!

येथें कुऱ्हाडीच्या दांड्याची बाहेरून स्तुति असून खरोखरीं निंदा केली आहे. हें "व्याजस्तुतीचें" उदाहरण

उदाहरण; वृत्त शिखरिणी

जलाच्या बिंदूनें सकल बुडवावी वसुमती,
तशी मातें वाटे तव कृतिहि आश्चर्यद अती ।
तुझी दो हाताची तनु शतपट स्थूल तरुला
लयाला नेतांना श्रम लवहि होतात न तुला! ॥ २३६ ॥

वि० वा० भिडे,—जीवजागृति. २०.

अरे कुऱ्हाडीच्या दांड्या, पाण्याच्या एका बिंदूनें सर्व पृथ्वी बुडवून टाकावी हें जसें आश्चर्यकारक, तसें तुझें कृत्य आश्चर्यकारक होय! दोन हात लांबीचा तुझा देह असून शंभरपट मोठा वृक्ष तोडतांना तुला मुळींच श्रम होत नाहींत! केवढा तुझा पराक्रम हा!

येथें कुऱ्हाडीच्या दांड्याची बाहेरून स्तुति असून वस्तुत. निंदा आहे. हें "व्याजस्तुतीचें" उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

सदसद्विवेक तुजला लवहि नसे, स्वर्ग पुण्यवंतास ।
गंगे! स्नानें देशी तैसा देशी समस्त पाप्यांस ॥ २३७ ॥

हे गंगे, तुला चांगल्यावाइटाचा भेद मुळींच कळत नाहीं! तुझ्या पाण्यांत नुसतें स्नान जरी केलें तरी तूं साधूंना स्वर्गास नेतेस, तसे पापी जनांनाही स्वर्गास नेतेस! केवढा हा तुझा मूर्खपणा!

येथें गंगेची बाह्यत: निंदा आहे. पण वस्तुतः तिचा मोक्षप्रदत्वाचा गुण स्तविला आहे. हें "व्याजस्तुतीचें उदाहरण."

उदाहरण, वृत्त आर्या.

कर्तव्यपर पित्यापरि अर्पी ब्रह्मा दरिद्रता स्वसुता ।
शोधुनि काढुनि पुरुषा विद्यास्वाचारशौर्यविनययुता ॥ २३८ ॥

आपल्या कन्येचें कल्याण चिंतिणारा बाप जशी तिला उत्तम वर पाहून त्याला अर्पण करतो, तसा ब्रह्मदेव दरिद्रता ह्या नावाची आपली मुलगी त्या वराला देतो कीं, जो विद्या, सदाचार, शौर्य, आणि नम्रपणा, ह्या गुणांनीं युक्त असतो!

येथें ब्रह्मदेवाची बाह्यात्कारीं स्तुति आहे, पण वास्तविक पाहातां निंदा आहे. कारण विद्यावंतांस, सदाचरणी माणसांस, शूरांस, आणि नम्र माणसांस, तो दारिद्र्यांत कुजत ठेवितो. हें व्याजस्तुतीचें उदाहरण.

उदाहरण; वृत्त आर्या.

सर्वांस सर्व देशी ही मिथ्यास्तुति तुझी महीपाला! ।
न परस्त्रियां दिलें त्वां वक्ष, न वा पृष्ठ तव विपक्षाला ॥ २३९ ॥

हे राजा, जो कोणी जें कांहीं तुजजवळ मागतो, तें तू त्याला देतोस ही तुझी स्तुति अयथार्थ आहे, तू परस्त्रियास तुझें वक्षःस्थल कधीं दिलें नाहींस, आणि शत्रूस पाठ दिली नाहींस!

येथें राजाचें बाह्यात्कारीं अदातृत्व निंदिलें आहे, पण वास्तविक त्याचें परस्त्रियाचे बाबतींत पावित्र्य, आणि रणांतील शौर्य स्तविलें आहे. हें "व्याजस्तुतीचें" उदाहरण.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**विजातीय पदार्थांचा " सह " शब्दें क्रियान्वय ।**
**" सहोक्ति " म्हणिजे जेव्हां तो असे चारुतामय ॥१४८॥**

भिन्न भिन्न जातींच्या दोन वस्तु एका क्रियापदाशीं " सह " ह्या शब्दानें जुळलेल्या असतात आणि ही जुळणी चमत्कृतिजनक असते, तेव्हां " सहोक्ति " हा अलंकार होतो

हेंच " सहोक्ति " अलकाराचें लक्षण वेगळया शब्दानीं सांगावयाचें झालें तर पुढील प्रमाणें सांगता येईल

लक्षण; वृत्त आर्या.

**शब्द सहार्थक योजुनि वस्तुद्वययुति विचित्र करिजेल–।**
**एकाच विधानें तर तेथ अलंकृति " सहोक्ति " म्हणिजेल॥१४९॥**

ज्या दोन वस्तूंचा संयोग एका विधानांत होणें संभवनीय वाटत नाहीं,त्या दोन वस्तूंचा संयोग विचित्र प्रकारें जर वक्त्यानें "सह" ह्या, किंवा "सह" ह्याच अर्थाच्या अन्य काहीं शब्दांनीं करून दाखविला असला, तर " सहोक्ति " हा अलंकार होतो.

" सहोक्ति " अलंकारांत दोन वस्तूंचा संयोग कोणाच्याही मनांत सहजा सहजीं येण्याजोगा नसतो. म्हणून तसा संयोग वक्त्यानें करून दाखविला असतां तो चमत्कृतिजनक होतो, हें " सहोक्ति " ह्या अलंकाराचें बीज आहे.

लक्षण; वृत्त आर्या

**सह, सहित, सवें, संगें, आणि, असे शब्द अन्यही येती–।**
**हींत विजातीयांच्या जुळणींत, विचित्रता भरे चेतीं॥१५०॥**

"सहोक्ति" अलंकारांत सह, सहित, सवें, संगें, आणि ,आणि ह्याच अर्थाचे इतर शब्द विजातीय पदार्थांची सांगड घालून देताना योजले जातात; ह्याच्या योगानें ही विचित्र तऱ्हेची सांगड चित्तांत भरते.

उदाहरण; वृत्त स्वागता

अध्वखेदसहिता रजनी ते जाय; पर्णमृदुला अवनीतें–।
सोडुनी मुनि कुमारकयुक्त कर्म आन्हिक करी अभियुक्त ॥ २४० ॥

वि०वा० भिडे,–रा० प०,सर्ग २, पद्य ५८

प्रवासाच्या श्रमासह ती रात्र संपली. पानें आथरून मऊ केलेल्या जमीनीवरून तो ऋषि प्रातःकाळीं राम लक्ष्मण ह्या दोन मुलांसह उठून प्रातःकाळचे विधि आटोपता झाला.

येथें अध्वखेदासह रजनी गेली असें वर्णन आहे हें ''सहोक्तीचें'' उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

मजसि कीर्तिसवें मिळवा द्रुत त्रिभुवना बल दावुनि अद्भुत ।
दशमुखासह युद्ध तुम्हांप्रती नाचि गमेल कधीं अफलायति ॥२४१॥

वि० वा० भिडे,– रा० प०, सर्ग १७, पद्य ११४.

सीता मारुतीच्या मुखानें रामाला निरोप पाठवीत आहे तिन्ही लोकांना आपले सामर्थ्य दाखवून मला कीर्तीसह मिळवा, म्ह० रावणाच्या तावडींतून मला सोडवा, म्हणजे त्रैलोक्यांत तुमचें यश भरेल रावणाबरोबर युद्ध करणें हें तुम्हाला निष्फळ ( अफलायति ) वाटणार नाहीं।

येथें मी आणि कीर्ति, ह्या दोन वस्तु चमत्कारिक रीतीनें "सवें" ह्या शब्दानें अन्वित केल्या आहेत. हें "सहोक्तीचें" उदाहरण.

उदाहरण, वृत्त सवाई.

पुनरपि तो वदला तिज यापरि ठेवुनि मस्तक तच्चरणीं,
मम असु जातिल मत्तनयासह, हर्ष कसा तुज मन्मरणीं ? ।

वचन तुझें अति दारुण जाळुन गात्र मदीय असूंस हरी,
मजवरि कोप नको दयिते! करूं, दाव दया मज अल्प तरी ॥२४२॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ५, पद्य २९.

कैकेयीच्या पायावर डोकें ठेवून पुन्हा दशरथ तिला ह्मणाला, "माझे प्राण माझ्या मुलाबरोबर मला सोडून जातील इ०"

येथें "मत्तनयासह मम असु जातील" ह्या शब्दांत "सहोक्ति" अलंकार आहे.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

निघे लक्ष्मण साकेतप्रमोदासह कानना ।
पुरत्याग करी त्याच्या न नष्टद्युति आनना ॥ २४३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ५, पद्य ८७.

अयोध्येच्या आनंदासह लक्षण अरण्याकडे जावयास निघाला, नगरींतून बाहेर पडावें लागत आहे म्हणून त्याच्या मुखावर खिन्नतेची छटा दिसत नव्हती !

येथें "सह" हा शब्द येऊन "सहोक्ति" हा अलंकार झाला आहे.

लक्षण; वृत्त रथोद्धता

**ती न वस्तु इजवीण शोभन, ती हिचेविण नसे अशोभन ।**
**ती हिचेविणहि वस्तु शोभन, ही "विनोक्ति" गणितात सज्जन॥१५१॥**
**शब्द येतिल विना, विनार्थक, कीं असत्त्वविफलत्वबोधक ।**
**तेथही गणिति ही अलंकृति, सर्वथा जर फळे चमत्कृति ॥ १५२॥**

दोन वस्तूंपैकीं ती वस्तु हिच्या वाचून शोभत नाहीं, किंवा ती वस्तु हिच्या वांचून अशोभन होत नाहीं, किंवा ती वस्तु हिच्या वाचूनही शोभन होते, असें जेथें विधान असतें, तेथें "विनोक्ति" हा अलंकार होतो. ह्या विधानांत "विना" हा शब्द किंवा "विना" ह्या अर्थाचा दुसरा कोणताही शब्द आला, किंवा एखाद्या वस्तूची अविद्यमानता ( असत्त्व ह्म० नसणें ) किंवा विफलता ( व्यर्थपणा किं० निरुपयोगीपणा ) सांगणारा शब्द आला, तरी हाच अलंकार असतो

ह्या सर्व प्रकारांचीं क्रमानें उदाहरणें देतों

उदाहरण, वृत्त वंशस्थ.

न लक्ष्मणावांचुनि राम, लक्ष्मण द्युती न रामाविण पावला क्षण ।
वसंत कामाविण नैव शोभतो, न वा वसंताविण जेंवि काम तो ॥ २४४ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ७४.

लक्ष्मणावांचून राम एक क्षणही शोभला नाहीं, आणि रामावाचून लक्ष्मणही एक क्षणही शोभला नाहीं, मदनाशिवाय वसंतऋतु शोभत नाहीं, आणि वसंतऋतूवांचून मदनही शोभत नाहीं त्याप्रमाणें.

येथें पद्याच्या दोन्ही अर्धांत एक एक विनोक्ति आहे.

उदाहरण, वृत्त आर्या

अन्योन्यासह तैसे अन्योन्याविणहि एकले सतत ।
हे शोभले गुणें, रिपुवीर्ये वीर्यी न जाहले प्रहत ॥ २४५ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य १२

शिवाजी, तानाजी, एसाजी, आणि बाजी, हे चार मराठे वीर एकमेकांबरोबर सहकार्य करून जसे आपल्या गुणानें शोभत असत, तसेच ते एकएकटेही शोभत असत; शत्रूच्या वीर्यापुढें त्यांचें वीर्य कमी पडलें नाहीं!

एकमेकांवाचूनही हे चवघे वीर एकएकटे शोभत असत ही " विनोक्ति "आहे.

उदाहरण, वृत्त आर्या.

साहसशौर्यादि गुणांविण शोभेनाचि कुशलही शस्त्री ।
कुंकुमातिलकावांचुनि सुंदरही शोभते कधीं न स्त्री ॥ २४६ ॥

शस्त्र धारण करणारा योद्धा शस्त्र वापरण्यांत कितीही पटाईत असला तरी धाडस, शौर्य, इत्यादि गुण त्याच्या अंगीं असल्याशिवाय तो शोभत नाहीं!

स्त्री कितीही सुंदर असली तरी तिच्या कपाळावर कुंकू नसलें ती तर शोभत नाहीं!

ह्या आर्येच्या दोन्ही अर्धांत एक एक "विनोक्ति" आहे.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ

प्रजावत्सलतेवीण न महीपाल शोभतो ।
जरीही असला लक्ष्मीशौर्यवीर्यादियुक्त तो ॥ २४७ ॥

संपत्ति, शौर्य, वीर्य, इत्यादि गुण राजाच्या ठायीं असले तरी प्रजाजनाविषयीं त्याच्या अंगीं वात्सल्य नसल्यास तो शोभत नाहीं!

हे "विनोक्तीचें" उदाहरण.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

छत्रचामर ह्या चिन्हाविनाही भूप शोभतो ।
सम जो बुद्धिनें सर्व प्रजेशीं नित्य वागतो ॥ २४८ ॥

प्रजाजनांपैकीं सर्वांशीं निःपक्षपाती बुद्धीनें राजाचें वर्तन असलें तर तो शोभतो,—जरी छत्र, चामर, इ० राजचिन्हें त्याचेजवळ नसलीं तरी!

हें "विनोक्तीचें" उदाहरण

उदाहरण, वृत्त आर्या

नसता पटल घनांचें विलसे रजनीश रम्य शोभेनें ।
रहित अहंकारेंसा पंडित भूपतिसभेंत विद्येनें ॥ २४९ ॥

अहंपणा ज्याचे अंगीं नाहीं असा पंडित राजाच्या सभेंत विद्वत्तेनें शोभतो, तसा आकाशांत मेघांचें पटल नसतां चंद्र शोभतो!

येथें "विनोक्ति" हा अलंकार आहे

लक्षण; वृत्त आर्या

**"परिवृत्ति" परा देणें कांहीं घेणें तयाकडुन दुसरें।**
**व्यवहारांत नसे तें विनिमयमाधुर्य येथ हृदयिं भरे ॥१५३॥**
**परिवृत्तिचे असति जे ते दोन्ही घ्या प्रकार समजोन ।**
**समसमविनिमय पहिला, विषमविनिमय प्रकार, हे दोन ॥१५४॥**

एकानें एक वस्तु दुसऱ्यास दिली, आणि त्याच्यापासून त्या वस्तूच्या मोबदला कांहीं वस्तु घेतली, असें वर्णन केलेलें असल्यास "परिवृत्ति" हा अलंकार होतो. सामान्य व्यवहारात मोबदला केला जातो, त्यांत कांहीं माधुर्य नसतें, परंतु कवीनें वर्णिलेल्या मोबदल्यांत कांहीं चमत्कृति असते, ती अंतःकरणाला आल्हाद देणारी असते. ह्या परिवृत्ति अलंकाराचे जे दोन प्रकार होतात, ते विद्यार्थ्यानें समजून घ्यावे. जेव्हां दोन समान योग्यतेच्या म्हणजे बरोबरीच्या वस्तूंची अदलाबदल वर्णिलेली असते, तेव्हां एक प्रकार होतो. कमी अधिक योग्यतेच्या वस्तूंची अदलाबदल वर्णिलेली असते तेव्हा दुसरा प्रकार होतो.

उदाहरण, वृत्त वंशस्थ.

सुमाढ्यवल्लीविटपां प्रभंजन प्रकंप देऊनि हरी रजोधन ।
रजोधनातें पसरूनि भूवरी जनास आनंदितमानसां करी ॥ २५० ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २, पद्य २०.

फुलांनीं संपन्न अशा वेलींच्या शाखांना वायु प्रकंप देऊन त्यांचा पराग हरण करीत होता, आणि हें परागरूपी धन भूतलावर इतस्ततः पसरून तो लोकांच्या मनाला आनंद देत होता !

येथें वेलींना प्रकंप देणें आणि त्यांच्यापासून रजोधन घेणें ही "परिवृत्ति" आहे. येथें समसमांचा मोबदला वर्णिला आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

गुरु शिष्यास दे विद्या त्याची घेई कृतज्ञता ।
जगीं ऐसा विनिमय अन्य श्रेष्ठ न पाहतां ॥ २५१ ॥

गुरु शिष्याला विद्या देतो आणि त्याची कृतज्ञता घेतो खरा विचार केला असतां ह्याच्या सारखा दुसरा कोणताही उत्कृष्ट मोबदला जगांत दिसत नाहीं !

येथें दोन उत्तम वस्तूचा मोबदला वर्णिला आहे.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

कररूपें धनें धान्यें प्रजेचीं किम्प्रभू हरी ।
त्यांस कारागृह, क्लेश, दे अन्याय परोपरी ॥ २५२ ॥

वाईट राजा प्रजाजनांचीं धनें आणि धान्यें घेतो आणि त्यांना तुरुंग, क्लेश, आणि अन्याय हीं मोबदला म्हणून देतो !

येथें धनें आणि धान्यें ह्या उत्तम वस्तु घेऊन त्याच्या मोबदला कारागृह इत्यादि अधम वस्तु देणें हा "परिवृत्ति" अलंकाराचा दुसरा प्रकार.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**होणारी जाहलेली वा वस्तु अद्भुत ही इथें ।**
**उभी प्रत्यक्ष ही उक्ति असे "भाविक" हो तिथें ॥१५५॥**

पुढें होणारी किंवा पूर्वी झालेली एकादी अद्भुत गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यापुढें दिसत

आहे अशा अर्थाचें जें वर्णन त्याला "भाविक" असें म्हणतात. हें वर्णन करतांना वक्त्याच्या मनाची कांहीं विशिष्ट वृत्ति असावी लागते. ती पुढील लक्षणपद्यांत दिली आहे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

> विषण्ण हृष्ट वा शांत चित्तें स्थिति कवी जिथें-।
> वर्णी आगामि गत वा असे "भाविक" हो! तिथें ॥ १५६ ॥

पुढें येणाऱ्या (आगामि) काळची किंवा गतकाळची (गत) स्थिति खिन्न, आनंदित, किंवा शांत अंतःकरणानें जेथें कवि वर्णितो तेथें "भाविक" हा अलंकार होतो.

स्वभावोक्तीमध्यें सद्य:स्थितीचें हुबेहुब वर्णन केलेलें असतें. भाविकामध्यें गतकाळचें किंवा भविष्यत् काळचें चित्र रेखाटलेलें असतें. हें चित्र रेखाटतांना कवि खेद, किंवा हर्ष, किंवा समाधान, ह्या भावनांनीं प्रेरित झालेला असतो स्वभावोक्तीमध्यें हुबेहुब वर्णन करणें हा कवीचा उद्देश असतो. अंतःकरणाच्या उत्कट अशा खिन्न, आनंदित, किंवा समाहित वृत्तीनें भाविकांतील उद्गार प्रेरिलेला असतो.

स्वभावोक्ति हा अलंकार जसा अनेकवाक्यात्मक असूं शकतो, तसा भाविक अलंकारही असूं शकतो.

भाविकाचें हें रूप मम्मटाच्या लक्षणाशीं विसंगत नाहीं.

उदाहरण, वृत्त आर्या.

> तव गुण ईशकृपेनें फळले दिसतात मम दृशांना या ।
> तुज राजचिन्हवैभवयुत मी आजचि बघें शिवा! राया! ॥ २५३ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य २०४.

बाल शिवाजीला तिप्पाभट वैष्णव म्हणतो:—

हे शिवराया, तुझ्या अंगचे गुण देवाच्या दयेनें फळास आलेले ह्या माझ्या नेत्रांस दिसत आहेत! छत्र, चामर, इत्यादि राजत्वाच्या वैभवाच्या लक्षणांनीं अलंकृत झालेल्या तुला मी आजच दृष्टीसमोर पाहात आहे!

येथें शिवाजी पुढें कसा दिसेल ह्याचें वर्णन आहे म्हणून हें "भाविक" होय. हें भाविक हर्षानें प्रेरित झालेल्या तिप्पाभटानें रेखाटलेलें चित्र आहे.

उदाहरण; वृत्त प्रमिताक्षरा.

> मुख गोड तें चिमुकलें मजला-
> दिसतें, रदावलिहि ती धवला ।
> शिरिं केशही विखुरले दिसती,
> तव मूर्ति ह्या क्षणिं उभी पुढती! ॥ २५४ ॥

तुझी लहानपणची ती मनोहर मूर्ति आतां माझ्या डोळ्यांपुढें उभी आहे,— तुझें लहान आणि गोजिरवाणें तोंड ते पांढरे शुभ्र दांत, डोक्यावर विसकटलेले ते केश, ह्यांहींकरून शोभणारें तुझें रूप ह्या क्षणीं मी पाहात आहें!

येथें गतकाळचा एक मनोहर देखावा दृष्टीपुढें उभा केला आहे. हें " भाविकाचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

कुंकुमतिलकाचि भालीं, मंगलसूत्रचि गळ्यांत, वलयेंची—।
करिं तव पत्नीच्या मी, बघतों तुज मग्न दीन रे! पेंचीं ॥२५५॥

दारूच्या व्यसनाला लागलेल्या एका माणसास त्याचा मित्र म्हणतोः—

तुझ्या बायकोचे सर्व दागिने नाहींसे होऊन तिच्या कपाळीं फक्त कुंकू, गळ्यांत फक्त मंगळसूत्र, आणि हातांत फक्त बांगड्याच उरल्या आहेत, आणि तूं भयंकर पेचांत दीन होत्साता पडला आहेस, असा देखावा मला दिसत आहे !

हा उद्गार मित्रानें दुःखानें काढिलेला आहे.

हें भाविकाचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**पदार्थ किंवा वाक्यार्थ उक्तिचा हेतु होतसे—।**
**अप्रत्यक्ष, तिथें जाणा "काव्यलिंग" असे असें ॥ १५७ ॥**

कर्ता, कर्म, क्रियापद, इत्यादि जीं वाक्याचीं अंगें, तीं सर्व विद्यमान असल्यास वाक्य होतें. ह्या अंगापैकीं एकादेंच जें अंग, त्याला वाक्य ही संज्ञा लाविता येत नाहीं तें वाक्याचें एक अंग असून त्याला " पद " ही संज्ञा लावितात हें पद सामासिक शब्दाच्या रूपांतही असू शकेल. " ही बातमी शहरांत वायूच्या वेगानें पसरली " हें वाक्य असून त्यात ही, बातमी, शहरांत, वायूच्या, वेगानें, पसरली, अशीं सहा पदें आहेत. " वायुवेगानें " असें आपण म्हटलें तर तें एकच पद होतें, आणि "ही बातमी शहरात वायुवेगानें पसरली, " हें वाक्य असून त्यांत पांचच पदें होतात. वरील लक्षणांतील " पदार्थ " ह्या सामासिक शब्दांत " पद " हा शब्द वरील अर्थानें योजण्यांत आला आहे

जेव्हां एखाद्या वाक्यांतील एका पदाच्या अर्थांत, किंवा वाक्य नसलेल्या अनेक पदांच्या अर्थांत, त्या वाक्यांतील विधानाचें कारण भरलेलें असतें, तेव्हां " काव्यलिंग " अलंकार होतो

तसेंच जेव्हां एकाद्या वाक्याच्या अर्थांत पुढील विधानाचें कारण भरलेलें असतें, तेव्हांही " काव्यलिंग " हा अलंकार होतो. पहिल्या प्रकाराला " पदार्थ काव्यलिंग ( क ) " म्हणतात, आणि दुसऱ्या प्रकाराला " वाक्यार्थ काव्यलिंग ( ख ) " म्हणतात.

"काव्यलिंग" ह्या अलंकारात जो हेतु असतो, तो मुख्य वाक्याशीं " म्हणून," " ज्या अर्थी, " " त्या अर्थी, " अथवा पंचम्यंत किंवा तृतीयान्त पदांनीं जोडलेला असतां कामा नये, तसा असल्यास तें धोपटमार्गी वाक्य होऊन त्यांतील चारुता नष्ट होते, आणि म्हणून तो अलंकार होऊं शकत नाहीं.

उदाहरण, वृत्त आर्या.

शुचिगुण हिंदूचें शिरिं हतगुण यवनास बसविणारास ।
कवण स्तवील ? त्याचा होइल वित्तार्थ कवण वा दास ? ॥२५६॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ७६.

[ शुचिगुण ह्म० निष्कलंक आहेत गुण ज्यांचे असे ( हिंदू ). हतगुण ह्म० कोणतेही चांगले गुण नाहींत ज्यांचे ठायीं असे ( यवन ). ]

नीतिमान् अशा हिंदू माणसाच्या डोक्यावर अनीतिमान् मुसलमानास जो बसवितो, त्या राजाला ( म्ह० अवरंगझेबाला ) कोण प्रशंसील ? किंवा पैशाच्या लोभानें त्याची नोकरी कोण पत्करील ? कोणी नाहीं !

येथें " बसविणारास " हें पद आहे, वाक्य नाहीं. ह्या पदांत "कवण स्तवील?" म्हणजे कोणी स्तविणार नाहीं ह्या विधानाचें कारण भरलें आहे. हें " पदार्थ काव्य-लिंगाचें " म्हणजे काव्यलिंगाच्या ( क ) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त आर्या.

अवरंगातें निंदिसि, त्याची आज्ञा विलंघिसी धृष्ट ।
मृत्युच दण्ड असे ह्या तव अपराधद्वयास उत्कृष्ट ॥ २५७ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ९०.

अरे शिवाजी, तू धीटाईनें अवरंगजेबाला निंदितोस, आणि त्याचा हुकूम उल्लंघितोस, ह्या तुझ्या दोन अपराधांना मरण हीच उत्तम शिक्षा होय !

येथें " तूं अवरंगातें निंदिसी " हें एक वाक्य, आणि " तू त्याची आज्ञा विलंघिसी " हें दुसरें वाक्य ह्या दोन वाक्यांतील मजकुरांवरून " अपराधद्वय " कसें होत आहे तें आपणास कळत आहे. निंदा आणि विलंघन ह्या दोन वस्तु अपराध-द्वयाच्या घटक आहेत, आणि हे घटक वाक्यांच्या रूपांत आहेत म्हणजे वरील दोन वाक्यांचे अर्थ हे " अपराधद्वय " ह्या कार्याचे घटक आहेत. हे घटक " अपराध-द्वय " ह्या शब्दाची सार्थकता स्थापित करीत आहेत. ह्या दृष्टीनें वरील दोन वाक्यांचे अर्थ हे " अपराधद्वय " ह्या कार्याचीं कारणें होत, आणि हीं कारणें तृतीया, पंचमी, इत्यादि विभक्तींनीं, किंवा " ज्या अर्थी, " " त्या अर्थी, " " म्हणून, " इत्यादि शब्दांनीं कथित नाहींत, म्हणून हा " काव्यलिंग " अलंकार होय. हा " काव्यलिंगाचा ( ख ) " प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या.

न्याय न, नीति न, धर्मस्वातंत्र्य न, ह्या वरंगराज्यांत ।
धनजीवितां न रक्षण, तें केंवि टिकेल हिंददेशांत ? ॥ २५८ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ६९.

[ वरंग ह्म० अवरजेब. ह्याच अर्थी आम्ही " अवरंग " हा शब्द वर उदाहरण पद्य २५७ मध्यें योजिला आहे ]

ह्या अवरंगजेबाच्या राज्यांत न्याय, नीति, इत्यादि कांहींच नाहीं तें राज्य हिंदुस्तानांत कसें टिकेल ?

येथें राज्य न टिकण्याचीं कारणें न्याय, नीति, इत्यादींचा अभाव, हीं सांगितलीं आहेत परंतु "म्हणून," "त्या अर्थी," इत्यादि शब्दांनीं तीं दर्शविलीं नाहींत.

ही आर्या "काव्यलिंगाच्या (ख)" ह्या प्रकाराचें उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या.

> हिंदूंच्या धर्मास न रक्षण, विद्येस न स्तुति, गुणास–।
> बढती न, कलेस न धन, तो दे,तो कंवि हो प्रिय अम्हांस? ॥२५९॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ७०.

ह्या अवरंगजेबाच्या राज्यांत हिंदूधर्माला रक्षण तो देत नाहीं, विद्येला स्तुति तो देत नाहीं, गुणाला बढती तो देत नाहीं, कलेला बक्षीस तो देत नाहीं.तो अवरंगजेब आम्हा हिंदूंना कसा आवडेल ?

येथें तो हिंदूंना न आवडण्याचीं कारणें पूर्वींच्या वाक्यांत कथित आहेत. "म्हणून," "त्या अर्थी," इत्यादि कार्यकारणभाव दाखविणारे शब्द येथें आले नाहींत. हें "काव्यलिंगाच्या (ख)" ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

> **गम्यार्थ मात्र सांगोनी वक्ता वाच्यार्थ जाणवी ।**
> **तो अलंकार जो त्यातें "पर्यायोक्त" म्हणे कवी ॥१५८॥**

वाक्यांत योजलेल्या शब्दांपासून जो अर्थ निघतो, तो त्या वाक्याचा "वाच्यार्थ." ह्या वाच्यार्थाहून अधिक अर्थ जो श्रोत्याच्या प्रतीतीस येतो, तो त्या वाक्याचा "गम्यार्थ" होय

जेथें वाच्यार्थ सांगावयाचा तो न सांगतां गम्यार्थ सांगितलेला असतो, आणि गम्यार्थावरून वाच्यार्थाचा बोध करून दिलेला असतो, तेथें "पर्यायोक्त" हा अलंकार होतो.

"पर्याय" म्हणजे वेगळा प्रकार; "उक्त" म्हणजे भाषण, कथन, किंवा वर्णन. वर्ण्य वस्तु प्रत्यक्षपणें न सांगतां वेगळ्या प्रकारानें म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें सांगितली असते, म्हणून ह्या अलंकाराला "पर्यायोक्त" हें नांव देण्यांत आलेलें आहे.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित

> शर भरोत सुखें तुमचे पितां खलदशास्यतनूगतशोणिता ।
> निशिगनाथवधूनिटिलस्थिततिलकमार्जन हो अविलंबित ॥ २६० ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य ८.

सीता मारुतीच्या मुखानें रामाला निरोप पाठवीत आहे.

दुष्ट रावणाच्या शरीराचें रक्त पितांना तुमचे बाण आनंद पावोत ! रावणाच्या नायकांच्या कपाळांवरील कुंकू लवकरच पुसलें जाओ !

येथें रावणाला तुम्हीं ठार मारा असें न म्हणतां रावणाच्या शरीरातील रक्त तुमचें बाण पिओत, आणि रावणाच्या बायकांचें कुंकूं पुसलें जाओ, असें पर्यायानें म्हटलें आहे. ह्या दोन्हीं कारणांनीं येथें "पर्यायोक्त" हा अलंकार झाला आहे

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**"उदात्त" म्हणिजे थोर समृद्धीचें निवेदन ।**
**वीराचें वा उपांगत्वें प्रस्तुतार्थांत वर्णन ॥ १५९ ॥**

एकाद्या वस्तूच्या वैभवाचें किंवा ऐश्वर्याचें कथन केलेलें असल्यास तेथें "उदात्त" हा अलंकार होतो (क). तसेंच एकाद्या वस्तूच्या वर्णनांत एकाद्या थोर पुरुषाचें वर्णन गौण रीतीनें होत असल्यास तेथेंही "उदात्त" हा अलंकार होतो (ख)

टीप,—"स्वभावोक्ति" आणि "भाविक," ह्या अलंकारांत वस्तूचें हुबेहूब वर्णन असतें, आणि त्यात अतिशयोक्ति नसते "उदात्त" ह्या अलंकाराच्या पहिल्या प्रकारात वस्तूचें अलौकिक वैभव किंवा समृद्धि ह्यांचें वर्णन असतें. "स्वभावोक्ति" आणि "भाविक" ह्यात अतिशयोक्ति बाधक असते उदात्ताच्या पहिल्या प्रकारात अतिशयोक्ति असल्यास ती चारुतेला पोषक होते

उदाहरण, वृत्त विबुधप्रिया

हें सभालय दीर्घविस्तर, उंच, सुंदर, निर्मल,
शाणघृष्टविभाढ्यहीरकबद्ध येथिल भूतल ।
कौशिकावररम्य येथ वितान चित्रविचित्रित,
स्तंभ येथिल शुभ्रमौक्तिकहीरकावलिशोभित ॥ २६१ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १८, पद्य २.

हें रावणाच्या सभागृहाचें वर्णन आहे

हें सभागृह अतिशय विस्तीर्ण होतें. तें उंच, सुंदर, आणि स्वच्छ होतें. सहाणेवर घालून पैलू पाडण्यामुळें देदीप्यमान अशा हिऱ्यांची ह्या सभागृहाला फरसबंदी केलेली होती. ह्या सभागृहाला रेशमाच्या कापडाचें आणि हरतऱ्हेच्या वेलबुट्ट्यांनीं सुशोभित केलेलें छत होतें ह्या सभागृहाच्या खांबांवर चकचकीत मोतीं आणि हिरे ह्यांच्या माळा लोंबत सोडलेल्या होत्या !

हें पद्य "उदात्त" अलंकाराच्या पहिल्या म्हणजे (क) ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त भुजंगप्रयात.

पहा उंच विस्तीर्ण हा वृक्ष देवि ! जटायू जया आश्रयालागिं सेवी ।
तुझ्या रक्षणीं जाहला तो गतायु रणा मांडितां रावणाशीं जटायु ॥२६२॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २१, पद्य ८१.

विमानांत बसून सीतेसहवर्तमान राम अयोध्येस परत येत असता तो तिला विविध स्थळें दाखवीत आहे त्या वर्णनांतील हें पद्य आहे.

हे सीते, तोच हा विस्तीर्ण आणि उच्च वटवृक्ष,–ज्यावर जटायु रहात असे आणि तो जटायु तुला सोडविण्यासाठीं रावणाशीं लढतां लढतां मरण पावला !

येथें वटवृक्षाचें वर्णन प्रस्तुत असून जटायूचें वर्णन उपांगत्वानें केलेलें आहे. हा " उदात्त " अलंकाराचा दुसरा म्हणजे ( ख ) हा प्रकार होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**समानशक्तिचीं सारीं समकालीन कारणें– ।**
**करितीं कार्य ही उक्ति " समुच्चय " कवी म्हणे ॥१६०॥**
**शेतामध्यें जसें कीजे पक्ष्यांनीं धान्यभक्षण ।**
**तसें येथें समत्वानें असे प्रत्येक कारण ॥ १६१ ॥**

जेव्हां एकादें कार्य घडवून आणावयाला समर्थ असें एक कारण विद्यमान असतां दुसरीं तितकींच समर्थ कारणेंही त्या स्थळीं आणि त्या वेळीं उपस्थित झालीं आहेत असें वर्णन असतें, तेव्हां " समुच्चय " हा अलंकार होतो.

शेतांतील धान्य खावयाला आलेल्या पक्ष्यापैकीं प्रत्येक पक्षी तितकेंच धान्य खातो, कोणी अधिक खात नाहीं किंवा कोणी कमी खात नाहीं. धान्य खाण्याचे बाबतींत सर्व पक्ष्यांचें सारखेंच सामर्थ्य असतें त्याप्रमाणें " समुच्चय " अलंकारांत कार्य घडवून आणणारीं कारणें सारीं सारख्याच सामर्थ्याचीं असतात.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्, युग्म

जन्म उच्च कुलीं, बुद्धि प्रौढ अध्ययनें तव, ।
मूर्ति रम्य, पद श्रेष्ठ, साध्य ऐहिक वैभव ॥
हीं सामान्य नरा नेतीं मदोद्धतपथाकडे ।
परी त्यांच्याच योगानें तुला शालीनता जडे ॥ २६३ ॥

एका वैभवशाली माणसाला उद्देशून हे श्लोक म्हटले आहेत.

उच्च कुळांत जन्म, अध्ययनानें प्रौढ झालेली बुद्धि, सुंदर रूप, उच्च पद, आणि सर्व ऐहिक वैभवाची प्राप्ति, हीं साधारण माणसाला उन्मादाच्या मार्गाकडे नेतात. परंतु त्यांच्याच योगानें तूं विनयशील झाला आहेस !

येथें उच्च कुलांत जन्म, प्रौढ बुद्धि, इत्यादि गोष्टी एकैकशः उन्माद करणाऱ्या असतां इतर गोष्टी त्याच्या जोडीला आहेत असें वर्णन आहे. हा " समुच्चयाचा ( क ) " प्रकार

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

खाया न भाकर शिळी, ल्याया वस्त्र न फाटकें ।
जाया न सांत्वना, सौख्य राया ! मी न लहों शकें ॥ २६४ ॥

हे राजा, मला खावयाला शिळी भाकरी नाहीं, ल्यावयाला फाटकें वस्त्र नाहीं, सांत्वन करावयाला बायको नाहीं ! मी सुख कसें मिळवावें ?

येथें सांगितलेल्या तीन गोष्टींपैकीं एक एक गोष्ट ही असुख उत्पन्न करणारी

असतां त्या सर्व गोष्टी एकवटल्याचें वर्णन आहे. हेंही " समुच्चयाचें " उदाहरण होय.

टीप—ह्या उदाहरणपद्यात " असयुतावृत्ति यमक " आहे. मागें पान २६ पहा.

उदाहरण वृत्त आर्या

प्रभुनें केली सत्कृति तीनें तो तोषला अतिथि फार !
त्यांत तयाचें दिसलें शास्त्रीं पाटव, समुन्नत विचार ।। २६५ ।।

एका राजानें कोण्या एका विद्वान् पाहुण्याचा सत्कार केला. त्याच्या योगानें तो पाहुणा संतोष पावला तशात त्या राजाचें शास्त्रात नैपुण्य आणि उदार विचार हीं त्याला दिसून आलीं !

येथें तो अतिथि राजानें केलेल्या सत्कारानें संतुष्ट झाला, आणि त्या संतोषांत राजाची विद्वत्ता आणि उदार विचार ह्यांनीं भर घातली असें वर्णन आहे. हा " समुच्चयाचा ( क ) " प्रकार.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**गुण दोन, क्रिया दोन, कीं क्रिया गुण हें द्वय ।**
**यौगपद्यचमत्कार दावितांही " समुच्चय " ।।१६२ ।।**

जेव्हा दोन गुण, किंवा दोन क्रिया, किंवा एक क्रिया आणि एक गुण, ह्यांचा चमत्कारिक रीतीनें एकदम प्रादुर्भाव झाल्याचें वर्णन असतें, तेव्हां " समुच्चयाचे " ( ख ), ( ग ), आणि ( घ ) असे प्रकार होतात. यौगपद्य म्ह० एकदम उपस्थिति किं० समकालिनता.

उदाहरण; वृत्त आर्या

तव सेना रिपुचें बल मर्दुनि झाली यशोविभाशाली ।
रिपुपक्षीयांचींही लज्जायोगें मुखें मलिन झालीं ।। २६६ ।।

तुझें सैन्य शत्रूच्या सैन्याचा पराभव करून यशाच्या कांतीनें शोभतें झालें. शत्रूच्या पक्षाच्या लोकांचीं तोंडें लाजेनें काळीं ठिक्कर झालीं !

येथें " यशोविभाशाली " आणि " मलिन ", ह्या दोन गुणांचें यौगपद्य वर्णिलें आहे हा " समुच्चयाचा ( ख )" हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

तानाजीचा असि नाभिं वेगें विद्युल्लतोपम स्फुरला ।
रणपटुतादर्प गळुनि भयकंपितकर हुसेन घाबरला ।। २६७ ।।

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ११४.

तानाजीची तरवार विद्युल्लतेप्रमाणें आकाशांत स्फुरली, आणि त्याच क्षणीं हुसेन लढवय्येगिरीचा गर्व ओसरून हात कांपूं लागून घाबरला !

येथें " स्फुरणें " आणि " घाबरणें, " ह्या दोन क्रियांचें यौगपद्य वर्णिलें आहे. हा " समुच्चयाचा ( ग ) " हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

त्वां धरिला असि हातीं नव रिपु झाले भयप्रहतकाय।
त्वद्विक्रमप्रतीतिप्रत्यय याहुनि दुजा वदूं काय ?॥२६८॥

वि० वा० भिडे,-कमळीची सुटका, पद्य १९३.

तू आपल्या हातांत तलवार घेतलीस, आणि तुझ्या शत्रूंचीं शरीरें भयानें कांपूं लागलीं. तुझ्या पराक्रमाच्या जाणिवेचा पुरावा मी दुसरा काय सांगूं ?

येथें " धरणें " ही क्रिया, आणि " भयप्रहतकाय " हा गुण, यांचें यौगपद्य वर्णिलें आहे " समुच्चयाच्या " चवथ्या प्रकाराच्या ह्य० ( घ ) ह्या प्रकाराचें हें उदाहरण होय.

वरील आर्येंत " झालें " हें क्रियापद क्रिया दाखवीत नाहीं, तर तें " रिपु " ह्या उद्देश्याला " प्रहतकाय " हें विधेय जोडणारा साधा आहे.

लक्षण; वृत्त आर्या

**स्थल एक त्यजुनि दुजें, त्यजुनि दुजें मग तिजें स्ववासास।**
**स्वीकरि वस्तु असा क्रम असतां "पर्याय" कवि म्हणे त्यास ॥१६३॥**

जेव्हां एकादी वस्तु आपल्या राहण्याची पहिली जागा सोडून दुसऱ्या जागीं जाऊन राहाते, नंतर ही दुसरी जागा सोडून तिसऱ्या जागीं जाऊन राहाते, अशा प्रकारचें वर्णन असतें, तेव्हां " पर्याय " नामक अलंकार होतो. हा पर्यायाचा ( क ) हा प्रकार. स्ववास म्ह० आपलें वास्तव्य म्ह० राहणें

लक्षण, वृत्त आर्या

**एका स्थळींच वस्तू एकामागोनि एक येतात।**
**ऐसा क्रम असला तर "पर्याय" असेंच त्यास म्हणतात ॥१६४॥**

एकाच स्थळीं अनेक वस्तु एकामागून एक अशा येत आहेत असें वर्णन असतें, तेव्हां " पर्यायाचा ( ख ) " हा प्रकार होतो.

उदाहरण; वृत्त कलहंस

बघ इंद्रजानु कपि हा पृथुकाय, तुज देइ विस्मय न तज्जव काय ?।
गिरिच्या पदास, कटकास, शिरास, क्षणिं तो क्रमें करि जवें स्वनिवास ॥२६९॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १४, पद्य ८०.

ठिकठिकाणचे ऋक्ष आणि वानर किष्किंधा नगरीस येत होते, त्यांपैकीं इंद्रजानु हा वानर रामाला दाखवून सुग्रीव म्हणतो—

हा पहा धिप्पाड शरीराचा वानर इंद्रजानु ! त्याचा वेग पाहून तुला आश्चर्य वाटत नाहीं काय ? तो क्रमानें प्रथम पर्वताच्या पायथ्यास, मग मध्यास, आणि मग शिखरास, आपलें निवासस्थान एका क्षणांत करतो !

येथें इंद्रजानु हा प्रथम पर्वताच्या पायथ्यास, मग मध्यास, मग शिखरास दिसतो, असें वर्णन आहे. हा " पर्यायाचा ( क ) " प्रकार

उदाहरण वृत्त आर्या.

वेदाचा घोष मधुर होता चालत जिथें अहोरात्र ।
तेथें भल्लूकांचा ऐकों ये सतत अशुभ रव मात्र ॥ २७० ॥

वि० वा० भिडे,-कमळांची सुटका, पद्य ७७.

जेथें वेदपठनाचा सुश्राव्य घोष सतत चालू असे, तेथें आतां कोल्ह्याच्या अशुभ गर्जना मात्र कानीं पडत आहेत !

येथें वेदांचा घोष आणि भल्लूकांचा रव, हीं भिन्न काळीं एकाच ठिकाणीं ऐकूं येत असल्याचें वर्णन आहे हा " पर्यायाचा ( ख ) " प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

शास्त्री पंडित वैदिक वैद्य पुराणिक जयीं वसत होते ।
त्या पुण्यक्षेत्रीं अजि वन्य पशू फिरति निर्भय अहो ! ते ॥ २७१ ॥

वि० वा० भिडे,-कमळीची सुटका, पद्य ७८.

ज्या पुण्यक्षेत्रांत शास्त्री इत्यादि राहात असत, त्यात आज जंगली पशु निर्भय-पणें वावरत आहेत !

येथें भिन्न काळीं त्याच पुण्यक्षेत्रांत शास्त्री इत्यादि आणि वन्य पशु, यांची वसति झाल्याचें वर्णन आहे. हा " पर्यायाचा ( ख ) " हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त विबुधप्रिया.

क्षुद्र तो मुसलध्वना, कल हृ वधूजनगायन,
धेनु ती स्थविरा, प्रचण्ड मदांध हे गज शोभन ।
गेह तें पडकें, समुच्छ्रित सद्म हें दृढ, सुंदर,
काय विस्मयकारि हें घडलें सुदामदशान्तर ! ॥ २७२ ॥

पूर्वी जेथें मुसळाचा भिकार आवाज ऐकू येत असे, तेथें आतां स्त्रियाचें मधुर गाणें कानीं पडत आहे, पूर्वी जेथें एक म्हातारी गाय होती, तेथें आता हे धिप्पाड आणि दानोदक स्रवणारे सुंदर हत्ती दिसत आहेत, पूर्वी जेथें ते पडकें घर दिसत होतें, तेथें आतां हा सुंदर आणि टोलेजंग (समुच्छ्रित) आणि भक्कम बांधणीचा (दृढ) वाडा दिसत आहे,सुदाम्याच्या स्थितींत किती आश्चर्यकारक फरक पडला आहे तरी !

येथें श्रीकृष्णाच्या कृपेनें सुदाम्याच्या स्थितींत जो फरक पडला, तो वर्णिला आहे हें " पर्याय अलंकाराच्या ( ख ) " ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त भुजंगप्रयात

जिथें वाजल्या स्यंदनव्यालघंटा तिथें मांडिती भालु मांसार्थ तंटा ।
जिथें पेटले दीप रात्रीं असंख्य तिथें नांदतो आज हा अंधकार ॥ २७३ ॥

[ स्यंदन ह्म० रथ व्याल ह्म० हत्ती, भालु ह्म० कोल्ह्याच्या स्त्रिया ]

शत्रूनें उद्ध्वस्त करून टाकिलेल्या एका नगराचें हें वर्णन आहे

रथांच्या आणि हत्तींच्या घंटाचा आवाज जाऊन त्याचे जागीं मांसासाठीं भांडणाऱ्या कोल्ह्यांचे आवाज ऐकू येत आहेत ! जेथें रात्रीं असंख्य दिव्यांचा लख लखाट होता, तेथें आता घनदाट अंधेर झाला आहे !

येथें " पर्याय अलंकाराचा ( ख ) " प्रकार आहे

**टीप,**—एका वस्तुच्या जागीं एक वस्तु येणे, ह्यापेक्षा अनेक वस्तूंच्या जागीं अनेक वस्तु आल्याचें वर्णन असल्यास पर्याय अलंकारांत चारुता अधिक असते.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**कार्य हें चिन्ह पाहोनी त्याचें कारण जाणणें ।**
**ह्या विधानाप्रति कवी " अनुमान " असें म्हणे ॥ १६५ ॥**

अमुक कार्य घडलें आहे किंवा अमुक परिणाम झाला आहे म्हणून त्याचें अमुक कारण पूर्वी घडलेलें असावें, असा तर्क ज्या विधानात सांगितलेला असतो, त्याला " अनुमान अलकार " म्हणतात.

उदाहरण, वृत्त आर्या.

मनिं तो म्हणे सुकृत मम गतजन्मींचें गुरु फलावरुनी– ।
दिसतें कीं व्याघ्रगुहेंतुन अक्षत भेटली सुता फिरुनी ॥ २७४ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका; पद्य १८९.

तिप्पाभट म्हणतो —

मी पूर्वजन्मीं फार मोठें पुण्य केलें असलें पाहिजे अशी मी फळावरून अटकळ करतों. कारण माझी कन्या वाघाच्या गुहेंत जाऊन ( म्हणजे यवनांच्या तावडींत सांपडलेली असून ) मला पुन्हां पवित्र अशा स्थितींत भेटली आहे !

येथें पूर्वजन्मीं मी मोठें पुण्य केलें असावें, असें सद्य स्थितीवरून अनुमान निघाल्याचें वर्णन आहे. हें " अनुमान " अलंकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

पतिमुखविधु ह्या स्त्रीच्या हृदयीं शोभे असें मला वाटे ।
उद्गतविधुकिरणांची ईच्या गात्रांत धवलता दाटे ॥ २७५ ॥

उगवलेल्या चंद्राच्या किरणांचा पांढरेपणा ह्या मुलीच्या शरीरांत दिसत आहे ह्यावरून मला असें वाटतें कीं ह्या मुलीच्या अंतःकरणात पतिरूपी चंद्र वसति करून राहिला आहे !

हें " अनुमान अलंकाराचें उदाहरण" होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**साभिप्राय अशीं योजी वक्ता जेथें विशेषणें ।**
**तेथें " परिकराभिख्य " अलंकार कवी म्हणे ॥ १६६ ॥**

जेव्हां वाक्यामध्यें अनेक सहेतुक विशेषणें योजलेलीं असतात, तेव्हां " परिकर" ह्या नांवाचा अलंकार होतो

जें विशेषण योजण्यांत कवीचा कांहीं उद्देश असतो, जें विशेषण योजल्यानें अर्थात कांहीं भर पडते, त्याला "साभिप्राय" किंवा "सहेतुक" विशेषण म्हणतात; अशीं अनेक

साभिप्राय विशेषणें वाक्यांत योजिलेलीं असलीं म्हणजे "परिकर' हा अलंकार होतो

"शीतल चंद्र" ह्या योजनेंत "शीतल" हा शब्द निष्प्रयोजन आहे. कारण चंद्र शीतल असणारच. परंतु "माझ्या अशांत माती कालविणाऱ्या काशाला आणि शिवरामाला हेंच शासन योग्य होय !" ह्या वाक्यात "माती कालविणाऱ्या" हें विशेषण "हेंच शासन योग्य होय" ह्या विधानाची सार्थकता दर्शवितें म्हणून तें सार्थ किंवा सप्रयोजन किंवा सहेतुक विशेषण होय अशीं अनेक सार्थ विशेषणें वाक्यांत योजल्यानें जर चारुता उत्पन्न होत असेल, तर तो "परिकर" अलंकार होतो.

एऱ्हवीं जीं विशेषणें निरर्थक किंवा निष्प्रयोजन म्हणून समजलीं जातात, तीं कारणपरत्वें सार्थ किंवा सप्रयोजन होऊं शकतात

उदाहरण, वृत्त आर्या.

विश्वासपात्र, देशोद्धारेच्छु, जिवास जीव देणारे ।
युद्धनिपुण, निर्मत्सर, तत्पर तव इष्ट मित्र करूं सारे ॥ २७६ ॥

वि० वा० भिडे,-कमळीची सुटका, पद्य १९७.

स्वराज्य संपादन करण्याच्या कामीं कोणेकाला जसे मित्र असावयास पाहिजेत तसे तुला आहेत, तूं हटकून स्वराज्य स्थापिशील, असें शिवाजीला सांगतांना तिप्पाभट म्हणतो:—

तुझे सर्व मित्र भरवशाला पात्र आहेत, सर्व मित्र देशाचा उद्धार करावयाला इच्छिणारे आहेत, सर्व मित्र जिवास जीव देणारे आहेत, सर्व मित्र लढण्यांत पटाईत असून त्यांच्या मनांत एकमेकांविषयीं मत्सर नाहीं, आणि सर्व मित्र तुझें ध्येय सफळ करण्याविषयीं झटणारे आहेत!

ही अशी मित्रमंडळी तुला मिळाली असतां स्वराज्यस्थापनेचें कार्य सफळ कसें नाहीं होणार ? असा तिप्पाभट साभिप्राय विशेषणें योजून आपला अभिप्राय व्यक्त करीत आहे.

येथें विश्वासपात्र इत्यादि सर्व विशेषणें सहेतुक आहेत. हें 'परिकर" अलंकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

नानाविध जिथें घाण साठली, नाशवंत जें, ।
त्या देहार्थ करायास नर मूर्ख अघें सजे ॥ २७७ ॥

हरएक प्रकारची मलमूत्रादि घाण ज्यांत साचली आहे, आणि जो नश्वर आहे, अशा देहासाठीं पापें करावयाला मूर्ख जो मनुष्य तोच सिद्ध होतो !

येथें जोपासना करण्याच्या लायकीचा देह नाहीं असें, "जिथें नानाविध घाण आहे' आणि "जो नाशवत आहे," ह्या विशेषणांनीं सुचविलें आहे ही विशेषणें सार्थ आहेत हें "परिकराचें" उदाहरण

उदाहरण, वृत्त उपजाति

भालीं जयाच्या विधुखण्ड साजे, ज्याच्या शिरीं विष्णुपदी विराजे ।
लयास तो नेइल देव शर्व दयालु सांसारिक ताप सर्व ॥ २७८ ॥

ज्याच्या कपाळावर चन्द्राची कोर शोभत आहे, आणि डोक्यावर स्वर्गीय नदी शोभत आहे, तो दयाळू देव शंकर इहलोकींच्या सर्व तापाचा नाश करील !

येथें चंद्र आणि गंगा हे शीतल पदार्थ ज्याच्या जवळ आहेत, त्याच्या अंगीं ताप शमविण्याचें सामर्थ्य आहे असें " शर्व " ह्या शब्दाच्या विशेषणावरून स्पष्ट होत आहे हें " परिकराचें उदाहरण " होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**गुप्त स्वरूप वस्तुचें स्फुट होतां परामतीं ।**
**व्यपदेशें झांकणें तें ही " व्याजोक्ति " अलंकृति ॥ १६७ ॥**

एकाद्या वस्तूचें गुप्त स्वरूप कोणच्या तरी कारणामुळें दुसऱ्याच्या नजरेस आलें असतां तें स्वरूप कोणच्या तरी सबबीवर (व्यपदेशें)पुन्हां छपवून टाकण्यासाठीं जें विधान केलें जातें, त्याला "व्याजोक्ति " म्हणतात

उदाहरण; वृत्त वसततिलका

ग्रामान्तराहुनि पती स्वगृहास आला, स्त्रीदेह कंपपुलकोद्भवयुक्त झाला ।
ती हर्षलक्षण वदे बुझवावयास "हेमन्त शीत मज ये न सहावयास" ॥२७९॥

प्रवासाहून परत घरीं आलेल्या पतीला पाहून कंप, रोमांच, इत्यादि प्रेमचिन्हांनीं तिचा देह युक्त झाला, हीं प्रेमचिन्हें लपविण्यासाठीं ती म्हणाली, " कोण बाई हा थंडीचा कडाका ! हिंवाळ्याची थंडी मला मुळीं देखील सहन करतां येत नाहीं ! "

प्रेमामुळें उत्पन्न झालेल्या हर्षरोमांचादि चिन्हांना तिनें " थंडीचे हे परिणाम होत " असें म्हणून लपविलें हे " व्याजोक्तीचें उदाहरण. "

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**तुल्यवस्तूंत ही ग्राह्य, न ती, हें दाविजे जिथें ।**
**" परिसंख्या " अलंकार जाणा होत असे तिथें ॥१६८॥**

**प्रश्नानें ग्राह्यकथन, निषेधें त्याज्यवर्जन ।**
**असतां नसतां चार भेद तज्ज्ञ म्हणे जन ॥ १६९ ॥**

योग्यतेनें, दर्जानें, किंमतीनें, उपयोगानें, किंवा दुसऱ्या कांहीं गुणानें, जेव्हां दोन वस्तु साधारणपणें तुल्य असतात, तेव्हा त्यांच्या पैकीं अमुकच ग्राह्य करावयाची, आणि दुसरी त्याज्य करावयाची, असें दाखवून देण्यासाठीं जें विधान केलेलें असतें, त्याला " परिसंख्या " असे म्हणतात

कोणची वस्तु ग्राह्य करावयाची असा अगोदर प्रश्न करून ग्राह्य वस्तु सांगितलेली

असली आणि त्याज्य वस्तु सांगितलेली असली तर "परिसंख्येचा ( क )" हा प्रकार होतो प्रश्न असून ग्राह्य वस्तु सांगितलेली असली आणि त्याज्य वस्तु सांगितलेली नसली तर ( ख ) हा प्रकार होतो. प्रश्न नसून ग्राह्य वस्तु आणि त्याज्य वस्तु ह्या दोन्ही सांगितलेल्या असल्यास ( ग ) प्रकार होतो प्रश्न नसून ग्राह्य वस्तु सांगितलेली असली आणि त्याज्य वस्तु सांगितलेली नसली, तर "परिसंख्येचा ( घ )" हा प्रकार होतो. असे एकंदर परिसंख्येचे चार प्रकार होतात.

हे चार प्रकार पुढील कोष्टकावरून स्पष्ट होतील

( क ) प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित असतां

( ख ) प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित नसतां.

( ग ) प्रश्न नसून त्याज्य वस्तु कथित असतां

( घ ) प्रश्न नसून त्याज्य वस्तु कथित नसतां

उदाहरण, वृत्त आर्या

उत्तम वक्ता कोण ? प्रतिपक्षा खुडुन जो स्वमत पटवी ।
तो न, श्रोत्यांना जो सुखकर शब्दावडंबरें खुळवी ॥ २८० ॥

प्रतिपक्षाच्या मताचें खंडन करून आपलें मत जो श्रोत्याना कबूल करावयास लावतो, तोच उत्तम वक्ता कानांस सुख देणाऱ्या शब्दांचें अवडंबर माजवून श्रोत्यांना केवळ खुळावितो तो उत्तम वक्ता नव्हे '

येथें प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित आहे हें "परिसंख्येच्या ( क )" प्रकारार्चे उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

उत्कृष्ट कोणता राजा ? जनभव्यार्थ जो झटे ।
न जो जनधनें घेई भोगवी त्यास संकटें ॥ २८१ ॥

उत्तम राजा कोणचा ? जो लोकाच्या कल्याणाला झटतो तो, जो करांच्या रूपानें रयतेपासून पैसे घेऊन त्यांना दुर्दशा भोगावयास लावतो तो राजा उत्तम नव्हे !

येथें प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित आहे हें "परिसंख्येच्या (क)" ह्या प्रकारार्चे उदाहरण

उदाहरण, वृत्त आर्या

साधू कोण म्हणावा ? जो निजदेशार्थ देह झिजवील ।
खल कोण ? जो धनास्तव रिपुला निज देश निस्त्रप विकील॥२८२॥

वि० वा० भिडे–पुण्यपंक्ति, पद्य ९

कोणाला साधु म्हणावें ? जो स्वदेशासाठीं देह कष्टवील त्याला. कोणाला दुर्जन म्हणावें ? जो पैशासाठीं शत्रूला देश निर्लज्जपणें ( निस्त्रप ) विकील त्याला !

येथें आर्येच्या दोन्ही अर्धांत प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित नाहीं. हीं "परिसंख्येच्या ( ख )" प्रकाराचीं उदाहरणें

उदाहरण; वृत्त आर्या.

राजास काय भूषण ? जनसंमत रीति मात्र अनुसरणें ।
प्रकृतीस काय भूषण ? योग्यनियमबंधनेंच पथकरणें ॥ २८३ ॥

राजाला कोणची गोष्ट श्रेयस्कर आहे ? प्रजाजनांना पसंत असेल तीच शासन-पद्धति अनुसरणें हें. रयतेला काय श्रेयस्कर आहे ? राजानें केलेलें कायदे इत्यादींच्या नियंत्रणा योग्य असल्या तरच त्या पाळणें !

येथें प्रश्न असून त्याज्य वस्तु कथित नाहीं. हा " परिसंख्येचा ( ख ) " प्रकार होय

उदाहरण, वृत्त आर्या.

तोच नृपति वंद्य असे प्रकृतिहितेच्छा यदंतरांत वसे ।
तो न,–प्रकृतिधनें जो स्वीयविलासार्थ मात्र घेत असे ॥ २८४ ॥

तोच राजा वंदनास पात्र असतो,—कीं ज्याच्या अंत:करणांत रयतेचें कल्याण करण्याची इच्छा असते तो राजा वंदनास पात्र नव्हे,–कीं जो रयतेचीं धनें स्वताच्या चैनीसाठीं मात्र घेतो !

येथें प्रश्न नाहीं पण त्याज्य वस्तु कथित आहे. हा " परिसंख्येचा ( ग ) " प्रकार.

उदाहरण, वृत्त आर्या

श्रेयस्कर काय नरा ? निजदेशोत्कर्ष करुनियां झिजणें ।
काय नरा निंद्य असे ? किंप्रभुला स्तवुनि उच्चपदिं चढणें ॥२८५॥

मनुष्याला श्रेयस्कर कोणची गोष्ट आहे ? आपल्या स्वताच्या देशाचें वैभव
साधु त्यासाठीं कष्ट सोसणें मनुष्याला निंद्य गोष्ट कोणची ? नीच राजाची प्रशंसा
करून मोठ्या अधिकाराच्या स्थानास चढणें !

येथें प्रश्न आहेत आणि त्याज्य वस्तु कथित नाहींत हे " परिसंख्येचे (ख) " हे
प्रकार

उदाहरण, वृत्त आर्या.

साधू कोण म्हणावा ? जो निजदेशार्थ सतत यत्न करी ।
तो न,–स्वदेह भसितें लेपी कीं जो जटा शिरास धरी ॥ २८६ ॥

साधु कोण ? जो आपल्या देशासाठीं सदैव झटत असतो तो साधु नव्हे, कीं जो
केवळ अंगाला राख फासतो, आणि डोक्यावर जटा धारण करतो !

येथें प्रश्न असून ग्राह्य वस्तु सांगितलेली असून त्याज्य वस्तूही सांगितलेली
आहे- हा "परिसंख्येचा ( क ) "प्रकार होय

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

लक्ष्याच्या ऐल वा पैल न जाता लक्ष्य केवल– ।
वेधी यच्छर तो धन्वी, नांवाचे भुवि पुष्कळ ॥ २८७ ॥

वि० बा० भिडे,–जी० जा०, संकीर्ण, पद्य १०५.

ज्या पदार्थावर बाण मारावयाचा आहे त्यालाच ज्याचा बाण लागेल, यत्किंचित्‌ही अलीकडे किंवा पलीकडे जाणार नाहीं, तोच खरा धनुर्धर ! नांवाचे पुष्कळ धनुर्धर जगांत दिसतात !

येथें प्रश्न नाहीं, " नावाचे " ह्या शब्दानें त्याज्य धनुर्धर उक्त आहेत. हें " परिसंख्येच्या ( ग ) " प्रकाराचें उदाहरण.

परिसंख्या अलंकाराची चारुता श्लेषानें वृद्धिंगत होते ह्याचें पुढील पद्य उदाहरण आहे.

उदाहरण, वृत्त शार्दूलविक्रीडित.

ते चापीं गुणखण्डन प्रकटितीं, चापल्य बाणासनीं,
चिंता अध्ययनीं, सदैव गुरुच्या ईर्ष्याहि संलोभनीं।
गीतामाजिं सरागता, प्रकृतिही क्रूरा द्विषन्मंडलीं,
यंत्रादी दृढ बंध पद्यरचनेमध्यें, मुलें चांगलीं ॥ २८८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ८५.

राम, लक्ष्मण, भरत, आणि शत्रुघ्न, ह्या दशरथाच्या चार पुत्रांच्या धनुष्याच्या दोऱ्या तुटत असत ( त्यांच्या सद्गुणांचा भंग होत नसे ), धनुष्य जोडण्यांत त्यांची चपलता दिसत असे ( ते खोडकर नव्हते ), त्यांना अध्ययनांत मति चालवावी लागत असे ( त्यांना संकट निवारण्याची काळजी वहावी लागत नसे ); गुरूला संतुष्ट ठेवण्यांत ते एकमेकांवर चढाओढ करीत ( ते परस्परांचा मत्सर करीत नसत ); गायनांत ते राग दाखवीत असत ( निषिद्ध पदार्थांविषयीं ते कधीं आवड दाखवीत नसत ); शत्रूंशीं ते कठोरपणा करीत ( इतरांशीं वागतांना करीत नसत ); पद्मबंध, खड्गबंध, इत्यादि प्रकारच्या काव्यरचनेंत ते बंध योजीत असत ( सामान्य जनांना ते प्रतिबंधांत ठेवीत नसत ! )

ह्या उदाहरणांत प्रश्नही नाहीं आणि त्याज्य वस्तुही कथित नाहीं. हें " परिसंख्येच्या ( घ )" ह्या प्रकाराचें उदाहरण होय. ह्या वरील पद्यांत त्याज्य करावयाच्या वस्तु अनुवादांत कसांत दाखविल्या आहेत पद्यामध्यें त्या उक्त नाहींत

उदाहरण; वृत्त यूथिका.

शांतिहेतुकचि शत्रुकुलक्षय, दानहेतुकचि कांचनसंचय।
ज्ञानहेतुकचि वाद करी नृप, तो असे निशिचरांसचि निष्कृप॥२८९॥

वि० वा० भिडे,–दण्डदण्डना, पद्य ४९

हें दण्ड राजाचें वर्णन आहे.

दण्ड राजा आपल्या राज्यामध्यें शांतता नांदावी म्हणूनच शत्रूच्या कुळांचा संहार करीत असे ( क्रूरपणामुळें नव्हे ), योग्य माणसांना दान करण्यासाठींच तो धन सांठवीत असे ( धनलोभामुळें नव्हे ), आपणाला ज्ञान मिळावें म्हणून तो वादविवाद करीत असे ( आपल्या विद्वत्तेची प्रौढी मिरविण्यासाठीं नव्हे ), तो राक्षसांशींच क्रूरपणानें वागे ( तो हाडाचा दुष्ट होता म्हणून नव्हे )

हें पद्य " परिसंख्येच्या (घ) " ह्या प्रकाराचें उदाहरण आहे. कारण येथें प्रश्नही नाहीं आणि त्याज्य वस्तूही कथित नाहीं. वर श्लोकाच्या अनुवादात त्याज्य वस्तु कसात सांगतल्या आहत

लक्षण; वृत्त आर्या

**पहिली वस्तु दुजीला, दुजी तिजीला, तिजीहि चवथीला– ।**
**हेतु अशी जी उक्ती " कारणमाला " असें म्हणति तीला॥१७०॥**

कांहीं वस्तूंची एक श्रेणी असून तींतील पहिली वस्तु दुसरीला कारण आहे, दुसरी वस्तु तिसरीला कारण आहे, तिसरी वस्तु चवथीला कारण आहे, असें म्हटलेलें असतें, तेथें " कारणमाला किंवा " हेतुमाला " हा अलंकार होतो

उदाहरण, वृत्त आर्या.

देशप्रीति तयाची प्रेरी मंत्रास, मंत्र शौर्यास, ।
शौर्य यवनराज्याच्या विध्वसेच्छेस, यश मिळे त्यांस ॥ २९० ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य १४.

शिवाजी, तानाजी, एसाजी, आणि बाजी, ह्या चवघांच्या अंतःकरणांत देशप्रीति होती, ही देशप्रीति त्याना खलबतें करावयास लावी, ह्या खलबतामुळें त्याना शौर्याचीं कृत्यें करण्याची प्रेरणा होई, ह्या शौर्याच्या कृत्यांनीं त्यांना परकीयांचें राज्य उलथून पाडण्याची इच्छा होई, आणि परिणामीं त्यांना यश मिळालें '

येथें देशप्रीति, मंत्र, शौर्य, यवनराज्याची विध्वसेच्छा, ह्या चार पदार्थांची एक श्रेणी आहे हींतील देशप्रीति ही कारण आहे मंत्रास, मंत्र कारण आहे शौर्यास, शौर्य कारण आहे यवनराज्याच्या विध्वसेच्छेस, असें म्हटलें आहे. हें " कारणमालेचें " किंवा " हेतुमालेचें " उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

साधुसमागम शुचिता, शुचिता धृति दे, धृति स्वजनभक्ति ।
ही स्वजनभक्ति मनुजा देशहित करावया विपुल शक्ति ॥ २९१ ॥

वि० वा० भिडे,–पुण्यपंक्ति, पद्य १६.

साधूंच्या संगतीनें पावित्र्य अंगीं ठसतें, पावित्र्य हें नीतिधैर्य देतें, हें नीतिधैर्य आपल्या लोकांविषयीं मनांत प्रेम उत्पन्न करतें, हें प्रेम स्वदेशाचें कल्याण करण्याला भरपूर सामर्थ्य उत्पन्न करतें !

हें "कारणमालेचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त कलहंस.

आधिकार हा उपजवी मद चित्तीं, मद माधुरी, अनय आत्मगुणें ती, ।
अनयें अघोद्भव, अघें नरकांत मिळतो निवास, कवि हें म्हणतात ॥२९२॥

वि० वा० भिडे,–मदमाधुरी, पद्य २२.

मनुष्याला उच्च अधिकार प्राप्त झाला असतां त्याच्या अंतःकरणात उन्मत्तपणा (मद) शिरतो, हा उन्मत्तपणा पुढें गोड वाटूं लागतो, ही उन्मत्तपणाची गोडी मनुष्याला वाटू लागली म्हणजे स्वाभाविकपणें तो मनुष्य अनीतीच्या

मार्गास लागतो, अनीतीच्या मार्गाला लागलेला मनुष्य पापें करू लागतो, तो पापें करूं लागला म्हणजे तो मरणोत्तर नरकांत पडतो !

येथें अधिकार हा मदाचा हेतु आहे, मद हा माधुरीचा हेतु आहे, माधुरी ही अनयाचा हेतु आहे, अनय हा अधोद्भवाचा हेतु आहे, आणि अधोद्भव हा नरकप्राप्तीचा हेतु आहे, असें म्हटलें आहे. येथें हेतूची परंपरा लाविली आहे. " हें कारणमालेचें " उदाहरण.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

येई विनय विद्येनें, विनय प्रेम मेळवी ।
मिळतां प्रेम लोकांचें नर होई सुखी भवीं ॥ २९३ ॥

वि० वा० भिडे,–जी० जा०, संकीर्ण, पद्य १००.

विद्येनें मनुष्याला विनय प्राप्त होतो, विनयानें लोकांचें प्रेम मिळतें, आणि प्रेम मिळाल्यानें मनुष्य संसारांत सुख पावतो !

येथें विद्या विनयाचें कारण, विनय प्रेमाचें कारण, आणि प्रेम सुखाचें कारण, असें म्हटलें आहे. हें " कारणमालेचें " उदाहरण.

**टीप**,—कारणमाला ह्या अलंकारांत एकाच सरणीचीं वाक्यें असलीं पाहिजेत असा नियम नाहीं एक वस्तु दुसरीस कारण आहे असें कोणत्याही रीतीनें सांगितलें तरी चालतें.

लक्षण; वृत्त आर्या.

**दोन पदार्थांमध्यें हा त्यावरि तोहि यावरी कार्य –।**
**करि तेंच असें वर्णन असतां"अन्योन्य" तें म्हणति आर्य॥१७१॥**

दोन वस्तूंपैकीं एक वस्तू दुसरीवर कांहीं परिणाम घडवून आणते, आणि दुसरी वस्तु पहिलीवर तोच परिणाम घडवून आणते, अशा वर्णनाला विद्वान् लोक " अन्योन्य अलंकार " म्हणतात

उदाहरण, वृत्त वंशस्थ.

विधू समुद्राप्रति कांति दे अती, समुद्र वा कांति जशी विधूप्रती ।
तशी रिपुघ्नें भरता द्युती दिली, द्युती रिपुघ्ना भरतेंहि अर्पिली ॥२९४ ॥

वि० वा० भिडे,—रा० प०, सर्ग १, पद्य ७५

चंद्र जशी समुद्राला शोभा देतो, किंवा समुद्र जशी चंद्राला शोभा देतो, तशी शत्रुघ्नानें भरताला शोभा दिली, आणि भरतानें शत्रुघ्नाला शोभा दिली !

हें " अन्योन्याचें " उदाहरण होय

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

विद्येस विनयें शोभा विद्येनें विनयास ये ।
पुरुष श्रेष्ठतामान पावतो ह्या गुणद्वयें ॥ २९५ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति,–संकीर्ण, पद्य ११२.

विद्येला विनयानें शोभा येते, आणि विनयाला विद्येनें शोभा येते. ह्या दोन्ही गुणांच्या योगानें पुरुष श्रेष्ठतेचा मान पावतो ( ह्म० श्रेष्ठ ठरतो )!

येथें विद्या आणि विनय हीं परस्परांना शोभा देतात असें वर्णन असल्याकारणानें हा " अन्योन्य " अलकार होय.

उदाहरण, वृत्त वंशस्थ.

ध्वजादि भूषाकरणें पुराप्रती, ध्वजादिकां कांति दिली पुरें अती ।
परस्परां शोभविलें तयीं तदा, अनल्प तो संगम देइ संमदा ॥ २९६ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ४३

अयोध्यानगरीला ध्वज, तोरणे, इत्यादींनीं सुशोभित केलें, आणि ध्वज, तोरणें, इत्यादींना अयोध्यानगरीनें सुशोभित केलें. त्यांनीं एकमेकाना सुशोभित केलें. हा संयोग मनाला फार संतोष देणारा होता !

येथें ध्वजादि आणि पुर ह्यांनीं परस्पराना सुशोभित केल्याचें वर्णन आहे. हें " अन्योन्य " अलकाराचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त चामर

दातृतेस देतसे अपूर्व कांति संपदा,
संपदेस दातृताहि कांति देइ सर्वदा ।
युग्म हें जयीं असेल तोचि धन्य मानव !
श्रेष्ठ हें सदैव मानिजे जगांत वैभव ॥ २९७ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति,–संपत्ति आणि दातृत्व, १७६

दान करण्याच्या इच्छेला संपत्तीनें शोभा येते, आणि दान करण्याच्या इच्छेनें संपत्तीला शोभा येते ही दान करण्याची इच्छा आणि संपत्ति अशी जोडी ज्या माणसाचें ठायीं असेल, तोच मनुष्य धन्य होय; हेंच वैभव जगात थोर म्हणून समजलें जातें.

हें " अन्योन्य " अलंकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

ऐकोनि उत्तर प्रश्न जाणतां येतसे जिथें ।
" उत्तराख्य " अलंकार होई कवि म्हणे तिथें ॥ १७२ ॥

केवळ उत्तर ऐकल्याबरोबर तें उत्तर कोणच्या प्रश्नाला दिलेलें असावें, असा तर्क करतां येतो, तेथें " उत्तर " नामक अलंकार होतो.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

हस्तिदंत व्याघ्रचर्म कैसें येथ मिळे तुला ? ।
सुनेचे जोंवरी रम्य विलास दिसती मुला ॥ २९८ ॥

जोंपर्यंत आमच्या सुनेचे मनोहर विलास आमच्या मुलाच्या दृष्टीस पडत आहेत, तोंपर्यंत आमच्या घरांत हस्तिदंत आणि वाघाचें कातडें तुला कसें मिळणार ?

ह्या उत्तरांवरून प्रश्नाची आपणास अटकळ करतां येतें कोणी माणूस हस्तिदंत

आणि वाघाचें कातडें विकत घ्यावयाला आलेला असावा, त्यानें " मला तुम्ही हस्तिदंत आणि वाघाचें कातडें विकत द्याल काय ? " असा प्रश्न त्या बाईला विचारलेला असावा, आणि त्या प्रश्नावर त्या बाईनें वरील उत्तर दिलेलें असावें येथें प्रश्न तर्किणें ह्यांत " उत्तर " अलंकाराच्या चारुतेचें बीज आहे

उदाहरण, वृत्त आर्या

सासू अत्र बधिर मम, गेले पतिराज ममहि गांवाला ।
मी एकटीच बाळा गृहिं," उतरा, या"कसें म्हणुं तुम्हाला ! ॥२९९॥

माझी सासू अधळी आणि बहिरी आहे, माझे यजमान परगांवीं गेले आहेत; घरांत मी एकटीच लहान मुलगी आहें, येथें रात्रीच्या मुक्कामाला उतरा असें कसें मी तुम्हाला म्हणूं ?

येथें त्या मुलीनें पान्थाला दिलेलें उत्तर वाचकांना कळतांच वाचकाच्या तर्कात ही गोष्ट येते की त्या पांथानें "रात्रीच्या वसतीला ह्या घरात मला जागा मिळेल काय?" असा त्या मुलीला प्रश्न विचारलेला असेल, त्याचें हें पद्य उत्तर असावें

येथें उत्तरावरून प्रश्न तर्किता येत आहे म्हणून हें "उत्तर" अलंकाराचें उदाहरण होय.

उदाहरण; वृत्त आर्या

आसन्नमरण माता, आसन्नप्रसव मम वधू असतां ।
"या, गृहिं वसतीस रहा ' हें न म्हणाया तुम्हां मम क्षमता ॥ ३०० ॥

माझी आई मरावयला टेकली आहे, आणि माझी बायको बाळंतपणाच्या वेणा देत आहे.या,माझ्या घरीं वसतीला रहा,असें तुम्हाला म्हणावयाला मी असमर्थ आहें !

कोणी पांथानें ह्या माणसाला तुझ्या घरीं मुक्कामाला राहाण्याची सोय होईल काय असा प्रश्न विचारला असेल, त्याचें उत्तर ह्या माणसानें वरील पद्यांत सांगितल्याप्रमाणें दिलें असेल, असा तर्क होण्याजोगा आहे हें " उत्तर " अलंकाराचें उदाहरण होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**अनेक असती प्रश्न, अतर्कित तदुत्तरें ।**
**अशी माला " उत्तराचे "चि म्हणिजे रसिकें नरें ॥१७२॥**

जेथें अनेक प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाचें लोकाच्या सहज तर्कात न येणारें एक एक उत्तर असतें, अशा प्रश्नोत्तराच्या परंपरेलाही रसिक लोक " उत्तर " अलंकारच म्हणतात

उदाहरण, वृत्त आर्या.

काय असह्यतम जगीं ? किंप्रभुशासन; जिवंतहि असून -- ।
मृत कोण ? जो न कोपे धर्माची गर्हणाहि परिसून ॥ ३०१ ॥

ह्या जगांत अत्यन्त असह्य अशी कोणची वस्तु आहे ? दुष्ट राजाचा अमल. जिवंत असून मेलेला कोण ? आपल्या धर्माची निंदा ऐकून ज्याला राग येत नाहीं तो !

टीप,—परिसंख्येचा ज्या प्रकारात प्रश्न असून उत्तर सांगितलेलें असतें, तो प्रकार आणि उत्तर अलंकाराचा हा दुसरा प्रकार, ह्या दोहोंतील भेद विद्यार्थ्यांनीं जाणून घेणें आवश्यक आहे. प्रश्नपरिसंख्येंत प्रश्नाला दिलेलें उत्तर श्रोत्याला ठाऊक असेल किंवा नसेल, परंतु त्या उत्तरांत सांगितलेलीच वस्तु घ्यावयाची, दुसरी वस्तु ग्राह्यशी वाटत असली तरी ती घ्यावयाची नाहीं, असें श्रोत्याच्या मनांत ठसविण्याचा वक्त्याचा उद्देश असतो.

" उत्तर " ह्या अलंकारांत उत्तरात सांगितलेली वस्तु श्रोत्याला ठाऊक नाहीं अशा प्रहानें वक्त्यानें ती ग्राह्य वस्तु सांगितलेली असते. " प्रश्नपरिसंख्येंत " त्याज्य वस्तुचा त्याग अभिप्रेत असतो. " उत्तर " अलंकारांत श्रोत्याला ठाऊक नसलेली वस्तु सांगण्याचा वक्त्याचा उद्देश असतो. " प्रश्नपरिसंख्येंत " त्याज्य वस्तूवर कटाक्ष असतो. " उत्तर " अलंकारांत ग्राह्य वस्तूवर कटाक्ष असतो.

एकाद्या विशिष्ट उदाहरणात " प्रश्नपरिसंख्या " हा अलंकार आहे किंवा " उत्तर " हा अलंकार आहे हें ठरवितांना वक्त्याचा उद्देश काय आहे हें लक्ष्यांत घ्यावें लागतें. वक्त्याला त्याग अभिप्रेत आहे असें विद्यार्थ्याचें मत असल्यास त्यानें त्याला "प्रश्नपरिसंख्या" म्हणावें, ग्रहण अभिप्रेत आहे असें विद्यार्थ्याचें मत असल्यास त्यानें त्याला " उत्तर " अलंकार म्हणावें.

लक्षण; वृत्त आर्या

**विचारांचा विनिमय नेत्रमुद्रादि साधनें – ।**
**झाल्याची उक्ति म्हणिजे " सूक्ष्मालंकार "तो जनें॥१७४॥**

दोन माणसांमध्यें डोळ्याच्या, हाताच्या, वगैरे खुणांनीं संभाषण चालल्याचें जें वर्णन, त्याला "सूक्ष्म" अलंकार म्हणतात. ह्या अलंकारांत दोन माणसें एकमेकांना आपले विचार खुणांनीं कळवितात, प्रत्यक्ष शब्दांनीं कळवीत नाहींत.

उदाहरण, वृत्त आर्या.

तानाजी जिज्ञासामुद्रेनें मग शिवाकडे पाहे ।
जाणुनि तत्प्रश्न शिवें स्वशिर कलविलें सवेग लवलाहें ॥ २०२ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य ११७.

नंतर तानाजीनें जिज्ञासेच्या मुद्रेनें शिवाजीकडे दृष्टि वळविली. तानाजीचा प्रश्न शिवाजीनें जाणून आपलें डोकें तत्क्षणीं जोरानें एका खांद्यावर कलविलें. यावरून ह्या यवनाचा शिरश्छेद कर " असा शिवाजीचा विचार तानाजीला कळला.

येथें तानाजीनें शिवाजीला नेत्रांच्या खुणेनें "ह्या यवनाची मी वाट काय लावूं!" असा प्रश्न विचारला. शिवाजीनें शब्दांनीं त्याला उत्तर न देतां खुणेनें त्याला आपलें मनोगत कळविलें. येथे खुणांच्या योगानें संभाषण झाल्याचें वर्णन आहे म्हणून हें " सूक्ष्म " अलंकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या

> एसाजी शिवमानस जाणाया प्रेरि सन्मुखीं नयन ।
> शिवबानें नेत्र मिटुनि अंधत्वफलार्थ दाविलें स्वमन ॥ ३०३ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य १२६.

शिवाजीचा विचार जाणावयासाठीं-एसाजीनें शिवाजीकडे जिज्ञासामुद्रेनें दृष्टि वळविली. शिवाजीनें आपले डोळे मिटून" त्या यवनाला अंधत्व दे " अशी आपली इच्छा प्रकट केली !

[ अंधत्वरूपी परिणाम आहे आशय ज्याचा असें ( स्वमन ) ].

येथें एसाजीचा प्रश्न आणि त्यावर शिवाजीचें उत्तर, हीं दोन्ही खुणांच्या रूपांत असल्याचें वर्णन आहे. हें ' सूक्ष्म " अलंकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त आर्या

> कांहीं काळ असें रण कौशल्यें करुनि जाफरासहित ।
> बाजीनें शिवबाचा आशय पुशिला स्वलोचनें त्वरित ॥ ३०४ ॥
> शिवबानें पोटावरि असि टेकुनि त्यास हेतु जाणविला ।
> हेतु शिवाचा उमगुनि बाजीनें असि रिपूदरीं पुरिला ॥ ३०५ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्यें १३२,१३३.

अशा रीतीनें कांहीं वेळ जाफराबरोबर लढाई करून नंतर बाजीनें शिवाजीचा विचार आपल्या डोळ्यांनीं विचारला शिवाजीनें आपल्या पोटावर तरवार टेकून आपला विचार त्याला कळविला, तो जाणून बाजीनें आपली तरवार शत्रूच्या पोटांत खुपसली !

येथें शिवाजी आणि बाजी या दोघाचें संभाषण खुणानीं झाल्याचें वर्णन आहे. हें " सूक्ष्म " अलंकाराचें उदाहरण होय.

लक्षण; वृत्त आर्या.

> **पहिल्या वस्तुहुनि अधिक दुसरी, तीहुनि गुणें अधिक तिसरी ।**
> **इत्यादि उक्ति म्हणिजे "सार," गुणन्यूनता तशीच तरी ॥ १७५ ॥**

कांहीं एका विशिष्ट गुणासंबंधानें एका वस्तूपेक्षां दुसरी वरचढ आहे, दुसरीपेक्षां तिसरी वरचढ आहे, तिसरीपेक्षां चवथी वरचढ आहे, अशा क्रमाचें कथन केलेलें असतें, तेव्हां " सार " हा अलंकार होतो. तसेंच कांहीं एक गुण उतरत्या पायरीनें कमी कमी होत गेला आहे, असें वर्णन असल्यासही " सार " अलकार होतो.

उदाहरण; वृत्त सौदामिनी

> जगीं श्रेष्ठ लंका असे वैभवें, तिथें श्रेष्ठ मत्सौध मोठें नवें ।
> तयीं श्रेष्ठ माझेंच शय्यागृह, तयीं श्रेष्ठ मीही विलासस्पृह ॥ ३०६ ॥
> तयीं तूंचि शय्यागृहीं माझियासवें क्रीडतां मन्मना हो प्रिया ।
> तुझा दास होओनि मी राहतों, तुझ्या मी पदीं प्राण हे वाहतों ॥ ३०७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १६, पद्यें ४९,५०.

ह्या जगामध्यें वैभवानें लंका श्रेष्ठ आहे ह्या लंकेमध्यें माझा राजवाडा विस्तीर्ण आणि नवीन म्हणून श्रेष्ठ आहे ह्या राजवाड्यात माझेंच शयनगृह श्रेष्ठ आहे येथें ह्या शयनगृहात सुखोपभोगाची इच्छा करणारा मी श्रेष्ठ आहें. ह्या शयनगृहात मजसह क्रीडा करुन तू मला आवडती हो! मी तुझा दास होऊन राहतों! मी तुझ्या पायांवर हे माझे पंचप्राण अर्पितों!

येथें लंका, सौध, शय्यागृह, मी, अशी श्रेष्ठपणाची चढती परंपरा सांगितली आहे हें "सार" ह्या अलंकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

नराहुनि मही मोठी, महीहुनि दिवाकर।
विश्व त्याहुनिही मोठें, जें एकाकीं अनश्वर ॥ ३०८ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति, संकीर्ण, पद्य ७०.

मनुष्यापेक्षा पृथ्वी मोठी, पृथ्वीपेक्षां सूर्य मोठा, सूर्यापेक्षा विश्व मोठें, जें एकटें अविनाशी आहे!

येथें नर, मही, दिवाकर, आणि विश्व, अशा चार वस्तु पहिलीहून दुसरी मोठी, दुसरीहून तिसरी मोठी तिसरीहून चवथी मोठी, अशा क्रमानें सांगितल्या आहेत हें "सार" ह्या अलंकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

संसारीं सार मानुष्य, मानुष्यांत कुलीनता।
कुलीनतेंत धर्मित्व, धर्मित्वात दयार्द्रता ॥ ३०९ ॥

वि० वा० भिडे,–जीवजागृति, संकीर्ण, पद्य १२७.

ह्या संसारात मनुष्यपण हें सार होय, मनुष्यपणांत कुलीनता हें सार होय, कुलीनतेंत धर्मशीलपणा हें सार होय, आणि धर्मशीलपणांत दयाळूपणा हें सार होय!

येथें उत्कर्षाच्या चढत्या पायऱ्या वर्णिल्या आहेत. हें "सार" अलंकाराचें उदाहरण होय

उदाहरण, वृत्त आर्या.

विश्वाहुनि देव महा, देवाहुनि धर्म, देश त्याहून।
तर विश्वदेवधर्महि नमिजेती देश केवल नमून ॥ ३१० ॥

वि० वा० भिडे,–रथरूपक,–स्फुट पद्यें, पद्य ५०

विश्वाहून देव मोठा, देवाहून धर्म मोठा, धर्माहून देश मोठा म्हणून विश्व, देव, आणि धर्म, ह्या सर्वांना नमणें हें देशाला नमल्यानें साध्य होणारें आहे!

येथें मोठेपणाच्या चढत्या पायऱ्या वर्णिल्या आहेत हें "सार" ह्या अलंकाराचें उदाहरण होय

लक्षण, वृत्त आर्या

**जेथें कारण तेथें कार्य अशी पद्धती जगीं दिसते।**
**तीला दाखविला अपवाद तर तिथें "असंगती" असते॥१७६॥**

निसर्गाचा असा नियम आहे कीं जेथें कारण असतें, तेथेंच कार्य असावयाचें. पण कारण एके ठिकाणीं आहे आणि त्याचें कार्य दुसऱ्याच एका ठिकाणीं आहे, असें कवीनें दाखविलेलें असलें, तर तेथें " असंगति " हा अलंकार होतो.

उदाहरण; वृत्त आर्या.

अपराध सुकन्येचा, झाला शर्यातिसैनिकां दंड ।
रावण सीतेस हरी, सिंधूला सेतुबंध उद्दंड ॥ ३११ ॥

वि० दा० भिडे,–सुकन्या, पद्य २८

सुकन्येनें अपराध केला आणि त्याबद्दल शर्यातीच्या सैनिकांना शिक्षा भोगावी लागली रावणानें सीतेला चोरून नेलें, आणि त्याचेबद्दल समुद्राला सेतुरूप बंधन भोगावें लागलें !

या आर्येच्या दोन्हीं अर्धांत असंगतीचें एक एक उदाहरण आहे. सबंध आर्या " प्रतिवस्तूपमेचें " उदाहरण होईल.

**टीप**,—मागें लक्षणपद्यें १३५ ते १३८ मध्यें आम्ही विभावना लक्षिली आहे. लक्षणपद्य १३९ मध्यें विशेषोक्ति लक्षिली आहे, आणि लक्षणपद्य १७६ मध्यें असंगति लक्षिली आहे. ह्या तीन्ही अर्थालंकारांच्या चारुतेचें बीज कोणत्या प्रकारच्या विरोधांत असतें हें पुढील लक्षणपद्यांत सांगितलें आहे.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

**कार्याभावें विशेषोक्ति, हेत्वभावें विभावना ।**
**कार्यहेतुस्थानभेदें असंगति हरी मना ॥ १७७ ॥**

[ हेतु ह्म० कांहीं कार्य घडवून आणणारें कारण. कार्य ह्म० कारणविशेषाचा घडून येतो तो परिणाम, फल ]

कारण घडलेलें असून कार्य न घडण्यामुळें विशेषोक्ति मन रमविते. कारण (हेतु) घडलेलें नसतां कार्य घडण्यामुळें विभावना मन रमविते. कारण ( हेतु ) एके ठिकाणीं आणि त्याचा परिणाम ( कार्य ) भिन्न ठिकाणीं असण्यामुळें असगति मन रमविते.

लक्षण; वृत्त आर्या.

**कार्य घडाया हेतू एक असुनि इतर अधिकवीर्य असे —।**
**आकस्मिक हेतु जुळुनि कीजे तें सुकर तो "समाधि" असे ॥१७८॥**

कांहीं विशिष्ट कार्य घडून यावयाला एक कारण विद्यमान असतां त्या कारणाच्या मदतीला दुसरें एक किंवा अनेक कारणें अकस्मात् येऊन तें कार्य सोपें झालें-असें वर्णन असल्यास येथें " समाधि " नामक अलंकार होतो.

उदाहरण, वृत्त आर्या.

अनुकूल ब्रह्म तसें तों झालें तन्मनोरथा पर्व ।
तीर्थस्नान कराया पुरवासी लोक चालिले सर्व ॥ ३१२ ॥

मोरोपंत,–सुभद्राहरण.

अर्जुनाच्या मनांत सुभद्रेला पळवून न्यावें असें होतें. ह्या उद्देशाच्या सफलतेला कृष्ण अगोदरच अनुकूल झालेला होता, आणि तशांत त्याच समयीं एक पर्वणीही आली, आणि तीर्थस्नानासाठीं नागरिक लोक जावयास निघाले. ही अर्जुनाला लोकांच्या दाटीमुळें उत्तम संधी सापडून त्याचें काम सुकर झालें, असें येथें वर्णन आहे. म्हणून येथें " समाधि " हा अलंकार झाला आहे.

**टीप,**—" समुच्चय " ह्या अलंकारांत सर्व कारणें सारख्याच दर्ज्याचीं, सारख्याच सामर्थ्याचीं, आणि एकदम सुरू झालेलीं अशीं असतात " समाधि " ह्या अलंकारांत एका कारणाची क्रिया सुरू होत असतां किंवा क्रिया सुरू झालेली असतां दुसरें आकस्मिक आणि अधिक जोरदार कारण जुळून येऊन तें कार्य लवकर किंवा सुलभतेनें घडून आलें, असें विधान असतें. हा " समुच्चय " आणि " समाधि " ह्या दोन अलंकारांतील भेद विद्यार्थ्यांनीं लक्ष्यांत बाळगावा

लक्षण, वृत्त आर्या.

**वस्तू परस्परांना योग्य अशा दोन येथ जुळतात ।**
**ऐसें वर्णन असतां "सम" तो, हें सर्व सुकवि म्हणतात ॥ १७९ ॥**

एकमेकांना अनुरूप अशा दोन चांगल्या किंवा वाईट वस्तु अमुक ठिकाणीं जुळून आल्या आहेत, असें वर्णन असतें, तेथें " सम " हा अलंकार होतो.

उदाहरण, वृत्त वसंततिलका

रामासि हीच, हिजलाही सुयोग्य राम,
हे दम्पती रुचिरयोगमनोभिराम ।
अन्योन्यसंगम अहा ! विधिनें कसा हो !
केला मनोरम ? तसा बहुधा न पाहों ॥ ३१३ ॥

वि० वा० भिडे,— रा० प०, सर्ग ३, पद्य ७१

रामाला अत्यंत योग्य पत्नी हीच होय, आणि हिलाही योग्य पति रामच होय ! हें जोडपें अनुरूप संबंधामुळें फार मनोहर आहे ! परस्परांना योग्य अशा दोन माणसांचा सुंदर संबंध ब्रह्मदेवानें कसा घडवून आणला ? तसा संबंध व्यवहारांत बहुत प्रसंगीं दिसून येत नाहीं !

हें " समाचें " उदाहरण.

उदाहरण; वृत्त द्रुतविलंबित

शुचि वधू तव, तूं शुचि तत्पती, उचितसंगमसुंदर दम्पती ।
उलटले तर मास न दोन तों, रणिं दशानन मारुनि टाक तो ॥ ३१४ ॥

वि० वा० भिडे,—रा० प०,सर्ग १७, पद्य ११४.

हे रामा, तुझी बायको पवित्र आहे, तिचा पति तूंही पवित्र आहेस ! परस्परांना अनुरूप अशा दोन माणसांचा हा संयोग मनोहर होय ! ह्यासाठीं दोन महिने उलटून गेले नाहींत, तोंच त्या रावणाला युद्धामध्यें ठार मारून टाक '

येथें राम आणि सीता यांचा योग्य संयोग झाला आहे असें वर्णन आहे. हें "सम" अलंकाराचें उदाहरण.

लक्षण वृत्त अनुष्टुभ्

विरूपवस्तुसंबंध "विषमीं" कथिला असे ।
त्याच्या नाना प्रकारांत असतां मुख्य हे असे ॥ १८० ॥
भिन्नधर्मीय वस्तूंचा संयोग जर वर्णिला, ।
इष्टयत्न अनिष्टांत फळला जर दाविला, ॥ १८१ ॥
कीं कार्याचा कारणाशीं क्रियेमाधें गुणामधिं– ।
विरोध कथिला त्याला नांव दे " विषम " प्रधीं ॥ १८२ ॥

परस्पराना अनुरूप नव्हेत, म्हणजे एकमेकाशीं विरुद्ध, अशा वस्तूंची संघटना म्हणजे जुळणी वर्णिली असतां "विषम" अलकार होतो. विषमाचे अनेक प्रकार असतात त्यांपैकीं पुढें दिलेले प्रकार मुख्य होत

( क ) भिन्न भिन्न धर्मांच्या दोन वस्तु अमुक ठिकाणीं जुळलेल्या आहेत, असें वर्णन असल्यास तो विषमाचा पहिला प्रकार

( ख ) कोणी मनुष्य कांहीं इष्ट वस्तु मिळविण्याचा प्रयत्न करीत असतां त्याला ती इष्ट वस्तु मिळण्याचें बाजूलाच राहून त्याच्यावर कांहीं अनर्थ ओढवल्याचें वर्णन असतें, तेथें " विषमाचा " दुसरा प्रकार होतो

( ग ) क्रियेच्या बाबतींत कारणाशीं कार्याची भिन्नता असली तर तो " विषमाचा " तिसरा प्रकार.

( घ ) गुणाच्या बाबतींत कारणाशीं कार्याची भिन्नता असली तर तो " विषमाचा " चवथा प्रकार.

टीप.—येथें ( ग ) आणि ( घ ) ह्या दोन प्रकारासंबंधानें खुलासा करणें जरूर आहे कार्याचा गुण आणि कार्याची क्रिया ही कारणाच्या गुणासारखीं आणि क्रियेसारखीं असलीं पाहिजेत हा कवींचा संकेत. ह्या संकेताच्या उलट जर कार्याची क्रिया कारणाच्या क्रियेशीं विसदृश असली,तर ( ग ) हा प्रकार होतो,आणि कार्याचा गुण जर कारणाच्या गुणाशीं विसदृश असला, तर ( घ ) हा प्रकार होतो.

आतां ह्या चारी प्रकारांचीं आम्ही क्रमानें उदाहरणें देतों.

उदाहरण, वृत्त आर्या

कोठें लोकोत्तर तो पुरुष जयें राज्य मिळविलें भव्य ? ।
कोठें मी कवि नेणें जो एकहि सरस कल्पना नव्य ! ॥२१५॥

वि० बा० भिडे,–शिवाजीचें चारित्र्य, पद्य ४

ज्याणें टोलेजंग राज्य स्थापिलें तो अद्वितीय पुरुष शिवाजी कोणीकडे ? आणि त्याचें वर्णन करणारा क्षुद्र कवि मी कोणीकडे,—ज्या मला एकही मनोहर आणि नवीन कल्पना ठाऊक नाहीं ?

येथें " विषमाचा ( क ) " हा प्रकार आहे.

उदाहरण, वृत्त वसंततिलका.

कोठें गिरिशधनु हें खलु वज्रसार ?
कोठें युवा मृदुल कोमल हा कुमार ? ।
ह्याच्या करें गुण कसा धनुतें जडेल ?
माळा कशी मम तदीय गळां पडेल ? ॥ ३१६ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ४३

या पद्यांत " विषमाचा (क)" प्रकार आहे.

उदाहरण, वृत्त सौदामिनी.

कुठें कोमला ही शिरीषापरी ? कुठें कर्कशा यक्षिणी किन्नरी ? ।
न ही लाभतां जन्म माझा फुका, असे हीच योग्या मला कामुका॥३१७॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १६, पद्य २६

हा सीतेला पाहून रावणाचा स्वगत उद्गार आहे.

शिरीषाप्रमाणें मृदु अशी ही सीता कोणीकडे ? आणि यक्षिणी आणि किन्नरी-ज्या मी आजपर्यंत भोगिल्या, त्या कोणीकडे ? इ०.

येथें " विषमाचा (क)" प्रकार आहे

उदाहरण; वृत्त क्षमा

मृदुलतनु कुठें जानकी ? हाय हा ! खर विरह कुठें गात्रदाही अहा ! ।
दिवस तरि कशी कंठि ही कोमला ? स्थिति खचित इची पाहवेना मला॥३१८॥

वि० वा० भिडे,–रा० प० सर्ग १५ पद्य ४०

अशोकवनिकेंत रावणानें सीतेला ठेविलें होतें, तिला मारुतीनें पाहिलें, त्या वेळचा हा मारुतीचा उद्गार आहे.

ही कोमलदेहाची जानकी कोणीकडे ? आणि देह जाळणारा आणि अत्यन्त दुःसह असा हा तिला रामापासून वियोग घडला आहे तो कोणीकडे ? ही दिवस कशी कंठीत असेल ? मला हिची अवस्था अगदीं पाहवत नाहीं !

येथें मृदुलतनू अशी जानकी; आणि गात्रदाही खर विरह, ह्या दोन भिन्नधर्मीय वस्तु सीतेच्या ठायीं जुळल्या आहेत असें वर्णन आहे हा " विषमाचा (क)" प्रकार होय.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

रिपुस दंड झटे करुं रावण, खपुरदाह मिळे फळ त्या पण ।
प्लवग धावत तेथुनि ऊठला, पुर समस्तहि जाळित सूटला ॥ ३१९ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य ८१.

मारुतीचें पारिपत्य करण्यासाठीं रावणानें त्याच्या शेपटीस आपल्या सेवकांकडून चिंध्या गुंडाळवून त्या पेटविल्या त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे.

आपल्या शत्रूचें म्हणजे मारुतीचें पारिपत्य करण्याचा रावणानें यत्न केला आणि स्वतःचें नगर म्हणजे लंका जळणें हें त्याला फळ मिळालें ! मारुति रावणाच्या सभेंतून उठून त्या सर्व नगरांत धावूं लागला आणि घरें जाळूं लागला !

येथें रावणाला मारुतीचें पारिपत्य करणें हें इष्ट साधावयाचें होतें, तें घडून न येता त्याच्याच पुराचा दाह होणें हें अनिष्ट प्राप्त झालें हा " विषमाचा ( ख )" हा प्रकार

उदाहरण; वृत्त आर्या

आबाचें बल भंगिन, त्यास पराभविन, संयत करीन ।
ही यवनाशा जिरली, अनुभवि तो ती दशा स्वयें दीन ॥ ३२० ॥

वि० वा० भिडे, शिवाजीचें चारित्र्य, पद्य ३३.

कल्याणचा सुभा सर करण्यासाठीं शिवाजीनें आबाजी सोनदेवास पाठविलें, त्या प्रसंगाला उद्देशून हें वर्णन आहे

आबाजीचें सैन्य मी कापून काढीन, आणि आबाजीचा पराभव करीन, आणि त्याला कैद करीन, अशी जी मौलाना अहमद सुभेदाराची महत्त्वाकांक्षा होती, ती निष्फळ झाली, आणि त्याला स्वतालाच ती दशा प्राप्त झाली ( म्हणजे त्याचेंच सैन्य कापून काढलें गेलें आणि तो स्वताच कैद केला गेला ) !

येथें इष्ट न साधता अनिष्ट पदरात पडलें, असें वर्णन आहे. हा " विषमाचा ( ख )" हा प्रकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या

ह्या काफिरास रोधूं, जेणूं, मारूं, चिरूं, अशी आशा ।
ह्या यवनांची जिरली, तेच उलट पावले स्वयें नाशा ॥ ३२१ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य १३७.

शिवाजी इत्यादि ह्या चार काफिरांना आपण चंदनगडाकडे जाऊं न देतां त्यांना आडवूं, जिंकूं, ठार मारूं, चिरून काढूं, ही जी त्या चार यवनांची उमेद होती, ती जिरून उलट ते स्वताच नाश पावले !

येथें इष्ट साधणें बाजूलाच राहून भलताच परिणाम झाल्याचें वर्णन आहे. हें " विषम अलंकाराच्या ( ख )" ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

परिरंभणकालीं त्वां पूर्वी थंडाविलें मला ।
परि त्वद्विरहें आज मम हा देह भाजला ! ॥ ३२२ ॥

पूर्वी आलिंगनाच्या वेळीं हे प्रिये, तू स्पर्शानें माझें अंग शीतल केलेंस, पण तुझ्याच विरहानें आज माझा देह होरपळत आहे !

येथें " तूं " हें कारण; त्याची ' थंडाविणें " ही क्रिया, " विरह " हें कार्य, त्याची " भाजणें " ही उलट क्रिया. येथें दोन क्रियांत विरोध आहे म्हणून येथें "विषमाचा ( ग )" हा प्रकार आहे

उदाहरण; वृत्त स्वागता.

कृष्णवर्ण गरलांकित होते बाण दाशरथिचेच अहो ! ते ।
कीर्ति त्याप्रति तथीं अवदात अर्पिली तुमुल त्या समरांत ॥ ३२३ ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग २, पद्य ८६.

रामाचें बाण विषानें माखलेले होते म्हणून ते काळे होते. ह्या काळ्या बाणांनीं रामाला रणांगणावर शुभ्र कीर्ति मिळवून दिली !

येथें कृष्णवर्ण ( बाण ) आणि अवदात ( कीर्ति ), ह्या कारणकार्यांत गुणाच्या बाबतींत विरोध आहे. हा " विषमाचा ( घ ) " प्रकार

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

आश्चर्य गा महीपाला ! वाटतें मम अंतरीं ।
त्वद्यज्ञधूम काळाही तो शुभ्र यश भू भरी ! ॥३२४॥

हे राजा, मला हें आश्चर्य वाटतें कीं तू करतोस त्या यज्ञात धूर काळा असतो, पण तो तुझें शुभ्र यश भूमीला भरतो !

येथें कवीनें कल्पिलेलें धूम हें कारण काळें असून यशोरूप कार्य शुभ्र आहे, असें म्हटलें आहे हा "विषमाचा ( ग )"प्रकार होय. येथें कार्यकारणात गुणांच्या संबंधानें भिन्नता आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

मसीनामक जें द्रव्य तें विचित्र खरोखर ।
स्वता काळेंहि तें ज्ञानें जगाला करि भास्वर ॥ ३२५ ॥

नि० वा० भिडे,—संकीर्ण, ८९

शाई ( मसी ) ह्या नांवाचा जो पदार्थ तो खरोखरीं विलक्षण आहे ' हा पदार्थ स्वता काळा असून लोकांना ज्ञान देऊन उज्ज्वल करितो !

येथें कारणाचा काळेपणा हा गुण कार्याच्या भास्वरतेशी विसंवादी आहे. हा " विषमाचा ( घ ) ' प्रकार होय

लक्षण; वृत्त आर्या

**आधेय थोर यास्तव अप्रकृताधार थोर तो आहे, ।**
**आधार थोर तरिही आधेय प्रकृत त्यांत नचि राहे ॥ १८३ ॥**
**ह्या कीं अन्य सरणिनें वर्ण्याचें विभव दाखवील कवी ।**
**तरि ती "अधिकालंकृति,"अधिक फळें वर्ण्य वस्तुच्या विभवीं॥१८४॥**
**प्रस्तुत आधार असो कीं आधेयहि, फळेल उत्कर्ष —।**
**ह्याचा तर तो "अधिकचि" उपजवि रसिकांचिया हृदयिं हर्ष ॥१८५॥**

आधेय म्हणजे स्थलविशेषीं ठेवावयाची वस्तु, आधार म्हणजे वस्तुविशेष ठेवावयाचें स्थळ. " बरणींत मोरंबा आहे " ह्या वाक्यात " बरणी " हा आधार, आणि " मोरंबा " हें आधेय

मोठ्या आधेयाला समावून घेणारा आधार मोठा आहे ह्या वाक्यात आधाराचा मोठेपणा प्रमुखत्वानें वर्णिला आहे आणि आधेयाच्या मोठेपणाला गौणत्व दिलें आहे तरी फलितार्थानें आधेयाचा मोठेपणा दाखविला जातो. हा " अधिकाचा ( क ) " प्रकार होय.

आधार मोठा असून सुद्धां त्यांत आधेय राहू शकत नाहीं असें विधान असतां अधिकाचा ( ख ) प्रकार होतो

ह्या दोन्हीं प्रकारांत आधेयच प्रकृत असतें आणि आधेयाचाच मोठेपणा कवि सांगतो,-( क ) मध्यें त्याला गौण वाक्यांगांत स्थान देऊन, आणि ( ख ) मध्यें त्याला प्रधान वाक्यांगांत स्थान देऊन

उदाहरण; वृत्त प्रहरणकलिता

अतिवितत दिसे जगदुदर मला भजनपर जनें स्मृतपदयुगला ! ।
अतुल रघुवरा ! तवहि यश तयें अविरत धरिजे स्थिर गलितभयें ॥३२६॥

वि० वा० भिडे,-रा० प, सर्ग १, पद्य २.

विश्वाची पोकळी फार विस्तीर्ण आहे असें मला वाटतें, कारण भक्त जन ज्याच्या चरणाचें स्मरण करतात अशा रघुकुलश्रेष्ठा रामा ! तुझें अपरंपर यश त्या पोकळीनें निर्भ-यपणें एकसारखें समावून घेतलें जातें !

येथें " यश " हें प्रस्तुत आहे. हे यश अपरंपार आहे असें असून तें यश जगाच्या पोकळीच्या रूपाच्या आधारांत समावतें, ह्यावरून ती जगाची पोकळी खरोखर फारच मोठी असली पाहिजे, असें म्हटलें आहे. येथें आधार जगाची पोकळी अप्रस्तुत असून तिला प्राधान्य देण्यात आलें आहे, आणि अशा रीतीनें प्रकृत जें यश, त्याचा उत्कर्ष दाखविला आहे हें " अधिकाच्या ( क ) " ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

नारदागमनानंद विष्णूदरिं न मावला ।
अनन्त भुवनांना जें प्रशस्ततम दे स्थला ॥ ३२७ ॥

असंख्य भुवनांना ज्यांत अघळपघळ अवकाश ( स्थळ ) मिळतो, त्या विष्णूच्या उदरांत नारदाच्या आगमनानें विष्णूला झालेला आनंद समावू शकला नाहीं !

येथें " आनंद " ही आधेयभूत वस्तु प्रकृत आहे " विष्णूदर " ही आधार-भूत वस्तु अप्रकृत आहे. आनंदाचा मोठेपणा प्रमुख वाक्यांत वर्णिला आहे.

हें " अधिक अलंकाराच्या ( ख ) " प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त आर्या.

**रिपु दण्डय असुनि त्यातें दंडूं न शकुनि नर बलाभावें ।**
**दंडी तत्पक्षीया, ह्या वचना " प्रत्यनीक " समजावें ॥१८६॥**

शत्रूनें आपला अपकार केलेला असतो, आणि त्याचें पारिपत्य करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नसल्याकारणानें आपण त्या शत्रूच्या पक्षाच्या कोणातरी माण-सावर आपला राग काढीत आहों असें वर्णन असता " प्रत्यनीक " ह्या नावाचा अलंकार होतो

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

'सूर्यास दंडूं न शके आतपें गज जर्जर ।
सूर्यमित्रां सरी पद्मां विध्वसी तो निरंतर ॥ ३२८ ॥

सूर्याच्या उन्हानें जर्जर झालेला हत्ती सूर्याचें पारिपत्य करावयाला असमर्थ होत्साता तळ्यांत जाऊन सूर्याचीं मित्रभूत जीं पद्में त्यांचा विध्वंस करतो ?

एकाचा राग दुसऱ्यावर काढला असें ह्या पद्यांत सांगितलें आहे हें "प्रत्यनीक" अलंकाराचें उदाहरण होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**दो वस्तूंचीं तुल्य चिन्हें असतां दृगुपस्थित ।**
**गुणोत्कर्षे तिजासि ही झाकी ही उक्ति "मीलित" ॥१८७॥**

समान धर्माच्या दोन वस्तु डोळ्यांपुढें असून ( दृगुपस्थित ) त्यांपैकीं एकीचा धर्म जोरदार स्वरूपाचा असल्याकारणानें ही वस्तु त्या कमी जोरदार धर्माच्या वस्तूस झाकून टाकते, आणि त्यामुळे ही कमी जोरदार धर्माची वस्तु ओळखून काढणें अशक्य होत आहे, अशा अर्थाचें विधान असतें, तेथें " मीलित " हा अलकार होतो.

लक्षण, वृत्त आर्या

धवलघनाकीर्ण नभीं ह्या समयीं बक अनेक संचरले ।
घनपटलीं न बकांचें होऊं वीरांस भान ह्या शकलें ॥ ३२९ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य १७.

ह्या तिसऱ्या प्रहराच्या समयीं पांढऱ्या ढगानीं व्याप्त अशा आकाशामध्यें अनेक बगळे संचरत होते, शिवाजी, तानाजी, एसाजी, आणि बाजी, ह्या चवघा वीरांना मेघपटलांतील बकांचें भान किंवा दर्शन होऊं शकत नव्हतें !

येथें अत्यन्त उज्वल अशा मेघांत बगळे अगदीं लोपून गेले होते, असें म्हटलें आहे हें " मीलिताचें " उदाहरण

लक्षण, वृत्त आर्या

**" एकावली " असे ती स्थापि कवि निषेधि वा समसरानें ।**
**श्रेणींत पूर्वपद त्या पुढचें जोडुनि विशेषणत्वानें ॥ १८८ ॥**

कांहीं वस्तूंची एक श्रेणी म्हणजे मालिका असून तिच्यातील आधींच्या कामिकाला (पूर्वपद) पुढचा क्रमिक विशेषण ह्या नात्यानें जोडून त्या पहिल्या क्रमिकाची स्थापना किंवा निषेध त्याच सरणीनें म्हणजे त्याच प्रकारची वाक्यरचना करून करतो, तेव्हां " एकावली " हा अलंकार होतो.

[स्थापिणें म्ह० अमुक वस्तु अमुक रूपाची आहे असें सांगणें. निषेधिणें म्ह० अमुक वस्तु अमुक रूपाची नाहीं असें म्हणणें ]

लक्षण; वृत्त आर्या

**श्रेणींत करणरूपी वर्णित साऱ्याहि वस्तु असतात ।**
**किंवा अकरणरूपी, दोन असे हे प्रकार होतात ॥ १८९ ॥**

एका श्रेणीत काहीं वस्तु असतात, आणि प्रत्येक मागल्या वस्तूच्या संबंधानें पुढच्या वस्तूनें करणरूपी वाक्यांत किंवा अकरणरूपी वाक्यात काहीं विधान केलेलें असतें, अशामुळें "एकावलीचे" दोन प्रकार होतात.

उदाहरण वृत्त आर्या.

राज्यांत समृद्ध पुरें, उंच पुरांतील गृहें, गृहात जन–।
उद्योगशील सारे, उद्योग स्तुत्य देति विपुल धन ॥ ३३० ॥

अशोकाच्या साम्राज्यात सर्व शहरें संपन्न होतीं, प्रत्येक शहरांत उंच उंच वाडे होते, प्रत्येक वाड्यांतील सर्व लोक उद्योगी होते, आणि प्रत्येक उद्योग स्तुत्य असून विपुल धन देणारा होता !

येथें राज्य, पुरें, गृहें, जन, उद्योग, आणि धन, अशा सहा पदार्थांची एक श्रेणी आहे. ह्या श्रेणींतील पहिल्या पदार्थाचें वर्णन दुसऱ्या पदार्थानें करणरूपी सरणीनें केलें आहे, दुसऱ्या पदार्थाचें वर्णन त्याच सरणीनें तिसऱ्या पदार्थानें केलें आहे; तसेंच तिसऱ्याचें चवथ्यानें, चवथ्याचें पांचव्यानें, आणि पांचव्याचें सहाव्यानें केलेलें आहे.

हा "एकावलीचा (क)" हा प्रकार होय

उदाहरण, वृत्त आर्या.

ह्या परराज्यांत न पुर न कुटुंबें बाटगीं विपुल ज्यांत ।
ह्यांत न एकहि ज्यांतिल नरनारी पापकृति न करितात ॥ ३३१ ॥
पापकृतींत न एकहि जी खचवि न देश अधिक दास्यांत ।
परदेशी परधर्मी प्रभु देशाचा करी महाघात ! ॥ ३३२ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजीची म्हाद्‌जीप्रत उक्ति; पद्यें ७४, ७६.

ह्या यवनांच्या राज्यात असा एकही गाव नाहीं, कीं ज्यांत पुष्कळ बाटगीं कुटुंबें नाहींत, ह्या बाटग्या कुटुंबांत असें एकही कुटुंब नाहीं, कीं ज्यांतील स्त्रीपुरुष पापें करीत नाहींत, ह्या पापांत असें एकही पाप नाहीं, कीं जें दास्याचीं बंधनें अधिक दृढ करीत नाहीं. देशावर परदेशी आणि परधर्मी राजाचें राज्य असल्यानें देशाची मोठी हानि होते !

येथें पुर, कुटुंबें, नरनारी, पापकृति, ह्या चार वस्तूंची एक श्रेणी आहे. मागल्या प्रत्येक वस्तूचें पुढच्या प्रत्येक वस्तूनें अकरणरूपी वाक्यानें काहीं विशिष्ट सरणीनें वर्णन केलें आहे. "हा एकावलीचा (ख)" हा प्रकार.

उदाहरण; वृत्त वंशस्थ.

पुरामधें कोसलकन्यकाधवा दिसेचना एकहि हर्म्य तेधवां --।
न शोभलें तोरणिं जें, न तोरण शिलीमुखांचा न जयावरी गण॥३३३॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १, पद्य ५६

अयोध्या नगरीमध्यें दशरथाला (कोसलकन्यकाधवा) अशी एकही हवेली दिसली नाहीं कीं जिला तोरण शोभा देत नव्हतें, आणि असें एकही तोरण दिसलें नाहीं कीं ज्याच्यावर भ्रमरांचा थवा नव्हता !

हें " एकावलीच्या ( ख ) " ह्या प्रकाराचें उदाहरण.

उदाहरण, वृत्त मंजुभाषिणी

नचि रामकार्मुकनिरस्त एकही शर जो शिरे द्रुत न यातुविग्रहीं ।
रणिं यातुविग्रह असा न एकही वरिली जयें न शयना तदा मही ॥३३४॥

विं० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १९, पद्य ७२.

रामाच्या धनुष्यावरून सुटलेल्या बाणात असा एकही बाण नव्हता कीं जो तत्क्षणीं राक्षसाच्या शरीरांत ( यातुविग्रहीं ) शिरला नाहीं; आणि असें एकाही राक्षसाचें शरीर नव्हतें कीं ज्यानें बाण शिरताच भूमीवर लोळण घेतली नाहीं !

हें " एकावलीच्या ( ख ) " ह्या प्रकाराचें उदाहरण

उदाहरण; वृत्त कलहंस.

बघ येथ एकहि दिसे सरसी न जल जींस शोभवि न कर्दमहीन ।
जल वा न जें न कमलीं हरि चेत, सगळें मनोरम असे शरदेंत ॥ ३३५ ॥

वि०वा० भिडे,–रा० प०, सर्ग १४, पद्य १४

राम लक्ष्मणाला म्हणतो —पहा, येथें असें एकही तळें दिसत नाहीं कीं ज्याला स्वच्छ जल शोभा देत नाहीं ! आणि असें एकही जल नाहीं कीं जें कमलांनीं प्रेक्षकाचें चित्त ( चेत ) आनंदित करीत नाहीं; शरदृतूंत सगळे देखावे सुंदर असतात !

हें " एकावलीच्या ( ख ) " प्रकाराचें उदाहरण

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**पूर्वानुभूतवस्तूची स्मृति तत्तुल्यदर्शनें–।**
**झाल्याची उक्ति असतां "स्मृति" ती म्हणिजे जनें ॥१९०॥**

पूर्वी पाहिलेल्या वस्तूचें स्मरण तिच्यासारखी नवीन दुसरी एखादी वस्तु पाहून झाल्याचें वर्णन असतें, तेथें " स्मृति " हा अलंकार होतो. ह्या अलंकाराला " स्मरण " असेंही म्हणतात

उदाहरण, वृत्त प्रहर्षिणी

सीताक्षिस्मरण मृगीदृशां बघून होओनी रघुवर फार होइ दून ।
तच्चित्ता व्यथित करी अतीव मोह, मोहाचा नच खुडवे नरा प्ररोह ! ॥३३६॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १२, पद्य २७.

हरिणींचे डोळे पाहून रामाला सीतेचे डोळे आठवले, आणि तो फार दुःखी झाला, त्याच्या अंत करणाला मोहानें फार पीडा झाली, कोणाही माणसाला मोहाचा उद्भव तोडून टाकतां येत नाहीं !

येथें प्रथमार्धांत " स्मृति " हा अलंकार आहे.

उदाहरण, वृत्त प्रहर्षिणी

वृक्षस्था परिसुनि गान अण्डजांचें खिन्नत्वें मन भरलें रघूद्वहाचें !
देखोनि रघुपति कोकिपित्सजालो सीतेचे स्मरुनि शिरोज खिन्न झाला ॥३३७॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १२, पद्य २४.

झाडांवर बसलेल्या पक्ष्यांचें (अण्डजांचें) गायन ऐकून रामाचें चित्त उदास झालें ! मोरांचे पिसारे पाहून रामाला सीतेच्या केशाचें स्मरण होऊन तो उदास झाला !

येथें " स्मृति " हा अलंकार आहे.

उदाहरण, वृत्त प्रहर्षिणी.

कोकाचें युग, पिकगान, कंजपर्ण, सिंहाची तनु कटि, केतकी सुवर्ण ।
हें सारें विपिनिं करी रघूद्वहास भार्येची स्मृति करवूनियां उदास ॥ ३३८ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १२, पद्य २५

चक्रवाक(कोक)पक्ष्यांचें जोडपें,कोकिळांचें गायन,कमळाचें पान,सिंहाची बारीक कंबर, आणि पिवळसर पाढरी केतकी, इत्यादि सर्व पदार्थ पाहून रामाला सीतेचें स्मरण होऊन औदासीन्य वाटलें !

येथें पाहिलेल्या कोणच्या वस्तूनीं कोणच्या वस्तूचें स्मरण करून दिलें, हें कथित नाहीं, तथापि हा " स्मृति " अलकारच होय

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**सादृश्यें प्रस्तुतभ्रांति अप्रस्तुतविलोकनें– ।**
**उपजे तो अलंकार " भ्रांतिमान् " म्हणिजे जनें ॥ १९१ ॥**

अप्रस्तुत अशी वस्तु पाहून तिच्या सारखी जी प्रस्तुत वस्तु तिची भ्रांति उत्पन्न झाल्याचें वर्णन असतें, तेथें " भ्रांतिमान् " अलंकार होतो असें लोक म्हणतात

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

स्निग्धश्यामल रामाला विलोकूनि वनस्थलीं ।
मेघ ह्या बुद्धिनें नृत्य मांडियेलें शिखावलीं ॥ ३३९ ॥

अरण्यामध्यें तेजस्वी आणि काळसर अशा रामाला पाहून हा मेघ आहे अशी मोराना भ्रांति पडून ते नाचूं लागले !

येथें राम मेघाप्रमाणें काळा असल्याकारणानें मोरांना तो मेघच आहे अशी भ्रांति झाली असें वर्णन आहे. हा " भ्रांतिमान् " अलकार.

टीप,—रूपकामध्यें एक वस्तु दुसरी नव्हे अशी वक्त्याला जाणीव असते. " भ्रांतिमान् " अलकारात अशी जाणीव नसते. भ्रांतिमान् अलकारांत वक्त्याचा खरोखरींच खोटा ग्रह झालेला असतो.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

शुकतुंडीं पडे भृंग पलाशकलिकाभ्रमें ।
शुक खाया निघे त्यातें, भृंग जंबू तया गमे ॥ ३४० ॥

पळसाच्या फुलाची ही कळी आहे अशा भ्रांतीनें भुंगा राघूच्या तोंडांत पडला ! राघूही त्या भृंगाला जांभूळ समजून खावयाला निघाला !

हें " भ्रांतिमान् " अलकाराचें उदाहरण होय.

राघूचें तोंड तांबडें असतें आणि पळसाची कळी तांबडी असते म्हणून भुंग्याला तें तोंड ही पळसाची कळीच आहे, असा भ्रम झाला. भुंगा काळा असतो आणि जांभूळही काळेंच असतें म्हणून राघूला भुंगा हें जांभूळ आहे असा भ्रम झाला

पहिल्या उदाहरणांत शिखावलांच्या एकपक्षीय भ्रांतीचें वर्णन आहे. दुसऱ्या उदाहरणांत शुक आणि भृंग ह्यांच्या उभयपक्षीय भ्रांतीचें वर्णन आहे ह्या दुसऱ्या उदाहरणांतील दोन्ही अर्ध " भ्रांतिमान् " अलंकाराचींच उदाहरणें होत

लक्षण, वृत्त आर्या

**उपमेयाचा गौरव, उपमानाचा असे तिरस्कार ।**
**तेव्हां "प्रतीप" नामक होत असे कवि म्हणे अलंकार॥१९२॥**
**तेथें " प्रतीप " चि जिथें म्हणिजे उपमेयसेंचि उपमान ।**
**ह्या दोन्ही रीतींनीं कवि उपमानास दावि अपमान ॥ १९३ ॥**

जेथें उपमेयाचा गौरव केलेला असतो, किंवा उपमानाला तुच्छता दर्शविलेली असते, तेथें " प्रतीप " हा अलंकार होतो तसेंच जेथें उपमान हें उपमेयासारखेंच आहे असें म्हटलेलें असतें, तेथेंही " प्रतीप " अलंकार होतो. ह्या दोन्ही प्रकारांनीं उपमानाचा कवीनें धिक्कार केलला असतो

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्

जनिं व्यर्थ शशांकाची गमें तन्मुख देखतां ।
गात्रासदृश सीतेच्या वाटते पद्मिनीलता ॥ ३४१ ॥

बि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १०, पद्य १२

शूर्पणखा रावणास म्हणते.—

सीतेचें मुख पाहिलें असतां चंद्राची उत्पत्ति ( जनि ) व्यर्थ आहे असें वाटतें ( आल्हाद द्यावयाला सीतेचें मुख असता चंद्राचें प्रयोजन उरत नाहीं म्हणून ). पद्मिनी लता सीतेच्या शरीरासारखी ( नाजुक ) आहे असें कोणालाही वाटेल '

आल्हाद देणें ह्या गुणांत चंद्राची प्रसिद्धि आहे. आल्हाद देण्याचें काम करावयाला सीतेचें मुख असतां चंद्राची उत्पत्ति व्यर्थ होय, ह्या विधानानें चंद्राचें वैयर्थ्य दाखविलेलें आहे, म्हणून हें " प्रतीपाचें " उदाहरण होय.

द्वितीयार्धांत सीतेचें शरीर वास्तविक उपमेय आणि पद्मिनी लता उपमान असून पद्मिनी लता उपमेय आणि सीतेचें शरीर उपमान केलें आहे. हेंही " प्रतीपच " होय.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**पूर्ण सादृश्ययोगानें प्रस्तुताप्रस्तुतांमधीं —।**
**नाकळे भेद ही उक्ति " सामान्य " म्हणती प्रधी ॥ १९४ ॥**

जेव्हा प्रस्तुत आणि अप्रस्तुत अशा दोन्ही वस्तु अगदीं सारख्या सारख्या असल्याकारणानें त्या दोहोंपैकीं प्रस्तुत वस्तु कोणची आणि अप्रस्तुत कोणची हें समजत नाहीं असें वर्णन असतें तेव्हा " सामान्य " अलंकार होतो.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

प्रतिबिंबें रावणाचीं आदर्शांतिल अंगदा ।
दिसतां रावण खरा न कळे अंगदा तदा ॥ ३४२ ॥

शिष्टाई करावयासाठीं अंगद रावणाकडे गेला असतां रावणाच्या सभागृहांत ठेविलेल्या आरशांत रावणाचीं प्रतिबिंबें पडलीं होतीं. त्यामुळें खरा रावण कोणता हें अंगदाला कळू शकलें नाहीं !

येथें खरा रावण आणि रावणाचीं प्रतिबिंबें, हीं सर्व अंगदाला दिसत होतीं. परंतु त्यांतील खरा रावण कोणता हें सर्व मूर्तींच्या अत्यंत सादृश्यामुळें अंगदाला ओळखितां आलें नाहीं असें वर्णन आहे म्हणून हें "सामान्य" अलंकाराचें उदाहरण होय.

**टीप**—वर्णनात जेथें दोन्ही वस्तु प्रस्तुत असतात आणि त्याच्यात अत्यन्त सादृश्य असल्यामुळें ही वस्तु आणि ती वस्तु ह्यांच्यात भेद करतां येत नाहीं, तेथें चारुता नसल्याकारणानें "सामान्य" हा अलंकार होऊं शकत नाहीं

उदाहरण, वृत्त आर्या

कांहीं कांहीं तरुंवर वायस कोकिल तयास आढळले ।
हा वायस हा कोकिल हा भेद न वीर हे करूं शकले ॥ ३४३ ॥

वि० वा० भिडे, कमळीची सुटका, पद्य २०.

येथें वायस आणि कोकिल दोन्ही प्रस्तुत असून त्यांच्यांत भेद करतां येत नव्हता असें म्हटलें आहे. म्हणून यांत सामान्य अलंकार आहे असें म्हणतां येत नाहीं.

**टीप,**—"भ्रांतिमान्" अलंकारात वक्त्याच्या डोळ्यापुढें एकच वस्तु उपस्थित असते, आणि ह्या उपस्थित वस्तूवर तेथें उपस्थित नसलेल्या वस्तूची भ्रांति होते; म्हणजे पुढें दिसत असलेली वस्तु तेथें दिसत नसलेली वस्तूच आहे, असा खोटा ग्रह वक्त्याचा होतो. "मीलित" ह्या अलंकारांत दोन्ही वस्तु उपस्थित असतात, परंतु एका वस्तुचा जोर अधिक असल्या कारणानें दुसरी वस्तु दिसत नाहीं "सामान्य" ह्या अलंकारांत दोन्ही वस्तु दिसत असतात, परंतु दोन्हींचा देखावा सारखा असल्या कारणानें प्रकृत वस्तु कोणची आणि अप्रकृत कोणची ह्याचा विवेक करिता येत नाहीं.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्

नसे प्रसिद्ध आधार तरी आधेय तें ठरे, ।
कार्य जो एक करि तो अशक्य करि दूसरें ॥ १९५ ॥
त्याच काळीं त्याच रूपें वस्तु नाना स्थलीं दिसे, ।
हें वर्णन असे तेणें "विशेष"त्रय होतसे ॥ १९६ ।

एकाद्या वस्तूचा व्यवहारांत प्रसिद्ध असा जो मानला जाणारा आधार, तो नसतांना सुद्धां ती वस्तु राहूं शकते असें वर्णन ( क ); कांहीं कार्य करणारा मनुष्य एकच कार्य करूं इच्छीत असला तरी त्याच्या हातून त्याच वेळीं दुसरेंही कार्य केलें जात आहे असें वर्णन ( ख ), एक वस्तु एकाच काळीं आणि एकाच रूपांत अनेक

स्थळीं दिसत आहे असें वर्णन ( ग ), अशा तीन प्रकारच्या वर्णनांना " विशेष " अलंकार म्हणतात

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

वाल्मीक्यादि कवि स्वर्गा गेले तरिहि तद्गिरा ।
जनां भूमिस्थितां देती अद्यापिहि मुदा स्थिरा ॥ ३४४ ॥

वाल्मीकि इत्यादि कवि स्वर्गाला गेले असले तरी अझूनसुद्धां त्यांचीं वचनें ( गिरा ) ह्या पृथ्वीवरील लोकांना सकस आनंद देतात !

कवींच्या गिरा म्हणजे उक्ति ह्या आधेय होत त्यांचे आधार कवि. कविरूप आधारांवाचून गिरा हें आधेय राहूं शकतें असें येथें विधान आहे.

हा " विशेषाचा ( क ) " हा प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

यवनां काळ अशा तुज निर्मुनि निर्मी हिरण्यगर्भ शिवा !—।
दुसरा विष्णू ज्यानें दैत्य वधुनि आणिलें जगांत शिवा ॥ ३४५ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य १९४.

यवनांचा विध्वंस करणाऱ्या तुला, हे शिवाजी, उत्पन्न करून ब्रह्मदेवानें (हिरण्यगर्भानें) दुसरा विष्णूच उत्पन्न केला, ज्या विष्णूनें दैत्यांचा संहार करून जगाचें कल्याण ( शिव ) केलें !

येथें शिवाजीला उत्पन्न करून ब्रह्मदेवानें दुसरा विष्णूच उत्पन्न केला, असें म्हटलें आहे. हा " विशेषाचा ( ख ) " हा प्रकार होय.

उदाहरण; वृत्त आर्या

मम शांति, बुद्धि, गृहिणी, विश्रांति, सखी, प्रपंचसंस्थाही ।
हरिली हरून पत्नी, हरिलें मम काय अंतकें नाहीं ? ॥३४६॥

कोणी विधुर म्हणतो —

यमानें माझ्या पत्नीला हरून माझी शांति, बुद्धि, घरकरीण, विश्रांति, मैत्रीण आणि संसाराची मांडणी, ही हरण केली ! यमानें माझें काय हरण केलें नाहीं ? सर्व काही हरण केलं !

येथेंही " विशेषाचा ( ख )" हा प्रकार आहे.

उदाहरण; वृत्त द्रुतविलंबित.

मजसि मूर्ति दिसे तुमची स्थिर पुढुनि, मागुनि, अंतरिं, बाहिर, ।
हरपतां तुमची स्मृति अंतरीं मजसमा हतका न दुजी खरी ॥ ३४७ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य १४

रामाला कळवावयाचा निरोप सीता मारुतीस सांगत आहे.

हे पतिराज, मला तुमची मूर्ति पुढें, मागें, आत, आणि बाहेर, दिसत आहे. तुमची स्मृति माझ्या अंतःकरणांतून ( अंतरीं ) नष्ट झाली तर माझ्यासारखी दुर्दैवी मीच !

येथें राम हा एकच असून तो सीतेला भिन्न स्थळीं एकरूपच दिसत आहे, असें वर्णन आहे हें " विशेषाच्या ( ग ) " प्रकाराचें उदाहरण.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**श्रेष्ठ ह्या गुण वस्तूचा घेतसे निकटस्थ ती, ।**
**ही उक्ति असतां होते "तद्गुणाख्य" अलंकृति ॥ १९७ ॥**

जवळ असलेली ( निकटस्थ ) ती वस्तू ह्या वस्तूचा गुण उत्कट म्हणजे जोरदार ( श्रेष्ठ ) असल्याकारणानें घेत आहे, असें वर्णन असतां " तद्गुण " नांवाचा ह्या अलंकार होतो

उदाहरण, वृत्त आर्या

असुनि तरुदलें हिरवीं मावळत्या रविच्चिया रुधिर किरणीं—।
झालीं तांबुस, जाणों नव पल्लव दे वसंत तरुंस झणीं ॥ ३४८ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य २७.

झाडांचीं पानें मूळचीं हिरवीं असून मावळत्या सूर्याचीं तांबडीं किरणें त्याच्यावर पडल्याकारणानें ती तांबूस झालीं,—जणों काय वसंत ऋतूच्या आगमनानें त्यांना नवीन पल्लव फुटले आहेत ( नवीन पल्लव तांबडे असतात म्हणून ! )

येथें हिरव्या पानानीं आपला हिरवा रंग टाकून जोरदार तांबडा रंग स्वीकारला असें वर्णन आहे हा " तद्गुण " अलंकार होय

टीप—ह्या अलंकाराच्या आणि पुढें येणाऱ्या "अतद्गुण" अलंकाराच्या लक्षणांत योजलेला " गुण " हा शब्द केवळ रंगाचाच वाचक आहे असें नव्हे. "गुण" ह्या शब्दामध्यें रुचि, कठिणपणा, स्वच्छपणा, पवित्रपणा, इ० गुणांचाही अंतर्भाव होऊं शकतो.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्.

**गुण ह्या वस्तुचा श्रेष्ठ असतां निकटस्थ ती ।**
**तो न घेइ अशी उक्ती " अतद्गुण " अलंकृती ॥ १९८ ॥**

ह्या वस्तूचा गुण उत्कट म्हणजे जोरदार ( श्रेष्ठ ) असून देखील ती जवळ असलेली (निकटस्थ) वस्तु तो गुण ग्रहण करीत नाहीं असें वर्णन असता "अतद्गुण" अलंकार होतो.

उदाहरण; वृत्त आर्या.

ह्या यवनाच्या कज्जलसन्निभ दाढीमिशा असुनि काळ्या ।
तन्निकटस्थहि दंतावलि दिसल्या शुभ्र, लवहि न निराळ्या ॥ ३४९ ॥

वि० वा० भिडे,—कमळीची सुटका, पद्य ३५.

ह्या मुसलमानाच्या दाढीमिशा अगदीं काजळासारख्या काळ्या कुळकुळीत होत्या, तरी त्यांच्यामध्यें असलेल्या त्याच्या दंतपंक्ति पांढऱ्या शुभ्र दिसत होत्या; ह्या दंतपंक्ति बिलकूल निराळ्या रंगाच्या झाल्या नाहींत !

येथें त्या यवनाच्या काळ्या दाढीमिशांमुळें त्याच्या दांतावर काळेपणाची छटा आली नाहीं, असें वर्णन आहे, म्हणून येथें " अतद्गुण " अलंकार होत आहे.

उदाहरण, वृत्त रथोद्धता.

त्वज्जलीं जरि करी निमज्जन साधु वंद्य अथवा असज्जन ।
निर्मलत्व तव हें दुणावतें नैव, नैव अथवा उणावतें ॥ ३५० ॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग ७ पद्य ८२.

सीता गंगेस म्हणते:—

हे गंगे, तुझ्या पाण्यांमध्यें पूज्य साधूनें स्नान केलें असता पाण्याची निर्मलता अधिक होत नाहीं, किंवा दुर्जनानें स्नान केलें असतां तुझ्या पाण्याची निर्मलता कमीही होत नाहीं!

येथें साधूच्या गुणाचें आणि असज्जनाच्या गुणाचें गंगेच्या जलाकडून अग्रहण होत आहे असें वर्णन आहे म्हणून हा "अतद्गुण" अलंकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

नीचाच्या संसर्गीं साधु असो, साधु नीचता न वरी ।
पंकांत पद्म असतें नित्य तरी पद्म मलिनता न धरी ॥ ३५१ ॥

वि० वा० भिडे,-पुण्यपंक्ति, पद्य १०.

हलकट माणसाच्या सहवासात साधु पुरुष असला तरी तो साधु पुरुष हलकट होत नाहीं! कमळ चिखलात असलें तरी तें मळकटपणा धारण करीत नाहीं!

येथें साधु पुरुष हलकटाच्या संगतींत असून सुद्धां हलकटपणाचा गुण घेत नाहीं, असें वर्णन आहे, म्हणून येथें "अतद्गुण" हा अलंकार झाला आहे

द्वितीयार्धांत पद्म पंकाची मलिनता धरीत नाहीं, असें म्हटलें आहे, हें "अतद्-गुणाचें" दुसरें उदाहरण.

संबंध पद्यात अर्थान्तरन्यास हा अलंकार आहे तो विद्यार्थ्यांच्या ओळखी-चाच आहे!

**टीप**—अतद्गुण हा अलंकार विशेषोक्तीचा एक पोटभेद आहे, तथापि गुणाच्या अग्रहणात स्वतंत्रपणें चमत्कृतिजनकत्व आहे म्हणून हा स्वतंत्र अलंकार गणिला गेला आहे

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**कोणी ज्या साधनें कांहीं करी तें त्याच साधनें-।**
**दुजा करी अन्यथा तो "व्याघात" म्हणिजे जनें ॥ १९९ ॥**

कोणी मनुष्य कांहीं एका साधनानें कांहीं विशिष्ट कार्य करतो, त्याच्या उलट कार्य त्याच साधनानें दुसरा मनुष्य करतो, असें वर्णन असतां "व्याघात" हा अलं-कार होतो तसेंच कोणी कांहीं साधनानें केलेल्या कार्याचा विध्वंस त्याच साधनानों दुसऱ्या कोणी केल्याचें वर्णन असताही "व्याघात" हा अलंकार होतो.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

दीनांचे हृदयतरू वचनांनीं विद्ध खल करी क्रूर ।
ते साधु पल्लवित करि वाहवुनी वचनरूप जलपूर ॥ ३५२ ॥

वि० वा० भिडे,-स्फुट पद्यें ( रथरूपक ), पद्य ७२.

दीनांच्या हृदयरूपी वृक्षांना दुष्ट लोक भाषणानीं विद्ध करतात; पण साधु पुरुष त्या हृदयरूपी वृक्षाना वचनरूपी जलाचें पाणी पुरवून टवटवीत करतात !

येथें वचनांनीं खल जन नाशरूपी जें कार्य करतात, त्याच्या उलट कार्य (तरूंना पल्लवित करणें हें) साधु पुरुष त्याच वचनरूप साधनांनीं करतात, असें म्हटलें आहे, म्हणून हा " व्याघात " अलंकार होय.

उदाहरण, वृत्त आर्या.

पवनापासुनि जन्मीं ज्या पदरें दीपरक्षणास करी ।
तेणें स्त्री मालवि तो, विधि फिरतां मित्र शत्रुतेस धरी! ॥ ३५३ ॥

दिवा लावताना स्त्री ज्या पदरानें दिव्याचें वाऱ्यापासून संरक्षण करते, त्याच पदरानें ती त्याला निरोप देते ( म्ह० दिवा मालविते ), दैव उलटलें असतां मित्रही शत्रु होतो !

येथें " व्याघात " अलकार आहे

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

स्त्रिया जन्मविती नेत्रें नेत्रें दग्ध शिवें स्मर ।
श्रेष्ठ स्त्रिया कीं जय त्या मेळवीति शिवावर ॥ ३५४ ॥

शंकरानें आपल्या नेत्रानें जाळलेल्या मदनाला स्त्रिया नेत्रानेंच जन्मास घालतात ( म्हणजे उत्पन्न करतात ), स्त्रिया शंकराहून श्रेष्ठ होत ! कारण शंकरावर त्या जय मिळवितात !

हें पद्य " व्याघाताचें " उदाहरण होय.

लक्षण; वृत्त आर्या.

**आले स्वतंत्र एका पद्यांत अनेक जर अलंकार ।**
**तर "संसृष्टि", घट जसा तिलतंडुलमिश्रणास आधार ॥२००॥**

अगदीं स्वतंत्र म्हणजे एकमेकांवर कोणत्याही प्रकारें अवलंबून नसलेले दोन किंवा अधिक अलंकार एका पद्यात आले, तर तेथें " संसृष्टि " ह्या नांवाचा अलंकार होतो एका घागरीमध्यें तीळ आणि तांदूळ, ह्यांचें मिश्रण करून घातलेलें असलें, तर त्या मिश्रणानें युक्त अशा त्या घागरीप्रमाणें हें पद्य असतें.

एका पद्यांत परस्परनिरपेक्ष असे दोन किंवा अधिक शब्दालंकार आले तर "संसृष्टीचा ( क )" हा प्रकार होतो

एका पद्यांत परस्परनिरपेक्ष असें दोन किंवा अधिक अर्थालंकार आले, तर "संसृष्टीचा (ख)" हा प्रकार होतो. आणि एका पद्यांत एक किंवा अधिक शब्दालंकार स्वतन्त्रपणें एका किंवा अधिक अर्थालंकारासह आलेले असले, तर तेथें " संसृष्टीचा तिसरा म्हणजे ( ग ) " प्रकार होतो.

उदाहरण, वृत्त आर्या

डुलत झुलत खुलत तिथें आला तो ठाकला सरापुढती ।
मग आनंदें शिरला जाळें शुंडादंड उभवुनी वरती ॥ ३५५ ॥

वि० वा० भिडे,—गजेन्द्रमोक्ष, पद्य १८

येथें डुलत, झुलत, आणि खुलत, हा अश्वधाटी यमक ह्या नावाचा शब्दालंकार असून शुंडा, आणि दण्ड, हा वृत्त्यनुप्रासरूप दुसरा शब्दालंकार आहे. हे दोन्ही शब्दालंकार पृथकत्वें ह्या पद्यांत आले आहेत; म्हणजे असें कीं ह्या दोन शब्दालंकारांपैकीं कोणताही एक काढून टाकला तरी दुसऱ्याला क्षति होणार नाहीं. वरील आर्येची पहिली पंक्ति

धीरोद्धतगमन तिथें आला तो ठाकला सरापुढतीं

अशी बदलली, तर अर्थांत फारसा बदल न होतां अश्वधाटीयमक नाहींसें होईल, पण आर्येच्या दुसऱ्या पंक्तींतील वृत्त्यनुप्रासाला क्षति होणार नाहीं तसेंच वरील आर्येची पहिली पंक्ति आहे तशी कायम ठेवून दुसऱ्या पंक्तींतील " दड " शब्द काढून तेथें "भव्य" शब्द घातला, तर वृत्त्यनुप्रास नाहींसा होईल, पण प्रथम पंक्तींतील अश्वधाटी यमकाला क्षति होणार नाहीं. म्हणजे उदाहृत आर्येंतील अश्वधाटी यमक आणि वृत्त्यनुप्रास, हे शब्दालकार परस्परनिरपेक्ष आहेत.

हा " संसृष्टीचा ( क )" हा प्रकार.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

> कोठें साध्वी दुराधर्षा ! कोठें तो क्षुद्र वायस ? ।
> शिरःस्थ मणि सर्पाचा काढूं तो करि मानस ॥ ३५६ ॥

वि० वा० भिडे,–काककाणता, पद्य ९.

श्रीरामचंद्र वनवासात असतां एके समयीं एका कावळ्यानें सीतेशीं अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला त्या प्रसगाचें हें पद्य आहे

जिच्याशीं लगट करणें अशक्य आहे अशी सती सीता कोणीकडे ? आणि तो क्षुद्र कावळा कोणीकडे ? सापाच्या मस्तकांतील मणि काढण्याचीच तो कावळा इच्छा करीत होता !

येथें प्रथमार्धांत विषम आणि द्वितीयार्धांत निदर्शना असे दोन अर्थालंकार आहेत, आणि ते परस्परनिरपेक्ष असे आहेत म्हणून येथें " संसृष्टीचा (ख)" हा प्रकार झाला आहे.

उदाहरण, वृत्त आर्या.

> हिंदूंचिया हिताच्या होणें हानीस हेतु हिंदूनें ।
> हें होतें संततिचें भक्षण करणें स्वताच ओतूनें ॥ ३५७ ॥

वि० वा० भिडे,–शिवाजी आणि म्हादाजी, पद्य ४७.

हिंदु लोकांचें जीत कल्याण आहे त्या गोष्टीला हिंदूनें अडथळा करणें हें मांजरानें (ओतूनें) आपलीं स्वताचीं पोरें खाणें होय ! ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच निंद्य होत !

येथें आर्येच्या प्रथमार्धांत " वृत्त्यानुप्रास " हा शब्दालंकार आहे. सबंध आर्येंत "निदर्शना ( ख )" हा अर्थालंकार आहे. अनुप्रास आणि निदर्शना ह्या दोहोंपैकीं कोणताही एक अलंकार काढून टाकला तरी उरलेल्या अलकाराला क्षति होत नाहीं, म्हणून येथें "संसृष्टीचा ( ग )" हा प्रकार झाला आहे.

उदाहरण; वृत्त आर्या

दंत उडाले, झाले केश धवल, कंप धरि शरीराला ।
तरि साध्वी पतिस तशी तृष्णा क्षणही त्यजी न पुरुषाला ॥३५८॥

दांत सगळे पडून गेले आहेत, केश पांढरे होऊन गेले आहेत, शरीराच्या प्रत्येक अवयवांत कंप भरला आहे, अशी जरी पुरुषाची स्थिति झालेला असली, तरी साध्वी स्त्री आपल्या पतीला सोडीत नाहीं तशी आशा पुरुषाला सोडीत नाहीं !

ह्या पद्यांत " उपमा " हा एक अर्थालंकार असून " विशेषोक्ति " हा दुसरा अर्थालंकारही आहे ह्या दोहोंची येथे " संसृष्टि " झाली आहे. उपमा काढून टाकिली तरी विशेषोक्तीला क्षति होत नाहीं हा " संसृष्टीचा ( ख ) " प्रकार

उदाहरण; वृत्त द्रुतविलंबित

खचित तो मम आज महा बला चटपटां मटकाविल एकला ।
मम वृथा बल जेणुनि निर्जरां, मशक तो शकतो जिणुं वीश्वरा ॥३५९॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य ४१.

रावण म्हणतो:– तो एकटा ( मारुति ) माझ्या अफाट सैन्याला ( महा बला ) खाऊन टाकील ( त्याचा संहार करील ) ! देवांना जिंकून माझें सामर्थ्य व्यर्थ होय ! तो चिलट ( तो वानर मारुति ) गरुडाला ( मला ) जिंकूं शकतो !

येथें चवथ्या चरणांत ' शक तो' ' शकतो ' हें यमक असून "अतिशयोक्ति" हा अर्थालंकार आहे, " मशक " शब्दानें मारुतीचें आणि " वीश्वर " शब्दानें रावणाचें निगरण केलें आहे

हें पद्य " संसृष्टीच्या ( ग )" ह्या प्रकाराचें उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित

परिशिला सुतनाश दशानना खवळवी, वळवी न सुवर्तना ।
मनिं म्हणे खल तो "मज वानर बक झषास तसाच खरोखर!"॥३६०॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७; पद्य ४०.

आपले पुत्र मारले गेले ही बातमी ऐकून रावण फार क्रुद्ध झाला, परंतु तो सन्मार्गाकडे वळला नाहीं ! रावण मनांत म्हणाला, " तो दुष्ट वानर मारुति माशाला बगळा तसा मला आहे ! "

येथें द्वितीय चरणात '. वळवी ' ' वळवी ' हें यमक आहे द्वितीयार्धांत उपमा आहे. हे दोन्ही अलंकार परस्परनिरपेक्ष आहेत. म्हणून हें " संसृष्टीच्या ( ग ) " ह्या प्रकाराचें उदाहरण होय

उदाहरण, वृत्त द्रुतविलंबित.

मज दशाननभूति असे महा दवशिखा मृगिला तशि दु:सहा ।
मम इथें विधु विग्रह जाळितो, पवन शीत सुगंधहि पोळितो ॥ ३६१ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १७, पद्य ३०.

सीता मारुतीला म्हणते·––

मृगीला जशी वणव्याची ज्वाला असह्य होते, तशी रावणाची अफाट समृद्धि मला असह्य होते ! येथें चंद्र माझें अंग जाळतो,आणि थंड आणि सुवासिक वारा मला तापदायक होतो !

येथें प्रथमार्धांत " उपमा "आणि द्वितीयार्धांत "विरोधाचे" दोन प्रकार आहेत. " विधु " ह्या द्रव्याचा " जाळणें " ह्या क्रियेशीं विरोध हा एक, आणि " शीतत्व" ह्या गुणाचा " पोळणें " ह्या क्रियेशीं विरोध हा दुसरा.

येथें उपमा आणि विरोध ह्या दोन अर्थालंकारांची "संसृष्टि" झाली आहे. " संसृष्टीचा हा ( ख ) " प्रकार होय

लक्षण, वृत्त आर्या.

**अन्योन्याश्रय एका वाक्यांत अलंकृती जर अनेक ।**
**तर "संकर," दुग्धसलिलयुतिपरि तो,त्यांत होइ न विवेक॥२०१॥**

एकमेकांवर अवलंबून असलेले दोन किंवा अधिक अलंकार एका पद्यांत असले, तर तेथें " संकर " हा अलंकार होतो संकरातील अलंकाराचें हें मिश्रण दूध आणि पाणी यांच्या मिश्रणाप्रमाणें असतें, म्हणजे मिश्रणांतून दूध वेगळें आणि पाणी वेगळें काढता येत नाहीं, त्याप्रमाणें संकरांतील अलंकार वेगळे वेगळे करतां येत नाहींत. एक अलंकार काढून टाकला तर दुसऱ्याला क्षति होते

लक्षण, वृत्त आर्या.

**"अंगांगिभावसंकर" ह्यासचि साहित्यविज्ञ म्हणतात ।**
**ह्यांत अलंकार सदा अन्योन्याश्रय करोनि असतात ॥ २०२ ॥**

संकराच्या ह्या प्रकाराला साहित्यशास्त्रकोविद " अंगांगिभावसंकर " म्हणतात. अंगी पदार्थ आणि त्याचें अंग, ह्या दोहोंत जो संबंध असतो तोच संकराच्या ह्या प्रकारांतील अलंकारात संबंध असतो.

लक्षण, वृत्त आर्या.

**जेथें संदर्भादिक चिन्ह अलंकारनिर्णयास नसे ।**
**तेथें " संदेहात्मक संकर " ऐसें तयास नांव असे ॥२०३॥**

जेथें एकाद्या पद्यामध्यें कवीला अमुक अलंकार अभिप्रेत आहे असें संदर्भ इत्यादि काही लक्षण नसल्याकारणानें ठरावतां येत नाहीं, तेथें " संदेहसंकर " होतो

कवीला आपला अभिप्राय स्पष्टपणें कळवितां आला नाहीं आणि म्हणून त्याच्या विधानांत जर काहीं संदिग्धता राहिली, तर तो दोष होय परंतु वाङ्मयांत असे शेकडो श्लोक, वाक्यें, म्हणी, इ० असतात कीं तीं कोणी रचिलीं आणि कोणत्या प्रसंगीं रचिलीं, हें आपणांस ठाऊक नसतें, आणि त्याचा नक्की अर्थ ठरविणें अशक्य असतें; तथापि त्याच्यांत काहीं चटकदारपणाचा अंश असतो म्हणून त्यांना वाङ्मयात स्थान दिलें जातें. असे श्लोक, म्हणी, वाक्यें, इ० मध्यें अलंकारही असतात. हे अलंकार ठरवितांना संदर्भाच्या अभावीं संदेह उत्पन्न होतो असे संदेहात्मक जे अलंकार, त्यांचा साहित्यशास्त्रकारांनीं " संदेहसंकर " म्हणून वर्ग केला आहे

लक्षण, वृत्त आर्या

**एकाच पदामध्यें विविध अलंकार उदित असल्यास ।**
**संकर "एकपदप्रतिपाद्य" असें नांव देति बुध त्यास ॥२०४॥**

एकाच पदांत अनेक अलंकार ( मग ते शब्दाचे असोत किंवा अर्थाचे असोत ) झालेले असले तर त्याला " एकपदप्रतिपाद्य संकर " असें विद्वान लोक नांव देतात.

अनेक स्वतंत्र शब्द समासाच्या नियमांनीं एकत्र बांधले गेलेले असले तर जो नवीन समस्त शब्द होतो त्याला येथें " पद " असें म्हटलेलें आहे

लक्षण, वृत्त आर्या

**अंगांगिभावसंकर पहिला, संदेहसंकराहि दुसरा ।**
**एकपदप्रतिपाद्यहि तिसरा; हें स्मरणि तीन भेद धरा ॥ २०५ ॥**

अंगांगिभावसंकर, संदेहसंकर, आणि एकपदप्रतिपाद्यसंकर, असे संकराचे तीन भेद होतात, ते नीट लक्षात ठेवा

लक्षण, वृत्त आर्या.

**होतात संकराचें ह्या सरणीनें प्रकार तीन असे ।**
**तीहींतही रसिकमतें आल्हादाचें अपूर्व बीज वसे ॥ २०६ ॥**

अशा प्रकारें संकराचे तीन प्रकार होतात. ह्या तीन्ही प्रकारात रसिकाच्या मताप्रमाणें मनोहरपणाचें बीज असतेंच असतें !

आतां ह्या तीन्ही प्रकारच्या संकराचीं क्रमानें देतों

उदाहरण; वृत्त आर्या

उलथेल यवनवैभव सत्यन्यायप्रतिष्ठित नसे तें ।
पाशवसामर्थ्यपुलिन वैभवभवना न दाढर्य चिर देतें ॥ ३६२ ॥

वि० वा० भिडे,-शिवाजीची उक्ति, पद्य १३१

यवनाचें वर्चस्व ढासळून पडेल, तें सत्य आणि न्याय यांचेवर आधारलेलें नाहीं, पाशव सामर्थ्य ह्या रूपाचें वाळवट(पुलिन)वर्चस्वरूपी मंदिराला (भवना)फार वेळ बळकटी देऊ शकत नाहीं !

येथें " अर्थान्तरन्यास " हा मुख्य अलंकार असून त्याच्या पोटांत " रूपक " गौणत्वानें आलें आहे.

हें ' अंगांगिभावसंकराचें" उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त आर्या

नेत्रें विशाल तैजस, अधर रुधिर, देह केतकाभ इचें ।
शकतीं मोहूं न मला, विषयाभिमुखें न साधुहीर पिचे ! ॥ ३६३ ॥

वि० वा० भिडे,-शिवाजीचें चारित्र्य; पद्य ६०.

[ विषय हाच कोणी ढेकूण ( अभिमुख ) त्याच्या योगानें साधु हाच कोणी हिरा (हीर) तो फुटत नाहीं ! (ढेकणाच्या स्पर्शानें हिरा भगतो अशी समजूत आहे )]

ह्या लीलेचे विशाल आणि तेजस्वी डोळे, रक्तवर्ण ओठ, आणि केवड्यासारखें शरीर, हीं मला मोह पाडूं शकत नाहींत, विषयरूपी ढेकणाच्या योगानें साधुपुरुषरूपी हिरा भग पावत नाहीं !

येथें " अर्थान्तरन्यास " हा एक मुख्य अलंकार असून त्याच्या पोटांत ' रूपक " अलंकार आहे

शिवाय " न मोढुं शकती " ह्या एका क्रियारूप सामान्य धर्मानें विशाल आणि तैजस नेत्रें, रुधिर अधर, आणि केतकाभ देह, हीं तीन प्रकृतें अन्वित झालीं आहेत म्हणून येथें " तुल्ययोगिता " ही उपस्थित आहेच.

वरील पद्यांत रूपक, अर्थान्तरन्यास, आणि तुल्ययोगिता, यांचा संकर झाला आहे. हें " अंगागिभावसंकराचें " उदाहरण.

उदाहरण; वृत्त मंजुभाषिणी.

अजनंदन स्वनगरा निघे यदा मिथिलाजन स्तविति त्याप्रती तदा ।
गुणमंडितत्व करि पात्र मानवा, न धनांकितत्व, अभिवादना स्तवा॥३६४॥

वि० दा० भिडे,–रा० प०, सर्ग ३, पद्य ८८

अजाचा पुत्र दशरथ हा मिथिलेहून परत आपल्या अयोध्या नगरीकडे जावयाला निघाला तेव्हां त्याची मिथिलेच्या लोकांनीं स्तुति केली मनुष्याला गुणयुक्तत्व हेंच वंदनाला आणि स्तुतीला पात्र करतें, श्रीमती करीत नाहीं. म्हणजे मनुष्य गुणांनीं वंद्य आणि स्तुत्य होतो, पैशानें होत नाहीं!

येथें मुख्य अलंकार " अर्थान्तरन्यास " असून त्याच्या पोटात " परिसंख्या " हा अलंकार आहे.

येथें श्लोकाच्या प्रथमार्धांत विशेषाचें विधान आहे. द्वितीयार्धांत सामान्याचें विधान आहे. हें सामान्याचें विधान परिसंख्या रूपाचें आहे.

हें पद्य " अंगांगिभावसंकराचें " उदाहरण.

उदाहरण, वृत्त आर्या.

सूचीच्या अग्रांपरि कुजनसुजनवर्तनें जगीं दिसतीं ।
एक करी छिद्रांतें, आच्छादन करि दुजें तयांवरती ॥ ३६५ ॥

खल आणि साधु ह्यांचें आचरण सुईच्या दोन टोकांप्रमाणें दिसतें खल हा छिद्रें करतो ( म्ह० दुसऱ्याचा कमीपणा उघडकीस आणतो ), आणि साधु हा त्या छिद्रांवर पांघरूण घालीत असतो!

ह्या पद्यामध्यें उपमा, श्लेष, आणि यथासंख्य, ह्यांचा " अंगांगिभावसंकर " झाला आहे.

उदाहरण; वृत्त आर्या

रत्नसमृद्ध, गभीर, स्वच्छद्युतिही असून सागर हा ।
कां तृष्णाशमनाला केला विधिनें न योग्य ? नवल महा ! ॥३६६॥

हा समुद्र रत्नांनीं संपन्न आहे, खोल आहे, आणि वर्णानें स्वच्छ आहे. असें असून विधात्यानें तो तान्हेल्याची तहान भागविण्याला योग्य असा कां केला नाहीं! हें मोठें आश्चर्य होय!

हा अमुक मनुष्य गुणसंपन्न, गंभीर मनाचा, आणि पवित्र वर्तनाचा असून गोड स्वभावाचा नाहीं, हें मोठें आश्चर्य होय, असें सांगावयासाठीं समुद्राचें वर्णन केलें आहे, म्हणून ही " अप्रस्तुतप्रशंसा " होऊं शकेल किंवा "समुद्र" प्रस्तुत असून वरच्यासारख्या माणसाचें वर्णन विशेषणाच्या सामर्थ्यानें येथें ज्ञात होत आहे, म्हणून ही " समासोक्ति " ही होऊं शकेल. येथें संदर्भ ठाऊक नसल्याकारणानें ह्या पद्यांतील अलं-

कार " अप्रस्तुतप्रशंसा " आहे, किंवा " समासोक्ति " आहे, ह्या संबंधानें संशयाला जागा आहे, म्हणून हा " संदेहसंकर " होय.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

> अमंदनयनानंददायी हें चंद्रमंडल ।
> समर्थ तम वाराया शोभतें अति निर्मल ! ॥ ३६७ ॥

अंधेराचा ( तमाचा ) नाश करावयाला समर्थ, आणि डोळ्यांना आनंददायक, असें हें स्वच्छ चंद्रबिंब आकाशांत शोभत आहे!

ह्या पद्याची अनेक प्रकारांनीं योजना करतां येईल

१. " हें " ह्या शब्दानें स्त्रीच्या मुखाचा निर्देश करून वक्त्यानें हा उद्गार काढला असल्यास मुखावर चंद्रमंडलाचा आरोप केला जाऊन हा रूपकालंकार " होईल.

२. स्त्रीच्या मुखालाच " हें चंद्रमंडल " म्हणण्याचा वक्त्याचा उद्देश असल्यास चंद्रमंडलानें मुखाचें निगरण केलें असें होऊन हा " अतिशयोक्ति " अलंकार होईल.

३ हें म्ह० स्त्रीचें मुख, आणि चंद्रमंडल, ह्या दोन्ही वस्तु प्रकृत असून तमाचा, ( दुःखाचा, निराशेचा, किंवा अंधकाराचा ), नाश करणें, ही त्यांच्यासंबंधानें एक क्रिया सांगितलेली असली, तर हा " तुल्ययोगिता " अलंकार होईल.

४. " मुख " हें प्रस्तुत आहे, आणि " चंद्रबिंब " अप्रस्तुत आहे, असें घेतल्यास हा " दीपक " अलंकार होईल

५. " स्त्रीमुख " अप्रस्तुत असून " चंद्रमंडल " हें प्रस्तुत असून आनंददायकत्व आणि तमोवारणसमर्थत्व ह्या धर्मसाम्यावरून स्त्रीमुख येथें सुचविलें जात आहे, असें घेतल्यास हा " समासोक्ति " अलंकार होईल

६ " चंद्रमंडल " ह्या अप्रस्तुतवर्णनानें धर्मसाम्यावरून स्त्रीमुखाचा बोध करून द्यावयाचा वक्त्याचा उद्देश आहे, असें घेतल्यास हा " अप्रस्तुतप्रशंसा " होईल.

७ " हा सुखविलासाचा काळ प्राप्त झाला आहे " असें चंद्रोदयाच्या वर्णनावरून जाणवावयाचें असा वक्त्याचा उद्देश असल्यास हा " पर्यायोक्त " अलंकारही होऊं शकेल.

वर दर्शविल्याप्रमाणें ह्या पद्यांत सात अर्थालंकार होऊं शकतात. ह्या सातांपैकीं कोणता अलंकार घ्यावयाचा ह्या संबंधानें निश्चय करता येत नाहीं, म्हणून हा " संदेहसंकर " होय

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

> नयनानंददायी हें इन्दुबिंब मनोरम ।
> असूनहि निरुद्धाश लोपलें हें नसे तम ॥ ३६८ ॥

ह्या श्लोकामध्यें रात्रीच्या आरंभाचें वर्णन केलेलें आहे.

[ निरुद्धाश म्ह० कोंडून टाकल्या आहेत आशा म्ह० दिशा ज्यानें असें तम म्ह० काळोख. ह्या शब्दाचा दुसरा अर्थ असा—तम म्ह० स्त्रीचा पतीवर रुसवा हाच कोणी अंधेर. आडविल्या आहेत पतीच्या आशा म्ह० सुखविलासाच्या इच्छा ज्यानें असें तम म्ह० रुसवा ]

डोळ्यांना आनंद देणारें हें पहा सुंदर चंद्रबिंब ! सर्व दिशांना भरून टाकणारें

तम अद्यापपावेतों पूर्णपणें निरस्त झालें नाहीं, ( विलाससमय उपस्थित झालेला असून स्त्रीचा रुसवा पूर्णपणें निरस्त झाला नाहीं )

मागील उदाहरणपद्याच्या विवरणावरून विद्यार्थ्यांनीं ह्या पद्यांत पर्यायोक्ति, अतिशयोक्ति, रूपक, दीपक, तुल्ययोगिता, समासोक्ति, अप्रस्तुतप्रशंसा, ह्यांपैकीं कोणताही अलंकार संदर्भाच्या अभावीं कसा होऊं शकेल हें ठरवावें. हें पद्य " संदेहसंकराचें उदाहरण " होय

उदाहरण, वृत्त आर्या

देशप्रीतिस माझ्या अवसर लाधेल यापुढें न कधीं ।
त्या सेवीन न मी ज्या यवनपवनभुजगभुज गणी मम धी ॥३६९॥

वि० वा० भिडे,–मंदारमञ्जरी, आर्या ३०

ही मंदाराची मंजरीप्रत उक्ति आहे

इतःपर मला देशकार्यं करावयाची संधी सांपडणार नाहीं, कारण त्या शिवाजीची सेवा इतःपर माझ्या हातून होऊं शकणार नाहीं,–ज्या शिवाजीला मुसलमान राजे हेच कोणी वायु, त्याला सर्पाप्रमाणें म्हणजे खाऊन टाकणारा आहे बाहु ज्याचा, असें मी समजतों. ( मुसलमानी राज्याच्या ठिकाणीं हिंदूचें राज्य स्थापण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिवाजीच्या उपयोगीं पडण्याची संधी मला मिळणार नाहीं; कारण, मी काशीस निघून जाणार आहें )

ह्या आर्येंत " यवनपवनभुजगभुज " हा एक सामासिक शब्द आहे, आणि त्यात " एकपदप्रतिपाद्य संकर " झाला आहे ह्या एका सामासिक शब्दांत " यवनरूपी पवन " हें एक रूपक आहे " भुजावर भुजगत्वाचा आरोप " हें दुसरें रूपक. ह्या दोन रूपकांसहवर्तमान " यवनपवन " आणि " भुज...भुज " हे दोन शब्दालंकार आलेले आहेत ' यवनपवनभुजगभुज " ह्या एका पदात चार अलंकार समाविष्ट झाले आहेत हें " एकपदप्रतिपाद्य " संकराचें उदाहरण आहे.

उदाहरण, वृत्त आर्या.

दास्यभुजंगास्यक्षुरभुज वंद्य तुह्मास शिव असेल जर ।
तर तत्पथानुसरणीं वाटावी का बरें तुह्मा कचर ? ॥ ३७० ॥

वि० वा० भिडे,–स्पृश्यास्पृश्यनिरूपण, आर्या १६.

[ दास्य म्ह० पारतन्त्र्य. भुजग म्ह० साप आस्य म्ह० तोंड. क्षुर म्ह० शस्त्र. दास्य.. भुज हा बहुव्रीहि समास शिव ( शिवाजी ) ह्याचें विशेषण आहे.

परवशतारूपी सर्पाच्या तोंडाला कुऱ्हाडीप्रमाणें आहे बाहु ज्याचा असा शिव म्हणजे शिवाजी जर तुम्हाला वंद्य असेल, तर त्याच्या सरणीनें वर्तन करावयाला तुम्ही कां कचरावें ? म्हणजे देशकार्यांत शिवाजी अस्पृश्यतेला स्थान देत नसे तसें तुम्हीही देऊं नये हा आशय

येथें " दास्यभुजंगास्यक्षुरभुज " हें एक पद असून त्यांत " दास्य...आस्य " आणि भुज.. भुज असे दोन शब्दालंकार आहेत आणि दास्यरूपी भुजंगास्य हें एक रूपक आहे तसेंच भुजावर क्षुरत्वाचा आरोप हें दुसरें रूपक आहे एकंदर तीन अलंकार एका पदांत आलेले असल्याकारणानें येथें " एकपदप्रतिपाद्य संकर " झाला आहे

———

# विज्ञप्ति

वृत्त अनुष्टुभ्

" साहित्यकौमुदी " ही मी विद्याधर करीं कृती ।
ती साहित्यवनीं मार्ग दावो बालजनाप्रती ॥ २०७ ॥
मम्मटाचा जगद्वंद्य ग्रंथ काव्यप्रकाश हा ।
असे आधार ह्या माझ्या कृतीला घेतला पहा ॥ २०८ ॥
उदाहरणपद्यें मी घेतलीं ह्या कृतीमधीं —।
मत्काव्यांतूनि बहुधा, अन्यांतून कधीं कधीं ॥ २०९ ॥
उदाहरणपद्यांचा लक्षणांशीं समन्वय ।
अनुवादी न वा ह्याचा करोत बुध निर्णय ॥ २१० ॥
प्रेमानें गुण हींतील दोष निःशंक मानसें ।
प्रकटो बुध ही माझी शालीन प्रार्थना असे ॥ २११ ॥
धनकालानुकूल्यें मी गुणदोषरसादिक ।
विरचीन असा शेष, त्या आम्रा बुध हो पिक ॥ २१२ ॥

विद्वानांस प्रार्थना. मी विद्याधर " साहित्यकौमुदी " ही कृति करीत आहें ! साहित्यशास्त्ररूपी अरण्यात ही कृति नवशिक्या विद्यार्थ्याला मार्गदर्शक होवो ! मम्मटाचार्यांचा जगाला पूज्य असा काव्यप्रकाश या नांवाचा ग्रंथ मी माझ्या ह्या कृतीला आधार घेतला आहे. ह्या माझ्या कृतीमध्यें उदाहरणार्थ जीं पद्यें मी घेतलीं आहेत, तीं प्राय. माझ्याच काव्यांतून मी घेतलीं आहेत. परंतु केंव्हा केंव्हा कांहीं पद्यें अन्य कवींचींही घेतलीं आहेत उदाहरणपद्यें लक्षणांशीं जुळतीं आहेत किंवा नाहींत, हें ठरविणें मी पंडितांवर सोपवितों पंडितानीं माझ्या ह्या साहित्यकौमुदी नांवाच्या कृतींतील गुण प्रेमानें प्रकट करावे, पण विसंवाद इत्यादिरूप दोष असतील ते न कचरतां दाखवून द्यावे, अशी माझी नम्र विनंती आहे ! काव्यप्रकांतील गुण, दोष, रस, इत्यादि जे अवशिष्ट भाग, ते मी ह्याच सरणीनें धन आणि काल ह्यांची अनुकूलता असल्यास रचिणार आहे. त्या आम्रतरूला पंडितजन कोकिलांप्रमाणें होवोत !

---

# परिशिष्ट

मम्मटानें जे एकसष्ट अर्थालंकार स्वीकारले आहेत, त्यांचें निरूपण आम्ही लक्षण-पद्यें ७८ पासून २०६ पर्यंतच्या पद्यांत केलें. मम्मटानें न स्वीकारलेले, किंवा अन्य नांवांनीं स्वीकारलेले, किंवा जे मुळीं अलंकारच नव्हेत म्हणून टाकून दिलेले, असे कांहीं अलंकार येथें आम्ही स्पष्टावणार आहों. तेणेंकरून हल्लींच्या काळच्या विद्यार्थ्यांची सोय होईल असें आम्हास वाटतें.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

> वाक्प्रचारांत जो अर्थ दावितें शब्दसंहति ।
> तोचि ग्राह्य, न वाच्यार्थ, तिथें " लोकोक्ति " बोलती ॥१॥

ज्या एकाद्या शब्दसंहतीचा रूढीनें ठरून गेलेलाच अर्थ घ्यावयाचा असतो, शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसतो, अशी शब्दसंहति एकाद्या वाक्यांत योजलेला असली, तर " लोकोक्ति " नामक अलंकार होतो.

आपल्या भाषणाला जोर आणण्यासाठीं, किंवा अन्य हेतूस्तव, अशी एकादी शब्दसंहति वाक्यात योजिली असता " लोकोक्ति " हा अलकार होतो.

' कोणेकाच्या नाकांत काड्या घालणें " ह्या शब्दांचा वाच्यार्थ न घेता त्याला खिजावणें असा अर्थ रूढीनें आपण घेतों. कोणेकानें काळें करणें म्हणजे त्यानें निघून जाणें कोणेकाच्या तोंडाला पानें पुसणें म्हणजे त्याला फसवून त्याला कांहीं लाभ न होऊं देणें असा अर्थ रूढीनें ठरून गेला आहे तो आपण घेतों अशा प्रकारची शब्दसंहति वाक्यांत आली असतां " लोकोक्ति " होते.

उदाहरण; वृत्त सौदामिनी.

> मिटोनीच डोळे दिनां लोटितें, मनीं मी पतीच्या पदां चिंतितें ।
> तुला स्थान मच्चित्तिं लाभे कसें ? जिथें राम सर्वावकाशीं वसे ॥ १ ॥

वि० वा० भिडे,—रा० प०, सर्ग १६, पद्य ७१.

सीतेला विलोभावयाला रावण अशोकवनिकेमध्यें आला असतां सीता त्याला धिक्कारून हा उद्गार काढीत आहे

डोळे मिटून म्ह० न चरफडता, अत्यन्त सहनशीलतेनें. या पद्यात " लोकोक्ति " अलंकार आहे

उदाहरण, वृत्त सौदामिनी.

> नको व्यर्थ मारीत हाका बसूं, नको कास मातें छळाया कसूं ।
> जरी अंत माझा असा पाहसी तरी मृत्यु तूं रोकडा लाहसी ! ॥२॥

वि० वा० भिडे,-रा० प०, सर्ग १६, पद्य ६८

येथें " हाका मारीत बसणें " म्हणजे चरफडत बसणें ही " लोकोक्ति " होय.

उदाहरण; वृत्त सौदामिनी

उगां कां स्वनाशा मिठी घालिशी ? भल्याला परस्त्री असे वांतिशी ।
नको धूळ खाया सजूं रे खला, कुमार्गीं नको ठेवुं रे पावला ॥ ३ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग १६, पद्य ६९.

येथें " धूळ खाणें " ही " लोकोक्ति " आहे

उदाहरण, वृत्त आर्या

हा तानाजी नाहीं मेलेल्या दूध आइचें प्याला ।
ये, दोन हात अपुले होओत, नको उगा दवडुं काला ॥ ४ ॥

वि० वा० भिडे,–कमळीची सुटका, पद्य ९७.

येथें कोणेकानें मेलेल्या आईचें दूध प्यालेलें असणें म्हणजे तो नामर्द असणें. कोणेकाचे कोणेकाशीं दोन हात होणें म्हणजे त्याची त्याच्याशीं लढाई होणें. ह्या दोन्ही कारणांनीं येथें " लोकोक्ति " अलंकार झाला आहे.

लक्षण, वृत्त अनुष्टुभ्

**कवि चेतन वस्तूचे गुण किंवा क्रिया जिथें ।**
**अचेतनावरी स्थापी " चेतनोक्ति " असे तिथें ॥ २ ॥**

अचेतन वस्तूवर चेतनत्वाचे धर्म किंवा क्रिया आरोपिल्या असतां " चेतनगुणोक्ति " किं० चेतनोक्ति हा अलंकार होतो.

उदाहरण, पद

तुज जगीं लाधे सुख खरें । भूरुहा रे ! ॥ धृ० ॥
पवनानें तव गळोत पानें,
तनु करपो तव रवितापानें,
समयिं मिळोत न वा जलपानें,
तरि अचल तुझ्या शम चित्तिं ठरे भूरुहा रे ! ॥ ५ ॥

वि० वा० भिडे,–आनंदाची मूर्ति; पद ३०.

येथें अचेतन वृक्षाशीं कवि बोलत आहे. त्या वृक्षाला आपलें भाषण समजत आहे असें गृहीत घेऊन कवि त्याच्याशीं बोलत आहे हें "चेतनगुणोक्तीचें" उदाहरण.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

वृक्षा ! त्वज्जन्मसाफल्य, साधूचें व्रत पाळिसी ।
स्वता सोसुनियां ताप छाया पांथांस वोपिसी ॥ ६ ॥

हे वृक्षा, तुझ्या जन्माचें सार्थक्य होत आहे; कारण तू साधूप्रमाणें वागत असतोस ! तूं स्वता सूर्याचें ऊन्ह डोक्यावर घेऊन मुषाफरांना छाया देतोस !

येथें वृक्ष सजीव आहे असें गृहीत घेऊन त्याच्याशीं कवि भाषण करीत आहे. हें " चेतनगुणोक्तीचें " उदाहरण होय.

उदाहरण, वृत्त उपजाति.

वर्षर्तुनें माज तुला न येतो, ग्रीष्मर्तु तूंतें कृशता न देतो ।
संपत्ति आपत्ति तुला समान, तुझेपरी तूं जलधे ! न आन ॥७॥

येथें अचेतन अशा जलधीला उद्देशून कवि बोलत आहे हें "चेतनगुणोक्तीचें" उदाहरण

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**तो "विरुद्धगुणन्यास" म्हणिजे ज्यामधें कवी ।**
**वर्णनीं दोन वस्तूंच्या विरुद्ध गुण दाखवी ॥ ३ ॥**

दोन वस्तूमध्यें परस्परांशीं विरुद्ध म्हणजे उलट असे दोन गुण असल्याचें वर्णन असतें तेव्हां तो "विरुद्धगुणन्यास" अलंकार होतो.

उदाहरण; वृत्त अनुष्टुभ्.

होतसे नम्र सुजन अनें दुर्जन ताठतो ।
जलानें नमतो मेघ ओढा उंच बठारतो ॥ ८ ॥

वि० वा० भिडे,-जी० जा०, संकीर्ण, पद्य १३६.

येथें सुजन आणि दुर्जन, मेघ आणि ओढा, यांचे विरुद्ध गुण दाखविले आहेत. हें "विरुद्धगुणन्यासाचें" उदाहरण.

लक्षण; वृत्त आर्या

**जर हें मान्य तुम्हाला तर तेंहि तुम्हांस मान्य असणार ।**
**ह्या अर्थाची उक्ती "अर्थापत्ती" असे अलंकार ॥ ४ ॥**

ही गोष्ट तुम्ही मान्य केली तर तीही गोष्ट मान्य करणें तुम्हांला प्राप्त आहे, असें जें वर्णन त्याला "अर्थापत्ति" असें म्हणतात

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्

पूरें फोफावली वर्षा ऋतूमध्यें नदी अशी ।
तरोनि पैल जाणारा वापी ही क्षुद्र कायशी ? ॥ ९ ॥

पावसाळ्यांत महापूरानें फोफावलेल्या अशा नदींतून पोहून पलीकडच्या कांठाला जाणाऱ्या माणसाला पोहावयाला ही लहान विहीर कठिण वाटेल काय? अर्थात् नाहीं वाटणार

ह्या पद्यांत "अर्थापत्ति" हा अलंकार आहे

लक्षण, वृत्त आर्या

**वक्त्याला जें संमत तें श्रोत्याला तसेंच असणार ।**
**ह्या मतिनें जो करिजे प्रश्न तिथें "प्रश्न" हा अलंकार ॥ ५ ॥**

वक्त्याला जी गोष्ट संमत आहे ती श्रोत्यालाही संमत आहे असें वक्त्यानें गृहीत धरून श्रोत्याला जो प्रश्न केलेला असतो, त्याला "प्रश्न" किंवा "प्रश्नालंकार" म्हणतात. आपल्याला संमत असेंच उत्तर श्रोता देईल अशी वक्त्याची अपेक्षा असते.

उदाहरण, वृत्त अनुष्टुभ्.

अज्ञानानें सुतें केला अपराध तरी तया ।
सुतवत्सल जो तात तो दाखवि न कीं दया ? ॥ १० ॥

येथें " तो दया न दाखवी काय ' ह्या प्रश्नाचें उत्तर [illegible]
असें प्रश्न विचारणारास अपेक्षित आहे. हें " प्रश्नालंकाराचें " उदाहरण.

लक्षण; वृत्त आर्या.

**अप्रस्तुतप्रशंसा जी तिज " अन्योक्ति " नांव देतात ।**
**वक्ता अन्याविषयीं किंवा अन्यास करि इथें मात ॥ ६ ॥**

मागें अप्रस्तुतप्रशंसा हा अलंकार जो लक्षणपद्यें १०७, १०८ मध्यें सांगितलेला आहे, त्यालाच "अन्योक्ति" हें नांव देण्यात येतें. ह्या अलंकारांत प्रस्तुत वस्तूला उद्देशून किंवा प्रस्तुत वस्तूविषयीं न बोलतां अप्रस्तुत वस्तुला उद्देशून किंवा अप्रस्तुत वस्तूविषयीं वक्ता बोलतो.

मागें अप्रस्तुतप्रशंसेचे जे पांच प्रकार आम्हीं सोदाहरण निरूपिले आहेत, ते [illegible] तत्वाबद्दल तत्याची उक्ति हा जो अप्रस्तुतप्रशंसेचा पांचवा प्रकार, त्यालाच मराठींत बहुधा " अन्योक्ति " हें नांव देण्यांत येतें.

लक्षण; वृत्त अनुष्टुभ्.

**इष्टार्थप्राप्ति हो ऐशी उक्ति " आशीरलंकृती " ।**
**असो स्वताविषयिं वा पराविषयिं उक्ति ती ॥ ७ ॥**

तुमचें उद्दिष्ट सफल होवो अशी इच्छा प्रकट करणें ह्याला " आशीः " किंवा "आशीर्वाद" असें म्हणतात तसेंच आमचें उद्दिष्ट सफल होवो अशा अर्थाची इच्छा प्रकट केली असतांही "आशीः" किंवा "आशीर्वाद" हा अलंकार होतो. "आशीः" हा शब्द स्त्रीलिंगी आहे.

उदाहरण; वृत्त वसंततिलका.

आशास्य अन्य दिसतें तव सर्व वाया,
श्रेयःसमृद्धि न उणी तव रामराया ! ।
घे प्रीतिदाय मजपासुनि हाच रामा !
पत्नी मिळो तुज गुणाढ्यमनोऽभिरामा ॥ ११ ॥

वि० वा० भिडे,–रा० प०, सर्ग २, पद्य १६.

येथें विश्वामित्रानें रामाला आशीर्वाद दिला आहे. हें " आशीः " ह्या अलंकाराचें उदाहरण.

# साहित्यकौमुदींत आलेल्या पारिभाषिक शब्दांची अनुवर्ण सूची

( अंक पानें दाखविणारे आहेत )


अंग १५२
अंगांगिभाव १५२
अंगी ७,१५२
अजहत्स्वार्था लक्षणा ५
अतद्गुण १४७
अतिशयोक्ति ६६
अद्भुत रस ११
आधिक अलंकार १३८
अपलाप ५३
अभिधा २
अनन्वय अलंकार ३९
अनुप्रास १७,१८
अनुमान अलकार १२०
अन्योक्ति १६१
अपलाप ५३
अन्योन्य अलंकार १२७
अपन्हुति ५३
अप्रस्तुतप्रशसा ६२
अभिधा २
अर्थान्तरन्यास ९३
अर्थापत्ति १६०
अर्थालकार १६,१७
अलकार १६
अश्वधाटी यमक २७
असगति १३२,१३३
असंयुतावृत्ति यमक २६
आधार १३८
आधाराधेय भाव १३८
आधेय १३८
आरभटी वृत्ति १२
आरोप ४९
आर्थ अपन्हुति ५३
आशी. अलंकार १६१
आशीर्वाद अलंकार १६१
आक्षेप ८७.
उत्तर अलकार १२८, १२९
उत्प्रेक्षा ४२
उदात्त अलंकार ११५
उपमा ३१
उपमान ३१
उपमावाचक ३१
उपमेय ३१
उपमेयोपमा ४१
उपादान लक्षणा ४
एकदेशविवर्ति सांग रूपक ५०
एकपदप्रतिपाद्य संकर १५३
एकावली १४०
ओज गुण १२,१३,१४
करुण रस ११
कविसमय, कविसंकेत २९
कारक दीपक ७८
कारणमाला किं० हेतुमाला १२६
कार्यकारणभाव ७
काव्य १,११
काव्यलिंग ११२
कैशिकी वृत्ति १२
क्रिया ९९
गुण १३,९९
गौडी रीति १३
गौणी लक्षणा ४

चित्र १७,२७
छेकानुप्रास १९,२१
जहत्स्वार्था लक्षणा ५
जाति ( सामान्य नामें ) ९९
जाति ( स्वभावोक्ति ) १०२
तद्गुण १४७
तात्कर्म्य ७
तादर्थ्य ७
तुल्ययोगिता ८१
दामयमक २५
दीपक ७७
दृष्टान्त ७६
दोष १४
द्रव्य ९९
निगरण ६६
निदर्शना ५८
निरंगरूपक ५०
निश्चयगर्भ ससंदेह ४७
निश्चयान्त ससंदेह ४७
परंपरित रूपक ५२
परिकर अलंकार १२०
परिवृत्ति १०९
परिसंख्या अलंकार १२२
परुषा वृत्ति १२
पर्याय अलंकार ११८
पर्यायोक्त अलंकार ११४
पांचाली रीति १३
पुष्पयमक २४
पौर्वापर्यसंबंध ६६
पौर्वापर्यविपर्यय ६६
प्रतिवस्तूपमा ७१
प्रतीप १४४
प्रत्यनीक अलंकार १३९
प्रयोजनवती लक्षणा ८
प्रश्न अलंकार १६०
प्रसाद गुण १२,१३
प्रौढा वृत्ति १२
फलोत्प्रेक्षा ४७
बिंबप्रतिबिंबभाव ७६
बीभत्स रस ११
भयानक रस ११
भाविक अलंकार ११०,१११
भ्रांतिमान् अलंकार १४३
मधुरा वृत्ति १२
माधुर्य गुण १२,१३
मालादीपक ८१
मालानिदर्शना ६१
मालानिरंग रूपक ५०
मालापरंपरित रूपक ५२
मालाप्रतिवस्तूपमा ७१
मालोपमा ३५
मीलित १४०
मुख्यार्थ २
यथासंख्य ९२
यमक १७,२३
रस ११
रसनोपमा ३८
रीति १२,१३
रूढिसंभवा लक्षणा ८
रूपक ४९
रौद्र रस ११
लक्षणलक्षणा ४
लक्षणा २
लक्ष्य, लक्ष्यार्थ १,२
लाटानुप्रास १९,२२
लुप्तोपमा ३१
वस्तूत्प्रेक्षा किं० स्वरूपोत्प्रेक्षा ४६
वाच्य १
वाच्यार्थ २
विनोक्ति १०८
विभावना ८८
विरुद्धगुणन्यास १६०

विरोध ९८
विशेष १४५
विशेषोक्ति ९०
विषम अलंकार १३५
विषय ६
विषयी ६
वीर रस ११
वृंतानुप्रास १९
वृत्ति ११, १२, १३
वृत्ति किं० शब्दशक्ति २
वृत्त्यनुप्रास १९
वैदर्भी रीति १३
वैधर्म्य ७२
व्यंग्य, व्यंग्यार्थ १,८
व्यंजना २
व्यतिरेक ८४
व्याघात १४८
व्याजस्तुति १०४
व्याजोक्ति १२२
शब्द १
शब्दशक्ति २
शब्दालंकार १६
शांत रस ११
शाब्द अपन्हुति ५३
शुद्ध निरंग रूपक ५०
शुद्ध ससदेह ४७
शुद्धा लक्षणा ४
शृंखला ८१
शृंगार रस ११
श्रुत्यनुप्रास १९, २१
श्लिष्ट शब्द १७
श्लेष १७, ५५
संकर १५२
सदष्टक यमक २३
संभावना ४२
सम अलंकार १३४
समस्तवस्तुविषय सांग रूपक ५०
समाधि १३३
समान धर्म ३१
समासोक्ति ५७
समीपत्व ७
समुच्चय ११६, ११७
समुद्गक यमक २४
संयुतावृत्ति यमक २६
ससदेह ४७
संसृष्टि १४९
सहोक्ति १०६, १०७
सांकेतिक अर्थ २
सांग रूपक ५०
सात्वती वृत्ति १२
साधर्म्य ७२
साध्यवसाना लक्षणा ६
सामान्य अलंकार १४४
सामान्य १४४
विशेष ९४
सार १३१
सारोपा लक्षणा ६
साहित्यशास्त्र १
सूक्ष्म १३०
स्मरण १४२
स्मृति १४२
स्वभावोक्ति १०२
स्वरूपोत्प्रेक्षा किं० वस्तूत्प्रेक्षा ४६
स्वामिभृत्यभाव ७
हास्य रस ११
हेतु ४६
हेतुमाला किं० कारणमाला १२६
हेतूत्प्रेक्षा ४६

# उदाहृत पद्यांची अनुवर्ण सूची

( आंकडे पानें दाखविणारे आहेत )


| | |
|---|---|
| अजनंदन स्वनगरा | १५४ |
| अजिन पांघरुनि वल्कल | १०३ |
| अतिवितत दिसे जगदुदर | १३९ |
| अधिकार हा उपजवी | १२६ |
| अध्वखेदसहिता रजनी | १०७ |
| अनुकूल ब्रह्म तसें | १३२ |
| अनुज लक्ष्मण सचाप | १०३ |
| अनेक जळतीं घरें | ४३,१०३ |
| अन्य बाहुज धनू उचलाया | ७४ |
| अन्योन्यांसह तैसे | १०८ |
| अपराध सुकन्येचा | १३२ |
| अपराधी जे त्याना क्षेमास्तव | ८६ |
| अबलेचा छल करणें | ५९ |
| अमंदनयनानंददायी | १५५ |
| अरण्यरुदितापरी मम न | ६९ |
| अवरंगाच्या व्याजें | ५४ |
| अवरंगातें निंदिसि | ११३ |
| अशापरीचा करुनी महोत्सव | ९८ |
| असंख्य शत्रुचे वीर | ६९ |
| असुनि तरुदलें हिरवीं | १४७ |
| असें वदुनि रावणी | ३४ |
| असो दु:खमहानीक | ९० |
| अहो अधमता ! अहो कुटिलता ! | ८७ |
| अज्ञानानें सुतें केला | १६१ |
| आकाश घनापगमें | ७९ |
| आक्रीड जेंवि दिसतो | ३७ |
| आत्मीय म्हणुनि जपला | ७५ |
| आधारस्तंभ तुम्ही | ५३ |
| आबाचें बल भागिन | १३७ |
| आबाजिस शिवरायें | ३३ |
| आरोपणा धनुचिया क्षम | ७४ |
| आर्योत्कर्षसरोजा | ५३ |
| आशास्य अन्य दिसतें | १६१ |
| आश्चर्य गा महीपाला ! | १३८ |
| आसन्नमरण माता | १२९ |
| इतुक्यात वनान्तावरि | ४८ |
| इहलोकीं पिता माता | १९ |
| उगा कां स्वनाशा मिटी | १५९ |
| उच्चार विचारापरि | ३८ |
| उत्कृष्ट कोणता राजा ? | १२३ |
| उत्तम वक्ता, कोण ? प्रतिपक्षा | १२३ |
| उपकार करी साधू | २० |
| उभयपार्श्वनिषण्णहि | ३७ |
| उलथेल यवनवैभव | १५३ |
| एसाजी शिवमानस | १३१ |
| ऐकोनि ह्या स्थूलशिरो | ५६ |
| कंठावरि हा वार क्षिति | ७१ |
| कपिवरा मम राम | २६ |
| करगत जणुं लंकारूप | ४५ |
| कररूपें धनें धान्यें प्रजेचीं | ११० |
| कर्णाट, गुर्जर, कलिंग | ३४ |
| कर्तव्यपर पित्यापरि | १०६ |
| कलिशक्ति खरी कृत्या | २५,९५ |
| कशास भय दाविसी | ७५ |
| कष्टे देशहितास्तव | ३३ |
| कां कांपावा ? कुटिल | २० |
| काय असह्यतम जगीं | १२९ |
| काहीं कांहीं तरुंवर | १४५ |
| कांहीं काळ असें रण | १३१ |
| किंप्रभू जों करांच्या रू | १५ |
| किंप्रभूस दयान्यायासाठीं | ५९ |
| कुंकुमतिलकचि भालीं | ११२ |
| कुठें कोमला ही शिरीषापरी | १३६ |
| कुन्हाडीच्या दांड्या ! तव | १०५ |
| कृच्छ्रगतास यथाबल | ६४ |

| | |
|---|---|
| कृष्णवर्ण गरलांकित होते | १३७ |
| कोकांचें युग, पिकगान | १४३ |
| कोठें गिरीशधनु हें खलु | १३६ |
| कोठें लोकोत्तर तो पुरुष | १३६ |
| कोठें साध्वी दुराधर्षा | १५० |
| कोदण्डलसक अखण्ड | ७० |
| क्रोधाग्निनें त्वन्मुख रक्त | ५० |
| खचित तो मम आज | १५१ |
| खनी सौष्ठवाची, धुनी | ५१,८३ |
| खलभाषण मधुर तरी | १०१ |
| खलाला करणें बोध | ५९ |
| खाया न भाकर शिळी | ११६ |
| गजराज तो उभारुनि | २० |
| गाधिजें धरियली श्रुति | ६० |
| गिरिवरि ठायीं ठायीं | ४५ |
| गुरुजनोक्ति तुला दवडी तर | १० |
| गुरु शिष्यास दे विद्या | ११० |
| ग्राम द्विजें, श्रुतें द्विज | ८१ |
| ग्रामान्तराहुनि पती | १२२ |
| घालाग्राला नवा घाला | २५ |
| चरमगिरितटा जाउं लागे | ४३ |
| चित्तें वचनें देहें चिंती | ९२ |
| छत्र चामर ह्या चिन्हांविना | १०९ |
| जगीं श्रेष्ठ लका असे | १३१ |
| जना सुख मिळे मुळीं | १०० |
| जानि व्यर्थ शशाकाची | १४४ |
| जन्म उच्च कुलीं, बुद्धि | ११६ |
| जर तू शशशृंगाच्या | ६८ |
| जलधित शयनाला | ४५ |
| जलाच्या बिंदूनें सकल | १०५ |
| जवळि तेथ बसली वसुधा | १०३ |
| जळें नेत्र होते तिचे | १०४ |
| जिथें वाजल्या स्यदन | ११९ |
| जें सौकुमार्य ईचें तें | ७० |
| जो राज्याला प्रभु असि | ६१ |
| वरिताला पय देसी | ६० |
| डुलत झुलत खुलत | २७,१४८ |
| तटावरोनी जल पाहिल्यानें | ५४ |
| तत्त्वें तव बध असो | ८८ |
| तदंगद्युतीनें जणों | ४६ |
| तद्वंधहि नर घेती परि | ९६ |
| तयीं सूंच शय्यागृहीं | १३१ |
| तव गुण ईशकृपेनें फळले | १११ |
| तव मित्रता भुवि मिळेल | ८४ |
| तव सेना रिपुचें बल | ११७ |
| तव हस्तस्पर्शानें | ५७ |
| तानाजींचा असि नभि | ११७ |
| तानाजी जिज्ञासामुद्रेनें | १३० |
| ताराफेनविराजित | ५१ |
| ती सानंद वसे वनिं | ८९ |
| तुज जगीं लाधे सुख | १५९ |
| तुज नृपा ! रिपुसैनिक | ७७ |
| तुमचें कारुण्य फळो | २२ |
| तूं कालळावरि घना | ६५ |
| तूं जंबुकसा धूर्त, प्रतिभय | ३६ |
| तूं तुझेंच परि अंब ! पावना | ४० |
| तूं धेड, नको शिवुं मज | ६३ |
| तूं मलिन कुटिल नीरस | ५६ |
| तृषा शमविती जलें सुरभि | ९८ |
| तृषिता क्षुधिता अधना | ९३ |
| तें काळें बघुनि घनध्वान्त | ४८ |
| ते चापीं गुणखण्डन | १२५ |
| तेथ मातृभगिनीस पाहुनी | ९७ |
| तो अंध अवीर्य जरठ | ९३ |
| तो गर्भश्रीमंतहि साहाय्य | ९१ |
| तोच नृपति वंद्य असे | १२४ |
| तो न्यायी तरि न अदय | ९१ |
| तो भ्रष्ट तापस न आदरि | ९२ |
| तो सुखविलासरत तरि | ९१ |
| तो सुबाहु रघुवंशशरानें | ४७ |
| त्यजूनि निजबांधवां | ४० |
| त्यास न उत्तर देतां | ५७ |

| | |
|---|---|
| त्वज्जलीं जरि करी | १४८ |
| त्वद्वैरिसद्मांत गुरें उपाशीं | ६३ |
| त्वां धरिला असि हातीं | ११८ |
| दंत उडाले झाले केश | १५१ |
| दशमुखें मग मन्त्रिसुतां | ३२ |
| दशाननतनूस हा शर | ७० |
| दशानन नरान्तकादि | ३५ |
| दातृतेस देतसे अपूर्व कांति | १२८ |
| दासाची स्थिति दुःसह | १०० |
| दास्यत्व नीचास रुचे म्हणून | १५ |
| दास्यभुजगास्यक्षुरभुज | १५६ |
| दिवसाचीं कर्तव्यें | ५७ |
| दीनांचे हृदयतरू | १४८ |
| दुष्कर्मसिद्धि दुष्टाला | ७३ |
| देशप्रीति तयाची प्रेरी | १२६ |
| देशप्रीतिस माझ्या | १५६ |
| दैत्य म्हणों यवनां तर | ४९ |
| द्वीपीं क्रूर परि तुझ्या | ६७ |
| धनधान्यें करूवें प्रकृति | १०५ |
| धर्माची स्वजनाची परिसुनि | ६४ |
| धवलघनाकीर्ण नभीं | १४० |
| धावे तन्त्री, पळे, लोळे, | ८० |
| धेनूच्या चालाच्या कैशा रे | ६६ |
| ध्वजादि भूषाकरणें | १२८ |
| नको व्यर्थ मारीत | १५८ |
| नच्हि रामकार्मुकनिरस्त | १४२ |
| न पाळि जो रीति निसर्ग | ८७ |
| नभ तोयसेंहि नभसें | ४२ |
| नयनानंददायी हें | १५६ |
| नर पेचांत पडता नीचाचीं | ९६ |
| नराहुनि मही मोठी | १३२ |
| नलविरचित सेतू | ४५ |
| न लक्ष्मणावांचुनि राम | १०८ |
| न वरंग तो, असे तो | ५४ |
| न शिके त्याच्या बोल न | २४ |
| नसता पटल घनाचें | १०९ |
| नानाविध जिथें घाण | १२१ |
| नानाविध बिलासांत | २१ |
| नारदागमनानंद | १३९ |
| निधे लक्ष्मण साकेत | १०८ |
| निशाटबल घेउनी | ४१, ५२ |
| निशाटरुदितध्वनी | ४४ |
| निसर्ग कोणासहि न क्षमा | ८७ |
| निस्तेज वदन तव हें | १० |
| नीचाच्या संसर्गी | १४८ |
| नृपते ! औदार्यगुणें त्वा | ८४ |
| नेत्रें विशाल तेजस | १५३ |
| न्याय न, नीति न, धर्म | ११३ |
| पति अंध जरठ असतां | ९१ |
| पतिमुखविधु ह्या स्त्रीच्या | १२० |
| पतीच्या मृत्युची वार्ता | ६९ |
| परक्यांचें देश कुनृप | ८ |
| परदास्यात न रते | २६ |
| परिरम्भणकालीं त्वां पूर्वी | १३५ |
| परिशिला सुतनाश | १५१ |
| पवनापासुनि जन्मीं | १४९ |
| पहा उंच विस्तीर्ण हा वृक्ष | ११५ |
| पाकाची सामुग्री गृहें | ८ |
| पांग तिचें फेडाया | २६ |
| पाण्यानें भरलेली घागर | १० |
| पापकृतीत न एकहि | १४१ |
| पुढें घे अभिचा शेक | ९७ |
| पुनरपि तो वदला तिज | १०७ |
| पुरस्थ सारे जन | ५५ |
| पुरामध्यें कोसलकन्यका | १४१ |
| पूरें फोफावली वर्षा | १६० |
| प्रजावत्सलतेवीण न | १०९ |
| प्रतिपक्षास सभेमधिं | ८६ |
| प्रतिबिंबें रावणाचीं | १४५ |
| प्रभुनें केली सत्कृति तीनें | ११७ |
| प्रस्तरसंस्तरदुस्तर | २० |
| प्राणी क्षुद्राहि एकीनें | ९४ |
| प्रावृट्कालीन घनापरि | ३६ |
| प्लवगबालें इंद्रजित् | ५३ |
| बघ इंद्रजानु कपि हा | ११८ |
| बघ धूम्र ऋक्षसमुदाय | ८४ |
| बघ येथ एकहि दिसे | १४२ |
| बघुनि असें बल रामदर्शित | ९७ |
| बघुनि रघुपतीला | ४८ |

| | |
|---|---|
| बाहिर्गत करावया | ४४ |
| बिसिनीपत्राचे वरि | ९ |
| भवदु खरोगजर्जर | ५२ |
| भक्षावें नित्य जें अन्न | ९५ |
| भालीं जयाच्या विधुखण्ड | १२२ |
| भाषणांत मधुर वदन | ३८ |
| भुजगयुक्त सदन, दैत्यों | ७८ |
| भूरिविक्रम कुमार नवीन | ३४ |
| भूषणाविण ही ओढी | ८९ |
| भूषणांविणही ही स्त्री | ८९ |
| भेकास सर्प, सर्पास | ३९ |
| मग दशानन तेथुनि | ९९ |
| मज दशाननभूति असे | ९९,१५१ |
| मजसि कीर्तिसवें मिळवा | १०७ |
| मजसि मूर्ति दिसे | १४६ |
| मनरंजक गोष्टी तुज | १६ |
| मनिं तो म्हणे सुकृत मम | १२० |
| मम रमणा मजसाठीं | ९ |
| मम शांति, बुद्धि, गृहिणी | १४६ |
| मसीनामक जें द्रव्य | १३८ |
| महात्मा हा नृप रणीं | ८६ |
| मागिल पद लांबवुनी | १०४ |
| मिटोनीच डोळे दिना | १५८ |
| मी अपराधी, मी अनुतप्त | ५१ |
| मी जातों गांवा हें | ६३ |
| मी येथ गोळा कुसुमें करीन | १० |
| मुख गोड तें चिमुकलें | १११ |
| मुनि तोषला बघुनि ही | १०१ |
| मुलाचे गालबोटानें | ७३ |
| मृदुलतनु कुठें जानकी | १३६ |
| मोहक मुख, गोंडस वपु | ८२ |
| मौन्यत्व हें साधन बालिशांस | १४ |
| मौलाना अहमद मी | ५० |
| यमकिंकरसे भीषण | ३६ |
| यवना काळ असा | १४६ |
| येई विनय विद्येनें, विनय | १२७ |
| योजकाची असे प्रौढी | ९५ |
| रघुनाथकार्मुकनिरस्त | ४६ |
| रत्नसमृद्ध, गंभीर | १५४ |
| रविनें ताप त्यजिला | ६८ |
| राघव प्रकृतिक्षेमचिंतनीं | ३९ |
| राघवास कोपवून | २१ |
| राजत्व अधिकारानें | ७९ |
| राजपदास्थित होता | ६१ |
| राजास काय भूषण ? जन | १२४ |
| राज्यांत समृद्ध पुरें | १४१ |
| रामापरीच भुजविक्रम | ४० |
| रामासि हीच, द्विजलाहि | १३४ |
| रामें सभेंत चुरिता | ७४ |
| रावणें भूमिकन्येला | २२ |
| राक्षस यवनास म्हणों | ४९ |
| राक्षसाधिप ऐकता | २२ |
| रिपुस दण्ड झटे करुं | १३६ |
| लक्ष्याच्या ऐल वा पैल | १२४ |
| वचन वद असें कीं | १५ |
| वज्रभग नर तो | ५९ |
| वर्षर्तुच्या आगमनें | ८३ |
| वर्षर्तुनें माज तुला न | १५९ |
| वाल्मीक्यादि कवि | १[illegible] |
| विद्युत्पातें ताडित वप्र | ३३ |
| विद्येस विनयें शोभा | १२७ |
| विधिचातुरी सदेहा | ५१ |
| विधु हससा धवलरूप | ४२ |
| विधू समुद्राप्रति कांति | १२७ |
| वियोगज्वरें अंगकांती | १०४ |
| विवेकानुसारें रहावें | २८ |
| विश्वासपात्र, देशोद्धारेच्छु | १२१ |
| विश्वाहुनि देव महा | १३२ |
| वृष्टिनें जलद, घर्षणें मणी | ७९ |
| वृक्षस्थां परिसुनि गान | १४२ |
| वृक्षा ! त्वज्जन्मसाफल्य | १५९ |
| वेदाचा घोष मधुर होता | ११९ |
| वेदोपनिषदा ग्रंथ | ८६ |
| शबरांचा सेनापति मातंगक | १०२ |
| शर भरोत सुखें तुमचे | ११४ |
| शरानुसृत तो काक | ८० |
| शरीरें सती टेकली शिंशपा | १०४ |
| शर्याति रामसा नृप | ४१ |

शांतिहेतुकचि शत्रुकुल १२५
शास्त्री पंडित वैदिक वैद्य ११९
शिखा अमित वन्हिच्या ८०,१०३
शिरीं कर्तृत्ववंताच्या ७५
शिवबाचा खड्ग न तो ५५
शिवबानें पोटावरि १३१
शुकतुण्डीं पडे भृंग १४३
शुचिगुण हिंदूचे शिरिं ११३
शुचि वधू तव, तूं शुचि १३४
शैवालें पंकज खुले ७६
शोक ओसरावयास तीस ६७
श्रीराम प्रणयविमोह ४७
श्रीराम लक्ष्मण कुमार २४
श्रीविराजित तो तरी ९०
श्रेयस्कर काय नरा ? १२४
संकटांत उडी टाकी १९
सकलही कलहीं कनका २६
सज्जनांचीं संकटें जीं ७५
सदसद्विवेक तुजला १०६
सदा श्रीस लाधे अरुद्धा ४४
सदा सत्पथ लोकास २५
समस्त पुरिं हिंडले १०३
समीरें तिचे हालले १०४
सर्वांस सर्व देसी ही १०६
सलिलावगाहविधिनें ६१
संसारीं सार मानुष्य १३२
साधु सदा सकलांना २०
साधुसमागम शुचिता १२६
साधुसमागम सुखकर ८५
साधू कोण म्हणावा ? जो १२३,१२४
साधूशीं नम्रपणें वागे ९६
सासू अंधवधिर मम १२९
साहस शौर्यादि गुणां १०९
सीताक्षिस्मरण मृगीदृशा १४२
सुमाढ्य वल्लीविटपां प्रभंजन ११०
सुवर्णाचिया पंजरीं ६५
सूचिभेद्य तम आश्रय ८३
सूचीच्या अग्रांपरि १८,१५४
सूर्यास दडूं न शके १४०
सेवाप्राप्ति स्वीकारि त्या ६४
सौंदर्यबाडिश टाकुनि ६०
सौंदर्य मला भुलविल ६८
स्त्रिया जन्मविती १४९
स्निग्धश्यामल रामाला १४३
स्त्रीजातीला त्यजुनि ६२
स्पर्शितो नच वन्हीला ९७
स्फुलिंग उठले तदा ४३,१०३
स्वताच्या सुखाची न चिंता ७७
स्वदेश बुडवावया २४
हर्यक्षासह झगडू बघतां ६७
हर्षे दस्यू विपिनिं ३७
हस्तिदन्त व्याघ्रचर्म १२८
हा काकपक्षधर कोमल ७३
हा तानाजी नाहीं मेलेल्या १५९
हा यत्न माझा न फळास आला १५
हा हन्त ! हाहा ! चिरिली ५४
हिंदूचिया हिताच्या १५०
हिंदूच्या धर्मास न रक्षण ११४
हिंदूधर्माचीं तुज तत्त्वें ८८
हें सभालय दीर्घविस्तर ११७
होउनि गेले राजे आजवरि ४१
होओ उच्चकुलीं जन्म ९५
होओनि उदित दिनकर ५६
होतसे नम्र सुजन १६०
होतले विरहिणीस निशाप १०१
होतांच तूं क्रुद्ध नृपा ७७
ह्या काफिरास रोधूं १३५
ह्या चारीही होत्या मूर्ती ४८
ह्या परराज्यात न पुर १४१
ह्या यवनाच्या कज्जल १४७
ह्या यवनांस पशू ही ४९
ह्या विपिनांतिल पादप होते ६९
क्षपणा कृपणा दूर टाळी ९८
क्षमा वस्तु नसे ठावी २७
क्षुद्र तो मुसलध्वनी ११९
क्ष्वेडसे दशकंठकंठ २३

# विद्याधर वामन भिडे यांचीं पुस्तकें

**१ राघवीयपरीवाह, पूर्वार्ध**,—सर्ग १ ते १० ह्या पूर्वार्धांत रामजन्मापासून तो पंचवटींत सीतेला चोरून न्यावयाला रावण आला येथपर्यंतचा कथाभाग ग्रथित केला आहे. संस्कृतातील महाकाव्यांच्या पद्धतीवर हें काव्य रचिलेलें आहे. वर्णनाचा ओघ, अलंकार, भाषा, रचना,, शुद्धता, वगैरे संबंधानें हें काव्य उत्कृष्ट आहे. अनेक पंडितांनीं हें काव्य प्रशंसिलेलें आहे. पद्यसंख्या ८६४. किंमत बारा आणे

**२ मंदारमंजरी इ०**—हा अठ्ठावीस काव्यांचा संग्रह असून यावर विद्वानांचे प्रशंसापर अभिप्राय आहेत. पद्यसंख्या १००७. किंमत बारा आणे

**३ गजेंद्रमोक्ष इ०**—हा बावीस काव्याचा संग्रह आहे. पद्यसंख्या ११०३ किंमत बारा आणे.

**४ रथरूपक इ०**—हा एकवीस स्फुट काव्यांचा संग्रह आहे पद्यसंख्या ११३६ किंमत बारा आणे.

**५ जीवजागृति**—ह्या संग्रहात सुमारें २५० विषयांवर कवीचे विचार असून त्यांत सुमारें १६० भिन्न भिन्न गणवृत्तांत रचना केलेली आहे. पद्य संख्या सुमारें १३००. किंमत बारा आणे.

**६ राघवीयपरीवाह, उत्तरार्ध**—सर्ग ११ ते २२ ह्या उत्तरार्धांत सीतेच्या शोधार्थ राम निघाला येथपासून तों रामाला राज्याभिषेक झाला येथपर्यंतचा कथाभाग आला आहे पद्यसंख्या १२१६ किंमत बारा आणे.

**७ आनंदाची मूर्ति इ०**—ह्या पदसंग्रहात अनेक गोड चालींवरचीं सुमारें ८० पदें असून तीं सामाजिक, नैतिक, वैराग्यपर, आत्मपर, बोधपर, सृष्टिवर्णनपर, तात्त्विक, अशा अनेक विषयांवर आहेत, तीं सर्व सुबोध आहेत. किंमत बारा आणे

**८ कमळीची सुटका**—हें २०९ आर्यांचें काव्य आहे. अवरंगजेबानें पळवून नेलेल्या कमळी ह्या नावाच्या एका ब्राह्मणकन्येची सुटका शिवाजीनें केली, त्या प्रसंगाचें ह्या खण्डकाव्यात बहारीचें वर्णन आहे किंमत चार आणे.

**९ पिलाजी आणि शिवाजी**—पिलाजी ह्या नांवाच्या एका वृद्ध मराठ्याला त्याच्या सावकाराच्या ऋणांतून शिवाजीनें कसें मुक्त केलें, आणि त्याच्या मुलीला एक रणशूर मराठा मुलगा पति मिळवून दिला, ह्या प्रसंगाचें वर्णन १२३ आर्यांच्या ह्या खण्डकाव्यांत चटकदार रीतीनें केलेलें आहे. किंमत दोन आणे

**१० अर्थालंकारांचें निरूपण**—सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. अर्थालंकार ह्या विषयावर ह्याच्या इतकें मोठें पुस्तक आजपर्यंत मराठींत झालेलें नाहीं. ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत लक्षणा, रस, काव्य, रीति, गुण, अनुप्रास, अलंकार, वगैरे पारिभाषिक शब्दांची सरळ आणि सोप्या शब्दांत लक्षणें दिलेलीं असून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत नंतर मुख्य ग्रंथांत ६१ अर्थालंकारांचें निरूपण केलें आहे. प्रत्येक अलंकाराचें लक्षण, लक्षणाच्या स्पष्टीकरणार्थ भरपूर उदाहरणें, प्रत्येक उदाहरणाचा अनुवाद आणि समन्वय, ह्या गोष्टी दिल्या आहेत. प्रत्येक अलंकाराचें निरूपण संपल्यावर विद्यार्थ्याला स्वताच्या बुद्धीनें अलंकार ठरविण्यासाठीं कांहीं पद्यें दिलीं आहेत अशा रीतीनें ह्या ६१ अलंकारांचें निरूपण समाप्त झाल्यावर विविध माहितीचीं पांच परिशिष्टें दिलीं आहेत नंतर १६५ गद्य आणि पद्य उतारे विद्यार्थ्यानें स्वत अलंकार ठरविण्यासाठीं दिले आहेत, आणि शेवटीं सर्व पारिभाषिक

शब्दांची एक आणि पद्याची एक अशा दोन अनुवर्ण सूची दिल्हा आहेत पृष्ठसंख्या सुमारें २५०. किंमत एक रुपाया

**११ साहित्य कौमुदी**—मम्मटाच्या काव्यप्रकाश ह्या ग्रंथाच्या १,२,३,९, आणि १० ह्या उल्लासाच्या आधारानें हा ग्रंथ लिहिलेला असून त्यांतील लक्षणें पद्यांत दिलीं आहेत; तेणें करून तीं लक्षणें विद्यार्थ्यांना पाठ करण्याच्या सोयीचीं आहेत. प्रत्येक पारिभाषिक शब्दाचें लक्षण पद्यांत दिलेलें असून त्याच्या स्पष्टीकरणार्थ भरपूर उदाहरणें देऊन समन्वय करून दाखविला आहे. शेवटीं पारिभाषिक शब्दाची एक आणि उदाहरणपद्यांची एक अशा दोन सूची दिल्या आहेत. पृष्ठसंख्या १७२. किंमत एक रुपया.

**१२ मराठी भाषेचा सरस्वतीकोश**—ह्या कोशांत आज मराठी भाषेंत प्रचलित असलेले सर्व शब्द आणि अप्रचलित असलेले बरेच शब्द समाविष्ट करण्यांत आलेले आहेत . शब्दांच्या व्युत्पत्ति शक्य तेथें दिल्या आहेत कोशाच्या शेवटीं विविध माहितींची सतरा परिशिष्टें दिलीं आहेत, त्यांत हरएक प्रकारची उपयुक्त माहिती दिली आहे ह्या कोशाची पृष्ठसंख्या २०६० च्या वर आहे. किंमत आठ रुपये टपाल हशील सव्वा रुपाया.

**13 A Concise Sanskrit-English Dictionary**. Pages 1228 of Demi 8 vo size Price. Rs 4

**१४ मराठी भाषेचे वाक्प्रचार आणि म्हणी इ०**—ह्या पुस्तकांत वाक्प्रचार आणि म्हणी यांचें विवरण असून शिवाय मराठीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाचे इतर सर्व विषय आहेत शिवाय २६ पानांची सूचीही पुस्तकाला जोडली आहे पृष्ठसंख्या ५३६. किंमत पावणे दोन रुपये

**१५ निबंधलेखन आणि अनुवाद**—निबंध कसे लिहावे हें विद्यार्थ्यांस समजावून देऊन सुमारें पन्नास निबंध लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत अनुवाद कसा करावा हें विद्यार्थ्याला सांगितलेलें असून सुमारें वीस उताऱ्याचे अनुवाद करून दाखविले आहेत पृष्ठसंख्या १७२. किंमत आठ आणे.

**१६ मराठी शब्दांचें उद्घाटन**—ह्या निबंधांत मराठी शब्दांच्या मार्मिक अभ्यासापासून आपणा, मराठ्याच्या इतिहासाचें, नीतिमत्तेचें, वगैरे ज्ञान आपणांस कसें प्राप्त होतें, हें मोठ्या मनोरंजक रीतीनें सांगितलें आहे किंमत आठ आणे.

**१७ मराठी म्हणींविषयीं चार शब्द**—ह्यांत मराठी भाषेंतील म्हणींच्या अभ्यासापासून आपणांस कशी विविध आणि मनोरंजक माहिती मिळते, हें सांगितलें आहे. म्हणींतील अलंकार हा भाग विशेष मनोरंजक आहे आवृत्ति दुसरी. पृष्ठसंख्या ८०. किंमत चार आणे

**१८ कोरलईचा किल्लेदार**--ही मनोरंजक आणि रहस्यपरिप्लुत कादंबरी ७५० पानांची असून ती वाचावयाला हातीं घेतली असतां समाप्त झाल्याशिवाय सोडवत नाहीं किंमत चार रुपये.

**१९ मुरारि अथवा शिवाजीची एक प्राथमिक मोहीम**—शिवाजीनें भोपाळगड कसा जिंकून घेतला ह्याची मनोरंजक हकीगत सांगितली आहे पृष्ठसंख्या २२०. किंमत दोन रुपये

**२० कैंजळगडाचा कबजा**—शिवाजीनें कैंजळगड कसा जिंकून घेतला ही ह्या कादंबरीत मनोरंजक हकीगत आहे. पृष्ठसंख्या २०० किंमत दोन रुपये

**२१ पण तिसरा कोण ?**—शिवाजींनें भैरवगड आणि जंगली जयगड हे दोन डोंगरी किल्ले मुसलमानांपासून कसे जिंकून घेतले ह्या प्रसंगाची हकीगत ह्या कादंबरींत सांगितली आहे ही कादंबरी रहस्यपूर्ण आणि अत्यन्त मनोरंजक आहे पृष्ठसंख्या ३५७ किंमत १रु. १२ आणे.

**२२ गणवंगडाचा गडकरी**—ही कादंबरी २७८ पानाची असून ती रहस्यपूर्ण आहे. ती शिवाजीच्या उदयकाळावरची असून तींत शिवाजीनें गणवतगड कसा हस्तगत करून घेतला, हा विषय आहे. किंमत पावणेतीन रुपये.

**२३ प्रपितामहाच्या पदावर**—शिवाजीनें दातेगड जिंकून घेतल्याची रहस्यपूर्ण आणि मनोरंजक हकीगत ह्या ३०१ पानांच्या कादंबरीत निवेदिली आहे. किंमत अडीच रुपये

**२४ अंबाजीरावाची साडेसाती**—अंबाजीराव नांवाच्या एका मराठ्याला साडेसाती कशी भोवली ह्याचें चित्रवेधक वर्णन असून प्रसगानुसार ग्रामसुधारणा, शुद्धीकरण, इत्यादि विषयांचें वर्णन आलें आहे. ही कादंबरी रहस्यमय आणि चटकदार आहे पृष्ठसंख्या सुमारें २००. ( अद्यापि अमुद्रित )

**२५ सवाईराव, एका गुलामाचें स्ववृत्तकथन**—ही कादंबरी अनेक लोमहर्षण आणि रहस्यमय प्रसगांनीं चित्ताकर्षक झालेली असून ग्रामसटघना, शुद्धीकरण, अस्पृश्यताविवेक, इत्यादि विषयांवर तत्कालीन थोर पुरुषांचें विचार ग्रथित केलेले आहेत पृष्ठसंख्या सुमारें ३०० ( अद्यापि अमुद्रित )

**२६ चिमुकलें रामायण**—यांत रामाची कथा मुलाना समजेल अशा सोप्या भाषेंत लिहिलेली असून त्याच्या आजपर्यंत अनेक आवृत्त्या निघालेल्या आहेत ह्या पुस्तकात सात चित्रें घातलेलीं आहेत पृष्ठसंख्या ६८ किंमत चार आणे

**२७ अकरा मनोरंजक गोष्टी**—ह्या पुस्तकांत आम्हीं भिन्न भिन्न वेळीं भिन्न भिन्न मासिकात छापविलेल्या अकरा चटकदार गोष्टी संकलित करून छापलेल्या आहेत पृष्ठसख्या २२८ किंमत एक रुपाया.

**२८ मुक्तामाला**—कविवर्य मोरोपत ह्यांचें ११५ आर्यांचें सस्कृत काव्य कै० वा० विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं मराठी अर्थासह छापिलें होतें त्याची सुधारून वाढविलेली ही आवृत्ति आहे. पृष्ठसख्या ४१ किंमत चार आणे

**२९ सरोजिनी**—बगाली भाषेंतील दे ह्या नांवाच्या कादंबरीकाराच्या ‘ माओ मेये ’ ह्या बगाली कादंबरीवरून विद्याधर वामन भिडे यांच्या पत्नी सौ० सरस्वतीबाई भिडे यांनीं सरोजिनी ही कादंबरी मराठींत रचिली आहे ह्या सामाजिक कादंबरीचें संविधानक साधें आणि सरळ असून अत्यंत मनोरजक आहे. पृष्ठसख्या १४६ किंमत एक रुपाया

**टीप**—वरील यादींतील ८, ९ हीं पुस्तकें काव्यरत्नावली ऑफीस, जळगाव, पूर्व खानदेश, येथें मिळतील,

१८,२०,२१ हीं पुस्तकें भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, येथें मिळतील

१९,२२,२३, हीं पुस्तकें ए पी बापट, बुधवार पेठ, पुणें, येथें मिळतील

बाकीची सर्व पुस्तकें चित्रशाळा प्रेस, पुणें, येथें मिळतील